‘‘संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास’’

साहित्य आणि ललित कला अभ्यास मंडळ अंतर्गत

पीएच.डी. पदवीसाठी मराठी विषयात

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

यांना सादर केलेला शोध प्रबंध

संशोधक

सौ. कल्पना साहेबराव काशिद

पी.आर.एन. क्रमांक : १३१०००४४७८

मार्गदर्शक

डॉ. रामचंद्र देखणे

विभाग

श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, पुणे

२०१९

–: मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र :–

प्रमाणित करण्यात येते, की टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे आंतरविद्याशाखा (मराठी विभाग) विषयांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी 'संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास' हा शोधप्रबंध सादर करण्यात आला आहे.

हा शोध प्रबंध सौ. कल्पना साहेबराव काशिद यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला असून, संबंधित संशोधन कार्य त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवी व परीक्षेकरिता वापरलेला नाही. सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

स्थळ :

दिनांक :

डॉ. रामचंद्र देखणे
मार्गदर्शक

–: संशोधकाचे प्रमाणपत्र :–

मी, प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, 'संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास' हा शोधप्रबंध मी स्वतः पूर्ण केलेला आहे. तो इतर कोणत्याही विद्यापीठातील पदवीकरिता अगर परीक्षेकरिता सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे

दिनांक :

सौ. कल्पना साहेबराव काशिद
संशोधक

–: अर्पणपत्रिका :–

''जो जे वांछील तो तें लाहो। प्राणिजातं ।।'' असे अवघ्या विश्वाला दान देणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि 'एकमेकां सहाय्य करू अवघे धरू सुपंथे ।' असे सांगत विश्वात्मकतेच्या भावनेने बांधून ठेवणारे जगद्गुरू संतशिरोमणी संत तुकाराम महाराज व लोकजीवनाकडे विशाल दृष्टीकोन ठेवून आपले योगदान देणारे लेखक, रचनाकार, कलाकार, अशा ज्ञात व अज्ञात बांधवांना, तसेच ''संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' या विषयातील संशोधनाचे मूळ प्रेरणा पाठबळ देणारे माझे सासरे कै. आनंदराव काशिद–पाटील, तसेच संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची निर्मितीस्थान असलेल्या भंडारा डोंगरावरील मंदिर जिर्णोद्धाराच्या कार्यात वाहून घेणारे माझे पती श्री. साहेबराव काशिद–पाटील व त्यांचे सहकारी, बंधू अरविंद शेवकर, दामोदर शिंदे, ढमाले मामा, जगन्नाथ पाटील, जोपाशेट पवार, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. श्रीपाद भट, गुरूवर्य डॉ. रामचंद्र देखणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रेरणास्थान लोकमान्य बाळकृष्ण गंगाधर टिळक यांना सादर अर्पण...

* * *

–: ऋणनिर्देश :–

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती या पदवीसाठी 'संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास' या प्रस्तुत शोध प्रबंधासाठी संत साहित्याचे गाढे अभ्यासक भारूडकार, प्रवचनकार, कीर्तनकार म्हणून ज्यांची ख्याती असे व्यासंगी व्यक्तिमत्त्व डॉ. रामचंद्र देखणे यांचे प्रभावी मार्गदर्शन प्राप्त झाले. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहन व प्रेरणेमुळेच या शोधप्रबंध पूर्णत्वास नेणे शक्य झाले. याचबरोबर या संशोधन कार्यासाठी ज्यांनी मला सहकार्य केले व वेळोवेळी प्रोत्साहन देऊन मदत केली त्यांचे ऋण मानणे हे माझे आद्यकर्तव्य आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील सौजन्यशील व्यक्तिमत्त्व विभागप्रमुख डॉ. श्रीपाद भट यांनी दिलेल्या मार्गदर्शनपर सूचना व संशोधन मांडणी आराखड्याचे ज्ञान यामुळे संशोधनाची दिशा आणि मांडणी स्पष्ट करण्यास साहाय्यभूत ठरले. तसेच डॉ. सदानंद मोरे यांचेही बहुमोल सहकार्य लाभले. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ. सुनंदाताई यादव, भागवतताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे बहुमोल पाठबळ लाभले. त्यामुळे मी सर्वांच्या ऋणातच राहणे पसंत करीन.

स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे ग्रंथपाल आणि त्यांचे सहकारी यांनी मैत्रत्वाच्या नात्याने सहकार्य केले. सदर संशोधनासाठी संदर्भ ग्रंथ स्वतः मार्गदर्शक डॉ. रामचंद्र देखणे सर, गुरूबंधू लोकमत पिंपरी–चिंचवड विभागाचे वरिष्ठ पत्रकार विश्वास मोरे, गुरुबंधू रामायणाचार्य संजयमहाराज पाचपोर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, पुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील जयकर ग्रंथालय, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी येथील ग्रंथालय व प्रमुख वंदनीय कुऱ्हेकरबाबा आदींसारख्या व्यक्तींनी ग्रंथरूपी सेवा देऊन मला संशोधनासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक अभार मानते.

एखाद्या कार्यात प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या अनेकांची मदत लाभत असते. माझे सासरे कै. आनंदराव नारायणराव काशिद–पाटील यांच्या पुरोगामी विचारसरणीमुळे मला विवाहोत्तर शिक्षण

पूर्ण करण्याची संधी मिळाली व त्यांच्या बहुमूल्य पाठिंब्यामुळे मी पीएच.डी.पर्यंत येऊ शकले. तसेच माझे पती साहेबराव आनंदराव काशिद–पाटील यांची भंडारा डोंगराची निःस्पृह व अविरत सेवा पाहून मी, संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांच्या गाथेतील अभंगांच्या चिंतनाद्वारे या संशोधनास प्रवृत्त झाले. त्यामुळे त्यांच्याही ऋणातच राहीन.

संशोधनाच्या कार्यात कुटुंबीयांचेही मोठे योगदान असते. माझ्या संशोधन कार्याकडे प्रोत्साहनरुपी कौतुकाने पाहणाऱ्या माझ्या सासूबाई कृष्णाबाई, वडील जयवंतराव गायकवाड, आई कुसुम गायकवाड, भाऊ सदानंद, मुकेश गायकवाड, दीर राजेंद्र, संजय, संभाजी काशिद, जाऊ रेश्मा, आरती, विद्या, नणंदा निशाताई, सारिकाताई यांनी सतत प्रोत्साहन दिले. तसेच माझी ज्येष्ठ कन्या ज्ञानेश्वरी, वेदांती व मुलगा अभंग, भाचा अजय हिंगे, कांताराम जाधवसर, अरविंद शेवकर, संभाजी पवार, बाबुराव गरूड, अरुण गरूड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

त्याचबरोबर प्रस्तुत शोध प्रबंधाचे मुद्रण करणारे, तसेच प्रबंधाची आकर्षक मांडणी करणारे 'संकल्प एंटरप्रायजेस ॲण्ड पब्लिकेशन'चे व्यवस्थापक विष्णू पांडुरंग मांजरे, मुद्रितशोधक दै. प्रभातचे सहसंपादक श्रीकृष्ण खंडू पादीर, मनोज मोरे, लोकमत पिंपरी–चिंचवडचे संपादक विश्वास मोरे व सौ. कविता मोरे यांचेही मी आभार मानते.

* * *

–: अनुक्रमणिका :–

अ.क्र.	प्रकरण	पान क्रमांक
१)	प्रकरण पहिले : संशोधन विषयाची ओळख	१ ते ११
२)	प्रकरण दुसरे : संशोधनाचा पूर्वाभ्यास	१२ ते १५
३)	प्रकरण तिसरे : संशोधन नमुना निश्चिती	१६ ते २२
४)	प्रकरण चौथे : प्रतिपाद्य विषय – माहिती संकलन विश्लेषण, आणि अर्थनिर्वेचण ४.१ संत तुकाराममहाराज – व्यक्ती आणि वाङ्मय ४.२ संत तुकाराममहाराजांची अभंग गाथा – स्वरूप व वाटचाल ४.३ संत तुकारामांच्या अभंगवाणीतील लोकजीवन – स्वरूप व वर्गीकरण ४.४ संत तुकाराममहाराजांचे लोकजीवनातील कार्य ४.५ संत तुकाराममहाराजांच्या अभंगांतील लोकजीवनाचा आढावा ४.६ अभंगाची भावविश्वता (लोकजीवनातील म्हणी, वाक्प्रचार, शेतीसंदर्भ आणि लोकाचार) ४.७ अभंगांचे घटक व लोकजीवनावरील भाष्य – संदर्भ	२३ ते २५४
५)	प्रकरण पाचवे : उपसंहार, संशोधनाचा सारांश, निष्कर्ष	२५५ ते २७२
६)	संदर्भ ग्रंथसूची, परिशिष्ट	२७३ ते ३१७

* * *

प्रकरण पहिले :

१.१ : संशोधनाचे प्रास्ताविक

१.२ : संशोधन विषय

१.३ : संशोधन आवश्यकता

१.४ : संशोधन समस्या

१.५ : संशोधनाचे महत्त्व

१.६ : संशोधनाची उद्दिष्टे

१.७ : गृहीतके

प्रकरण दुसरे

२.१: संशोधनाचे प्रास्ताविक

२.२: संशोधन समस्या निश्चिती

२.३: संशोधन आढावा

२.४: संशोधन पूर्वाभ्यास

प्रकरण तिसरे

३.१ : संशोधन नमुनानिश्चिती

३.२ : संशोधनाची कार्यपद्धती

३.३ : माहिती संकलनाची साधने व तंत्रे

प्रकरण चौथे

४.१ : संत तुकाराम – व्यक्ती आणि वाङ्मय

४.१.१ : प्रास्ताविक

४.१.२ : श्रीक्षेत्र देहू

४.१.३ : तुकाराममहाराजांचे चरित्र

४.१.३.१ : जन्म व बालपण

४. १.३.२ : वंशावळ

४. १.३.३ : तुकारामांचे प्रापंचिक जीवन

४. १.३.४ : एकांतवास

४. १.३.५ : गुरूपदेश

४. १.३.६ : तुकारामांचे कवित्व

४. १.३.७ : परमार्थ साधना

४. १.३.८ : तुकाराममहाराज यांचा छळ

४. १.३.९ : अनगडशाहा – बहिणाबाई यांची भेट

४. १.३.१० : निर्वाण वैकुंठगमन

४.२: तुकाराममहाराजांची अभंग गाथा – स्वरूप व वाटचाल

४.२.१ : प्रास्ताविक

४.२.२ : अभंगाची निर्मिती आणि वाटचाल

४.२.२.१ : एकनाथमहाराज

४.२.३ : अभंगाचे स्वरूप आणि भूमिका

४.२.४ : संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास, भक्तिमार्ग व तत्त्वज्ञान

४.३ : तुकारामांच्या अभंगवाणीतील लोकजीवन – स्वरूप व वर्गीकरण :

४.३.१ : प्रास्ताविक

४.३.२ : अभंगांचा क्रमवार आढावा

४.३.३ : विषयवार अभंग संख्या

४.३.४ : अभंगांचे वर्गीकरण

४.३.४.१ : स्वानुभवपर अभंग

४.३.४.२ : आत्मपर अभंग

४.३.४.३ : करुणापर अभंग

४.३.४.४ : उपदेशपर अभंग

४.३.४.५ : निर्वाणपर अभंग

४.३.४.६ : विरहिणीपर अभंग

४.३.४.७ : अद्वैतपर अभंग

४.३.४.८ : बालक्रीडापर अभंग

४.३.४.९ : रूपकात्मक अभंग

४.३.४.१० : विठ्ठल भक्तिपर अभंग

४.४ : तुकाराममहाराजांचे लोकजीवनातील कार्य :

४.४.१ : प्रास्ताविक

४.४.२ : लोकजीवनाची ओढ व प्रेरणा

४.४.३ : लोकजीवनातील पारमार्थिक जागृती

४.४.४ : संत तुकारामांचे आध्यात्मिक सार

४.४.५ : लौकिक जीवनाचा सार

४.४.६ : आध्यात्मिक समतेची प्रेरणा

४.४.७ : सामाजिक लोकजीवनातील विषमता

४.४.८ : नैतिकतेचा पुरस्कार

४.४.९ : लोकजीवनाचा आत्मिक विकास

४.४.१०: सामाजिक अंधश्रद्धा

४.४.११: लोकजीवन ज्ञानेश्वर, एकनाथ व बहिणाबाई

४.४.११.१ : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज

४.४.११.२ : संत एकनाथमहाराज

४.४.११.३ : संत बहिणाबाई

४.४.१२: ऐतिहासिक आढावा

४.४.१३: तुकोबांची राष्ट्रजागृती

४.४.१४: तुकोबांच्या अभंगातील सांस्कृतिक जीवन

४.४.१५: तुकारामांचे तत्त्वचिंतन व संकल्पना

४.४.१६: तुकारामांचे व्यावहारिक ज्ञान व सामाजिक बांधिलकी

४.५ : तुकाराममहाराजांच्या अभंगांतील लोकजीवनाचा आढावा :

४.५.१ : प्रास्ताविक

४.५.२ : लोकजीवन व्याख्या व व्याप्ती

४.५.३ : महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा

४.५.४ : महाराष्ट्राचा सांस्कृतिक कालखंड

४.५.५ : संतसाहित्य व सांस्कृतिक दर्शन

४.५.६ : गाथेतील समाज दर्शन

४.५.६.१ : गावगाडा

४.५.६.२ : जाती, पोटजाती, वर्ण, बलुतेदार

४.५.७ : तुकारामांचे कुटुंब

४.५.८ : अभंग, मातृ–पितृ जिव्हाळा

४.५.९ : नाती – गोती

४.५.१० : स्त्री जीवन

४.५.११ : पाळणा

४.५.१२ : सण – उत्सव

४.५.१३ : नृसिंह जयंती

४.५.१४ : लोकधर्म

४.५.१४.१ : देव, मूर्ती देवळे

४.५.१४.२ : पोथ्या–पुराण

४.५.१४.३ : पूजा – अर्चा

४.५.१४.४ : जत्रा – यात्रा

४.५.१५ : निसर्ग–पर्यावरण–कृषिसंदर्भ

४.६ : अभंगातील भावविश्वता

(लोकजीवनातील म्हणी, वाक्प्रचार, शेतीसंदर्भ आणि लोकाचार)

४.६.१ : प्रास्ताविक

४.६.२ : लोकजीवनाचा पाठीराखा विठ्ठल

४.६.३ : लोकजीवनातील तुकोबांचे भावकाव्य व तत्त्वज्ञान

४.६.४ : लोकजीवनातील तुकोबांचे काव्य अलंकार

४.६.५ : अभंगांची अवतरण क्षमता, भाषाशैली व वैशिष्ट्ये

४.६.६ : अभंगातील म्हणी व वाक्प्रचार

४.६.६.१ : म्हणी

४.६.६.२ : वाक्प्रचार

४.६.७ : शेती संदर्भातील अभंग

४.६.८ : लोकगीते व लोककथा

४.६.९ : शिदोरी काल्याचे अभंग

४.६.१० : खेळासंदर्भातील अभंग

४.६.१०.१ : विटी–दांडूचे अभंग

४.६.१०.२ : टिपरीचे अभंग

४.६.१०.३ : हमामा / हुतुतू

४.६.११ : दळण–कांडण

४.६.१२ : लोकाचार

४.६.१३ : देव–धर्म, शकुन–अपशकुन

४.७ : अभंगांचे घटक व लोकजीवनावरील भाष्य – संदर्भ

४.७.१ : प्रास्ताविक

४.७.२ : लेखकांचे लोकजीवनाविषयीचे मत

४.७.३ : गृहीतके

प्रकरण पाचवे :

उपसंहार – संशोधनाचा सारांश आणि निष्कर्ष

५.१ : प्रास्ताविक

५.२ : निष्कर्ष (उपप्रकरणानुसार)

५.३ : पुढील संशोधनाची दिशा

५.४ : निष्कर्ष

* * *

प्रकरण पहिले

१.१ : संशोधनाचे प्रास्ताविक

१.२ : संशोधन विषय

१.३ : संशोधन आवश्यकता

१.४ : संशोधन समस्या

१.५ : संशोधनाचे महत्त्व

१.६ : संशोधनाची उद्दिष्टे

१.७ : गृहीतके

प्रकरण पहिले

१.१ संशोधनाचे प्रास्ताविक :

महाराष्ट्रामध्ये अध्यात्मिक लोकशाहीचा पाया भागवत धर्माने घातला. संत ज्ञानेश्वरांपासून ते रामदासांपर्यंतच्या सर्व संतांचे साहित्य हे भक्ती, प्रबोधनात्मक व सामाजिक नीतीची शिकवण आपणास देणारे ठरते. भागवत धर्मातील वारकरी संप्रदायाच्या मंदिराचा पाया संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराजांनी घातला, त्यावर तुकाराममहाराजांनी कळस चढविला. या संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून घातला व भागवत धर्माच्या मंदिराचे एक एक चिरेबंदी दगड होण्याचे काम अनेक संतानी केले. संत नामदेव, एकनाथ, तुकाराम आदी श्रेष्ठ संतांनी भागवत धर्माची पताका आपल्या खांद्यावर घेतली आणि इतर बहुजन समाजातील अठरापगड जाती–जमातीतील संतांच्या कार्यामुळे भागवत धर्माचा प्रसार–प्रचार समृद्ध झाला. ज्ञानेश्वरमहाराज, तुकाराममहाराज व एकनाथमहाराजांसह बहुजन समाजातील संतांचे कार्यही तितकेच महत्त्वाचे ठरले. त्यामध्ये संत गोरा कुंभार, सावता माळी, चोखामेळा, बहिणाबाई, विसोबा खेचर, जनाबाई, कान्होपात्रा अशा अनेक संतांचा हातभार भागवत धर्माच्या प्रसारात लागला आहे.

महाराष्ट्रात संतकाव्य तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत आल्याचे दिसून येते. सहाशे वर्षांचा प्रदीर्घ कालखंड संत साहित्याने व्यापलेला आहे. महाराष्ट्रात महानुभाव, संत ज्ञानेश्वर व संत नामदेव हे या पंथाचे संस्थापक व प्रेरणास्थान होते. वारकरी संप्रदायातील संतांनी समाजाला नवा विचार दिला. मानवी जीवनातील मूल्यांचा समतोल व समन्वय साधून समाजजीवनाचे संरक्षण व संवर्धन केले. संत साहित्यात जाणीवपूर्वक लोकतत्त्वांचा वापर केला गेला. संतांनी संत साहित्याची निर्मिती करून समाज उद्धाराचे कार्य हाती घेतले.

संत साहित्य म्हणजे मुख्यतः भागवत धर्माचे, तसेच विविध संप्रदायांमधील सर्व संतांनी निर्माण केलेले साहित्य होय. ह्या साहित्यात १३व्या शतकात निर्माण झालेली भावार्थदीपिका ते १७व्या शतकातील समर्थ रामदासांपर्यंतचे साहित्य यांचा समावेश केला, तर वावगे ठरणार नाही.

याचदरम्यान अनेक संप्रदाय उदयास आले व समाजाभिमुख कार्य आपापल्या परीने केल्याचे आढळते. महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, नागेश संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, सिद्धेश्वर संप्रदाय, सूफी संप्रदाय, रामदास संप्रदाय, नाथ संप्रदाय आदींचा समावेश आढळून येतो.

मध्ययुगीन कालखंडात संतसाहित्याची पाळेमुळे महाराष्ट्राच्या संस्कृतीत खोलवर रुजली व विकसित झाली. याच काळात यादवसत्ता, ब्राह्मणीसत्ता, मराठ्यांची सत्ता इत्यादी लहान–मोठ्या अनेक राजसत्ता येऊन गेल्या; पण महाराष्ट्रावर खरी सत्ता होती ती संतांचीच! कारण संतांच्या विचारांचा प्रभाव समाजमनात खोलवर रुजला होता. संतांनीही तेवढ्याच कौशल्याने मानवतावादी, अध्यात्मवादी व व्यवहारवादी तत्त्वांच्या विचारांची पायाभरणी केली होती.

मध्ययुगात महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक जीवनाचे अध:पतन झाले होते. जुनी वैदिक संस्कृती, वर्ण–जातिव्यवस्था व त्यातून कर्मठ कर्मकांड, यज्ञयागाचे वैदिक पंडितांनी माजविलेले अवडंबर व या सर्वांशी जुळलेली ईश्वरी संकल्पना; परमेश्वराच्या नावावर चाललेली हिंसात्मकता आणि बीभत्सता, अज्ञान व स्वार्थ यांचा पगडा मानवी समुदायावर पडला होता. रुढी–परंपरांच्या नावाखाली अंधश्रद्धा बोकाळली होती. यातून मार्ग काढायचा असेल व धर्म – भोळ्या–भाबड्या जिवाला अध्यात्मिक बैठक द्यावयाची असेल, तर वारकरी पंथाच्या माध्यमातून समाजातील सर्वच जाती–पंथांना एकाच बैठकीत बसवण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी केले. सर्व समाजांतला मोक्षाचा सरळ व सोपा मार्ग अनुसरायला लावून क्रांतिकारक बदल वारकरी पंथाच्या स्थापनेत झाला. पंढरीच्या पांडुरंगालाच आपले आराध्य दैवत मानून वारकरी पंथ भजन – कीर्तनात रंगू लागला.

संस्कृत भाषा जनसामान्यांना उमजणारी नव्हती; तिला मराठी भाषेचा आधार देत, चक्रधरस्वामी, म्हाइंभट, संत नामदेव, ज्ञानदेव, तुकाराममहाराज आदी संतांनी तिला राजमानस दर्जा दिला. वारकरी संप्रदायातील संतांनी मराठी भाषेला व समाजाला नवी दिशा दाखविली.

सतराव्या शतकात तुकोबारायांनी मराठी भाषेत अभंगरचना करून जनसामान्यांच्या हृदयात तिला स्थान प्राप्त करून दिले.

१.२ : संशोधन विषय :

मराठीच्या ग्रंथनिविष्ठतेचा काळ : या कालखंडात आद्य मराठी ग्रंथकार मुकुंदराज होऊन गेले. या सोबतच महानुभव मराठी वाङ्मय आणि ज्ञानेश्वरांची भावार्थदीपिकेची निर्मिती झाली. वैदिक – प्राकृत, अपभ्रंश, प्रभूती अवस्थेतून परिणत होत होत मराठी भाषा आपल्या स्वत्वाला प्रकटवू लागली ती यादव काळातच! 'श. गो. तुळपुळे' यांचे मराठी भाषा व वाङमयाविषयी मांडलेले मत सार्थ वाटते. मराठी भाषा व मराठी वाङ्मयाला समृद्ध करण्यासाठी नाथ, महानुभाव व वारकरी संप्रदायाने केलेले कार्य अतिशय मोलाचे ठरते. नाथ, महानुभाव व वारकरी संप्रदायाने मराठीस प्रगल्भतेकडे नेलेले दिसून येते आणि मध्ययुगीन काळातील जनसामान्यांसाठी ती मोलाची कामगिरी ठरली. एकूणच मराठीला चांगले दिवस आले ते यादव काळातच.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. सर्वांना समजेल अशाच भाषेत संतांनी उपदेश केला. म्हणूनच संतांचे विचार खऱ्या अर्थाने तळागाळात जाऊन पोहोचले. संतांनी केलेला उपदेश सहजरीत्या जनमानसांत पोहोचविण्यासाठी त्यांनी अभंग, गौळणी, हरिपाठ, भारुडे, स्फूटपदे आख्यान इत्यादी प्रकार लिहिले. मनोरंजनातून अध्यात्म व जीवनविषयक तत्त्वज्ञान समजावून सांगण्याचे काम संतांनी केले.

१२ ते १७व्या शतकात महाराष्ट्रात संतवाङ्मय निर्माण झाले. या वाङ्मयाचे मुख्य आचार्य म्हणून संत ज्ञानेश्वरमहाराज ओळखले जातात, तर या संतमालिकेत महाराष्ट्रातील संतमंडळांत मानाचा शिरपेचातील मुकुटमणी म्हणजे संत तुकाराममहाराज होय. त्यांनी वेद साध्या व सरळ भाषेत सांगितला. ते सामान्यांच्या गळ्यातील ताईत ठरले. आपल्या रसाळ काव्यरचनेने आणि व्यवहारसुलभ दृष्टान्तांची उदाहरणे देत त्यांनी जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजविले.

प्रस्तुत संशोधनासाठी या संप्रदायाच्या साहित्य निर्मितीतून तत्कालीन लोकजीवन विविध पद्धतीने व्यक्त झाले आहे. त्या काळातील समाजजीवन, प्रादेशिक वातावरण, धर्माचे स्वरूप तत्कालीन कला आणि क्रीडा राजकीय स्थिती यांची माहिती मिळते. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेतून त्या काळाचे लोकजीवन कसे होते, याचा शब्दस्वरूपात मांडणी करण्याचा प्रयत्न करता येतो. भोवतालची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती या साऱ्यांचा विचार करून तुकाराममहाराजांच्या अनुभवातून निर्माण झालेले साहित्य व त्यातील लोक जीवनाविषयीची रचना यांचा सारासार विचार करण्याचा छोटासा प्रयत्न करता येऊ शकतो. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेमधून व्यक्त झालेले लोकजीवन व त्यांचे तत्त्वज्ञान यांचा सर्वांगीण विचार करता येईल. महाराष्ट्रातील संस्कृती ही लोकजीवनातील आचार – विचार, रूढी–परंपरा यातून निर्माण होते. लोकसाहित्य याच संस्कृतीतून जन्मास येते. लोकसंस्कृतीतून व लोकसाहित्यातून सामाजिक परंपरा व लोकसंस्कृती उभी राहते, त्याचे प्रतिबिंब तुकाराममहाराजांच्या अभंगरचनेतूनही व्यक्त होते.

संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला व त्याचा विस्तार होण्यासाठी बहुजन समाजातील अनेक संतांनी मोलाचा वाटा उचलला. त्यामध्ये अनेक संतांचे कार्य महत्त्वाचे आहे. संत बहिणाबाईंचा एक अभंगच आपल्याला त्याची साक्ष देऊन जातो.

‘‘संत कृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।।३।।
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारीला भागवत ।।४।।
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।।५।।[१]

प्रस्तुत अभंगात बहिणाबाईंनी भागवत धर्माची पताका कशा प्रकारे फडकती आहे, याचे उत्तम शब्दांत वर्णन केले आहे. संत नामदेव, संत जनार्दनस्वामी, एकनाथमहाराज यांनी ही इमारत भक्कमपणे उभी केली. सावता माळी, गोरा कुंभार, विसोबा खेचर, चोखा मेळा, कान्होपात्रा

[१] संत बहिणाबाई, बहिणाबाईंची गाणी, सुचित्रा प्रकाशन, मुंबई, नववी आवृत्ती २००४, पृ.क्र. ९७–९८

अशा अनेक संतांनी ही इमारत फळा येण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला आहे. या साऱ्या संतमंडळींच्या अभंगांच्या संग्रहाचा आणि चिकित्सेचा संशोधनाचा प्रयत्न महाराष्ट्रातील विद्वानांनी केला आहेच. या साऱ्यामध्ये संत तुकारामांच्या अभंगाची चर्चा ऊहापोह व संशोधन अधिक झाल्याचे दिसून येते. असे असले, तरी आजही संतशिरोमणी तुकाराममहाराजांचे अभंग सर्वसामान्यांपासून विद्वान, प्रज्ञावंतांपर्यंत सर्वांनाच भावतात.

आजवर तुकारामांच्या अभंगांचे विविधांगी संशोधन झाले आहे. तरी त्यांच्या अभंगातील उक्तीप्रमाणे 'करेल तेवढे थोडे काही संशोधन अभंगातील 'लोकजीवन' या दृष्टिकोनातून तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करण्याचा अल्पशः प्रयास होय. प्रस्तुत प्रबंधात त्या दृष्टीने तुकारामांच्या अभंगातील लोकजीवनाचा अभ्यास मांडावयाचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्र हा संतांचा प्रांत मानला जातो. वारकरी संप्रदाय अनेक विविध संप्रदायांचे माहेरघर म्हणजे महाराष्ट्र होय. इथे संतांची मांदियाळी आहे. जनसामान्यांच्या हितासाठीच संतांचा जन्म झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ही भूमी संस्कृती व ज्ञानाचा वारसा जपणारी भूमी आहे. ग्रामीण संस्कृतीशी तिची नाळ जोडली गेली आहे. संतांच्या साहित्यात प्रामुख्याने लोकतत्त्वांचा वापर झाला. तो यासाठी, की आपले ज्ञानलोक माणसाला परके वाटू नये, अवघड वाटू नये, तर ते आपलेच आणि जिव्हाळ्याचे वाटावे हा यामागचा उद्देश होता. मानवतावादी अध्यात्मवादी, तत्त्वांचे व विचारांचे प्रत्यारोपण संत साहित्यात केले गेले. त्यातील एक संत म्हणजे जगद्गुरू श्री संतश्रेष्ठ तुकाराममहाराज होय. तुकारामांच्या अभंगवाणीवर गेली साडेतीनशे वर्षे महाराष्ट्रातील लोकांचा अध्यात्मिक पाया रचला गेला आहे. तुकारामांची अभंगवाणी प्रत्येकास मार्गदर्शन करते व आत्मशुद्धी करण्यास मदत करते.

तुकारामांचे अभंग त्यांच्या प्रत्यक्ष जगण्याशी निगडित आहेत. तत्कालीन जीवनपद्धती तुकारामांच्या गाथेत आढळते. तुकारामांच्या गाथेतील अभंग व मानवी जीवन याचा फारसा फरक करता येत नाही. गाथेच्या आधारे आपणाला महाराष्ट्राच्या 'लोकजीवनाचा' अभ्यास करणे सोपे जाते. तुकारामांची गाथा ही सर्वश्रेष्ठ सर्व जनसामान्यांची सामाजिक बांधिलकीचा आरसा होय.

तुकारामांचे लौकिक आणि अध्यात्मिक जीवनचरित्र हे लोकजीवनासाठीचा संदर्भ ग्रंथच आहे. तुकोबांची गाथा अध्यात्मिक, सामाजिक आणि दैनंदिन जीवनावर प्रकाश टाकणारा अनन्यसाधारण ग्रंथ आहे. तुकोबांच्या अभंगांची प्रेरणा आणि प्रभाव हा तत्कालीन व सद्यकालीन लोकजीवनावर आढळून येतो. म्हणून तुकाराममहाराजांच्या अभंगांतील लोकजीवनाच्या दृष्टीने अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रबंधात त्या दृष्टीने 'संत तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवन : संदर्भ आणि चिंतन – एक अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

१.३ : संशोधनाची आवश्यकता :

साडेतीनशे वर्षांनंतरही तुकाराम महाराजांच्या गाथेचे व त्यातील अभंगवाणीचे वर्चस्व जनसामान्यांच्या मनावर रुजलेले आहे. त्यातील साधी, सोपी व मनाला स्पर्श करणारी भाषा त्यामुळे प्रत्येक अभंग प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा आहे. सर्वसामान्य प्रापंचिक व्यक्तिमत्त्व ते अध्यात्मिक मार्गातील संतश्रेष्ठ म्हणून तुकारामांची ओळख आहे. तुकोबांची विविध रूपे व त्यांचा सर्वांगीण अभ्यास आपल्याला गाथेच्या रूपात आढळतो. अनेक संशोधकांनी त्यावर भाष्यही केले आहे. तरी आजही अभंगांचे अध्ययन व चिकित्सा अपुरी आहे, असे वाटते. कारण गाथेतील अभंगांत अमर्याद ज्ञान आणि भगवंतप्रेमाची लालसा दडलेली आहे. तुकारामांच्या नम्रतेने आणि व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्या अभंगांच्या रचनेबद्दल अनेक प्रश्न पडतात. ते प्रश्नाची उकल अल्पशा बुद्धीने होणे अवघड वाटते. या उद्देशाने हा संबंधित विषय संशोधनासाठी घेतला आहे. लोकजीवनातील संकल्पना वास्तवता, रूपके, लोकव्यवहार या सर्वांमध्ये वसलेली अध्यात्मिक बैठक व त्याचा समाजावर पडणारा प्रभाव सर्वांसमोर मांडणे या उद्देशाने संशोधन करण्यासाठी लोकजीवन या विषयाची निवड केली आहे.

१.४ : संशोधन समस्या :

तुकारामांच्या जीवनपटाचा अभ्यास करीत असता अनेक उलट–सुलट प्रश्न समोर येतात. त्यांच्याबद्दलचे अनेक प्रश्न अभ्यासकांच्या मनात येतात. तुकारामांच्या जन्मापासून ते वैकुंठ

गमनापर्यंत अनेक शंका–कुशंका घेतल्या जातात. त्यांच्या सुशिक्षित, अल्पशिक्षित स्वरूपाचा तर, वेदाभ्यासांच्या अधिकाराचा व अशा अनेक स्वरुपांचा प्रश्न अभ्यास करताना भेडसावतो. यांसारखे अनेक प्रश्न उपस्थित करून ते सोडविण्याचे प्रयत्नही झालेले दिसतात आणि निर्विवादपणे ते मान्य करावे लागतात. कारण अभ्यासकांनीच ते सिद्ध केलेले दाखलेही दिले आहेत. चरित्रकार महिपतीने तुकारामांचे व्यक्तिमत्त्व केवढे व्यासंगी होते, हे नमूद केले आहे. ते लिहितात की, तुकाराम हे जन्माने वैष्णव होते त्यांनी संस्कृत ग्रंथांचा, गीतेचा, भगवंताचा आणि समकालीन संतांचा अभ्यास केलेला आढळतो. त्याचे दाखलेही गाथेचा अभ्यास करताना मिळतात.

१.५ : संशोधनाचे महत्त्व :

संतचरित्रांचा विचार करणे म्हणजे महाराष्ट्रातील संत परंपरेचा, वारकरी परंपरेचा विचार करणे एवढीच व्याख्या मर्यादित होऊ शकत नाही; तर ब्रह्मांड स्वरूपात संतांचे अवतार कसे निर्माण झाले व त्यांचे सृष्टीतील कार्य यांचा परामर्श घेणे इत्यादी होय. ब्रह्म हे निर्गुण, निराकार व अव्यक्त आहे. ब्रह्म या शब्दाचा अर्थ अमर्याद आहे. ज्या ज्ञानाच्या जोरावर परब्रह्माशी एकरूपता येते ते ज्ञान म्हणजेच ब्रह्म होय. ज्या ज्ञानाच्या तिमिरात सर्व सृष्टीवरील जीव जगत आहेत ते ज्ञानच ब्रह्म आहे. ज्ञानासारखे जगात काही पवित्र नाही, असे गीतेत सांगितले आहे. ज्ञातृ म्हणजे जाणणारा, ज्ञय म्हणजे जाणण्याची गोष्ट या दोघांचे अधिष्ठान आहे. जे या दोघांच्या साहाय्याने प्रकट झाले आहे. ते म्हणजे ज्ञान होय. ते ज्ञान ब्रह्मानंदी आहे, असे म्हटले जाते व हे ज्ञानच परब्रह्मांचा आनंद मिळवून देते. ते ज्ञान शुद्ध, निर्मळ व पवित्र आहे म्हणून साक्षात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत म्हटले आहे

''ज्ञातृशेचा विरिन । नुसधेंचि जे ज्ञात ।
सुखा भरलें गगन । गाळीव जें ।।''[२]

[२] श्री ज्ञानेश्वरी, संपादक ह.भ.प. डॉ. श्री नारायण महाराज जाधव, आनंदाश्रम प्रकाशन, आळंदी देवाची, पुणे, द्वितीयावृत्ती २०१५.

ज्ञानाच्या प्राप्तीने पंचमहाभूतांची जाणीव होते. ज्ञानातून आनंदाची निर्मिती होते व हाच आनंद किंवा आनंदाची स्वरूपता हेच विश्वाच्या निर्मितीचे कारण होय. ज्ञानाच्या जाणिवेतून ज्या अनंत कल्पना जागृत होतात तेव्हा त्या सगुण होतात आणि विश्वातील अनंत स्वरूपाची निर्मिती होते. ज्ञानाचे व्यक्त रूप जगताची जाणीव सगुणपण आकारास येते तेव्हा जीवात्मा जन्मास येतो. जेव्हा ज्ञान, ज्ञातृत्व, जीव, जगत्, देव, भक्त यांमध्ये जेव्हा आनंद सगुणपणाने विश्वरूप धारण करतो, तेव्हा संताचा अवतार होतो. याच दृष्टीने विश्वाविषयी म्हटले आहे की, 'सर्व खाल्विदम् ब्रह्म। संत हे स्वानंद प्रतीचे पुतळे आहेत. म्हणून ते पांडुरंगास प्रिय आहेत. तुकारामांच्या अभंगाप्रमाणे

''नावडे वैकुंठ शेष शयन । वैष्णव सदन आवडलें ।।
रमा म्हणे कैसी नवल परी । देव भुलले वैष्णवा घरीं ।।''[३]

जेव्हा माय–बापासारखे संत जीवलग वाटत असतात तेव्हा ते श्रेष्ठ, पवित्र व प्रिय वाटत असतात. संतांच्या ठिकाणी समता व समदृष्टी पाहावयास मिळते. त्यामुळे संतांना सदाचारी–दुराचारी माणसे सारखीच वाटतात. संतांच्या ठिकाणी वैषम्य दृष्टीस पडत नाहीत. सामान्यजनांच्या दृष्टीने सांगावयाचे झाल्यास अविधीच्या कल्पनाजगतात, दुर्जनांच्या रूपाने प्रकट होतात. विधीच्या कल्पना सज्जनांच्या रूपाने प्रकट होतात. जेव्हा देव कार्यास व अवतारास सुरुवात होते तेव्हा सज्जनांचा विजय होतो. सद्वर्तनाने ईश्वराची प्राप्ती करून घेता येऊ शकते व ती प्राप्त करण्यासाठी भक्ती व साधनांची गरज भासते.

भक्तीच्या जोरावर ईश्वराची प्राप्ती करून घेण्याची शक्ती श्रीहरीच्या सत्तेवर अवलंबून आहे. ज्ञान व कल्पना या दोन्हींमधून नांदणारा जो आनंद आहे, तो श्रीहरी अथवा पांडुरंग होय. आनंद प्राप्तीत जेव्हा जगद्रूपांत सगुणपणा आकारास येतो तेव्हा संतांचा अवतार होतो.

संत परंपरा ही मध्यवर्ती परंपरा आहे. समाजाच्या सर्वस्तरांपर्यंत पोहचून मराठी मनावर आपला ठसा उमटवणारी व त्याद्वारे प्रतिष्ठा प्राप्त करून घेणारी लोकाश्रयी अशी ही संत परंपरा

[३] संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, कै. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, प्रकाशक बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८, पृ.क्र.८.

आहे. महाराष्ट्र ही संत–महंताची भूमी आहे. महाराष्ट्रात संतांची मांदियाळी होती व आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ही परंपरा सुरू होते ते कैवल्यसम्राट संत ज्ञानेश्वरमहाराजांपासून ते अठरा पगड जातीचे संत यात येतात. संतांनी महाराष्ट्रात भक्तीचे मळे फुलवले, संतांनी समाजात भगवत भक्ती रूजवली, समाजातील भेदभाव नष्ट करून समाज एकसंघ करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र ही संतांची पवित्र व पावन भूमी आहे. समाजाला संतांपासून शाश्वत जीवनमूल्यांचे भांडार खुले केले आहे व प्रत्येक ठिकाणी परमेश्वर परमात्माला येणे शक्य नव्हते ; म्हणून जगाच्या कल्याणासाठी संतांचा जन्म झाला.

''जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।
देह कष्टविता उपकरां ।।३।।''[४]

'नमः पूर्णायः शंभवे' असे सांगून पूर्णवादाचे प्रकटीकरण करणारे ज्ञानेश्वर महाराज असोत की 'वेदांचा तो अर्थ आम्हासी ठावा,' असे आत्मविश्वासपूर्ण सांगणारे तुकाराममहाराज असोत. महाराष्ट्रातील संत ही आचार्यांची एक मांदियाळीच आहे. या समस्त संतांनी भारतीय तत्त्वज्ञान आभूषित केले. त्यामुळे महाराष्ट्रातील संत आणि वारकरी संप्रदाय हे भारतीयांचे एक आदरांचे अध्यात्मिक विश्वात मानबिंदू ठरतात.

१.६ : संशोधनाची उद्दिष्टे :

महाराष्ट्रातील संप्रदायिक कालखंडाचा विचार केला असता महाराष्ट्रातील संतमंडळींचा, अभंगांचा व संत साहित्यातील संकलनाच्या योगदानाचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील संप्रदायाने समाजाला नवीन दिशा दाखविण्याचे काम केले आहे. संत मंडळींनी आपापल्या साहित्याच्या निर्मितीतून जनसमुदायाला आचार–विचारांची नवीन बैठक देण्याचा प्रयत्न केला आहे. त्या संत मंडळींत संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घातला आहे, तर संत तुकारामांनी कळस चढविला. संत तुकारामांच्या अभंगांची व साहित्याची वेळोवेळी चिकित्सा झालेली आढळून

[४] कै. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८, पृ.क्र.१११.

येते. त्यात भक्तिमय, अध्यात्म, तत्त्वज्ञान, कीर्तन, देव, नामस्मरण, विठ्ठल, पंढरी या सर्वच विषयांचा परामर्श घेण्यात आला आहे. एका अंगाने तुकोबारायांच्या अभंगातील निवृत्तीदर्शन व्यक्त झाले आहे; पण लोकजीवनातील संकल्पना वापरून तुकोबारायांनी शुद्ध प्रवृत्तीदर्शनही मांडले आहे. लोकजीवनाशी निगडित संकल्पनांना प्रभावीपणे वापरून त्यांच्या अभंगांतून व्यक्त झालेले प्रवृत्तीदर्शन अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्यातून तत्कालीन समाजजीवन प्रकटत आहे. त्यांच्या अभंगांच्या विविध चिकित्सक गाथांमधून त्यांच्याच अभंगांमधून व्यक्त झालेल्या लोकजीवनाचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्याचा उद्देश आहे. प्रस्तुत प्रबंधासाठी श्री तुकाराममहाराजांची सार्थ गाथा, (संपादक ह.भ.प. स. के. नेऊरगावकर), तसेच श्री संत तुकारामांची सार्थ गाथा, (मामासाहेब दांडेकर), श्री तुकाराममहाराज गाथाभाष्य (ह. भ. प. वै. शंकरमहाराज खंदारकर), संत तुकारामांची गाथा (सरकारी प्रत), जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराममहाराज अभंग गाथा, श्रीक्षेत्र देहू या गाथा डोळ्यांसमोर ठेवून संशोधन केले आहे. तुकोबारायांच्या अभंगांतील लोकजीवनाचा अभ्यास हेच या प्रबंधाचे उद्दिष्ट आहे.

१.७ : गृहीतके :

१. संत तुकाराम महाराजांच्या अभंगात लोकजीवन आहे का? ते कसे?

२. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन तत्कालीन समाजाचे प्रतीक आहे का?

३. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन समाजाला प्रेरक आहे.

४. अभंगातील लोकजीवन प्रबोधनाचे माध्यम कसे आहे ?

* * *

प्रकरण दुसरे

२.१: संशोधनाचे प्रास्ताविक

२.२: संशोधन समस्या निश्चिती

२.३: संशोधन आढावा

२.४: संशोधन पूर्वाभ्यास

प्रकरण दुसरे

२.१ : संशोधनाचे प्रास्ताविक:

'भेदाभेद भ्रम अमंगळ...' अशी सामाजिक समता प्रस्थापित आणि अध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्याचे काम महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील सकल संतांनी केले. अभंग, ओव्या, भजनांच्या माध्यमातून अध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्याचे काम केले. भागवत धर्माच्या मंदिराचा पाया संतश्रेष्ठ कैवल्यसाम्राज्य ज्ञानेश्वरमहाराज यांनी रचला, तर संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराजांनी त्या मंदिरावर कळस चढविला. तुकोबारायांच्या गाथेने समाजाला वेगळी दिशा देण्याचे काम केले. अभंगरचनांतून जीवनाचे तत्त्वज्ञान समाजाला मिळाले. जगण्याचे भान दिले. अशा संतश्रेष्ठ तुकोबारायाच्या अभंगांत समाजाचे चित्र उमटले आहे. तत्कालीन समाजाचे, संस्कृतीचे, लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटले आहे. तुकोबारायांच्या अभंगातून सामाजिक भान मिळण्यास मदत झाली. संत तुकोबारायांनी सुमारे साडेचार हजार अभंग लिहिले. यातील प्रत्येक अभंगांवर, तुकोबारायांच्या जीवनभाव, तत्वज्ञानावर संशोधन करता येऊ शकते. संत तुकाराम महाराजांचे अभंग आणि त्याचा समाजजीवनावर झालेला परिणाम व्यापक स्वरूपाचा आहे. महाराजांच्या अभंगांत आलेले लोकजीवन हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी घेतलेला आहे.

२.२ : संशोधन समस्या निश्चिती : संशोधन समस्येची निश्चिती करणे हा संशोधन प्रक्रियेतील महत्त्वाचा पहिला टप्पा आहे. समस्या निश्चित झाल्यावर ती नेमक्या शब्दांत स्पष्टपणे मांडणे, तिची उद्दिष्टे ठरविणे आणि संशोधनासंबंधितच्या साधनांची निवड करणे यासाठी मार्गदर्शक माहितीची आवश्यकता असते. यासाठी संशोधन विषयाच्या संदर्भातील पुस्तके, संदर्भग्रंथ, समीक्षकांनी मांडलेली मतेही आवश्यक ठरत असतात.

२.३ : संशोधन आढावा : संशोधन समस्येची निश्चिती झाल्यावर संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा व्यापक आढावा घेणे आवश्यक असते. त्यासाठी संशोधन समस्येच्या स्वरूपानुसार पुस्तके, विश्वकोश, ग्रंथ, लेखकांचे साहित्य याचाही आढावा घेणे आवश्यक असते. वाचन

प्रक्रियेतून संशोधनास पूरक अशी माहिती मिळत असते. त्यातून संशोधनास मदत होत असते. संशोधन कार्यातील पूर्वाभ्यास हा महत्त्वाचा भाग आहे.

२.४ : संशोधन पूर्वाभ्यास : संशोधक ज्या विषयावर संशोधन करीत आहे, त्या विषयाच्या संदर्भात व संबंधात यापूर्वी कोणी संशोधन केले आहे, कोणकोणत्या अंगाने संशोधन झाले आहे, याचीही माहिती यातून मिळणार असून, त्याची संशोधनास मदत होणार आहे. संशोधन करताना पूर्वाभ्यास महत्त्वाचा आहे. यासाठी टिळक महाराष्ट्र ग्रंथालय, पुणे, तसेच जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ या ग्रंथालयांना भेटी दिल्या. तसेच तेथील कलाविषयक पुस्तके, ग्रंथ यातील संदर्भ एकत्रित केले. संत तुकाराम महाराजांच्या सार्थ गाथा, विविध लेखकांच्या तुकाराममहाराज साहित्यविषयक ग्रंथांचाही अभ्यास केला.

''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' या विषयासंदर्भातील संशोधन समस्येची निश्चिती केल्यानंतर समस्येची मांडणी, विषयाची उद्दिष्टे, संशोधनासंबंधितच्या साधनांची निवड केली. संदर्भातील पुस्तके, संदर्भग्रंथ, संशोधकांनी मांडलेली मतेही विषय मांडण्यासाठी पूरक ठरली. संशोधन समस्येची निश्चिती झाल्यावर संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा व्यापक आढावा घेणे आवश्यक असते. त्यासाठी संशोधन समस्येच्या स्वरूपानुसार तुकाराम गाथा, पुस्तके, विश्वकोश, ग्रंथ, संत तुकाराम महाराज यांच्या साहित्याचा अभ्यास केलेल्या लेखकांचे साहित्य याचाही आढावा घेतला. ग्रंथालये, पुस्तके यांचे वाचन केले. वाचन प्रक्रियेतून संशोधनास पूरक अशी माहिती मिळाली. संशोधन कार्यातील पूर्वाभ्यास हा महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला.

तुकोबाच्या अभंगात भक्ती, ज्ञान, वैराग्य, आध्यात्म, यांसारखे निवृत्तीवादी विषय आले आहेत. तसेच समाज जातीय विषमता पर्यावरण, लोकाचार, कृषी लोकसंस्कार, गावगाडा, यांसारखे अनेक विषय तुकोबांनी मांडले आहेत. कधी दृष्टांत तर कधी सिद्धांत तर कधी रूपक म्हणून त्यांनी आध्यात्मिक चिंतनाबरोबर लोकजीवनाचेही वास्तववादी चित्रण उभे केले आहे.

आणि लोकजीवनातील घटकांमधून सामाजिक प्रबोधन घडविले आहे. हे प्रवृत्तीवादी चिंतन आजच्या समाजाला आणि विशेषत्त्वाने तरुण वर्गाला खूप मोलाचे ठरेल.

ज्ञानजागृतीबरोबरच त्यांनी अभंगातून केलेली कर्मजागृती आणि त्यासाठी वापरलेली रुपके समाजाला जगण्यासाठी प्रभावी ठरतील.

* * *

प्रकरण तिसरे

३.१ : संशोधन नमुनानिश्चिती

३.२ : संशोधनाची कार्यपद्धती

३.३ : माहिती संकलनाची साधने व तंत्रे

प्रकरण तिसरे

३.१ : संशोधन नमुनानिश्चिती :

''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' अशा संत तुकाराममहाराज यांच्या अभंगगाथांवर आधारित संशोधन समस्येची मांडणी झाल्यावर अभ्यासासाठी कोणत्या माहितीचा आधार आहे, हे लक्षात घेऊन नमुना पद्धत निवडली. संशोधनाचे प्रकार पुढील प्रकारे सांगता येतील–मूलभूत आणि उपयोजित संशोधन पद्धत. मूलभूत संशोधनात कोणत्याही शास्त्रातील मूलभूत तत्त्वे किंवा सिद्धान्त प्रस्तावित करण्यासाठी या संशोधनाचा वापर केला जातो. नैसर्गिक शास्त्राशी संबंधित संशोधन या प्रकारात मोडते. अमेरिकेच्या राष्ट्रीय विज्ञान संस्थेनुसार मूलभूत किंवा शुद्ध संशोधनात ज्ञानाच्या विकासासाठी सैद्धान्तिक ज्ञानाचा शोध घेतला जातो. हे संशोधन कोणत्याही समस्येचे उत्तर शोधणे हे उद्दिष्ट समोर ठेवीत नाही. म्हणजेच मूलभूत संशोधनात ज्ञान मिळविणे हा मुख्य उद्देश असून, त्याची उपयुक्तता भविष्यकाळात होऊ शकते. वर्तमानकाळातील समस्येच्या सोडवणुकीच्या दृष्टीने संशोधनाच्या संबंध नसतो. उपयोजित संशोधनात उपयोजित संशोधनाचा संबंध साधारणत: व्यावहारिक समस्येच्या सोडवणुकीशी म्हणजेच संशोधनाचे ध्येय उपयोगितावादी असून, संशोधनाचा निष्कर्षात उपयोगात आणले जाते. पी. व्ही. यंग यांनी केलेली संशोधनाची व्याख्या अशी : उपयोजित संशोधनातील संबंध मानवाच्या आणि मानवी कल्याणाशी संबंधित आहे. अ) पॅरामेट्रिक ब) नॉन पॅरामेट्रिक अशा शास्त्रीय सामाजिक संशोधन अध्ययनाच्या दोन पद्धती आहेत. संशोधनपद्धतींचे तीन प्रकार आहेत. त्यात पहिला ऐतिहासिक संशोधन पद्धती, दुसरी प्रायोगिक आणि तिसरी वर्णनात्मक संशोधन पद्धती होय. ऐतिहासिक संशोधनपद्धतीत भूतकाळातील घटना, नोंदी, विश्लेषण अर्थ लावणे याचा समावेश ऐतिहासिक संशोधनात होता. थोडक्यात, इतिहास साधनांचा उपयोग करून संशोधन केले जाते. भूतकाळ आणि वर्तमानकाळ या दोहोंचे आकलन करणे हाच संशोधनपद्धतीचा उपयोग आहे. अशा संशोधनातील सामान्यत्वाचा शोध घेतल्यास याद्वारे भविष्यातल्या घटनांविषयी अंदाज बांधणेही शक्य होते. प्रायोगिक संशोधन पद्धत ही

नावानुसार नव्या प्रयोगांशी संबंधित आहे. काही चल घटक हेतुपुरस्सर आणि काळजीपूर्वक नियंत्रित ठेवून संशोधन केले जाते. वर्णनात्मक संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट अध्ययन समस्यांच्या संबंधित सत्य, प्रमाणित सामग्री एकत्रित करून त्यांचे क्रमबद्ध, तार्किंत तसेच व्यवस्थेचे वर्णन करणे हा आहे. जेव्हा एखाद्या समस्येचे अध्ययन प्रथमत: केले जाते. तेव्हा वर्णनात्मक संशोधनाचा आढावा घेतला जातो. जेव्हा एखाद्या समस्येचे अध्ययन प्रथमत: केले जाते तेव्हा वर्णनात्मक संशोधनाचा आधार घेतला जातो. या प्रक्रियेत समस्येची व्याख्या, तथ्यांचे संकलन, वर्गीकरण, विश्लेषण या टप्प्यांतून संशोधनाचे कार्य पूर्णत्वास नेले जाते. संपूर्ण समग्राचा अभ्यास न करता विशिष्ट पैलूंचा अभ्यास केला जातो. संशोधनकर्ता वस्तुनिष्ठ पद्धतीने निरीक्षणकर्त्यांच्या भूमिकेतून काम करीत असतो.

गुड आणि हॅट : नमुना यातील नावाप्रमाणे एका विस्तृत समूहाचे लघु प्रतिनिधित्व करतो. श्रीमती पॉलिन यंग : एक सांख्यिकीय नमुना त्या सपूर्ण संमूहाचे किंवा समग्राचे एक लघुचित्र आहे. ज्यामधून हा नमुना घेतला आहे. ''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' या विषयावरील प्रस्तुत संशोधनासाठी नॉन पॅरामेट्रिक पद्धतीने नमुना निवड केली आहे.

''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' या विषयावरील प्रस्तुत संशोधनात संत तुकाराममहाराज यांची अभंगगाथा हा प्रमुख आधार आहे. अभंगातील लोकजीवन मांडत असताना संत तुकाराम महाराजांचे अभंग लोकजीवनाशी किती एकरूप झाले आहेत. हे पटवून देण्यासाठी तुकाराम गाथेचे प्रयोजन, तुकाराम महाराजांचे चरित्र, त्यांचा कालखंड, गाथामध्ये अभंगांतून आलेले, उमटलेले लोकजीवनाचा शोध घेतला. त्यानुसार अभंगांचे विलगीकरण करून त्यांची मांडणी केली आहे. त्याचबरोबर विविध पुस्तकांतून लोकजीवन कसे उमटले आहे. तसेच मान्यवर कीर्तनकार, प्रवचनकार, लेखकांना प्रश्नावली देऊन सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रकट मुलाखती घेतल्या आहेत. संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यांचा

तपशील पुढील प्रकरणात दिले आहे. गाथातील अभंग, त्यातून उमटलेले लोकजीवन, पुस्तक, ग्रंथ, मान्यवरांच्या मतांच्या आधारे संशोधन केले.

३.२ : संशोधनाची कार्यपद्धती : या संशोधनाची संकल्पना, संशोधन पद्धती, संशोधनाची साधने व तंत्रे याबाबतची सखोल माहिती घेतली. संशोधन साहित्य आणि पूर्वी झालेल्या संशोधनाचा अभ्यासही केला आहे. संबंधित विषयाबाबत कोणकोणत्या संशोधनपद्धती वापरण्यात आल्या. याचाही सविस्तर अभ्यास केल्यानंतर संबंधित संशोधनास सुरुवात केली आहे. गाथेमधून अभंगांचे विलगीकरण केले. मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली नमुना प्रश्नावली तयार करून कीर्तनकार, प्रवचनकार, अभ्यासकांच्या मुलाखती घेतल्या.

''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' यात अभंगांतील लोकजीवन कसे आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न एका प्रकरणात केला आहे. लोकजीवनाचे कोणकोणते संदर्भ आहेत, समाजातील कोणत्या घटकांना स्पर्श केला, याचा आढावा घेतला. अभंगांचे विलगीकरण केले. या विषयावरील विविध ग्रंथ, पुस्तकांचे वाचन करण्यात आले. सर्व माहितीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून त्यांच्या आधारे संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

३.३ : माहिती संकलनाची साधने व तंत्रे : ''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' या विषयाचा अभ्यास करताना केवळ एकाच पद्धतीचा वापर करून माहिती मिळू शकेल, असे वाटत नसल्याने एकापेक्षा अनेक तथ्यांचे संकलन या पद्धतीचा वापर केला आहे. तथ्य संकलनाचे विविध प्रकार आहेत. त्यात गाथेतील अभंग, प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण यांचा समावेश होतो. त्यामध्ये निरीक्षण, साहित्य वाचन, मनन, चिंतन, संशोधनातील जाणत्या व्यक्तींशी विचारविनिमय यांसारख्या गोष्टीतूनही तथ्यांचे संकलन केले जाते. संकलित तथ्यांचे वर्गीकरण करावे लागते. तसेच काही तथ्ये, बाबी, व्यक्ती आणि घटनांची नमुना निवड करावी लागते. त्यानंतर नमुना चाचणी घेतल्यास संकलनाची नेमकी पद्धत निवडली जाते. १) प्रश्नावली : ''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन :

एक अभ्यास'' या प्रस्तुत संशोधनात अभंग गाथा, त्यातील अभंग हा प्राथमिक स्त्रोत आहे, तसेच प्रश्नावली या स्त्रोतात कीर्तनकारांशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे संपर्क साधण्याचे महत्त्वाचे साधन आहे. विशेषत: जेव्हा संशोधनाचा विषय व क्षेत्र व्यापक किंवा विशाल असते. तेव्हा या साधनाचा विशेष वापर होतो. उत्तर देणारी व्यक्ती ही सुशिक्षित असो वा अशिक्षित, प्रश्नावली भरून घेणाऱ्याची भूमिका सहकार्याची असेल, तर त्यातून निश्चितच विषयाशी संबंधित उत्तम प्रतीची तथ्ये हाती येतात. २) मुलाखत : संशोधनात प्राथमिक तथ्य संकलनाचे आणखी एक महत्त्वाचे प्रभावी साधन म्हणजे मुलाखत होय. संबंधित व्यक्तीशी संभाषण, चर्चा किंवा संवाद साधून संशोधन विषयाशी संबंधित तथ्ये गोळा करणे, म्हणजेच मुलाखत होय. संशोधन क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्ती संशोधन विषयांशी घनिष्टतेने संबंधित असतात. त्यामुळे संशोधन विषयाशी संबंधित वास्तविक माहिती त्यांना असते. म्हणूनच अगदी औपचारिक मुलाखत न घेताही त्यांच्याकडून अनेक महत्त्वाची तथ्ये हाती लागू शकतात.

संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेतील अभंगांत लोकजीवन कसे उमटले आहे; महाराष्ट्राची संस्कृती, समाज विकास होत असताना, अभंगातील लोकजीवन कसे पूरक ठरले आहे; तुकोबारायांच्या अभंगात लोकजीवन उमटले आहे किंवा नाही, लोकजीवन कसे उमटले आहे. सामाजिक उद्धारासाठी, विकासासाठी हे अभंग कसे पूरक ठरले आहे, यांचा अभ्यास यात केला आहे. संत तुकाराम महाराजांच्या विविध गाथांबरोबरच, पुस्तकांचा आधार घेतला आहे. संशोधन विषयाची माहिती प्रामुख्याने पुढील पाच प्रकारांनी मिळविण्याचे ठरविण्यात आले. १) संत तुकाराम गाथा सर्वेक्षण, २) आशय विश्लेषण, ३) कीर्तनकारांच्या, प्रवचनकारांच्या मुलाखती, ४) संशोधन विषयासंबंधीचे साहित्य.

१. सर्वेक्षण : ''संत तुकाराम महाराजांच्या अभंगांतील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' या विषयाच्या संदर्भात तुकाराम गाथेतील अभंगांचे वर्गीकरण करून, त्यातील लोकजीवनाचे अध्ययन केले. ऐतिहासिक सर्वेक्षणात सामाजिक घटक समस्यांचा शोध घेणे व त्यांच्या निराकरणासाठी प्रयत्न करणे हे अभिप्रेत असते. त्या दृष्टीने एक वैज्ञानिक पद्धती निर्माण

केली आहे. सर्वेक्षणाच्या या वैज्ञानिक पद्धतीनुसार काढलेले निष्कर्ष हे वास्तविक निरीक्षण व परीक्षणांवर आधारलेले असतात. म्हणूनच ते अतिशय उपयुक्त समजले जातात.

२. सामाजिक सर्वेक्षण : कारलिंगर यांच्या व्याख्येनुसार सामाजिक सर्वेक्षण ही सामाजिक, वैज्ञानिक अन्वेषणाची अशी एक शाखा आहे, की ज्या अंतर्गत व्यापक किंवा लघु आकाराच्या लोकसंख्येचे अध्ययन केले जाते. या अंतर्गत एकूण तुकाराम महाराजांच्या सुमारे साडेचार हजार अभंगांपैकी निवडक अभंग घेतले. अभंगांत लोकजीवन आले आहे किंवा नाही याचाही आढावा घेतला. कीर्तनकार, प्रवचनकार, लेखकांच्या प्रश्नावली भरून घेतल्या. मुलाखती घेतल्या. संशोधन विषयांतील विविध घटकांचा परस्परांशी असलेला संख्यात्मक संवादही यातून सहजपणे स्पष्ट करता येतो. यामुळे प्रत्येक बाबीचे सविस्तर स्पष्टीकरण आणि वर्णन करण्याचे कष्ट वाचतात.

३. आशय विश्लेषण : ऐतिहासिक संशोधनात आशय विश्लेषण हे अभ्यासाचे नवे तंत्र आहे. या तंत्राच्या साह्याने गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय आणि वस्तुनिष्ठ तथ्यांमध्ये रूपांतर करता येते. थोडक्यात, आशय विश्लेषण म्हणजे तथ्यांच्या आशयाचे विश्लेषण करणे होय. या तंत्राच्या साह्याने आशय किंवा संदर्भांचे निष्कर्ष काढण्यात येतात. आशय विश्लेषणाच्या व्याख्येची माहिती घेणे गरजेचे आहे. संशोधन विषयाशी संबंधित तथ्य संकलनातून हाती आलेली माहिती आणि त्या तथ्यांचे विश्लेषण करून त्यांचा संशोधन विषयाच्या अनुषंगाने निष्कर्ष काढण्यासाठी वापर करणे म्हणजेच आशय विश्लेषण होय. बर्नाड बेरेल्सन–संज्ञापनातील व्यक्त किंवा प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ, व्यवस्थित व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे.

पॉलीन यंग – मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची आणि इतर लिखित किंवा मौखिक भाषाविषयक अभिव्यक्तीद्वारे प्राप्त संशोधन तथ्यांचे क्रमबद्ध, वस्तुनिष्ठ आणि परिणामकारक वर्णन करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे संशोधन तंत्र म्हणजेच आशय विश्लेषण होय. प्रकट झालेल्या आशयाचे अध्ययन व विश्लेषण केले जाते. मुलाखतीमुळे मुलाखत देणारा आणि घेणारा यांचा प्रत्यक्ष संबंध येतो. अशा प्रकारच्या प्रत्यक्ष संपर्कामुळे त्या व्यक्तीच्या आयुष्यातील अतिरिक्त बाबी, घटना, त्यांचे आचार–विचारसरणी याबाबतची माहिती प्राप्त करता येते. या माहितीचे

अध्ययन सामाजिक संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे आणि उपयुक्त ठरते. अनेक तज्ज्ञ आणि नामवंत लोकांशी मुलाखतीसाठी संपर्क साधला; पण यातील ज्या लोकांनी सदर संशोधनाच्या संदर्भात आपली मते प्रत्यक्ष वा लेखी स्वरूपात उपलब्ध करून दिली, त्याचा आढावा संशोधनात घेतला आहे.

* * *

प्रकरण चौथे : प्रतिपाद्य विषय

४.१ : संत तुकाराममहाराज – व्यक्ती आणि वाङ्मय

४.१.१ : प्रास्ताविक

४.१.२ : श्रीक्षेत्र देहू

४.१.३ : तुकाराममहाराजांचे चरित्र

४.१.३.१ : जन्म व बालपण

४. १.३.२ : वंशावळ

४. १.३.३ : तुकारामांचे प्रापंचिक जीवन

४. १.३.४ : एकांतवास

४. १.३.५ : गुरूपदेश

४. १.३.६ : तुकारामांचे कवित्व

४. १.३.७ : परमार्थ साधना

४. १.३.८ : तुकाराममहाराज यांचा छळ

४. १.३.९ : अनगडशहाबळी – बहिणाबाई यांची भेट

४. १.३.१० : निर्वाण वैकुंठगमन

४.२: तुकाराममहाराजांची अभंग गाथा – स्वरूप व वाटचाल

४.२.१ : प्रास्ताविक

४.२.२ : अभंगाची निर्मिती आणि वाटचाल

४.२.२.१ :एकनाथमहाराज

४.२.३ : अभंगाचे स्वरूप आणि भूमिका

४.२.४ : संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास, भक्तिमार्ग व तत्त्वज्ञान

४.३ : तुकारामांच्या अभंगवाणीतील लोकजीवन – स्वरूप व वर्गीकरण :

४.३.१ : प्रास्ताविक

४.३.२ : अभंगांचा क्रमवार आढावा

४.३.३ : विषयवार अभंग संख्या

४.३.४ : अभंगांचे वर्गीकरण

४.३.४.१ : स्वानुभवपर अभंग

४.३.४.२ : आत्मपर अभंग

४.३.४.३ : करुणापर अभंग

४.३.४.४ : उपदेशपर अभंग

४.३.४.५ : निर्वाणपर अभंग

४.३.४.६ : विरहिणीपर अभंग

४.३.४.७ : अद्वैतपर अभंग

४.३.४.८ : बालक्रीडापर अभंग

४.३.४.९ : रूपकात्मक अभंग

४.३.४.१० : विठ्ठल भक्तिपर अभंग

४.४ तुकाराममहाराजांचे लोकजीवनातील कार्य :

४.४.१ : प्रास्ताविक

४.४.२ : लोकजीवनाची ओढ व प्रेरणा

४.४.३ : लोकजीवनातील पारमार्थिक जागृती

४.४.४ : संत तुकारामांचे आध्यात्मिक सार

४.४.५ : लौकिक जीवनाचा सार

४.४.६ : अध्यात्मिक समतेची प्रेरणा

४.४.७ : सामाजिक लोकजीवनातील विषमता

४.४.८ : नैतिकतेचा पुरस्कार

४.४.९ : लोकजीवनाचा आत्मिक विकास

४.४.१०: सामाजिक अंधश्रद्धा

४.४.११: लोकजीवन ज्ञानेश्वर, एकनाथ व बहिणाबाई

४.४.११.१ : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज

४.४.११.२ : संत एकनाथमहाराज

४.४.११.३ : संत बहिणाबाई

४.४.१२: ऐतिहासिक आढावा

४.४.१३: तुकोबांची राष्ट्रजागृती

४.४.१४: तुकोबांच्या अभंगातील सांस्कृतिक जीवन

४.४.१५: तुकारामांचे तत्त्वचिंतन व संकल्पना

४.४.१६: तुकारामांचे व्यावहारिक ज्ञान व सामाजिक बांधिलकी

४.५ तुकाराममहाराजांच्या अभंगांतील लोकजीवनाचा आढावा :

४.५.१ : प्रास्ताविक

४.५.२ : लोकजीवन व्याख्या व व्याप्ती

४.५.३ : महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा

४.५.४ : महाराष्ट्राचा सांस्कृतिक कालखंड

४.५.५ : संतसाहित्य व सांस्कृतिक दर्शन

४.५.६ : गाथेतील समाज दर्शन

४.५.६.१ : गाव गाडा

४.५.६.२ : जाती, पोटजाती, वर्ण, बलुतेदार

४.५.७ : तुकारामांचे कुटुंब

४.५.८ : अभंग, मातृ–पितृ जिव्हाळा

४.५.९ : नाती – गोती

४.५.१० : स्त्री जीवन

४.५.११ : पाळणा

४.५.१२ : सण – उत्सव

४.५.१३ : नृसिंह जयंती

४.५.१४ : लोकधर्म

४.५.१४.१ : देव, मूर्ती देवळे

४.५.१४.२ : पोथ्या–पुराण

४.५.१४.३ : पूजा – अर्चा

४.५.१४.४ : जत्रा – यात्रा

४.५.१५ : निसर्ग–पर्यावरण–कृषिसंदर्भ

४.६ : अभंगातील भावविश्वता

(लोकजीवनातील म्हणी, वाक्प्रचार, शेतीसंदर्भ आणि लोकाचार)

४.६.१ : प्रास्ताविक

४.६.२ : लोकजीवनाचा पाठीराखा विठ्ठल

४.६.३ : लोकजीवनातील तुकोबांचे भावकाव्य व तत्त्वज्ञान

४.६.४ : लोकजीवनातील तुकोबांचे काव्य अलंकार

४.६.५ : अभंगांची अवतरण क्षमता, भाषाशैली व वैशिष्ट्ये

४.६.६ : अभंगातील म्हणी व वाक्प्रचार

४.६.६.१ : म्हणी

४.६.६.२ : वाक्प्रचार

४.६.७ : शेती संदर्भातील अभंग

४.६.८ : लोकगीते व लोककथा

४.६.९ : शिदोरी काल्याचे अभंग

४.६.१० : खेळासंदर्भातील अभंग

४.६.१०.१ : विटी–दांडूचे अभंग

४.६.१०.२ : टिपरीचे अभंग

४.६.१०.३ : हम्मामा / हुतुतू

४.६.११ : दळण–कांडण

४.६.१२ : लोकाचार

४.६.१३ : देव–धर्म, शकुन–अपशकुन

४.७ : अभंगांचे घटक व लोकजीवनावरील भाष्य – संदर्भ

४.७.१ : प्रास्ताविक

४.७.२ : लेखकांचे लोकजीवनाविषयीचे मत

४.७.३ : गृहीतके

प्रकरण चौथे : प्रतिपाद्य विषय

४.१ : संत तुकाराममहाराज – व्यक्ती आणि वाङ्मय :

४.१.१ : प्रास्ताविक :

मागील वर्षांच्या कालखंडातील संत परंपरेचा आढावा घेतला, तर महाराष्ट्राच्या पावन मातीत अवतीर्ण झालेला संतांचा अध्यात्मिक विचारांचा परामर्श केला जातो. सर्व संतांच्या अध्यात्मिक विचाराचे अधिष्ठान एकच आहे. विश्वात्मक विश्वंभर म्हणजे तरी काय? ही संकल्पना शोधण्याचे कार्य संतांनी केले, अणू–रेणूंपेक्षाही सूक्ष्म व आकाशापेक्षा व्यापक असलेल्या अध्यात्मिक–तात्त्विक बैठकीला आरंभ केला. मराठी संतकाव्य तेराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतचा सहाशे वर्षांचा प्रदीर्घ काळ आहे. या प्रदीर्घ काळात महाराष्ट्राने यादव सत्ता, बहामनी सत्ता, मराठ्यांची सत्ता इत्यादी लहान–मोठ्या राजसत्ता अनुभवल्या. तरीही महाराष्ट्रावर खरी अधिसत्ता गाजवली ती संतांनी. याचे प्रमुख कारण म्हणजे मराठी संत चरित्रांचा, संत काव्यांचा मराठी मनावर असलेला प्रभाव. महाराष्ट्राला ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत मोठी परंपरा लाभली आहे, ती टिकवण्याचे कार्य महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने केले आहे.

मोठ्या जनसमुदायाला अध्यात्मिक विचारांची बैठक संत ज्ञानेश्वरांनी दिली. चक्रधर म्हाईभट, संत नामदेव, ज्ञानदेव यांनी मराठी भाषा घडवली आणि १७ व्या शतकात तुकारामांनी मराठीला प्रबळ व शक्तिशाली बनवले. वारकरी संप्रदायातील संतांनी समाजाला नवा विचार दिला. मध्यमयुगीन कालखंडात विविध संप्रदाय निर्माण झाले. महाराष्ट्रातील समाजजीवनाला योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य महानुभाव पंथ व वारकरी संप्रदायाने केला. महाराष्ट्रामध्ये अध्यात्मिक पाया भागवत धर्माने घातला.

४.१.२ : श्रीक्षेत्र देहू :

‘‘ धन्य देहूगांव पुण्य भूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ।।१।।
धन्य क्षेत्रवासी लोक दइवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ।।धृ।।

कर कटी उभा विश्वाचा जनिता । वामांगी ते माता रखुमादेवी ।।२।।

गरुड पारीं उभा जोडुनिया कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ।।३।।

दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगातीर इंद्रायणी ।।४।।

लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ।।५।।

विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारीं सहित दोघे ।।६।।

तेथें दास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचें ।।७।। [१]

वरील अभंगात संत तुकाराममहाराज आपल्या देहूचे वर्णन करतात. मावळच्या कुशीत पुण्यापासून ३० कि.मी. अंतरावर वायव्यास; आळंदीपासून काही अंतरावर वायव्येस इंद्रायणी नदीच्या काठी वसलेले छोटेसे गाव म्हणजे देहू. देहूच्या चोहोबाजूस निसर्गरम्य डोंगराचा सहवास देहूच्या भूमीला लाभला आहे. महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रांत देहूचे नाव अग्रगण्य आहे.

या भूमीचे पावन भूमीत रूपांतर हे फक्त एकाच व्यक्तीमुळे तुकाराममहाराजांचे आठवे पूर्वज विश्वंभरबाबा यांच्या पदस्पर्शाने झाले आहे. इंद्रायणी नदीच्या एका काठावर ज्ञानेशाचे आळंदी गाव वसले आहे, तर एका बाजूस तुकोबांचे देहू! देहू हे तसे छोटेसे गाव टाळ–मृदंगाच्या आवाजात दुमदुमत असते. अवर्णनीय आशा देहूचे आपण वर्णन काय करावे ? देहूत पुण्याकडून आल्यावर मुख्य प्रवेशद्वार लागते. अठरा घंटा बसवून ती कमान सुशोभित केली आहे. त्यानंतर थोड्याच अंतरावर देहूचे प्रमुख आकर्षण म्हणजे श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर आहे. प्रशस्त असे हे मंदिर मोठ्या डौलात उभे आहे. तुकाराममहाराजांचे आठवे पूर्वज विश्वंभरबाबा घराण्यातील विठ्ठलभक्तीची परंपरा चालत आली होती. विश्वंभरबुवा हे पंढरीच्या पांडुरंगाचे एकनिष्ठ भक्त होते, वारकरी होते. पंढरीची वारी ते नित्यनियमाने करीत असत. पंढरीच्या पांडुरंगाचा ध्यास त्यांचा नित्याचा होत असे. त्यांना पंढरीशिवाय चैनच पडत नसे. मग ते पुढे–पुढे तर पंधरवड्यास पंढरपूरला जाऊ लागले. असा प्रवास ते सतत आठ महिने करीत होते. त्यांना संसारी सोडवणूकही करावीशी वाटेना व निर्गुण–निराकार पांडुरंगाच्या पंढरीचा ध्यास त्यांना संसारात रमू

[१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशन – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू, पुणे २०१३ अ.क्र. ७८३, पृ. क्र. १८०

देत नव्हता, विश्वभरबुवांना वृद्धापकाळामुळे पुढे–पुढे पंढरीची वारी जमेनाशी झाली. चालण्याचा त्रास होऊ लागला. वारी चुकू लागल्यामुळे विश्वंभरबुवा मनात दुःखी–कष्टी होऊ लागले. त्यांच्या मनाची व्यथा पंढरीच्या पांडुरंगाने जाणली. पांडुरंगाने त्यांना त्यांच्या स्वप्नात येऊन दृष्टान्त दिला. पांडुरंगाने विश्वंभरबाबांना सांगितले, ''बुवा तुम्ही आता माझ्याकडे येऊ नका मीच देहूत येत आहे. आंबिल्याच्या वनात जाऊन मला घेऊन या...!'' विश्वंभरबाबांनी आपला दृष्टान्त गावकऱ्यांना सांगितला. ते सगळे भजन करीत आंबिल्याच्या वनात गेले. वनात गेल्यावर त्यांना चंदनाचा सुवास दरवळत असल्याचा जाणवले. तिथेच जवळच एका जागेवर बुका व तुळशीपत्र सापडले. पांडुरंग येथेच असतील, असे जाणून विश्वंभरबुवांनी हातानेच ती माती उकरण्यास सुरुवात केली, तर अधिकच बुका व तुळशी बाहेर निघाली. थोडे आणखी उकरल्यावर श्री पांडुरंग व रुक्मिणी यांच्या दोन सुकुमार साजिऱ्या मूर्ती सापडल्या. त्या पाहून बाबांना परमानंद झाला. आकाश ठेंगणे झाले. त्यांनी डोळ्यासमोर पांडुरंगाचे ध्यान केले व आभार मानीत त्या मूर्ती वाजत–गाजत आपल्या घरी आणल्या व जवळच त्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली. तेच हे देहूचे विठ्ठल मंदिर होय. पण हे मंदिर इ.सन १७३३मध्ये तुकोबांचे पुत्र नारायणमहाराज यांनी बांधले. देहूच्या या मंदिरात पांडुरंग व रुक्मिणीची मूर्ती शेजारी उभे आहेत. मूर्ती उत्तराभिमुख आहेत. समोरच गरूडपार आहे. गरूड आणि हनुमंत दोघेही नम्रपणे हात जोडून उभे आहेत. पूर्वेकडील दरवाजाजवळ विघ्नराज गणेशाची मूर्ती आहे. गणेशाची मूर्ती दक्षिणाभिमुख आहे. मुख्य मंदिराच्या पश्चिमेला हरेश्वराचे मंदिर आहे व बाहेरच्या बाजूला बहिरवाचे लहान मंदिर आहे. तुकारामाच्या मुख्य घराण्याचे घर हरेश्वर मंदिराच्या शेजारी आहे. हेच घर आता इनामदारांचा वाडा म्हणून ओळखले जाते. विठ्ठल मंदिराच्या पूर्वेला राममंदिर आहे. त्यामागे शिव मंदिर आहे. त्याच्या जवळ असलेले तुकोबांचे वृंदावन आहे. तिथल्या एका शिळेवर बसून तुकोबा विठ्ठलाचे भजन करीत असत. त्याच जागेवर महाराजांच्या पादुकांची प्रतिष्ठापना केली आहे. तिथे त्यांचा मुखवटाही आहे. हेच वृंदावन नारायणबाबांनी इसवी सन १७०४ मध्ये बांधले आहे. विठ्ठल मंदिराच्या उत्तरेकडील महाद्वारासमोर महाराजांच्या वंशजांच्या समाधीच्या शिळा आहेत. त्याजवळ नारायणबाबांची समाधी आहे. इंद्रायणी नदीच्या डोहाजवळच गोपाळपुरा हे स्थान असून, तिथेच अश्वस्थ वृक्षाखाली

तुकाराममहाराजांच्या निर्वाणाचे स्थान आहे. गोपाळपुरापासून काही अंतरावर दुसरा एक डोह आहे त्याच डोहात तुकोबांच्या अभंगगाथा बुडवल्या होत्या, असे सांगितले जाते.

४.१.३ : तुकाराममहाराजांचे चरित्र :

तुकाराममहाराजांना अवघे ४२ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांच्या जीवनकालाचे दोन भाग पडतात. पहिला भाग २१ वर्षांचा; तो सामान्य नरदेहाचा. दुसरा भाग असामान्य पारमार्थिक उत्कर्षाचा. पहिल्या भागातील जीवनातील चढ–उतारामुळे त्यांचे पारमार्थिक आयुष्य घडले. संसारातील दु:खाशी एकरूप झाल्यानंतर प्रपंच म्हणजे परब्रह्म स्वरूप नव्हे हे त्यांना हळूहळू कळू लागले. प्रापंचिक जीवन फक्त सुखी, समाधानी नसून, दु:खाने भरलेले आहे, याची जाणीव तुकाराममहाराजांना झाली.

४.१.३.१ जन्म व बालपण : संत तुकाराममहाराजांचे पहिले चरित्र महिपतीबुवा ताहराबादकरांनी महाराजांच्या निर्वाणानंतर सुमारे सव्वाशे वर्षांनंतर म्हणजे १७७४मध्ये लिहिले. हे चरित्र अनेक दंतकथांनी समाविष्ट असले, तरी प्रथमतः त्यांचा आधार घेऊन आणि नंतर तुकोबांच्या उपलब्ध अभंगांवरून त्यांच्या चरित्राचा अभ्यास केलेला जाणवतो. संत तुकारामांच्या चरित्राचा अभ्यास ल. रा. पांगारकर, भालचंद्र नेमाडे, रा. ग. हर्ष, रा. ध. रानडे, शं. गो. तुळपुळे, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. सदानंद मोरे आदी. अभ्यासकांनी तुकाराममहाराजांच्या लौकिक, पारमार्थिक व अध्यात्मिक चरित्रांचा आणि वाङ्मयाचा अभ्यास केलेला आढळतो. या अभ्यासकांमध्ये मतभेदही आढळून येतात. तुकाराममहाराजांच्या जन्माच्या तीन तारखा अभ्यासकांनी मांडल्या आहेत.[२] वि. का. राजवाडे यांनी करंजखोप येथे सापडलेल्या वंशावळीवरून तुकारामांचा जन्म शके १४९० असा नमूद केला आहे, तर विनायक कोंडेओक यांच्या मते जन्म शके १५१०, तर महिपतीबाबा तहाराबादकर यांच्या मते जन्म शके १५३० असा आढळून येतो. वैकुंठवासी जोगमहाराज

[२] कै. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८. पृ.क्र. १७ ते २०.

सांप्रदायिक सार्थ श्री तुकाराम गाथा यांच्या गाथेत त्यांचा जन्म १६०८ असा संबोधला जातो. तुकाराम महाराजांची वंशावळ साधारणपणे अशा पद्धतीने दिसून येते.

[३]श्री. पु. म. लाड यांच्या मते, तुकारामांच्या कुळीचे अध्यात्मिक संस्कार जसे 'शुचि' होते. तशी त्यांच्या कुळाचा लौकिक 'श्रीमंतीचा' होता.

४.१.३.२ : वंशावळ :[४]



४.१.३.३ : तुकारामांचे प्रापंचिक जीवन : तुकाराममहाराजांच्या प्रापंचिक जीवनाचा आढावा घेत असताना वयाच्या तेराव्या वर्षापासून ते एकविसाव्या वर्षापर्यंत प्रापंचिक जीवन व्यवस्थित सुरू होते; परंतु शके १५५१मध्ये मुळीच पाऊस पडला नाही. दुष्काळाने लोक अगदी

---

[३] पु. म. लाड, तुकारामांचे चरित्र पूर्वार्ध, पहिली आवृत्ती–१९५८, पृ.क्र.२२.

४ कै. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८, पृ.क्र.३८

त्रस्त झाले. ज्या लोकांच्या घरात धान्य होते, ते वर्ष लोकांनी कसेबसे काढले. पावसाचा थेंब नाही व अन्नाचा कण नाही, अशी स्थिती अनेक प्रांतांची झाली. हजारो माणसे अन्न–पाण्यावाचून तडफडू लागली. हे जसे सर्वत्र होते, तशाच प्रकारचे आघात महाराजांच्याही आयुष्यात आढळून येतात. तुकारामांच्या दुसऱ्या विवाहानंतर बोल्होबा यांचे निधन झाले, त्यानंतर थोड्याच दिवसांनी आईचेही निधन झाले. दु:खाची दुर्दशा संपत नव्हती त्याच वेळी काळाने सावजीच्या पत्नीवरही झडप घातली. मुळातच प्रापंचिक विरक्त असलेले सावजी तीर्थाटनासाठी निघून गेले, ते परत आलेच नाहीत. घरातील अशी एकामागून एक माणसे निघून गेली आणि दुष्काळानेही डोके आणखी वर काढले व त्यापाठोपाठ साथीच्या रोगानेही घाला घातला. तुकाराममहाराजही या साऱ्या परिस्थितीतून चालले होते. या दु:खाचे वर्णन करताना त्यांनी आपल्या या अभंगात असे म्हटले आहे –

''न देखवे डोळां ऐसा हा आकांत ।
परपीडे चित्त दु:खी होतें ।।''[५]

त्यातच नियतीने महाराजांवर आपला प्रभाव करून प्रहार केला. दम्याच्या आजाराने व दुष्काळामुळे प्रथम पत्नी निर्वाण झाली व पत्नीपाठोपाठ थोरला मुलगा संतु हाही मृत्यू पावला आणि तुकारामांवर दु:खाचा डोंगर कोसळला. संसारातील सुखशांती नष्ट झाली.

''दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ।।
लज्जा वाटे जीव त्रासलों या दु:खें । बेबसाय देखे तुटी येतां ।।''[६]

अशा परिस्थितीतून सावरत असताना तुकारामांनी आत्मचिंतनाचा मार्ग स्वीकारला.

४.१.३.४ एकांतवास : तुकाराममहाराजांनी संसार सावरण्यासाठी पुष्कळ परिश्रम केले. पण प्रपंच काही व्यवस्थित होईना. त्यामुळे एकांतवासासाठी ते भामचंद्र डोंगरावर जाऊन बसले. तुकारामांचे

---

[५] कै. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८, अ.क्र. ५५७, पृ. क्र. १२९

[६] कै. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८, अ.क्र. मो.गा.३२, पृ.क्र.६०

लहान बंधू कान्होबा यांनी त्यांना शोधून घरी परत आणले. त्यानंतर तुकाराम महाराजांनी कान्होबाला अर्धा हिस्सा देऊन सावकारकीच्या त्यांच्या वह्या त्यांच्या स्वाधीन केल्यानंतर आपल्या हिश्श्याच्या सावकारीच्या ज्या वह्या होत्या, त्या इंद्रायणीत सोडून त्यांनी संसाराची व द्रव्यांची आशा एकाच वेळी बुडवून टाकली. हीच घटना त्यांच्या पारमार्थिक जीवनाला कलाटणी देणारी ठरली. वह्या बुडविल्या, तरीही त्यांनी संसाराच्या जबाबदारीचा त्याग केला नाही. परब्रह्म व देह यात भेद मुळीच नाही, अशी त्यांची खात्री पटली. भामचंद्रावरील भामनाथ डोंगरावर त्यांना परमात्मा पित्याचे दर्शन झाले आणि त्याचे वर्णन करताना ते म्हणतात,

[७]**''भामगिरीपाठारीं वस्ती जाण केली । वृत्ति स्थिरावली परब्रह्मीं ।।१।।**
निर्वाण जाणूनी आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ।।२।।
सर्प विंचू व्याघ्र अंगासी झोंबले । पीडूं जे लागले सकळीक ।।३।।
पंधरा दिवसांमाजीं साक्षात्कार झाला । विठोबा भेटला निराकार ।।४।।
दीप कीं कर्पूर कैसा तो निराळा । तैसा देह झाला तुका म्हणे ।।५।।''

भामनाथावरून घरी परतल्यानंतर त्यांनी आपले स्वानुभव अभंगांतून मांडण्यास सुरुवात केली, त्यांना सद्गुरूभेटीची आस लागली.

४.१.३.५ : गुरूउपदेश : माघ शुद्ध दशमी गुरुवारच्या रात्री महाराजांना एक स्वप्न पडले की, आपण गंगेत स्नानास जात असताना वाटेत एक सत्पुरुष ब्रह्म रूपाने भेटले. त्यांनी आपल्या मस्तकावर हात ठेवून 'राम कृष्ण हरी' हा मंत्र सांगितला. 'राघव चैतन्य, केशव चैतन्य' अशी गुरूपरंपरा सांगून स्वतःचे नाव बाबाजी असे सांगितले आणि भोजनाकरिता पावशेर तूप मागितले. ते आणेपर्यंत ते श्रीगुरू निघून गेले. सद्गुरूंनी आपल्यावर कृपा केली, पण आपल्या हातून त्यांची सेवा घडली नाही. याचा खेद महाराजांच्या मनाला वाटला व त्या विषयीची तळमळ वर्णन करताना ते म्हणतात,

---

[७] कै. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८, पृ.क्र. ७२

''सत्यगुरूरायें कृपा मज केली । परि नाहीं घडली सेवा कांहीं ।।१।।

सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ।।धृ।।

भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजीं ।।३।।

काय कळे उपजला अंतराय । म्हणोनियां काय त्वरा झाली ।।४।।

राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खूण माळिकेची ।।५।।

बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ।।६।।

माहो शुद्ध दशमी पाहूनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।७।।'' [८]

नामदेवमहाराजांनी स्वप्नात येऊन तुकारामांना कवित्व करण्याचा उपदेश केला. तुकाराममहाराजांनी नामदेवमहाराजांची आज्ञा मान्य करून अभंगरचनेस सुरूवात केली.

''नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ।।१।।

सांगितले काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ।।धृ।।

माप टाकी सळे धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ।।३।।

प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उतरे तें शेवटीं लावी तुका ।।४।।''[९]

तुकोबारायांच्या गाथेतील अभंगांची संख्या चार हजारांहून अधिक आहे. विविध गाथांमध्ये अभंगांची संख्या कमी–जास्त प्रमाणात दिसून येते.

४.१.३.६ : तुकारामांचे कवित्व : पहिले कवित्व श्रीकृष्णाच्या बाळक्रीडेवर केले. कीर्तन करताना स्वयंस्फूर्तीने त्यांच्या वाणीतून अभंग सहज बाहेर पडू लागले. असे प्रासादिक कवित्व परखड भाषाशैली यामुळे त्यांच्या कीर्तनात दिवसेंदिवस अधिकाधिक जनसमुदाय लांबून येऊ लागला. श्री पांडुरंगाच्या समोर रोज रात्री दोन प्रहरांपर्यंत व एकादशीच्या दिवशी प्रहरापर्यंत कीर्तन व हरिजागर होऊ लागला. हळूहळू तुकाराम महाराजांची कीर्ती सभोवतालच्या गावांमध्ये पसरू लागली. लोहगावामध्ये कुलदैवत श्रीरामचंद्रांचे मंदिर आहे, तेथे राम नवमीस मोठा उत्सव होत असे.

---

[८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, अ. क्र.३६८, पृ.क्र.७६.

[९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, अ. क्र.१३१५, पृ.क्र.२८२.

दुष्काळामुळे सावकाराला तो उत्सव कसा पार पाडावा याची चिंता पडली होती; परंतु सावकारास कोणीतरी सांगितले की, तुकाराममहाराज विनामूल्य कीर्तनाची सेवा देतात. हे ऐकताच तो सावकार तुकाराममहाराजांना देहूत येऊन भेटला व त्यांनी महाराजांस रामनवमी उत्सवाची कीर्तनसेवा करण्याचे आमंत्रण दिले. तुकाराम महाराजांनी ते मान्य करून लोहगावास प्रस्थान केले. तुकोबांचे करुणामय अभंग ऐकून सर्व जनांस आनंद झाला. सर्वत्र ब्रह्मानंद प्रकटला व सर्व जनसमुदायाच्या वाणीवर विठ्ठलनामाचा घोष होऊ लागला. याप्रमाणे एक महिनाभर तुकारामांचे लोहगावी कीर्तन झाले. लोहगावात तुकारामांच्या कीर्तनाचा लौकिक वाढला. माय–लेकराप्रमाणे तुकाराम व लोहगावच्या लोकांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. लोहगावामध्ये महाराजांची कीर्ती झाली, ती देहूपर्यंत येऊन पोहोचली. महाराजांच्या कीर्तनास देहूतूनही मोठमोठे विद्वान लोक येऊ लागले; परंतु मंबाजी गोसावी यांना तुकाराममहाराजांविषयी बिलकुल प्रेम नसतानाही कीर्तनास यावे लागले. महाराजांची टवाळकी करणाऱ्या कुटाळ लोकांची तोंडे बंद होऊ लागली. मंबाजी गोसावी हे चिंचवडचे गृहस्थ देहूत मठ बांधून राहत होते. ते तुकाराममहाराजांचा वाढत असलेला लौकिक पाहून द्वेष करू लागले. एकदा त्यांनी काटेरी कुंपणांच्या काठ्यांनी तुकाराममहाराजांना झोडपले; परंतु तुकाराममहाराजांनी तोंडातून अवाक्षर काढले नाही. मारता मारता मंबाजीबुवा दमून मठात निघून गेले, पण तुकाराममहाराज शांतपणे देवळात येऊन विठोबाला म्हणाले, बरे झाले देवा तू मला काट्यांनी मारविले. शिवीगाळीचा भडिमार करून विटंबना केलीस; पण मला क्रोधाच्या हातून सोडविलेस. त्या कृपेचे वर्णन करताना महाराज लिहितात,

''बरवें बरवें । केलें विठोबा बरवें ।।१।।
पाहोनिया अंत क्षमा । अंगी कांटीं वरी मारविलें ।। धृ।।
शिव्या गाळीं नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ।।२।।
तुका म्हणे क्रोधा हातीं । सोडवुनी घेतलें रे ।।३।। ''[१०]

[१०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र. ३८३५, पृ.क्र.७७२.

४.१.३.७ : परमार्थ साधना : मंबाजींनी इतके मारूनही तुकाराममहाराजांनी त्यांना सायंकाळी आपल्या कीर्तनासाठी बोलाविले त्यांना क्षमा करून उलट आपणच त्यांची क्षमा मागितली. क्रोधावर मारा न करता शांतपणाने तुकाराममहाराजांनी आलेला प्रसंग सावरून नेला आणि आपल्या कीर्तनास उभे राहिले. कीर्तनास उभे असताना त्यांनी सदर अभंगाचे निरुपण केले.

''नाही मज कोणी उरला दुर्जन । मायबापाविन ब्रह्मांडांत ।।१।।
कासया जिकीर करणें येविसीं । भयाची मानसीं चिंता खंती ।।धृ।।
विश्वंभराचिये लागलों सांभाळीं । सत्तेनें ती चाली आपुलिये ।।३।।
तुका म्हणे माझें पाळण पोषण । करीतां आपण पांडुरंगा ।।४।।''[११]

४.१.३.८ : तुकाराममहाराज यांचा छळ : मंबाजी व सालुमालुसारखे ढोंगी लोक तुकारामांचा द्वेष करीतच राहिले. नामदेवांच्या आज्ञेप्रमाणे तुकोबारायांनी अभंग रचण्यास सुरुवात केली व त्यांच्या मुखातून अद्वैत प्रचिती येऊ लागली. तुकोबा एकांतासाठी भामनाथ व भंडाऱ्यावर जाऊन बसू लागले. भंडाऱ्यावर बसून ते अभंग गाऊ लागले. तुकोबाराय दिवसभर भंडाऱ्यावर बसत व रात्री परत गावात येत असे म्हटले जाते. जिजाई त्यांना भंडाऱ्यावर भाकरी घेऊन जात असे. एकदा ती भंडाऱ्यावर जात असताना माता जिजाईच्या पायात काटा रुतला तेव्हा गुराख्याच्या रूपात साक्षात परब्रह्म पांडुरंगाने येऊन तो काटा काढला. शेताच्या राखणीचा प्रसंग असो किंवा संसाराचा; तुकोबांच्या पांडुरंगाने तो तारून नेला. तुकाराममहाराजांचा लौकिक वाढतच चालला होता. त्यांच्या काव्याची कीर्ती दूरवर पसरली होती. खुद्द शिवाजीमहाराजही तुकारामांच्या कीर्तनास येत होते, असा उल्लेखही सापडतो. शिवाजीमहाराजांसाठी पाईकांच्या अभंगाची निर्मिती पाहणे इष्ट ठरते.

''पाईक तो प्रजा राखोनियां कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ।।१।।
तो एक पाईक पाईकां नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ।।धृ.।।''[१२]

---

[११] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र. ३८३५, पृ.क्र.७७२.

[१२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र. १०६६, पृ.क्र.२३३.

रामेश्वर भट्टांनी तुकारामांच्या लेखणीवर आक्षेप घेतला व त्यांना गावाबाहेर जाण्याची आज्ञा दिली. तुकाराममहाराज रामेश्वर भट्टास भेटावयास गेले व त्यांना विचारले, आपण आम्हास गावाबाहेर जाण्याची आज्ञा केलीत. तेव्हा रामेश्वर भट्ट त्यांना म्हणाले, तू जातीचा शुद्र आहेस व प्राकृत कवित्व करून श्रुतीचे अर्थ सांगत आहेस. हे सांगण्याचा अधिकार तुला प्राप्त नाही. हे करून तू आमचा अपमान केला आहेस. तेव्हा तू केलेले कवित्व तुझ्या हाताने नदीत बुडव. तुकाराम कवित्व करून मोठा लौकिक मिळवील, हे सहन न झाल्याने रामेश्वर भट्टांनी त्यांना ही आज्ञा दिली तुकाराममहाराजांच्या नयनांतून अश्रू वाहू लागले. त्यांनी पांडुरंगास आर्त हाक घातली व पांडुरंगास म्हणाले, ''कदाचित तुझीच आज्ञा आहे,'' असे समजून अभंगांचे गाठोडे इंद्रायणी डोहात बुडविले. त्यांची झालेली ही फजिती पाहून विरोधक आनंदले; परंतु तुकाराममहाराजांना अंत:करणातून फार वाईट वाटले. त्यांचा जीव कासावीस होऊन, अंत:करण भरून येऊन, डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. इकडे रामेश्वर भट्टांच्या अंगाचा दाह सुटला. त्यांनी आळंदीत जाऊन दाह कमी होण्यासाठी अनुष्ठान मांडले. इकडे तुकाराममहाराजांनी वह्या बुडविल्यामुळे अन्न–पाणी वर्ज्य करून पांडुरंगाचे नामस्मरण करत बसून राहिले. पांडुरंगाने त्यांच्या भक्ताच्या स्वप्नात येऊन दृष्टात दिला की, तुक्याच्या अभंगांच्या वह्या पाण्यात कोरड्या रक्षिल्या आहेत. सर्वजण इंद्रायणीच्या डोहाजवळ येऊन पाहतात. तर खरोखरच वह्या तरंगलेल्या होत्या. हे पाहून तुकोबारायांचे अंत:करण पांडुरंगाच्या प्रेमाने भरून आले व त्यांच्या मुखातून अनेक अभंग आले.

''थोर अन्याय केला । तुझा अंत म्यां पाहिला ।
जनाचिया बोला । साठीं चित्त क्षोभविलें ।।१।।
भागविलासी केला सीण । अधम मी यातीहीन ।
झांकूनि लोचन । दिवस तेरा राहिलों ।।धृ।।
अवघें घालूनियां कोडें । तहानभुकेचें सांकडें ।
योगक्षेम पुढें । तुज करणें लागलें ।।३।।
उदकीं राखिलें कागद । चुकविला जनवाद ।

तुका म्हणे ब्रीद । साच केलें आपुलें ।।४।।''[१३]

इकडे रामेश्वर भट्टांनाही ज्ञानेश्वरांनी दृष्टान्त देऊन तुकारामांच्या आश्रयास जावयास सांगितले. रामेश्वरांनी तशा प्रकारचे पत्र तुकाराम महाराजांस लिहिले पत्र वाचून तुकाराममहाराजांच्या अंतःकरणात त्यांच्या मागील वर्तनाचीही आठवण राहिली नाही. अखिल विश्वामध्ये पांडुरंगाशिवाय त्यांना कुणीही दिसत नव्हते. तेव्हा शत्रू आणि मित्र या दोघांमध्येही श्रीहरीच नांदत असल्याचा भाव तुकारामांच्या ठायी होता. रामेश्वर भट्टांच्या दु:खाने कळवळून महाराजांच्या अंत:करणात प्रेमभावना जागृत होऊन स्वयंमस्फूर्तीने रामेश्वर भट्टांसाठी हा अभंग बाहेर पडला

''चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ।
व्याघ्रही न खाती सर्प तया ।।१।।
विष तें अमृत आघात तें हित ।
अकर्तव्य नीत होय त्यासी ।।धृ।।
दु:ख तें देईल सर्व सुख फळ ।
होतील शीतळ अग्निज्वाळा ।।३।।
आवडले जीवां जीवाचिये परी ।
सकळां अंतरीं एक भाव ।।४।।
तुका म्हणे कृपा केली नारायणें।
जाणिजेते येणें अनुभवें ।।५।।''[१४]

हा अभंग घेऊन शिष्य परत रामेश्वर भटजीकडे गेला. रामेश्वर भटजी तो वाचत असताना होतील शीतल अग्निज्वाळा हे कडवे येताच रामेश्वर भट्टांच्या अंगाच्या दाह थांबला आणि तुकारामांच्या सामर्थ्याची प्रचिती रामेश्वर भट्टास आली. मनामध्येच त्यांनी तुकाराममहाराजांना लोटांगण घातले व संतांचा महिमा अगाध आहे, हे मान्य केले. तेव्हापासून रामेश्वर भट्ट हे

---

[१३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ. क्र.२२३१, पृ.क्र.४६३.

[१४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ. क्र.१७४५, पृ. क्र. ३६८.

तुकाराम महाराजांचे पट्टशिष्यांपैकी एक शिष्य झाले. भागवत धर्माची स्तुती करताना वैदिक धर्मानेच भागवत धर्माच्या भक्ती राजमार्गाची महती जगाला प्रसिद्ध करून दाखविली. त्याची स्तुती रामेश्वर भट्टांनी अशी केली,

''पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । परि सरी न पवती तुकयाची ।।१।।
शास्त्रही पुराणें गीता नित्य नेम । वाचिताती वर्म न कळे त्यांसी ।।२।।
कर्मअभिमानें वर्णअभिमानें । नाडले ब्राह्मण कलियुगी ।।३।।
तैसां नव्हे तुका वाणी व्यवसाई । भाव त्याचा पायीं विठोबाचे ।।४।।
अमृताची वाणी वरुषला शुद्ध । करि त्या अशुद्ध ऐसा कोण ।।५।।
चहूं वेदांचे हें केले विवरण । अर्थहि गहन करूनियां ।।६।।
उत्तम मध्यम कनिष्ठ वेगळे । करुनि निराळे ठेविले ते ।।७।।
भक्ति ज्ञान आणि वैराग्य आगळा । ऐसा नाही डोळां देखियेला ।।८।।
जपतप यज्ञ लाजविली दाने । हरिनाम कीर्तनें करुनियां ।।९।।''[१५]

सर्व मोहांचा त्याग करून रामेश्वर भट्टांनी तुकाराममहाराजांचे चरण धरिले.

४.१.३.९ अनगडशहा बहिणाबाई यांची भेट : रामेश्वर भट्टांचा दाह कमी झाल्याची बातमी अनगडशहाच्या कानी आली तेव्हा ते तुकारामांस भेटण्यास पुण्यावरून देहूस येण्यास निघाले. तुकोबांच्या घराच्या दारापुढे भिक्षा मागताना तुकोबांच्या मुलीच्या मूठभर पिठाने त्यांचे भिक्षापात्र भरून पावले. तिला त्यांनी तिच्या पित्याचे नाव विचारताच तिने तुकोबा असे सांगितले. तिने तुकोबा देवळात गेल्याचे सांगितल्यानंतर अनगडशहांनी देवळात जाऊन तुकोबांस साष्टांग दंडवत घातला. ती भेट धर्मनिरपेक्षतेचे ज्वलंत उदाहरण दाखवून देते.

कोल्हापुरात जयरामस्वामींच्या कीर्तनात तुकोबारायांचे अभंग म्हटले जात. त्या वेळी त्या श्रोत्यांमध्ये बहिणाबाई नावाची एक बारा वर्षांची मुलगी होती. तिला हे अभंग ऐकून तुकाराममहाराजांना भेटण्याची आनिवार्य इच्छा झाली. तिने तुकाराममहाराजांच्या भेटीचा ध्यास

[१५] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायणप्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, द्वितीयावृत्ती, २०१० अ. क्र. ३३५२, पृ.क्र.७०६.

घेतला, ती सर्व कुटुंबीयांसहित देहूस तुकाराममहाराजांच्या भेटीस आली. देवळात आरती करत असताना बहिणाबाईंची तुकारामांशी भेट झाली आणि त्यांच्या नयनातून अश्रू वाहू लागले. बहिणाबाईंनी तुकाराममहाराजांच्या भेटीचे वर्णन आपल्या अभंगात केले आहे ते असे –

''मायबाप बंधु भ्रतारासहित ।
इंद्रायणी जेथ तेथ आलों ।।१।।
करूनिया स्नान पांडुरंगी भेटी ।
आनंदली सृष्टी अंतरंगें ।।२।।
तुकोबा आरती करित होते तेथें ।
नमस्कारे स्वस्थ चित्त केलें ।।३।।
स्वप्नीं जो देखिला तेंचि ध्यान तेथें ।
देखिलें नेमस्त पूर्ण दृष्टीं ।।४।।''[१६]

४.१.३.१० : निर्वाण वैकुंठगमन : तुकारामांचे वाङ्मयीन धार्मिक, सामाजिक व अध्यात्मिक प्रबोधन कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांचे अभंग मराठी साहित्यामध्ये एकमेव व अद्वितीय असे ठरले आहेत. आपल्या उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार व वास्तववादाशी जवळचे नाते, असेच अभंग गाथा वाचताना वाटते. तुकारामांच्या साहित्याचे वाङ्मयीन स्थान अढळ आहे. वारकरी संप्रदायामध्ये त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे, म्हणूनच बहिणाबाईंच्या रुपकाप्रमाणे ते भागवत धर्माच्या कळसावर शोभत आहेत. भाविकांनी त्यांची स्थापना भागवत धर्माच्या कलशाने केली आहे. त्यांनी आपल्या साहित्यामध्ये वैश्विक व चिरंतन अशा श्रेष्ठ जीवनमूल्यांचा आविष्कार केला आहे. बहुजन समाजाला धार्मिक व सामाजिक उद्धाराचा मार्ग उपलब्ध करून दिला. गृहस्थ आश्रमात राहून भक्तीचा मार्ग स्वीकारून सामाजिक बांधिलकीची जपणूक करण्याचा संदेश त्यांनी आपल्या गाथेत दिला. नाथमहाराज असे म्हणतात, भक्त सद्भावे कीर्तन करीत असताना त्याच्या हृदयात श्रीहरीचे ध्यान ठसलेले असते. त्या श्रीहरीची चिन्हे त्यांच्या अंगी उमटू लागतात.

---

[१६] कै.बाळाराम कृष्णनाथ धुरंधर,संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८, पृष्ठ क्र. २१२

देव भक्ताच्या ठिकाणी सभायंतरी प्रकट होऊन भक्त देवरूप होतात. (एकनाथी भागवत अभंग क्र. ५) हे वर्णन तुकोबारायांना लागू पडते.

तुकाराममहाराजांच्या अंत:करणात आपल्या कार्यसिद्धीची वेळ जवळ आली आहे, असे वाटू लागले. त्यांना भगवंत भेटीची उत्सुकता लागली. प्रस्तुत अभंगात त्या विषयीची तळमळ ते व्यक्त करतात.

''आतां कशासाठीं दुरी । अंतर उरी राखिली ।।१।।
करीं लवकरी मूळा । लहान तळा मुळीचिया ।।धृ।।
दोहीं ठायीं उद्‌वेगवाणें । दरूषणें निश्चिंती ।।३।।
तुका म्हणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठा ।।४।।'' [१७]

तुकाराममहाराजांनी पंढरीनाथास पत्र पाठविले की, ईहलोकी आम्हा राहणे नाही. तुझ्या भेटीची आस, ओढ आम्हाला लागली आहे. वैकुंठास माहेरचे रूपक देताना तुकाराममहाराज म्हणतात,

''आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतां हातीं आला ।।१।।
सुख दु:ख माझें आइकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ।।धृ।।
करुनि सिद्ध मूळ साउलें भातुके । येती दिसे एकें न्यावयासी ।।३।।
त्याचि पंथें माझें लागलेंसे चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ।।४।।
तुका म्हणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ।।५।।'' [१८]

पंढरीनाथास पत्र पाठवल्यानंतर त्यांना शकुन – अपशकुनाची चिन्हे जाणवू लागली. पंढरीरायाचे दर्शन आता आपल्याला लवकरच होईल व त्याची भेट झाल्यानंतर आत्मिक संतुष्टी मनास मिळेल. विठ्ठल भेटीला सामोरे जाताना तुकाराममहाराज म्हणतात,

---

[१७] जगद्‌गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र.३४७८, पृ.क्र.७०५.

[१८] जगद्‌गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र.१५८७, पृ.क्र.३३८.

''चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ।।१।।

तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं ।

फेडावया धणी । प्रेमसुखाची आजी ।।धृ.।।

पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ।।३।।

तुका आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ।।४।।'' [१९]

तुकाराममहाराजांनी पांडुरंगास घरी जेवण्यास नेले व आपल्या मोडक्या प्रपंचात त्यांचा आदर – सत्कार केला. पाहुणचारासाठी जिजाऊस त्यांनी कण्या शिजवण्यास सांगितल्या. प्रस्तुत अभंगात पांडुरंगाचा पाहुणचार करताना तुकाराममहाराज म्हणतात,

''पाहुणे घरासी । आजी आले ऋषीकेशी ।।१।।

काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ।।धृ।।

दरदरीत पाण्या–। माजीं रांधियेल्या कण्या ।।३।।

घरीं मोडकीया बाजा । वरी वाकळांच्या शेजा ।।४।।

मुखशुद्धी तुळसीदळ । तुका म्हणे मी दुर्बळ ।।५।।'' [२०]

जिजाऊच्या कण्या पांडुरंगाने आनंदाने खाल्ल्या. फाल्गुन वद्य द्वितीयेस तुकाराम महाराजांनी प्रात:काळी जिजाबाईंचा निरोप घेतला व तिला आशीर्वाद देऊन ते म्हणतात,

''होसी पुत्रवंती नारायण सुखें । पहासी पुत्रमुख आशिर्वचन ।।१।।

जातां हा शेवट त्वां गोड केला। कळस झाला येथुनियां ।।२।।

तुका म्हणे आतां झालें समाधान । समाखिलें मन शेवटींचें ।।३।।''[२१]

असे वचन देऊन तुकोबाराय पांडुरंगाच्या दर्शनासाठी मंदिरात निघून गेले. देवळात टाळकरी व भक्त मंडळी जमली होती. त्यांना उपदेशून तुकाराममहाराज म्हणतात,

---

[१९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र.१५९४, पृ.क्र.३३९.

[२०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र.१५९५, पृ.क्र.३३९.

[२१] कै.बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८ पृष्ठ क्र.३७४.

''आम्ही जातों आपुल्या गांवा । आमुचा राम राम घ्यावा ।।१।।

तुमचि आमची हे चि भेटी । येथुनियां जन्मतुटी ।।धृ।।

आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पाया ।।२।।

येतां निजधामीं कोणी । विठ्ठलविठ्ठल बोला वाणी ।।३।।

रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ।।४।।'' [२२]

तुकाराममहाराजांच्या वैकुंठगमनाविषयी अनेक मत–मतांतरे आहेत.

''शालिवाहन शके पंधराशें एकाहत्तर ।।

विरोधी नाम संवत्सर उत्तरायणीं।।

फाल्गुन वद्य द्वितीया दिवस सोमवार ।

प्रथम प्रहर प्रातःकाळ ।।१।।

तये दिवशीं शेवट कीर्तन करितां ।

म्हणे मज आतां निरोप द्यावा ।।२।।

तुका म्हणे नमन साधु संत पाया ।

ऐसें बोलोनियां गुप्त झाले ।।३।।'' [२३]

अशा पद्धतीने तुकाराममहाराजांनी आपल्या इहलोकाच्या यात्रेस पूर्णविराम देऊन सदैव वैकुंठगमन केले. सर्वांना निरोप देताना तुकाराममहाराज म्हणतात,

''आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी ।

सकळां सांगावी विनंती माझी ।।१।।

वाड वेळ झाला उभा पांडुरंग ।

वैकुंठा श्रीरंग बोलावितो ।।२।।

---

[२२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र.४४४८, पृ.क्र.८९९.

[२३] कै.बाळाराम कृष्णनाथ धुरंधर, संतमुकुटमणि श्री तुकाराममहाराज यांचे चरित्र, प्रकाशक – बाबुलजी कृष्णनाथ धुरंधर आणि धुरंधर बंधु, मुंबई – १९२८ पृष्ठ क्र.३८१, गो.गा.अं.६६३६

अंतकाळी विठो आम्हांसी पावला ।

कुडीसहित झाला गुप्त तुका ।।३।।'' [२४]

सारांश : संतभूमी मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या इतिहासात भक्ती वा अध्यात्म हा केवळ मार्ग मानला जात नाही, तर संतांनी तत्कालीन महाराष्ट्रासाठी व सामान्य जनतेसाठी व त्यांच्या अध्यात्मिक व सामाजिक प्रबोधनासाठी दिलेले योगदान हे महाराष्ट्राच्याच नव्हे; तर भारताच्या इतिहासात 'भक्ती–चळवळ' म्हणून नमूद केले जाते. जात–पात, अंधश्रद्धा, गरिबी, दुष्काळ, समाजातील अज्ञान, हिंसाचार यांसारख्या समस्यांतून समाजाला बाहेर काढण्यासाठी व समाजाच्या एकतेसाठी, उन्नतीसाठी संतांनी केलेले कार्य हा भक्तीच्या मार्गाने केलेला उठाव होता, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

संत ज्ञानेश्वर, मुक्ताई, संत एकनाथ, संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत विसोबा आदी अनेक संतांनी उभारलेली ही भक्ती चळवळ म्हणजेच आजही कार्यरत असलेला वारकरी संप्रदाय.

या संप्रदायाचे सर्वश्रेष्ठ अनुयायी व वारकरी संप्रदायातील मुकुटमणी असलेले संत म्हणजे जगद्गुरू संत तुकाराममहाराज, विठ्ठलभक्ती त्यांना परंपरागत लाभली होती. त्यांच्या मागील दहा पिढ्यांपासून विठ्ठलभक्ती हा जणू तुकाराममहाराजांच्या घराण्याचा कुळधर्म होता. पुणे परगण्यात प्रतिष्ठित महाजनपद, सावकारीचा व्यवसाय, वाणी व्यवसाय, शेती या श्रीमंतीसोबतच विठ्ठलभक्तीची परंपरादेखील त्यांना आनुवंशिकच लाभली होती. तुकोबांचे आठवे पूर्वज विश्वंभरबाबा हे अत्यंत भाविक व धार्मिक गृहस्थ होते. मातेचा आदेश मानून त्यांनी पंढरीची वारी स्वीकारली व त्यांनी अत्यंत आनंदाने अनेक पंढरीच्या वाऱ्या केल्या. पंढरीच्या वारीमुळे व चित्त हरिनामात गुंतल्याने त्यांचे प्रपंचात दुर्लक्ष होत होते. तेव्हा प्रत्यक्ष पांडुरंगाने त्यांच्या स्वप्नात येऊन 'पांडुरंग देहूत येईल' असा दृष्टान्त दिला व काही काळाने देहूतील आमराईत त्यांना सर्वांगसुंदर विठ्ठल व रुक्मिणीच्या मूर्ती सापडल्या व त्यांची स्थापना देहूत एका मंदिरात केली.

---

[२४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ. क्र.१६०१, पृ.क्र.३४०.

तेव्हापासून देहूला श्रीक्षेत्राचे स्थान लाभले. तुकारामांचे बालपण हौसेने व खेळण्यात गेले, त्यांनी अभंगांतून रुपक दिले. टिपऱ्या, चेंडू, पाट्या, हुतूतू, हम्मामा, हुंबरी, विटी – दांडू हे खेळ त्यांच्या आवडीचे होते. आईचे शब्द जिवापेक्षाही किमती मानत प्रेमी व भाविक वातावरणात त्यांचे बालपण गेले. पुढे संसार, दुष्काळाचे संकट, व्यवसाय व द्रव्यरूपी नुकसान हा सारा घटनाक्रम घडला. त्या साऱ्या चरित्रातून त्यांचे विशाल अंतःकरण दुःख निवारण्यासाठीची धडपड असलेने संतत्व दिसून येते. पुढे त्यांना सद्गुरू साक्षात्कार झाला तो माघ शुद्ध दशमी गुरुवारी त्यांच्या स्वप्नात सद्गुरू बाबाजी आले व त्यांनी तुकाराम महाराजांना 'राम कृष्ण हरी' हा मंत्र दिला. हाच मंत्र अखिल वारकरी संप्रदायाचा मंत्र ठरला आहे. परंतु सर्वांत मोठा क्षण हा तुकाराम महाराजांच्या कवित्व स्फूर्तीचा होता. त्याचमुळे जगाला संतश्रेष्ठ तुकारामांमध्ये जगातील सर्वश्रेष्ठ संतकवी मिळाला. तुकोबारायांची अभंगगाथा ही मराठी सारस्वताचा एक मोठा वाङ्मयीन ठेवा ठरला प्रज्ञावंत, प्रतिभावंत, शास्त्रज्ञ, समाजचिंतक, भक्त, ज्ञानी, साधक, उपासक, सामान्य, प्रापंचिक या सर्वांना ही अभंगवाणी एक दिव्य दृष्टी देऊन गेली. त्यांच्या अभंगवाणीतील प्रत्येक शब्दा–शब्दांतून त्यांचे व्यक्तिमत्व प्रकटत आहे.

* * *

४.२ : तुकाराममहाराजांची अभंग गाथा– स्वरूप व वाटचाल :

४.२.१ : प्रास्ताविक :

संत तुकाराममहाराज यांचे साडेचार हजारांहून अधिक अभंग उपलब्ध आहेत. अभंगांची निर्मिती जनसामान्यांच्या उद्धारासाठीच केली असल्यामुळे त्याबद्दलची तळमळ आपल्या अभंगनिर्मितीत दिसून येते. या प्रकरणात अभंगाची रूपे, संख्या, अभंगरचनेत वेगवेगळे रचनाप्रकार पहावयास मिळतात. अभंगरचनेतील विविधता आढळून येते. तुकारामांच्या अभंगरचनेतील या विविध रूपांचा आढावा घेण्यात आला आहे.

अभंगाचे विषय, विषयवार आलेले अभंगलेखन त्याचा आढावा व तुकारामांच्या जीवनातील घटना–प्रसंग यांच्या आधारेविषयावर मांडणी केली व थोडक्यात अभंगाचा क्रम, विषयावर, गाथेवार आढावा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

४.२.२ :अभंगाची निर्मिती आणि वाटचाल :

संत वाङ्मयात अभंग हे मुख्यतः 'ओवी' या छंदात रचले गेले आहे. अभंग हा वैशिष्ट्यपूर्ण छंद आहे. संस्कृत भाषेशी प्रचलित नसलेल्या जनसमुदायास जवळचा वाटणारा अभंग हा प्रकार आहे. अभंग हा प्रकार सर्वसामान्यांच्या जवळचा असल्याने लोकप्रिय आहे. अभंग हे वारकरी परंपरेत सर्वच संतांनी लिहिलेले आढळतात. संत नामदेवांना अभंगाचे जनक मानले जाते. संत नामदेव, संत एकनाथ, चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार ते तुकाराममहाराजापर्यंत सर्वच संतांनी अभंगाची रचना केलेली दिसते. तुकाराममहाराजांचे अभंग हे स्वानुभवपर असल्यामुळे लोकांना अधिक जवळचे वाटतात. त्यामुळे तुकारामांच्या अभंगांना अधिक लोकप्रियता मिळाली. 'ओवी' ही संस्कृत भाषेत असल्याने तिची रचना समजण्यास अवघड आहे., तथापि अभंगरचनेच्या बाबतीत अक्षर संचांचे निर्माणाचे बंधन नसल्यामुळे अभंग समजण्यास सुलभ जातो. अभंगांचे प्रकार अभंग रचनेवरून पडतात. ज्या छंदामध्ये किंवा अक्षरांमध्ये अक्षरांची विभागणी किंवा भंग होत नाही, तो 'अभंग' भंग म्हणजे कर्णमधुर गण, तसेच

अभंग म्हणजे गणविहीन, वृत्तात्मक, समचरण किंवा विषय चरण छंद. संत नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ व तुकाराम यांचे अभंग वाचताना असे दिसून येते की, अभंगांचे एकापासून १०० ते २०० पर्यंत असे अनेक प्रकारचे चौक असतात. प्रत्येक चौकात साडेतीन, पावणेचार किंवा चार चरण असतात. चरणात चारपासून चौदापर्यंत अक्षरे असतात. अभंगामध्ये चार किंवा साडेतीन चरण एकदम म्हटले जातात. या प्रकाराला चौक असे संबोधले जाते. अभंगात चरणाचे शेवटचे उपान्त्य (दुसरे) अक्षर स्वर किंवा हेल काढून लुप्त होते. अभंगांच्या चौकाच्या पहिल्या तीन चरणांत नियमित अक्षरे असावी लागतात.

संत निवृत्तीनाथांपासून अभंग निर्मितीस सुरूवात झाली. निवृत्तीनाथांनंतर ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, गोरा कुंभार, सावतामाळी, सेना न्हावी, चोखामेळा, नरहरी सोनार, कबीर, कमाल, सुरदा, मीराबाई, एकनाथ, बहिणाबाई, तुकोबाराय आदी संतांनी अभंगनिर्मिती व रचना करून अभंग वाङ्मय समृद्ध केले. या सर्व संतांचे आराध्य दैवत म्हणजे पंढरीनाथ विठ्ठल होय आणि या विठ्ठलाच्या भक्तीतून अभंगनिर्मिती झाली. संतांच्या आपापल्या अभंगांचे स्वरूप व वैशिष्ट्येही वेगवेगळी आहेत. निवृत्तीनाथांच्या नावावर अंदाजे साडेतीनशे ते चारशे अभंग पहावयास मिळतात. निवृत्तीनाथांनी निवृत्तीसार, निवृत्तीदेवी आणि उत्तरगीता टीका असे तीन ग्रंथ लिहिले आहेत. निवृत्तीनाथांचा 'हरिपाठ' प्रसिद्ध आहे. हरिपाठाच्या अभंगांमधून त्यांनी नाममहिमा वर्णन केला आहे.

ज्ञानेश्वरांनी आपल्या ओवीरचनेतून अभंगरचना केलेली आढळते. 'ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि अभंगाची गाथा' इत्यादींची निर्मिती केली. ज्ञानेश्वरांचे अनेक अभंग उपलब्ध आहेत. डॉ. प्र.न. जोशी यांनी सार्थ श्री ज्ञानदेव अभंग गाथा या नावाने ज्ञानेश्वरांचे अकराशे अभंग भावार्थासहित संवादित करून ते प्रकाशित केलेले आहेत. ज्ञानेश्वरांचे अभंग हे विविध विषयांवर आहेत. मंगलचरण, गणेशवंदन, श्री गुरू महिमा, नाम महिमा, संत महिमा, पंढरी महिमा, गवळणी, श्रीकृष्ण वर्णन, बाळक्रीडा, करुणापर, उपदेशपर अशा पद्धतीने वर्णन करता येईल. वारकरी संप्रदायात भजन आणि कीर्तनाचा प्रारंभ ''अलंकापुरी पुण्यभूमी

पवित्र, तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र ।।१।। तया आठविता महापुण्यराशी । नमस्कार माझा श्री सद्‌गुरू ज्ञानेश्वराशी'' असे नामस्मरण करून होतो.

''रूप पाहता लोचनी । सुख झाले हो साजनी ।।१।।
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।।धृ।।
बहुता सुकृतांची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी ।।२।।
सर्व सुखाचे आगर । बाप रुखमादेवीवरू ।।३।।'' [२५]

ज्ञानेश्वरांच्या या प्रस्तुत अभंगाने कीर्तनाची सुरुवात होते. ज्ञानदेवानंतर मुक्ताबाईचेही अभंग पहावयास मिळतात. मुक्ताबाईंचे, 'ताटीचे' अभंग प्रसिद्ध आहेत. डॉ. र. रा. गोसावी संपादित श्री सकल संतगाथा (खंड १) मध्ये मुक्ताबाईचे बेचाळीस अभंग दिलेले आहेत. ताटीच्या अभंगांद्वारे ज्ञानेश्वरमहाराजांना उद्देश करताना मुक्ताबाई म्हणतात.

''योगी पावन मनाचा ।सहि अपराध जनाचा ।
विश्व झालीया वन्ही । संतमुखे व्हावे पाणी ।।
शब्द शस्त्र झाले क्लेश । संती मानवा उपदेश ।
विश्व परब्रम्ह दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।
लडीवाळ मुक्ताबाई । बीज मुद्दल ठायी ठायी ।
तुम्ही तरीणी विश्वतारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।''[२६]

परंतु हे 'ताटीचे अभंग' श्री. र. रा. गोसावी संपादित श्री संत सकल गाथा (खंड १) मध्ये काही अभंग दिलेले नाही.

---

[२५] संपादक, प्रा.डॉ. र. रा. गोसावी, ब्रह्मीभूत श्री नानामहाराज साखरे प्रसादिक, श्रीसकलसंतगाथा खंड पहिला, सारथी प्रकाशन, पुणे, द्वितयावृत्ती २०१६, अ.क्र. १, पृ.क्र. ७७

[२६] संपादक, प्रा.डॉ. र. रा. गोसावी, ब्रह्मीभूत श्री नानामहाराज साखरे प्रसादिक, श्रीसकलसंतगाथा खंड पहिला, सारथी प्रकाशन, पुणे, द्वितयावृत्ती २०१६,, पृ.क्र.२३६.

वारकरी संप्रदायात संत नामदेवांचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. भागवत धर्माचा पाया ज्ञानदेवांनी रचला असला, तरी भागवत धर्माचा प्रसार व प्रचार नामदेव महाराजांनी केला. श्री संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक मानले जातात. नामदेवांचे कार्य हे फक्त महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते. नामदेवांच्या उपलब्ध गाथेमध्ये त्यांच्या नावावर साधारणपणे २५०० अभंग उपलब्ध आहेत. वारकरी संप्रदायात संत नामदेवांच्या गौळणी फार लोकप्रिय आहेत. कृष्णचरित्राचे वर्णन करताना श्री संत नामदेव प्रस्तुत गौळणी कृष्णाच्या बालरूपाचे वर्णन करताना म्हणतात,

''बाळ सगुन गुणाचे तान्हे गे।
बाळ दिसते गोजिरवाणे गे ।
काय सांगता गाऱ्हाणे गे।
गोकुळींच्या नारी ।।१।।''[२७]

नामदेवांनी 'विराण्या' रचल्या. तसेच बाळक्रीडेच्या अभंगांवरच नामदेवांनी रूपकात्मक अभंगांचे वर्णन केले. नामदेवांच्या अभंगरचनेमध्ये प्रेमभाव आणि भक्तिभाव यांचा अविष्कार होताना दिसतो. संत नामदेवांनी नामसंकीर्तनाची परंपरा सुरू करून वारकरी संप्रदायाला समृद्ध व प्रभावशाली बनवते. श्री संत ज्ञानदेव, मुक्ताई व नामदेव याप्रमाणे गोराकुंभारांनीही अत्यंत साध्या व सोप्या भाषेत अभंगरचना केली. तसेच सावता माळी यांनीही कृषी संदर्भात आणि विठ्ठल अभंगरचना केली. संत नामदेवांच्या परंपरेत नरहरी सोनार यांनीही अभंगरचना केली. सावता माळींप्रमाणेच नरहरी सोनार यांनीही आपला व्यवसाय व जीवन विठ्ठल स्वरूप करून टाकले. प्रस्तुत अभंगात आपल्याला त्याची प्रचिती येते.

''देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।।१।।
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने ।।२।।

---

[२७] संपादक, प्रा.डॉ. र. रा. गोसावी, ब्रह्मीभूत श्री नानामहाराज साखरे प्रसादिक, श्रीसकलसंतगाथा खंड पहिला, सारथी प्रकाशन, पुणे, द्वितयावृत्ती २०१६, अ.क्र. २६५, पृ.क्र. ३०५

त्रिगुणाची करूनी मुस । आत ओतिला ब्रम्हरस ।।३।

जीव शिव करूनी कुंफी । रात्रंदिवस ठोकाठोकी ।।४।।

विवेक हातवडा घेऊन । कामक्रोध केला चूर्ण ।।५।।

मनबुद्धीची कातरी । रामनामे सोने चोरी ।।६।।

ज्ञान ताजवा घेऊनी हाती । दोन्ही अक्षरे जोखिती ।।७।।

खांद्या वाहोनी पोतडी । उतरला पैलथडी ।।८।।

नरहरी सोनार हरी दास । भजन करी रात्रंदिवस ।।९।।''[२८]

संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत नरहरी सोनार, संत मुक्ताई व संत गोरा कुंभार या आदी संतांप्रमाणे संत चोखामेळांचेही अभंगरचनेस अढळ स्थान आहे. र. रा. गोसावी संपादित श्री संकल गाथेत त्यांच्या नावाने ३४९ अभंग आढळतात. संत चोखोबांचे अभंग विशेषतः पंढरी महिमा, नाम महिमा, उपदेश व विठ्ठल वर्णनपर आढळतात. तसेच आपल्या जातीहीनतेची अपेक्षा त्यांच्या अभंगांतून आढळून येते.

''नाही देह शुद्धयति अमंगळ ।

अवघे वोंगळे गुणदोष ।।१।।

करू जाता विचार अवघा अनाचार ।

आणिक प्रकार काय बोलु ।।२।।

वाणी नाही शुद्ध धड नये वचन ।

धि:कारिती जन सर्व मज ।।३।।

अंगसंग कोणी जवळ न बैसे ।

चोखा म्हणे ऐसे जीवित माझे ।।४।।''[२९]

---

[२८] संपादक, प्रा.डॉ. र. रा. गोसावी, ब्रह्मीभूत श्री नानामहाराज साखरे प्रसादिक, श्रीसकलसंतगाथा खंड पहिला, सारथी प्रकाशन, पुणे, द्वितयावृत्ती २०१६, अ.क्र. १२, पृ.क्र. ९२४

[२९] संपादक, प्रा.डॉ. र. रा. गोसावी, ब्रह्मीभूत श्री नानामहाराज साखरे प्रसादिक, श्रीसकलसंतगाथा खंड पहिला, सारथी प्रकाशन, पुणे, द्वितयावृत्ती २०१६, अ.क्र. ११७, पृ.क्र. ९७२

[३०]श्री संत गाथा– नानामहाराज साखरे यांच्याप्रमाणे सेना न्हावीही तेराव्या शतकामध्ये नामदेवांच्या संत मेळ्यातील अठरापगड जातींतील एक संत होय. ते मुळात हिंदी भाषिक होते. इतर संतांच्या संगतीने त्यांना मराठी भाषा अवगत झाली. अभंगरचनेत जनाबाई कान्होपात्रा यांचेही मोलाचे योगदान आहे.

४.२.२.१ : एकनाथमहाराज :

एकनाथमहाराजांनीही भारूडांची रचना केली व ती विविध स्वरूपाची आहे, भारुडांच्या माध्यमातून त्यांनी सामान्यजनांशी मनोरंजनाच्या माध्यमातून संवाद साधला. त्यांच्या भारूडात वासुदेव, गोंधळी, भराडी, वाघ्या– मुरळी, भुत्ये, जोशी, कोल्हाटी, गारूडी, डोंबारी, फकीर, पांगुळ, नंदी बैलवाले, दरवेशी, वैदू, ज्योतिषी, महार–महारीण आदी विविध व्यक्तींचा समावेश होतो.

अभंगरचनेचे स्तंभ ज्यांना म्हटले जाते, असे हे एकनाथमहाराज! एकनाथमहाराजांनी अनेक अभंगरचना व ग्रंथरचना केल्या. एकनाथी भागवत हा एकनाथ महाराजांचा प्रमुख ग्रंथ आहे. त्यांनी या ग्रंथात भागवताच्या एकादशस्कंधावर टीका केली आहे. एकनाथांनी भागवत धर्माची पताका पुढे नेण्याचे मोलाचे कार्य केले आहे. नाथांनी महत्त्वाच्या ग्रंथांची निर्मिती केली.

१) चतुःश्लोक भागवत

२) एकनाथी भागवत

३) भावार्थ रामायण

४) रुक्मिणी स्वयंवर

५) अभंग, पदे, गौळणी व स्फूट अभंग आणि भारूडे यांची निर्मिती केली.

---

[३०] नानामहाराज साखरे, श्री संत गाथा, वरदा बुक्स, पुणे २००४, पृ.क्र. ३,४,१५६ ते १८०

एकनाथी भागवत ग्रंथात एकूण २०,००० ओव्या आहेत व नाथांनी सुमारे ४,००० अभंग लिहिले.र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या श्री सकल संत गाथा खंड २ या गाथेत संत एकनाथांनी ४००९ अभंग दिले आहेत. एकनाथी भागवत हे एका दृष्टीने ज्ञानेश्वरीचे भाष्यच आहे. नाथांच्या तत्त्वज्ञानाचा सार आपल्याला या ग्रंथात पाहावयास मिळतो, भारूडकार म्हणून एकनाथमहाराजांची सर्वसामान्य जनतेवर छाप आहे. एकनाथांची एकूण भारूडांची संख्या १०० ते१२५ विषयांवर असून त्यांची संख्या जवळपास ३०० एवढी आहे. नाथांची भारूडे ही वेगवेगळ्या स्वरूपाची आहेत. भारूडांच्या माध्यमातून एकनाथ महाराजांनी सर्वसामान्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे. भारूडाच्याच माध्यमातून मनोरंजन करता करता उपदेश करण्याचे कार्यही त्यांनी केले आहे. तसेच या माध्यमातून जनसमुदायापर्यंत पोहोचण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. आपल्या विविध रचनांच्या माध्यमांतून उदा. वासुदेव, गोंधळी, वाघ्या–मुरळी, कोल्हाटी, गारूडी, डोंबारी, फकीर, नंदीबैलवाले, दरवेशी, वैदू अशा विविध सोंगांची रूपे घेऊन एकनाथमहाराजांनी समाजाशी संवाद साधला. सर्वसामान्यांच्या परिचयाचे दाखले देऊन त्यांना भक्तिमार्गाकडे आकर्षित केले. मरीआई, सटवाई, अंबाबाई, यलम्मा अशा विविध लोकदेवतांच्या माध्यमातून व हमामा, हुंबरी, हुतूतू, फुगडी इ. खेळांच्या माध्यमातून समाजात प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्रिवेश वेशभूषा घेऊन 'मला दादला नको गं बाई' अशा रचना करून आपल्या संसारापेक्षा परमात्म्याशी समरस व्हावे, असे लोकशिक्षण आपल्या या रूपकात ते देतात. तसेच अनेक गौळणींची रचना नाथांनी आपल्या लेखन संग्रहात केली व त्याला अध्यात्माची जोड दिली. तसेच त्यांनी अनेक अभंगरचनाही केल्या. त्यामध्ये नाम महिमा, पंढरी महिमा, विठ्ठल महिमा, संत महिमा, विठ्ठल वर्णन, उपदेश, आत्मानुभूती आदी विषयांचा उल्लेख त्यांनी आपल्या अभंगांमध्ये केला आहे. अशा प्रकारे संतपरंपरेतील एकनाथमहाराज विशेष तत्त्वाने गणले जातात. संत संप्रदायामध्ये असे अनेक विविध अंगी विविध संत पहावयास मिळतात.

४.२.३ :अभंगाचे स्वरूप आणि भूमिका :

अभंग हे ओवीचेच तालमय रूप आहे. तेराव्या शतकात अनेक संतांनी अभंगनिर्मिती केली. अभंग निर्मितीची सुरुवात निवृत्तीनाथांपासून झाली असल्याचे निळोबारायांच्या अभंगात आढळते. म्हणजेच निवृत्तीनाथ हे ज्ञानेश्वरांचे गुरुपदेशक. त्यांच्यापासूनच वारकरी संप्रदायाला प्रेरणा मिळाली व अभंगवाणीचा उगम झाला. [३१]ल. रा. पांगारकरांच्या मते अभंग आणि ओवी हे मूळ संस्कृत शब्द आहेत. वारकरी संप्रदायात संतपरंपरेत अभंग निर्मिती ही सामान्य जनसमुदायाच्या उद्धारासाठी निर्माण झाली. संतांनी अभंगांच्या माध्यमातून समाजाला दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला. अभंग या शब्दाचा अर्थ असा सांगता येईल की, 'कधीही भंग न पावणारा तो अभंग.' अभंग हा एक मराठी छंद प्रकार आहे. अभंग 'वाङ्मय' हे मराठी संतांनी मराठी भाषेला दिलेली एक देणगी आहे. महाराष्ट्राला मराठी साहित्याला लागलेला अमूल्य ठेवा आहे. इसवी सन १३व्या शतकाच्या आसपास अभंगांची निर्मिती आढळून येते. अभंग निर्मितीमागे संतांची ठोस भूमिका जाणून येते. अभंग म्हणजे अखंड, अक्षय, शाश्वत असा अर्थ लावण्यास हरकत नाही; प्राचीन संतांचे मराठी काव्य हे अभंग व ओवी या प्राकृत छंदातून प्रकट झाले आहेत. संत नामदेव, संत तुकाराम यांनी बहुजन हिताय याचसाठी अभंगरचना केल्या. अभंगरचना ही आटोपशीर शब्द समूहात मांडली गेली. व त्या शतकातील जनसमुदायात अभंग प्रचलित होऊन सहज लोकांच्या ओठांवर अभंग खेळू लागले. अभंग हा समाजाच्या मनावर खोलवर जाऊन रुजू लागला. तुकारामांच्या कीर्तनांमध्ये अभंग प्रचलित होऊन लोक सहज गाऊ लागले. अभंगांविषयी एक जिव्हाळा निर्माण झाला. प्रत्येक अभंग स्वानुभवपर असल्यामुळे लोकांना जवळचा वाटू लागला. अभंग हे प्राचीन मराठी काव्याचे अविभाज्य अंग आहे. गेल्या अनेक शतकांत मराठी वाङ्मयात अभंग रूढ झालेला आहे. लहान–मोठ्या अशा दोन प्रकारांत अभंगरचना केली जाते. नानामहाराज साखरे आपल्या श्री संत गाथा या छोट्याशा ग्रंथात अभंगाविषयी आपले स्पष्ट मत मांडताना म्हणतात, सर्व संतांचे अभंग लोकाभिमुख आहेत. या

[३१] ल. रा. पांगारकर, तुकाराम चरित्र, प्रकाशक – अ.ह.भावे, वरदा बुक्स,पुणे, पहिली आवृत्ती – १९९०, प्रस्तावना, पृ.क्र. ६७ ते ९१.

अभंगांचा प्रभाव लोकजीवनावर फार मोठा आहे. संतांनी जी अभंगांची रचना केली ती अलीकडच्या कवींप्रमाणे स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी नाही. अभंग असो वा ओवी, त्या काव्याचा हेतू भक्ती व ईश्वरसान्निध्य हाच असतो.

संतांच्या काव्यरचनेत ईश्वराबाबत भक्तीभावनाच व्यक्त होते. अभंग व ओवीचा आशय हा अध्यात्मिकच असतो; पण याचवेळी ही काव्ये भक्ती – भावनांचा प्रचार करणारीही असतात.

''नाचूकीर्तनाचे रंगी'' – असा या सर्व अभंगांचा मनोभाव असतो. ''ज्ञानदीप लावू जगी'' हा अभंगाचा हेतु संतजन जाहीर करतात. तत्कालीन लोकजीवनातील वैशिष्ट्ये अभंगात गुंतलेली आढळतात. अभंग आणि ओवी यांची भाषा, लोकांच्या बोलण्यातली आणि परिचयाची असते. या भाषेत अपरिचित अलंकार मुद्दाम गुंफण्याचा अट्टहास नसतो. अभंग व ओवी हे समाजालाच व्यक्त करतात म्हणूनच हा काव्यप्रकार महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय झालेला आढळतो.अभंग व ओवी यांच्या लोकप्रियतेचे रहस्य, त्यात अभिव्यक्त होणारे जीवनानुभव रोजच्या परिभाषेतील आहेत. यासाठी १–२ उदाहरणे पाहु,आपल्या अभंगात सावता माळी म्हणतात,

''कांदा – मुळा भाजी। अवघी विठाई माझी ।।१।।
लसुण – मिरची– कोथींबरी । अवघा झाला माझा हरी ।।२।।
मोट –नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।३।।
सावता म्हणे केला मळा । विठ्ठलापायी गोविला गळा ।।४।।''[३२]

प्रसिद्ध संत नरहरी सोनार, आपल्या व्यवसायातीलच उदाहरणे व उपमा देतात, ते म्हणतात,

''देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।।१।।
देह बागंसरी जाण । अंतरात्मा नाम सोने ।।२।।

[३२] नाना महाराज साखरे, श्री संतगाथा, प्रकाशक – अ.ह. भावे, वरदा बुक्स, पुणे, पुनर्मुद्रण – २००४, अ.क्र. ३, पृ.क्र. : १४५.

त्रिगुणाची करूनी मुस । आत ओतीला ब्रम्हरस ।।३।।''[३३]

या संकलनातील सेना न्हावी १२८व्या अभंगात म्हणतात,

''आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक ।।१।।
विवेक दर्पण आयना दावु । वैराग्य चिमटा हालवु ।।२।।
उदक– शांति डोई घोळु । अहंकाराची शेंडी पिळु ।।३।।
भावार्थाच्या बगला झाडु। कामक्रोध नखे कादु।।४।।
चो वर्णा देऊनी हात । सेना राहिला निवांत ।।५।।''[३४]

अशाप्रकारे या सर्व संतांनी दैनंदिन जीवनातीलच उपमा घेतल्या व त्यातूनच जनतेला भक्तिभावना शिकवली आहे. हे अभंग भजन आणि कीर्तन या माध्यमातून जनतेपर्यंत पोचले आणि त्या अभंगांतूनच या संतांनी भक्तीचा मळा पिकवला. अभंग व ओवी यांची लोकप्रियता शतके लोटली, तरी अजूनही टिकून आहे. संत नामदेवांनी तर शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली होती.

अभंग ही दीर्घ कविता नसते. मनात उसळून आलेला भाव संपला की अभंग संपतो. या अभंगाच्या गुणामुळे सर्वसामान्य जनतेला तो समजायला सोपा जातो आणि जनतेच्या मनात अभंग कायमची वस्ती करतो. अभंगांत भक्तिभाव असतो. अभंगाची भाषा लोकमानसाची असते. त्यात येणारे अनुभव दैनंदिन जीवनातीलच असतात. अंभगातील विचार छोटा असला, तरी अतिशय रमणीय असतो. अभंगाची रचना गायनास अतिशय सुलभ आहे. साधूसज्जनांची शैली व व्यक्तित्व त्यातून प्रकट होते. अभंगातून व्यक्त होणाऱ्या या भक्तीचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला आणि तुकाराममहाराज त्या भक्तिप्रसादाच्या कळस झाले.

याप्रमाणेच अभंगाबद्दल सांगताना भालचंद्र नेमाडे[३५] आपल्या तुकाराम गाथा (निवडक अभंग) या पुस्तकात अभंगाचे वर्णन करताना म्हणतात. अभंग ही प्राचीन मराठी भाषेपासून रूढ

---

[३३] नाना महाराज साखरे, श्री संतगाथा, प्रकाशक – अ.ह. भावे, वरदा बुक्स, पुणे, पुनर्मुद्रण – २००४, अ.क्र. १२, पृ.१५१.

[३४] नाना महाराज साखरे, श्री संतगाथा, प्रकाशक – अ.ह. भावे, वरदा बुक्स, पुणे, पुनर्मुद्रण – २००४. अ.क्र. १२८, पृ.क्र. १७२

[३५] भालचंद्र नेमाडे, तुकाराम गाथा (निवडक अभंग), साहित्य अकादमी,पहिली आवृत्ती २००४ पृ. १ ते ५ (प्रस्तावना)

असलेल्या ओवींची तेराव्या शतकांपासून संतांनी रूढ केलेली रचना असून, तुकारामांची अभंगांची शैली पूर्ण तोला–मोलाची दिसते. या छंदात कोणताही स्वर कितीही दीर्घ किंवा ऱ्हस्व उच्चारता येण्याची सोय असते. वर्णाची किंवा अक्षरांची संख्या ही काटेकोरपणे पाळली जात नाही. पहिल्या तीनही चरणांची लांबी गेयतेनुसार कमी – जास्त करता येते. शेवटचा म्हणजे चौथा चरण बहुधा आखूड असल्याने अभंगातील ओवीच्या अर्थाचा एक भाग संपल्याची आवर्तने त्यामुळे स्पष्ट होतात. तुकारामांच्या अभंगाची रचना वेगवेगळ्या ग्रंथप्रकारांनी समृद्ध आहे; त्यात लोकगीतांचे रूपबंधही वापरले जातात. छंदाचे अनेक प्रयोग असून, उपमा रूपकाचे अपूर्व विश्व ओळीओळींतून प्रकट होते.

४.२.४:संत तुकारामांच्या अभंगाचा अभ्यास, भक्तिमार्ग व तत्त्वज्ञान :

महाराष्ट्रातील भागवत धर्माचे अद्वैत तत्त्वज्ञान त्यांनी आत्मसात केले होते. संतांचे लौकिक जीवन, उद्‌बोधन, त्याचे सहील, त्याचे विचार, एक लोकशिक्षक म्हणून होणारे कार्य यांचा विचार केला असता सतांचे कार्य हे वैश्विक स्वरूपाचे आहे. भविष्यासाठी समृद्ध वैभव त्यांनी निर्माण केले आहे. अशाच पद्धतीचे कार्य तुकोबांनी आपल्या जीवन कार्यात केले आहे. सामाजिक विषमता, आर्थिक स्तरांचा विचार, कर्मठपणा, जादुटोणा, तंत्र–मंत्र, भानामती, गंडा, ताईत याचा पगडा असणाऱ्या समाजावर ओढलेले ताशेरे त्यांच्या वाङ्‌मयात दिसून येते. तुकोबांनी समाजाला दिलेला विचार हा मानवतावादी आहे. नैतिकतेचा व आदर्श जीवनमूल्यांचा ऱ्हास झालेल्या समाजाला ताळ्यावर आणण्याचे सामर्थ्य तुकारामांच्या वाङ्‌मयात पदोपदी दिसून येते. धर्माचे रक्षण करण्यासाठीच आपण आलो असून त्यासाठी झगडणार आहोत, हे त्यांनी सांगितले.तुकारामांनी सांगितलेल्या गोष्टी केवळ वरवरच्या नव्हत्या, तर त्यासाठी त्यांनी स्वत:च्या जीवनाचे विशिष्टतत्त्वज्ञानही स्पष्ट केले आहे. तुकोबाराय वारकरी होते. ते अध्यात्मिक पिंडाचे होते. तरीही त्यांचे वेगळेपण त्यांच्या लेखनीतून दिसून येते. त्यांचे कवित्व निराळे आहे. या साक्षात्कारी व्यक्तिमत्त्वाचे कवित्व आणि अध्यात्म हे दोन मुख्य पैलू आहेत. तुकाराममहाराजांच्या चरित्राचा त्यांच्या लेखनाचा व लेखन शैलीचा विचार केला असता तुकारामांच्या वाङ्‌मयीन

व्यक्तिमत्त्वाची संकल्पना लक्षात येते. तुकाराममहाराजांचे लौकिक चरित्र वेगळे नसून ते सारखेच आहे. त्यांनी आपल्या जीवनात समाजाशी वाईट प्रसंगांशी लढा दिला व भविष्य काळात सुचित करणारे दृष्टान्त आपल्या लेखनातून मांडले व समाजात प्रबोधन घडवून आणले. ' ब्रह्मनंदी लागली टाळी' अशा वृत्तीने आपले जीवन प्रत्यक्षात जगून पांडुरंगाच्या नामस्मरणात रंगून आपली गाथा निर्मिती केली. आणि याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातल्या भागवतधर्मात संतात तुकारामांचे नाव कळसाप्रमाणे घेतले जाते. समाजाला दिलेला विचार हा मानवतावादी आहे. चांगले विचार जीवनामुळे काळ बदलला, तरी बदलत नसतात. परिवर्तित काळाबरोबर समाजाच्या सर्व स्तरांवर अनेक आव्हाने उभी राहतात. ती आव्हाने पेलण्याची क्षमता, सामर्थ्य हे अभंगांमध्ये मांडलेले दिसून येते.

''परावीया नारी माऊलीसमान । मानिलिया धन काय वेंचे ।।१।।
न करिता परनिंदा परद्रव्य अभिलास । काय तुमचे यास वेंचे सांगा ।।धृ.।।
बैसलिये ठायीं म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ।।३।।
संतांचें वचनीं मानता विश्वास । काय तुमचें यांस वेंचे सांगा ।।४।।
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेंचे यास ऐसें सांगा ।।५।।
तुका म्हणे देव जोडे याचसाठीं।आणिक तें आटी न लगे कांही ।।६।।''[३६]

काम, क्रोध, लोभ, मोह, लज्जा, आशा, दंभ व वाद यांचा त्याग करून चित्त अत्यंत शुद्ध करावे. संतवचनांवर विश्वास ठेवून सर्वांभूती नम्र असावे, असेच या अभंगात जाणवत होते. प्रपंच उदासवृत्तीने करावा तन–मन देवाला अर्पण, संप्रदायाच्या पायवाटेवरच तुकोबा एकरूप होऊन चालत राहिले.

तुकारामांच्या या अभंगात आदर्श जीवन मूल्यांच्या नैतिकतेची प्रखरता दिसून येते. कर्म करताना वासना, स्वार्थ, विकार, कलुपित वृत्तीचा त्याग महाराज करावयास सांगतात.

---

[३६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशन – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ.क्र. ६१, पृ.क्र. १२

माणसातील हीनत्व काढून तो मनुष्य स्वच्छ, चारित्र्यसंपन्न करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या विचारातून केला आहे.तुकाराममहाराजांनी आपले विचार अभंगातून मांडले. समाजातील अज्ञानी जनतेचा गाडा त्यांनी ओढला. तुकारामांनी आपले कार्य भक्तीच्या व परमेश्वर प्राप्तीच्या दिशेने जीवनभर चालू ठेवले होते. तुकाराममहाराजांच्या चरित्राचे वेगळेपण त्यांच्या अभंगांतून दिसून येते. त्यांचे वाङ्मयीन वेगळेपण विशेषत्वाचा अनुभव पदोपदी येतो. सामाजिक परिस्थितीचा आढावा घेताना धर्माची हेळसांड व अधर्माचे प्राबल्य प्रापंचिक जीवनात येणाऱ्या अडचणी त्यांनी स्वत: अनुभवल्या. धर्माचे रक्षण करण्यासाठीच आपण आलो आहोत हे सगळे वरवरचे नव्हते, तर जीवनाचे विशिष्टतत्त्वज्ञानही त्यांनी स्पष्ट केले आहे. हे तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या अनेक अभंगांतून सांगितले आहे. त्यातून प्रतित होणाऱ्या तत्त्वज्ञानावर भागवतधर्माचा पाया रचला गेला आहे.

''आम्ही वैकुंठवासी ।आलों याचि कारणासी।
बोलिले जें ऋषी। साच भावें वर्ताया ।।१।।
झाडूं संतांचे मारग ।आडरानें भरलें जग ।
उच्छिष्टाचा भाग। शेष उरला तो सेवूं।।धृ.।।''[३७]

ऋषी– मुनींचा जो मार्ग आहे, तोच आमचा मार्ग आहे. कोणतेही नवीन तत्त्वज्ञान सांगावे किंवा नवीन धर्म पंथ स्थापन करावा हा तुकारामांचा हेतू नव्हताकिंवा तत्कालीन कोणत्याही संताचा तो उद्देश नव्हता.संतांच्या मार्गावर पादक्रमण करण्यासाठीच आमचा जन्म झाला आहे असेच तुकाराममहाराज आपल्या या अभंगात व्यक्त करतात. आम्ही धर्मरक्षणासाठी प्रयत्न करतो, संतांप्रमाणे आचरण करण्याचे प्रयत्न करतो. ज्या धर्माच्या रक्षणासाठी आमचा अवतार झाला आहे तो जुनाच आहे. जे वेद उपनिषदे–गीता इ. ग्रंथांनी सांगितला त्यांच्या–काठिण्यपातळी मुळे ह्यांचा अर्थ लावणे कठीण झाले. तेच तत्त्वज्ञान अगदी साध्या व प्राकृत

[३७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशन – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३ अ.क्र. ५२०, पृ.क्र. १२२

भाषेत सांगण्यासाठीच तुकाराममहाराज म्हणतात,'आमचा जन्म झाला.' जीव–जगताविषयी भागवत धर्माच्या अद्वैत तत्त्वज्ञानाच्या वाटेवरच तुकोबांची अभंग गाथा आहे.

''तुका तरी सहज बोले वाणी । त्याचे घरी वेदांत वाहे पाणी ।''

वेदांत जणूकाही आपल्या घरी पाणीच भरत आहेत, असे तुकोबा आपल्या या अभंगात सांगतात.आपल्या मूळ स्वरूपात मी आणि माझे या वृत्ती निर्माण झाल्या की द्वैताला प्रारंभ होतो असे द्वैत निर्माण होऊ नये म्हणून तुकाराम अद्वैत ब्रह्मज्ञानाचे स्वरूप सांगतात. ते सांगताना म्हणतात, 'एक ब्रह्म सत्य आहे. इतर सर्व आभास असे द्वैत पाहणाऱ्या जिवाचे स्वरूप निर्गुण निराकार आहे, सगुण साकार स्वरूपात विटेवर उभा असलेला श्री विठ्ठल निर्गुण निराकार रूपाने चराचरात व्यापून आहे.' तेव्हा तुकोबा आपले हे तत्त्वज्ञान सांगताना असे म्हणतात, की पंढरी पांडुरंग विश्वव्यापक आहे. अशा या पांडुरंगाला स्वस्वरूपाच्या घरात कोंडून टाकले आहे.

''जयापासोनि सकळ । महीमंडळ हें झालें।।१।।
तो एक पंढरीचा राणा । नये अनुमाना श्रुतीसी ।।धृ.।।
विवादती जयासाठीं। जगजेठी तो विठ्ठल ।।३।।
तुका म्हणे तो आकळ। आहे सकळ व्यापक ।।४।।''[३८]

सर्व विश्वात जे एक आत्मतत्त्व व्यापून आहे, तेच परब्रह्म विटेवर उभे आहे. तुकोबांनी हे अद्वैत तत्त्वज्ञान वरील अभंगात सांगितले आहे. सर्व भूतदया ज्यांच्यापासून निर्माण झाले तोच हा पांडुरंग विटेवर उभा आहे. ज्याच्या स्वरूपाविषयी सहा शास्त्र वादविवाद करतात, तोच हा जगजेठी विठ्ठल आहे व सर्व ठायी, सर्वव्यापक आहे. तोच विश्वाचे धारण, पोषण करीत असतो. अद्वैतवाद स्पष्ट करताना महाराज सांगतात,

''न करी रे संग राहे रे निश्चळ। लागो नेदी मळ ममतेचा ।।१।।
या नांव अद्वैत खरे ब्रह्मज्ञान । अनुभवावाचून बडबड ते ।।२।।''[३९]

---

[३८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशन – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. २९२४, पृ.क्र.५९७

मी माझे ममत्व यांचा त्याग करून त्या परब्रह्म विटेवर उभा असणाऱ्या पांडुरंगाचा तुला लळा लागू दे आणि तेच खरे अद्वैत बह्मज्ञान आहे. तुकोबांच्या उपदेशाचे हे अंतरंग आहे. ही प्रतीती येण्याकरिता मीपणाचा अभिमान अविद्येसह नष्ट केला पाहिजे, वायफळ बडबड न करता अनुभवाशिवाय बोलणे मिथ्या आहे; असेच त्यांच्या अभंगातून स्पष्ट होते. आत्मतन्य किंवा ब्रह्मत्व एकच आहे आणि हेच तत्त्व सत्य आहे. इतर सर्व नाशवंत मिथ्या क्षणभंगुर आहे व परब्रह्मत्व विश्वाच्या निर्मितीपूर्वी सद्यःस्थिती व अनादी अनंतापर्यंत अखंडच आहे. जीव याच तत्त्वाचा एक अविभाज्य घटक आहे, म्हणजेच काय तर सर्वव्यापी असणारे ब्रह्मतत्त्व हे एकत्र ज्ञाते आहे, असा निर्गुण निराकार परमात्मा नामरूपातील असूनही भक्तासाठी विटेवर सगुण साकार झाला आहे. विटेवर उभे असलेले हे परब्रह्म चैतन्य विश्वाला अंतर्बाह्य व्यापून आहे.

''तुका म्हणे हेचिं चैतन्य सावळे ।व्यापुनि निराळे रोहिलेसे ।।
मृत्यूलोकी आम्हा आवडती परी ।नाही एका हरिनामेंविण ।।१।।
विटले ते चित्त प्रपंचापासुनि। वमन ते मनी बैसलेसे ।।धृ।।
सोने रूपे आम्हा मृत्तिकेसमान । माणिक पाषण खडे जसे ।।३।।
तुका म्हणे तैशा दिसतील नाटी । रियाचियापरी आम्हापुढे ।।४।।''

एका परब्रह्मशिवाय तुकोबा सर्व मिथ्या वाटत आहे. हेच त्यांनी आपल्यावरील अभंगात व्यतीत केले आहे. ह्या मृत्यूलोकी हरिनामाविण त्यांना सर्व व्यर्थ वाटत आहे. सोने,रुपे मातीसमान वाटत आहे. त्यात विरक्ती प्रतित होती. मणिक स्त्रिया पाषाणप्रमाणे वाटत सर्व व्यापक परमात्म्यासाठी त्याचे अंतर्बाह्य व्याकूळ झाले, त्यांच्या वाङ्मयात दिसते. परबह्मपरमात्मा किंवा परमेश्वर तेवढा खरा असून बाकीचा पसारा व्यर्थ आहे असा अद्वैताचा सिद्धांत असल्यामुळे तद्भिन्न भासणाऱ्या बाकीच्या वस्तू मृत्तिकेसमान वाटतात. परमात्म्याच्या अस्तित्वाशिवाय दुसरे कशाचेच अस्तित्व नाही. तोच चराचरात भरलेला आहे, अशी अनुभूती ज्यांची आहे. तो जीवही त्याच्यापेक्षाही वेगळा नाही. त्यांना सर्व मृत्तिकासमान वाटणे हेच त्यांचे त्या एकरूपतेचे दर्शन ह्या

---

[३९] वै. जोग महाराज सांप्रदायिक, सार्थ श्रीतुकाराम गाथा, वै.ह.भ.प. देवडीकर पारायणप्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती२०१०, अ.क्र. ८७, पृ.क्र.३६

अभंगातून येते. हा विश्वंभर म्हणजेच अनुभवांचा साठा. आत्मानुभवाचा घटक आहे. तुकोबारायांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व हे अंतरीचे, धावे स्वभावे बाहेरी, असेच होते.

''धर्माचें पाळण । करणे पाखांड खंडन ।।१।।
हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ।।धृ.।।''[४०]

जीवनाच्या साधनेचे स्वरूप मनाच्या विविध अवस्था भगवंताशी त्याचा संवाद हाच त्यांच्या वाङ्मयाचा अविभाज्य घटक आहे. तुकोबांचे अभंग म्हणजे भक्तिमार्गाचे सिद्धान्त शिरोमणी आहेत. संतांचे तत्त्वज्ञान हे अध्यात्मिक आहे. तुकाराममहाराज म्हणतात,

''तुका म्हणजे तोची संत । सोशी जगावे आघात।।''

संताचा आदर्श अवतार म्हणजे तुकाराममहाराज. महाराजांनी भागवत धर्माचे पुनरुज्जीवन केले. विश्व हे मिथ्या नसून ब्रत्वच आहे. विश्वात्मकांचा आदर्श महाराज आपल्या पुढे मांडताना म्हणतात,

''विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ।।१।।
आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।धृ.।।
कुणाही जीवाचा न घडावा मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचें।।३।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुखदुःख जीव भोग पावे ।।४।।''[४१]

या अभंगात ईश्वर प्राणिमात्रांत सर्वांठायी आहे. सर्वांठायी असलेल्या परमात्म्याची भक्त हीच मोक्ष साधना आहे. अशा प्रकारे मानवधर्माची प्रचिती त्यांच्या अभंगातून येते. तुकाराममहाराज म्हणजे त्यांच्या अभंगांतून आढळणारे विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे. व्यवहार जाणणारे, दणकट मनाचे प्रतिबिंब असणारे, निरंजनाप्रमाणे तेवणारा पण विजेसारखा कडाडणारा, प्रेम करताना कोमलतेचा प्रहार करताना कठोरता जाणविणारा भास प्रत्येक अभंगात दिसून येतो. त्यांचे वाङ्मय

---

[४०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशन – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.२१२५, पृ.क्र.४४४

[४१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशन – श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.४६, पृ.क्र.९

हे बहुरंगी असे जे अधिदव्य आहे. आपल्या आध्यात्मिक साधनेचीच नव्हे, तर लौकिक सुख–दु:खाची नोंद तुकारामांनी आपल्या अभंगात केली आहे. त्यांचे अभंग म्हणजे मानवकल्याणात समाजपरिवर्तनाला, विश्वबंधुत्वाला सहाय्यमुक्त ठरणारे आहे. अध्यात्म व तत्त्वज्ञान यांची योग्य सांगड त्यांच्या अभंगातून दिसते.

प्रत्येक अभंगांचावेगळा असा पैलू आपणास पहावयास मिळतो. वाङ्मयाची निर्मिती ही वैश्विक मानवता जोपासण्यासाठीच दिसून येते. त्यात अर्थकारण, राजकारण यांची प्रतिभाही पहावयास मिळते. विश्वकल्याण व आत्मकल्याण यावर भर देणारे तुकाराममहाराज हे एक थोर संत होत. त्यांचे वाङ्मय ही वारकरी भक्तसमाजाची संजीवनी ठरली आहे. तुकोबाराय संतसज्जनांचे सखेसोबती होते.

''बुडता हे जन न देखवे डोळा ।''

ही खंत आपल्या अभंगात व्यक्त करतात, तसेच मातृ–पितृप्रेम ते आपल्या सकळ जनांवर करतात.

''अनुभवे आले अंगा। तें या जगा देतसे।।''

आपला अवतारच बुडताच्या जनास वाचवण्यासाठी आपले अनुभव ते सांगतात,

''दिननाथा तुझीं ब्रीदें चराचर । घेसील कैवार शरणागता ।।१।।
पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे । ते आम्हां रोकडे कळों आले ।।२।।
आपुल्या दासाचें न साहसी उणें। उभा त्याकारणें राहिलासी ।।३।।
चक्र गदा हाती आयुधें अपार । न्युन तेथें पुरें करूं धांवें ।।४।।
तुका म्हणे तुज भक्तीचें कारण । करावया पुर्ण अवतार ।।५।।''[४२]

असे महाराज आपल्या अभंगात साक्षात परब्रह्म परमात्म्यास सांगतात की, तू ह्या चराचरणात सामावला आहेस. ते तुझ्या शरण येतात, तू त्याचे रक्षण करतोच भक्ताचे कार्य

[४२] नथुसिंग डोंगरसिंग राजपूत, श्री संत तुकाराममहाराजांची सार्थ गाथा, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती – १९१८, अ.क्र. १०५५, पृ. क्र. ५३१

करण्यासाठीच भगवंताचा अवतार होत असतो. तुकोबांच्या विविध अंगी वाङ्मयात तुकोबाराय एकच मागणे मागतात– मला मुक्ती नको, भक्ती हवी. संपत्ती नको, सज्जन सहवास हवा. मला मोक्ष नको. देवाची सेवा करावयाची आहे. कधीही त्या ईश्वर तत्त्वाचा विसर पडू नये. त्याचेच गुण आवडीने गीत गाता राहाता यावे.

''हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।
गुण गाईन आवडी । हेंचि माझे सर्व जोडी ।।२।।
नलगे मुक्ति आणि संपदा। संतसंग देईं सदा ।।३।।
तुका म्हणे गर्भवासी। सुखें घालावें आम्हांसी ।।४।।''[४३]

पांडुरंगाच्या भेटीसाठी जाणाऱ्या लाखो भाविकांच्या मुखी हाच अभंग असतो. हे एकच दान तू मला दे । तुझं गुणगाईन मी आवडीने, प्रेमाने, मनापासून करीन. मला मोक्षसुख नको. धनदौलतीची अपेक्षा नाही. संतसज्जनाची सदैव सोबत मिळावी. सत्संग घडावा आघाडीला पांडुरंगाच्या भेटी जाताना पायवाटेचा अभंग पूर्ण सार सांगून जातो. संतांची सोबत म्हणजे सदासर्वकाळ 'अखंड आनंद प्रेमाचा कल्लोळ' असे तुकोबा म्हणतात–

''चंद्रभागे स्नान । तुका मागे हेचि दान ।''[४४]

असे तुकोबा आपल्या अभंगात भगवंताकडे दान मागतात. देवाने औदार्य दाखवून आपणास संतसज्जनांच्या पायीच ठेवावे असे मागणे तुकोबा मागतात

''मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरी पाहें पांडुरंगा ।।१।।
या संतासी निरवी हेंचि मज देईं। आणिक दुजें कांही न मागें तुज ।।२।।
तुका म्हणे आतां उदार तूं होई । मज ठेवीं पायीं संतांचिया ।।३।।''[४५]

---

[४३] नथुसिंग डोंगरसिंग राजपूत, श्री संत तुकाराममहाराजांची सार्थ गाथा, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती – १९१८, अ.क्र.१९९०, पृ. क्र.५८१

[४४] हरिपाठ, गीताप्रेस, गोरखपूर, मागणे अभंग क्र. १

[४५] हरिपाठ,गीताप्रेस, गोरखपूर, मागणे अभंग क्र. ३

तुकोबा भगवंताकडे आर्त हाक मारतात. वारीला वारकरी ओव्या–अभंग गाण्यात आनंद आहे आणि हाच आनंद चिरकाला आहे. तुकारामांचे बहुतांश वाङ्मय हे आत्मनिवेदनपर तर काही उपदेशपर आहे. तर काही प्रासंगिक व सहजस्फूर्त आहे. त्यांच्या अंदाजे साडेचार हजार अभंगांत–

''अनेक बुद्धीचे तरंग । क्षणाक्षणा पालटती रंग।।''

असे त्यांचे भावसंपन्न व तरलतर अभंग प्रतिभावंत काव्यशाली पाहता अनेक अभंगांचे स्वतंत्र एक स्थान आहे. तात्कालिक पार्श्वभूमी आहे. प्रत्येक वचनाचा असा स्वतंत्र भाव आहे. एका सरळ चौकटीत न बांधता येण्यासारखी गाथा नाही.

तुकोबारायांच्या अभंगाबाबत [४६]दिलीप चित्रे म्हणतात, आयुष्याच्या उत्तरार्धातल्या वीसपेक्षा कमी वर्षात केव्हाही प्रसंगानुसार, स्फुरणानुसार, तिकडीनुसार, बिरक्तीनुसार, वैतागानुसार, क्रोधानुसार, करुणेनुसार, विवशतेनुसार, वेदनेनुसार आनंदाने किंवा तटस्थपणे किंवा दु:खाने ने उद्‌गार काढले तेच त्याचे अभंग. म्हणूनच तुकोबांच्या अभंगात कोठेही कृत्रिमपणा आढळत नाही. तुकारामांनी वारकरी पंथाचीच दीक्षा घेतली असल्यामुळे सर्व संतांच्या वाङ्मयात येणारे ठरावीक विषय आणि परंपरागत विचार, त्यांच्या वाङ्मयातही पुन्हा पुन्हा दिसून येते. परमार्थात गुरूउपदेश महत्त्वाचा असतो त्यांना तो स्वप्नातच लाभला. तुकारामांचा जीवनक्रम पाहिला, तर त्यांच्या वाङ्मयात बुद्धीची कुशाग्रता, विचारांची सर्वंकषता, अवलोकनाची सुक्ष्मता, मनाची तीव्र संवेदनक्षमता आणि स्वभावातील आक्रमणशीलता दिसून येते. जितके त्यांचे वाङ्मय नम्र तितकेच बंडखोरीचे आहे. जितके क्षमाशील तितकेच निष्ठूर व कडक आहे.

''दुर्जानांसि पंचानन। तुका रजरेणु संताचा।।''

अशीच त्यांची वास्तविक भूमिका आहे. तुकोबांच्या लौकिक वाङ्मयात लोकवाङ्मय बनण्याचे प्रचंड सामर्थ्य दिसून येते. त्यांच्या आत्मानुभवाच्या उद्धारामुळेच गाथेची निर्मिती झाली.

---

[४६] डॉ. दिलीप चित्रे, पुन्हा तुकाराम, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि., मुंबई, तिसरी आवृत्ती १९९५–९६, (प्रस्तावना)पृ.क्र. २१ ते ३१

संत तुकाराम हे मनस्वी संत होते. तुकोबा अनुभवाविण कुठलाही उद्‌गार काढत नाहीत. म्हणूनच ही अभंगरचना सामान्यजनांना स्वत:चीच वाटते. त्यामुळे तुकारामांचे साहित्य हे संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या कोठेही अपुरे ठरत नाही. समाजाच्या भौतिक कल्याणासाठी सदाचाराचा आणि निरक्षीर न्यायते. लोकांसमोर तत्त्वज्ञान मांडणारे तुकोबा हे एकाक्षित्रिय तत्त्वचिंतक आहे. तुकोबांची कविता ही आपले अकृत्रिम भावसौंदर्य घेऊन स्वतंत्रपणे आपले अशिल मुद्रित करते. तुकोबांची काव्यदृष्टी तुकोबांचे व्यक्तिमत्त्व ह्या दोन्ही माध्यमांनी तुकारामांच्या कवित्वाची जाणीव होती. त्यांचे अभंग हे तत्कालीन जनसामान्यांसाठी नव्हते,तर सर्वव्यापक व सर्वसमावेशक होते. ते संपूर्ण मानवजातीचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या विचारधारेला मानवतावादी मुल्यांचे अधिष्ठान असल्यामुळे त्यांचे आवाहन विशिष्ट परिस्थितीत किंवा काळातच होऊ शकेल असे नसून ते सर्वकालीन आहे. संत तुकाराम प्रचंड ताकदीचे संतसाहित्यिक व बहुजनांचे नेतृत्व करणारे लोकनायक होते. तुकोबाच्या अभंगाची मूळ संख्या पाच ते आठ हजारापर्यंत सांगितली जाते. वै. जोगमहाराज सांप्रदायिक सार्थ श्री तुकाराम गाथा (अभंगक्रम : वै.ह.भ.प. देवडीकर पारायण पद्धतीप्रमाणे); यात मूळ अभंग ४१४४ अशी संख्या आहे.शासकीय गाथेत ४६४४ अभंगांचा समावेश आहे.

तुकारामांच्या अभंगाच्या एकूण मूळ चार प्रती उपलब्ध झाल्या, ज्या मुख्य समजल्या जातात त्यात पहिली देहूची प्रत तुकोबांचा मोठा मुलगा महादेवबाबा यांच्या हातची असून, ती इ.स. १७०० च्या सुमाराची समजली जाते, तर दुसरी प्रत त्रिंबक कासारांची जी इ.स. १७८७ च्या आसपास असून त्रिंबक कासारांनी ती जिवाचा आटापिटा करून चाळीस वर्षे मेहनत घेऊन तिचे संकलन केले तिसरी प्रत गंगुतात्यांनी एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वारकरी संप्रदायाच्या उपयोगासाठी तयार केली. चौथी प्रत कडुस येथील गंगाजी मवाळ यांच्या घराण्यातील आहे. या प्रतीवरून इ. स. १८६९ परशुराम शास्त्री पंडित यांनी शंकर पांडुरंग यांच्या साहय्याने गाथा शुद्ध करून अभंगांची निवड करून मुंबई सरकारच्या मदतीने प्रकाशित केली. तुकोबांचे मूळ अभंग नदीत बुडवल्याने मूळ प्रत मिळवणे अशक्यप्राय आहे. अनेकांनी त्यावर अनेक मते मांडलेली दिसतात.

''सत्य असत्याशी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमता।।''

या स्वत: तुकारामांच्या वचनाप्रमाणे तुकारामांचीच अस्मिता असलेली काव्यदृष्टी त्यांच्या वाङ्मयात पदोपदी डोकावते. तुकोबांच्या अभंगाचे अध्यात्मिक आणि वाङ्मयीन कर्तृत्व फार मोठे आहे. सामाजिक परिवर्तनाची बांधिलकी हेच तुकोबांच्या अभंगाचे मूळ स्थान आहे. तुकोबांच्या अभंगांतून प्रसंगानुरूप द्वैत–अद्वैत, ब्रह्मस्वरूप प्रकृती, जीव, मोक्ष यांचा भाव आहेआणि हेच तुकारामांचे खरे तत्त्वज्ञान आहे. तुकाराम अद्वैत ब्रह्मज्ञानाचे स्वरूप सांगतात.

''तुका म्हणे अवघे जग । सर्वा घटी पांडुरंगजगच देव।।''

हे खरेतत्त्वज्ञान आपणास ठाऊक असावे असे तुकोबांस वाटते.

''एक जिवे आता जिणे झाले दोन्ही । वेगळीक काही नष्टे आता ।
नारायणा आम्हा नाही वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळली ।''

परब्रह्म–परमात्मा किंवा परमेश्वर तेवढा खरा असून बाकीचा पसारा व्यर्थ आहे अशी अद्वैताचा सिद्धांत असल्यामुळे बाकी सर्व मिथ्या आहे. नारायणाशी झालेली त्यांची एकरूपता अनेक अभंगांतून अनुभवयास मिळते. तुकाराम महाराजांनी अद्वैत तत्त्वज्ञानाला स्पष्टता दिली आहे. निष्काम भक्तीचे स्वरूप कसे असावे, याचे साक्षात चित्र उभे केले आहे. जीव व जगत याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. लौकिक जीवनातील आनंद आणि अध्यात्माची उंची व त्यातील निर्माण होणारा परमानंद मोक्षप्राप्तीची आस त्यांनी स्पष्ट केली आहे. देव व भक्त गुरू, शिष्य यांच्यातील नाते तादात्मक भाव त्याचे संबंध त्यातील ही शुद्ध स्वरूप – अशुद्ध स्वरूप, आंतरिक भाव स्पष्ट केला आहे. सगुणांचे स्वरूप आणि निर्गुणाचे स्वरूप कसे असावे. याचेही विविध दाखले त्यांनी दिले आहे. तुकारामांच्यातत्त्वज्ञानाचे स्वरूप दोन विभागांत विभागता येते. आत्मोन्नती आणि समाजोन्नती आत्मोन्नतीचे स्वरूप, तत्त्वज्ञान अद्वैत भक्तीवर आधारित आहे. तर समाजोन्नतीचे तत्त्वज्ञान उपदेशपर आहे. समाजाची योग्य दिशा सापडण्यासाठी अध्यात्मिक व सामाजिक बांधिलकीची गरज आहे. तुकारामांना हे गवसले. तुकोबांनी स्वअनुभवाचा आणि सत्य असणाऱ्या कसोटीवर पारखून एक एक चिंतन समाजापुढे मांडले. वेद, उपनिषदे, गीता, पुराणे इत्यादी

ग्रंथांतून मान्यता दिलेला एकमेवाद्वितीयम् ब्रह्म किंवा सर्व खल्विंदम् ब्रह्म हा सिद्धांत तुकारामांच्या शेकडो अभंगांत दिसून येतो. परमेश्वर किंवा नारायण हा वस्तुत: अव्यक्त, अनंत, निर्गुण, सच्चित, नारायण असाच आहे.

श्रीतुकाराममहाराज (१६०८ ते १६५०) तत्त्वज्ञानी, सर्वश्रेष्ठ भाष्यकार मानले जातात. अशा या भाग्यकाराची शतकानुशतके भाषा, वाणी कायम आहे. महाराष्ट्राच्या मातीत शुद्ध बीज म्हणून रुजलेले हे बीज आज संतपरंपरेत वटवृक्षाप्रमाणे वाढले आहे व त्याला फळेही रसाळ गोमटीच आली आहेत.

महाराष्ट्रातील या संतांच्या अंत:करणात लोककल्याणाची तळमळ ओतप्रोत भरलेली होती. तुकारामांच्या अभंगाचे मुख्य ध्येय होते,धार्मिकतेतून सामाजिक व लोककल्याणाच्या भूमिकेतून समाजाचे वास्तव मांडणे. जीवनातील शाश्वत मूल्ये तुकोबांनी आपल्या अभंगांतून मांडली. वास्तव जीवन लोकांसमोर साकारले. जीवनातील कटू सत्य सांगताना त्यांची वाणी कठोर आणि परखड होती. तेवढेच ते मृदू होऊन लोकांशी थेट संवाद साधतात. लोकजीवनातील सत्ये लोकांसमोर आणण्यासाठी त्यांनी लोकमाध्यमाचा जाणीवपूर्वक स्वीकार केला आणि या लोकमाध्यमांच्या आविष्कारासाठी लोकभाषेचा वापर तुकारामांच्या अभंगांतून केलेला आढळतो. त्यांचे लोकजीवनाचे निरीक्षण किती सुक्ष्म, आणि सखोल होते हे लक्षात येते. तुकोबांचा अभंग आविष्कार जशी त्यांच्या आत्मनिष्ठ अनुभवांशी संबंधित आहे, तशीच ती सामाजिक अनुभवांशीसुद्धा संबंधित आहे. स्वअनुभवातून जगाला अनुभव ज्ञान देणारे तुकोबा महान संत होत. त्यांच्या अभंगात विश्वाच्या कल्याणाची ताकद दिसून येते.

संत तुकाराममहाराजांच्या अभंग गाथेचा अभ्यास करताना, असे जाणवते की, तुकोबांनी सर्वच विषयांना स्पर्श करीत विचार अंतर्बाह्य येऊन मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

उदा. कीर्तन, प्रवचन, पुराण, पारायण, पाठ, गोंधळ, रूपक, भेदिक, जागरण, आरत्या, काला, दिंडी, वारी इत्यादी सर्व समूह माध्यमे होती. या माध्यमांच्या अभिव्यक्तीसाठी तुकोबांनी

सामाजिक जीवनात रुळलेल्या आणि लोकप्रिय असलेल्या ओवी, अभंग, पद, भूपाळी, गण, गौळणी, विराणी, श्लोक, कृष्णलीला, पद्यचरित्र, अशा वाङ्मय प्रकारांचा वापर केला, अशा लोकप्रिय वाङ्मयाचा आणि लोकमाध्यमाचा वापर तुकारामांनी केला व प्रबोधनाचा व भक्तीचा विचार समाजापुढे मांडला. तुकोबांनी अभंग आणि कीर्तन ही दोन माध्यमे संपुर्ण सामर्थ्यानिशी समाजापुढे मांडली. तुकोबांची कीर्तने ऐकण्यासाठी हजारो लोक देहूत येत. कीर्तनात तुकोबा स्वत: रचलेले अभंग गात व त्यातून ते जनसामान्यांच्या मनात ईश्वरभक्ती सदाचार, धर्माची साधना, व्यावहारिक, कौशल्य, विठ्ठलाची आस, विठ्ठलभक्ती रुजवत असत. तुकाराम हे समाजाचे धार्मिक तसेच सामाजिक नेते बनले.

सारांश :संतांच्या अभंगवाणीचा वाङ्मयीन विचार केला असता, त्यात विविध रूपे व गुणधर्मआणि विविध रसांनी भरलेले आपल्याला पाहावयास मिळतात. अध्यात्मिकदृष्ट्या परिपक्वता प्रत्येक संताच्या अभंगांमध्ये दिसते. जीवनाची आसक्ती विठ्ठल–भक्ती ओथंबून वाहताना दिसते. संत निवृत्तीनाथांपासून सुरू झालेली ही परंपरा साधारणपणे तुकाराममहाराजांपर्यंत येऊन थांबते.

* * *

४.३ : तुकारामांच्या अभंगवाणीतील लोकजीवन – स्वरूप व वर्गीकरण :

४.३.१ : प्रास्ताविक :

तेराव्या शतकात संत नामदेवांपासून सुरू झालेली वारकरी परंपरा संत तुकारामांमुळे सतराव्या शतकात उत्कर्षाला पोहोचली. भागवत धर्माची पायाभरणी ज्ञानदेवांनी केली, तर स्तंभाचे (खांब) कार्य एकनाथांनी केले आणि कळसाची भूमिका संत तुकाराममहाराजांनी बजावली. तुकारामांच्या अभंगांतून सतराव्या शतकातील समाजाचे व समाज जीवनाचे विस्तृत चित्र पहावयास मिळते. समाजातील रूढी, प्रथा व परंपरांचे तसेच अंधश्रद्धा, नवससायास इत्यादीचे वर्णनही त्यांच्या अभंगांतून दिसून येते. सतराव्या शतकात राजकीय, धार्मिक, सामाजिक जीवनस्थिती विखुरलेली होती. तुकाराममहाराजांनी स्वानुभवातून समाजमनाची नाडी ओळखून परखड व बाणेदार शब्दरचनेत प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. ते श्रेष्ठ भागवत भक्त होते. तसेच वारकरी पंथाचे थोर उपासक होते. सद्धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. ज्ञानाचा एका आणि नामाचा तुका अशी वारकरी पंथांच्या परंपरेत एक लोकोक्ती ज्ञानदेवांच्या कार्याचा आणि तुकोबांच्या कार्याचा गौरव केला आहे. नामदेवांनी आपल्या ज्ञानदेवविषयक चिंतनातून 'एकतरी ओवी अनुभवावी' असे सांगून त्यांच्या अलौकिक साहित्याचे वर्णन केले, तर बहिणाबाईंनी 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे सांगून संत परंपरेतील तुकाराममहाराजांचे अढळ स्थान वर्णन केले. तुकाराममहाराजांच्या अभंगातील वाङ्मयाचा परिस्थितीचा, पर्यावरणाचा आणि लोकजीवनाचा परामर्श आपण घेणार आहोत.

संतांची चळवळ ही महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासाला परिवर्तनशील चळवळ असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वैदिक धर्माचे मळभ दूर करून मानवतावादी धर्माची सुरुवात केली. समाजप्रबोधन करून भक्तिमार्गाने ईश्वरोपासना करून समाजाला अध्यात्म्याचे व तत्त्वज्ञानाचे धडे तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगांतून दिले. तुकारामांचा प्रत्येक अभंग म्हणजे एक स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आविष्कार होय. उच्च कोटीचे वाङ्मय अनुभवाची अभिव्यक्ती त्यांच्या विविध रचना

प्रकारांतून प्रत्ययास येते. तुकाराममहाराजांच्या गाथेतील अभंगांचा सामाजिकतेच्या दृष्टिकोनातून विचार केला, तर त्यांचे समाजचिंतन, निरीक्षण व सुक्ष्म परीक्षण अचूक होते याची प्रचिती त्यांच्या अभंगांवरून येते. त्यांच्या अभंगातील सहज – सरळ भाषाशैलीमुळे शतकानुशतके जनसामान्यांस ते मुखोद्‌गत आहेत. तुकारामांचे अभंग, व्यक्तिगतपण, सर्वस्पर्श अशा सामाजिक बांधिलकीतून निर्माण झालेले आहेत.

४.३.२ : अभंगांचा क्रमवार आढावा : तुकारामांच्या गाथेतील सर्व अभंग म्हणजे त्यांचे आत्मानुभव आहेत. प्रत्येक अभंग सहज – सुंदर व वेगवेगळ्या शैलीत अभिव्यक्त झालेला आहे. संपूर्ण गाथाच त्यांच्या आत्मानुभवाचे दर्शन घडविते. संत तुकारामांची अभंगगाथा आशय व रचनेच्या दृष्टीने प्रबोधनपर व अनेक वैशिष्ट्यांनी रचलेली आहे. प्रत्येक अभंग हा आत्मानुभवातून लिहिलेला असला, तरी त्यामागची प्रेरणा ही सामाजिक आहे.

१) संत तुकारामांनी सुमारे साडेचार हजार अभंग लिहिले असे सर्वसामान्य मत आहे; परंतु वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळी संख्या मांडलेली आढळते. तसेच त्यांनी जवळजवळ ८० विषयांवर अभंगलेखन केलेले आहे. तुकारामांच्या अभंगवाणीची सरकारी प्रत या अभंगवाणीत एकूण चार हजार सहाशे सात अभंग आहेत. गाथेमध्ये संपादकाने विषयवार रचना केली आहे.

२) श्री जगद्‌गुरू तुकोबारायांची वेदवाणी अभंग गाथा व गंगुकाका शिरवळकर यांचे प्रासादिक वहीप्रमाणे – प्रकाशक संत वाङ्‌मय प्रसारक मंडळ, कराड (महाराष्ट्र) यांच्या गाथेत एकूण ४०९२ अभंग आढळतात.

३) ह.भ.प. विष्णू नरसिंह जोग यांनी संपादित केलेल्या तुकारामांची गाथा (सार्थ तुकाराम गाथा : भाग १ आणि भाग २) या ग्रंथात तुकारामांचे ४१४१ अभंग आढळतात.

४) श्री. संत तुकाराम महाराजांची सार्थ गाथा संपादक नथुसिंह, डोंगरसिंह रजपूत वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची या गाथेत अभंगाचे वर्गीकरण केलेले आढळते. मंगलाचरण, बालक्रीडेचे अभंग, गौळणीचे अभंग, कला, खेळावरील रूपके, पौराणिक अभंग, हिंदुस्थानी पदे, भूपाळ्यांचे अभंग, आरत्यांचे अभंग, प्रासंगिक अभंग, नाट्याचे अभंग, एकविध अभंग, भेटीचे अभंग, देवाशी सलगीचे अभंग, देवापाशी मागणीचे अभंग, देवाशी प्रेमाचे भांडण, करुणापर अभंग, स्थितीपर अभंग.

५) वै. जोगमहाराज सांप्रदायिक सार्थ श्री तुकाराम गाथा (अभंग क्रम : वै. ह.भ.प. देवडीकर पारायण पद्धतीप्रमाणे) एकूण अभंग संख्या ४१४४ अशी आहे. तर तुकारामांचे क्षेपक अभंग याची संख्या ४०७ अशी नामक केली आहे. तसेच गाथेच्या प्रतीत नसलेले, तरी भक्त मंडळास प्रचितीत असलेले दत्तावरील अभंगही त्यात समाविष्ट आहेत. तसेच या सार्थ गाथेत श्री तुकाराममहाराजकृत हरिपाठाचे अभंगही समाविष्ट आहेत. तसेच ते आपल्या प्रस्तावनेत सांगतात. ह.भ.प. देवडीकर यांच्या पारायण प्रतीत कान्होबांचे काही अभंग व संत तुकाराम यांच्याशी त्यांच्या पत्नीने केलेले कठोर भाषण व महाराजांनी ती काढलेली समजूत एवढे अभंग समाविष्ट केलेले नसतात. पण ते अभंग ४०९२ क्रमांकानंतर वेगळे छापून उणीव राहू नये म्हणून तेही सार्थ रूपात समाविष्ट केले आहेत.

६) श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा ह.भ.प. स. के. नेऊरगांवकर प्राचार्य दांडेकर धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक वाङ्मय प्रकाशन मंडळ यांच्या गाथेत एकूण अभंगाची संख्या ४९४३ इतकी दिली आहे. तर क्षेपक अभंगाची संख्या स्वतंत्ररीत्या ४०७ इतकी दिली आहे.

७) श्री. तुकाराम गाथा संपादक डॉ. अशोक कामत गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे एकूण अभंग ४६०७ एवढे आहेत.

८) डॉ. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या श्री सकल संत गाथा : भाग १ व भाग २ मध्ये एकूण अभंगसंख्या ४०९२ इतकी आहे.

९) श्री तुकाराममहाराज गाथा भाष्य ह.भ.प. शंकरमहाराज खंदारकर : भाग १ व भाग २ मिळून एकूण अभंग संख्या ४०४७ इतकी आहे. तर आरत्या आनंदावाप्ती प्रार्थना, श्री साधूमहाराज सांप्रदायिक भजनातील श्री तुकोबांचे अभंग, काकडा आरतीचे अभंग अशी एकूण अभंगसंख्या ४०७९ इतकी होते. तसेच या गाथेत श्री कान्होबांचे (तुक्या बंधूंचे) अभंग असे स्वतंत्र अभंगाची संख्या एक इतकी आहे. तसेच या गाथेत, श्री रामेश्वर भट्टांचे अभंग, श्री निळोबांचे अभंग समाविष्ट केलेले आहेत.

तसेच महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेला श्री तुकारामांच्या अभंगांची गाथा या प्रतीत एकूण अभंग संख्या ४६०९ एवढी आहे. तसेच पंढरपूरच्या प्रतीतील एकूण अभंगसंख्या २३० आहे आणि रामेश्वर भट्टांचे, कान्होबांचे ९२, ब्रह्मानंद तुकयाचे ३, एका जनार्दनाचा १, वामनाचा १ असे अभंग समाविष्ट केलेले आहेत. प्रस्तूत प्रबंधासाठी जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगाचा गाथा श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, तसेच डॉ. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या श्री सकल संत गाथाः भाग एक, भाग दोन, ह.भ.प. वैकुंठ शंकरमहाराज खंदारकर यांनी संपादित केलेल्या श्री तुकाराममहाराज गाथा भाष्य : भाग १ व भाग २, श्री सद्गुरू तुकोबारायांची वेदवाणी अभंग गाथा संत प्रसारक मंडळ, कराड (महाराष्ट्र), श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा (संपादक ह.भ.प. स. के. नेउरगांवकर) यांना प्रमाणभूत आधार म्हणून घेतले आहेत.

४.३.३ : विषयांवार अभंगसंख्या : जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांच्या गाथा श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू प्रतीनुसार –

एकूण अभंग – ४५८३ पैकी मंगलचरण ०१, अभंग ६, विराण्या अभंग २५, जोहार अभंग ३, काला चेंडुफळी –अभंग १००, कोडे –अभंग २, फुगड्या –अभंग २, लखोटा –अभंग १,

हुंबरी–अभंग १, हमामा–अभंग २, गाई–अभंग १, कांडण –अभंग २, आडसण दळण–अभंग १, दळण–अभंग १, हाल–अभंग २, टिपरी–अभंग ७, विटीदांडू–अभंग १, मृदंग पाट्या–अभंग १, ब्रह्मचारी फिर्याद गेला : अभंग २ मंबाजी गोसावी यांनी स्वामीस पीडा केली : ५, स्वामी सद्गुरूची कृपा झाली, अभंग ४, डांका अभंग ८, वासुदेव अभंग ६, गावगुंड अभंग १, जोगी – अभंग १, सरवदा–अभंग १, मंढा–अभंग ३, डोईफोडा–अभंग १, मलंग –अभंग १, दरवेस–अभंग १, वैद्यगोळी–अभंग १, गोंधळ–अभंग ३, कावडे– अभंग ५, लळीत अभंग ११, वाघा–अभंग १, आशीर्वाद–अभंग ५, दसरा–अभंग १, लोहगावास परचक्रवेढा पडला –अभंग ३, स्वामींचे स्त्रीने स्वामीस कठीण उत्तरे केली अभंग ७, नाटाचे अभंग–अभंग ६३, शाक्तावा –अभंग १३, धुर्वक–अभंग २८, घोटाळ्याचे अभंग –अभंग १२, रामचरित्र अभंग १४, श्लोकरूपी–अभंग ६, सेताबर–अभंग ३, उत्तराधिपदे–अभंग २२, साख्या–अभंग ३०, भूपाळ्या–अभंग ८, लोहगावी स्वामींच्या अंगावर ऊन–पाणी घातले ते अभंग–अभंग १, नामदेव व पांडुरंग यांनी स्वप्नात येऊन स्वामींस आज्ञा केली की कवित्व करणे ते अभंग – २, स्वामीस संतांनी पुसलें की तुम्हास वैराग्य कोणत्या प्रकारे झाले, ते सांगा अभंग ३, सदाशिवावर अभंग :२, आरत्या १३, स्वामींनी काया ब्रह्म केली ते अभंग : २४, शके १५७१ एकाहत्तरी विरोधनम संवत्सरी, फाल्गुन वैद्य द्वितिया सोमवारी प्रथम प्रहारी तुकोबा गुप्त झाले. अभंग १, वाराणशीस यात्रा चालली, तेव्हा स्वामींनी भागीरथीस पत्र धाडिलें ते अभंग : ३.

अनघसिद्धाच्या शब्देंकडून रामेश्वरभट यांच्या शरीरी दाह झाला, तो ज्याने शमला तो अभंग : १, शिवाजीराजे यांनी स्वामींस अब्दागिरी घोडा कारकून असे न्यावयास पाठविले ते अभंग : ९, स्वामींनी पत्र पंढरीनाथास पंढरीस पाठविले ते अभंग : ३६, पत्राचे अभंग समाप्त : ३६।। १९।। ११।। ६६।। स्वामींनी स्त्रीस उपदेश केला ते अभंग : ११, अलंकापुरी स्वामी कीर्तनास उभे राहिले, तेव्हा कवित्वाचा निषेध करून लोक बोलिले की, कवित्व बुडवणे, तेव्हा कवित्व बुडवून पाच दिवस होते. लोकांनी फार पीडा केली की, संसारही नाही व परमार्थही बुडविला, आणिक कोणी असतें, ते जीव देते, मग निद्रा केली ते अभंग : २०, स्वामींनी तेरा

दिवस निद्रा केली, मग भगवंते येऊन समाधान केले की, कवित्व कोरडे आहे, ते काढणे उदकांतून : अभंग ७, एकाखडी : अभंग १, लोहगावी कीर्तनात मेलेले मूल जीत झाले, ते समयी स्वामींनी अभंग केले ते २, अलंकापुरी ब्राह्मण धरणें बसून बेचाळीस दिवस उपवासी होता, त्यास दृष्टान्त की देहूस तुकोबापाशीं जाणे, ब्राम्हण आला, त्याबद्दल अभंग : ३१, उपदेश : अभंग २१, स्वामींचे अभंगाचे नाव काढून सालोमालो आपले नाव घालित, त्यावर अभंग : ८, पाळणा : १२, लळितें : अभंग २५, कृष्णजन्म : अभंग ५, देवांनी स्वामीस चिंचवडास नेले होते, ते अभंग : १०, कान्होबा देवाशी भांडले ते अभंग : ३७, नाटाचे अभंग : २, बाळक्रीडा प्रारंभ : अभंग १००.

४.३.४ : अभंगांचे वर्गीकरण :

अभंगांचे वर्गीकरण पुढीलप्रकारे करता येते.

४.३.४.१ स्वानुभवपर अभंग : तुकाराममहाराजांच्या जीवनातील होणाऱ्या घडामोडींमुळे त्यांचे जीवन बदलून गेले. संसार, दुष्काळ, संसाराची होणारी वाताहत, प्रथम पत्नीचे निधन, हालआपेष्टा, पिता बोल्होबा आणि माता कनकाई यांचे निधन, थोरले बंधू साऊजी विरक्त होऊन प्रपंचाचा त्याग, आजुबाजूची सामाजिक परिस्थिती, दुष्काळाने रुद्र रूप धारण केलेले असताना, तुकोबाराय स्वानुभवातून तावून सुलाखून निघाले. हे सारे तुकोबारायाने उघड्या डोळ्यांनी पाहिले आणि वैराग्यातून विवेकाकडे त्यांच्या जीवनाची वाटचाल सुरू झाली.

‘‘ दुष्काळें आटीलें द्रव्यें नेला मान ।
स्त्री एकी अन्न अन्न करीतां मेली ।।३।।‘‘ [४७]

अशा प्रकारचे हृदयद्रावक चित्रण तुकारामांनी आपल्यावरील अभंगांतून केले आहे.

संवसारतापें तापलों मी देवा ।
करितां या सेवा कुटुंबाची ।।१।। [४८]

---

[४७] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. १३३३

[४८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ९१

असे वर्णन करताना तुकाराममहाराज म्हणतात,

''दु:खबांदवडी आहे हा संसार ।
सुखाचा विचार नाहीं कोठें ।। धृ.।।'' [४९]

मुळातच भक्तिप्रवण असलेले संत तुकारामांचे मन विरक्तीकडे धाव घेऊ लागले व हळूहळू लोकांच्यातून ते एकांताकडे जाऊ लागले. जीवनातील आपत्ती, दु:ख, चिंता, अपमान यातून बाहेर पडून ते एकांतात राहण्यासाठी भामनाथ व भंडारा डोंगरावर जाऊ लागले. भजन, ईश्वराचे नामस्मरण यात तल्लीन होऊ लागले.

४.३.४.२ : आत्मपर अभंग : एकांतवासात संत तुकाराम विठ्ठल स्मरणात रंगून जात असत. संत नामदेवांचे अभंग गाता गाता तुकोबाराय स्वत:चे अभंग रचू लागले. आत्मपर अभंगात ब्रह्मज्ञान वेद या साऱ्यांना थोडे बाजुला ठेवून पांडुरंगाशी संवाद आणि स्वत:शी संवाद तुकोबाराय साधू लागले. सद्गुरू भेटीची लालसा व विठ्ठल भेटीची आस, हा तुकोबारायांच्या आत्मपर अभंगातला महत्त्वाचा आशय आहे. तुकोबारायांच्या बहुसंख्य रचना या आत्मपर व आत्मसंवादपर आहेत. त्याची प्रचिती आपल्याला त्यांच्या अभंगाच्या शेवटच्या चरणात 'तुका म्हणे' अशा संबोधनातून येते. तुकारामांच्या अभंगाचे स्वरूप आत्मपर असल्यामुळे त्यांचा जीवनलेख आपल्यासमोरून जातो. जीवनातले बालपण, दुष्काळ, कौटुंबिक रचना, सामाजिक चढउतार, गुरूस्थानी असलेले संत नामदेव आणि विठ्ठलभेटीची आस, तसेच भागवत धर्मातील विचारसरणीवर असलेले प्रेम जिव्हाळा याबाबतचे प्रेम त्यांच्या अभंगांत दिसून येते.

उदा.

''कासया गा मज घातले संसारीं । चित्त पायांवरी नाही तुझ्या ।।१।। ।।धृ.।।
कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा ।।धृ.।।'' [५०]

अशा प्रकारच्या अभंगांतून तुकारामांचा स्वत:शीच चाललेला व्यापक संवाद व्यक्त होतो.

---

[४९] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २४८५

[५०] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २८४८

''बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ।।१।।
अनुतापें तुझें राहीलें चिंतन । झाला हा वमन संवसार ।।धृ।।'' [५१]

तुकारामांचे प्रत्येक काव्य आणि आत्मजाणीव हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य अंग आहे.

४.३.४.३ : करूणापर अभंग : तुकारामांचे काव्य जेवढे आत्मनिष्ठ आहे, तेवढेच ते अनुभवनिष्ठही आहेत. तुकारामांच्या काव्यात येणाऱ्या प्रतिमा व दृष्टान्त लोकव्यवहारातील असल्याने त्यांच्या काव्यात लोकमानसाच्या मानाचा आधार प्राप्त झाला आहे. त्यांचे काव्यसंस्कार संपन्न आहे. विठ्ठलाची प्रतिमा त्यांनी आपल्या काव्यांतून विविधतेने मांडली आहेत. तुकोबारायांनी आपल्या अभंगांत विठ्ठलाची करुणा भाकली आहे. करुणा याचा विग्रह करताना दया असा करणे चुकीचे आहे, तर विठ्ठलाशी एकरूपता साधून त्याच्याकडे दु:खितांचे दु:ख निवारण्याची तीव्र इच्छा तुकोबारायांनी आपल्या अभंगांतून विठ्ठलाला आर्त साद घातली आहे.

''अल्प माझी मती । म्हणोनि येतों काकुलती ।।१।।
आतां दाखवा दाखवा । तुमचीं पाउलें केशवा ।।धृ।।
धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ।।३।।
तुका म्हणे दया । मज करा अभागिया ।।४।।'' [५२]

संत तुकाराममहाराज प्रस्तुत अभंगात मज अभाग्यावर दया करा, अशी विनंती पांडुरंगा करीत आहेत. काकुळती येऊन माझ्यावर दया करा, असे सांगत आहेत. परमेश्वराला ते सांगतात, 'मला मोक्षाचे प्रलोभन नाही तर केवळ आपल्या भक्तीची आवड आहे. तुकोबारायांनी विठ्ठलाची करुणा आपल्या अनेक अभंगांतून भाकली आहे.'

---

[५१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. १३३०, पृ.क्र.२८६.

[५२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.८००, , पृ.क्र.१८४.

''भेटीलागीं पंढरीनाथा । जीवा लागली तळमळ व्यथा ।।१।।

कधीं कृपा करिसी नेणे । मज दीनाचें धांवणें ।।धृ.।।

शिणले माझें मन । वाट पाहतां लोचन ।।३।।

तुका म्हणे भूक । तुझें पहावया मुख ।।४।।''[५३]

अशा अनेक अभंगांतून तुकाराममहाराज आपल्या करुण रसाने भरलेले अभंगाचे सादरीकरण करतात. प्रस्तुत अभंगातही साक्षात पांडुरंगास गलबलून येईल असे शब्दांचे सामर्थ्य दिसून येते.

''तूं कृपाळू माऊली । आम्हां दीनाची साऊली ।

न संवरित आली । बाळवेषें जवळी ।।१।।

माझें केलें समाधान । रूप गोजिरें सगुण ।

निवविलें मन । आलिंगन देऊनि ।।धृ.।।

कृपा केली जना हातीं । पायीं ठाव दिला संती ।

कळों नये चित्तीं । दु:ख कैसें आहे तें ।।३।।

तुका म्हणे मी अन्यायी । क्षमा करीं वो माझे आई ।

आतां पुढें काई । तुज घालूं साकडें ।।४।।'' [५४]

तुकारामांच्या विठ्ठलावरील उत्कट प्रेमामुळे ते विठ्ठलाशी रसाळ संवाद साधतात.

''आंतरीचे धावे स्वभावे बाहेरी । अवरिता परी आवरेना ।।''

अशी उत्कट करुणा आपल्याला गाथेतील अनेक अभंगांवरून दिसून येते. विठ्ठलाची भक्ती करता करता त्यांनी ईश्वरचरणांची आस धरली व प्रापंचिक मोह, माया, पाशापासून

---

[५३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.३५७६, पृ.क्र.७२३.

[५४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.२२३२, पृ.क्र.४६३.

आपली सोडवणूक करून घेऊन स्वत:तले मनुष्यतत्त्व व संतत्त्व वाढीला लावले आणि आपल्या जीवनाचा व समाजाचा उद्धार केला.

४.३.४.४ : उपदेशपर अभंग : सामाजिक जडण–घडणीतून तुकोबारायांमधील संतत्व घडत गेले. समाजरक्षण करण्यासाठी तुकोबारायांनी धर्म आणि नीतीचा समन्वय साधला. स्वानुभवातून समाजप्रबोधन करण्याचे कार्य त्यांनी आपल्या अभंगांतून केले. तुकोबाराय उत्तम उपदेशक होते. भागवत धर्माची पताका त्यांनी आपल्या खांद्यावर घेऊन आपल्या अभंगांतून आदर्श जीवनाची संकल्पना मांडली. संसारात राबूनही आपल्या दु:खाला बाजूला सारून धर्माची, नीतिमुल्यांची जपणूक करून संसार सुखाचा कसा करावा, हे आपल्या अभंगांमध्ये त्यांनी सांगितले. तुकोबारायांनी संसार न सोडता त्याची आसक्ती कमी करण्यास सांगितली. मानवाचे हित –अहित कशात आहे, अधर्म, नीती–अनिती याचे विघटन कसे करावे, याची सुंदर उदाहरणे आपल्या उपदेशपर अभंगांमध्ये दिली. त्यांनी भक्ती कशी असावी? अध्यात्मिक आणि व्यवहार, भक्ती आणि नीती याची सांगड कशी घालावी याचे सुंदर विवेचन आपल्या अभंगांत केले आहे.

''नको सांडु अन्न नको सेवु वन । चित्ती नारायण सर्व भोगी ।।१।।
मातेचिये खांदी बाळ नेणें सीण । भावना त्या भिन्न मुंडविया ।।२।।
नकों गुंफो भोगी नको पडो त्यागी । लावुनि सरे अंगी देवाचिया ।।३।।
तुका म्हणे नको पुसो वेळोवेळा । उपदेश वेगळा उरला नाही ।।४।।'' [५५]

प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज सांगतात, 'अन्न घेण्याचे टाकू नकोस, उपवास करू नकोस, घर सोडून वनवासात जाऊ नकोस, संसारात राहून नारायणाचे चिंतन कर, संसाराच्या भोगामध्ये गुंतू नकोस आणि त्यागही करू नकोस. जे जे काही करशील, ते देवाला अर्पण कर आणि हाच एकमेव श्रेष्ठ उपदेश आहे.'

''न सांगावे वर्म । जणी असो द्यावा भ्रम ।।१।।

---

[५५] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ८७०, पृ.क्र. २०४.

उगीच लागतील पाठी । होती रितोच हिंपुटी।।२।।

शिकविल्या गोष्टी । शिकोन न धरीती पोटी ।।३।।

तुका म्हणे सीण । होईल अनुभवविण ।।४।।'' [५६]

प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज सांगतात, 'अनुभवावाचून केलेला उपदेश व्यर्थ ठरतो. आपण ज्ञानी आहोत अशी लोकांची समजूत करून दिल्यावर त्यांना वर्म समजले नाही, तर श्रम फुकट जातात. तुकोबारायांचे अनेक अभंग उपदेशपर आहेत.'

''अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझे त्यास तेचि द्यावे ।।१।।

मुंगीवर भार गजाचें पालाण । घालिता ते कोण कार्य सिद्धी ।।२।।

तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगी ते काढी पारधी तो ।।३।।'' [५७]

प्रस्तुत अभंगात महाराज म्हणतात, 'जसा ज्याच्या ज्ञान ग्रहणाचा व उपासनेचा अधिकार असेल, योग्यता असेल त्याप्रमाणे आपण त्याला उपदेश करावा व ज्याच्या डोक्यावर जेवढे ओझे सहन होते, तेवढेच ओझे त्याच्या डोक्यावर द्यावे. मुंगीने हत्तीची झूल घातली तर त्याचा उपयोग होणार नाही. शिकाऱ्याजवळ अनेक हत्यारे असतील, तरी प्रसंगाला कोणती काढायची ते तो ठरवतो. तुकाराममहाराज प्रापंचिकांना प्रपंच सोडून परमार्थ करा, असे कधीच सांगत नाही; उलट प्रपंच परमार्थाच्या आड येऊ देऊ नका, टीका करणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष करा. हरीचे नामस्मरण करून नैतिक मार्गाने आपला प्रपंच नेटका करा. देह हा नाशवंत आहे. त्याचे फार कौतुक करीत न बसता हरिनामात तल्लीन व्हा. तुकाराममहाराज सदाचार, नीती–अनीती व धर्माचे पालन करणे, प्रपंचात राहून परमार्थ कसा करावा देह हा नाशवंत असून मोक्षासाठी नामस्मरणात तल्लीन व्हावे, असा उपदेश जनसामान्यांना करतात. तुकाराममहाराजांचा उपदेश हा केवळ उपदेश नसून आत्मानुभव आहे. त्याला वैराग्याची जोड आहे.

---

[५६] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ. क्र. ८७२, पृ. क्र. २०४

[५७] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. २४३४, पृ.क्र. ५३०.

[५८] डॉ. श. गो. तुळपुळे म्हणतात की, स्वानुभवाधिनित झाल्यावर तुकारामांच्या तोंडून जी उपदेशवाणी बाहेर पडली, तिचे मोल काही निराळे आहे. वैराग्याची चिन्हे देहमनावर उमटलेली, साक्षात्काराचे तेज सर्वांगावर फाकलेले आणि वाणीला स्वानुभवाचा रंग चढलेला, अशा स्थितीतील त्यांची बोधवाणी परिणामकारक चढली असलीच पाहिजे. ।।६२।।

तुकाराममहाराजांनी स्त्रीसही उपदेश केला आहे. अशा प्रकारे उपदेशपर अभंगांची विभागणी दिसून येते.

४.३.४.५ : निर्वाणपर अभंग : तुकोबारायांचे स्थान फार महत्त्वाचे आहे. संत बहिणाबाईंच्या उद्‌गाराप्रमाणे विचार केला असता,

''ज्ञानदेव रचला पाया । तुका झालासे कळस''

हे उद्‌गार अतिशय मार्मिक आहेत. नामदेवरायांचे स्वप्न पूर्ण करण्याचे कार्य तुकाराममहाराजांनी केले. एकनाथ महाराजांची भागवत धर्माची पताका आपल्या खांद्यावर घेऊन तुकोबारायांनी अभंगाच्या व कीर्तनाच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यत पोहचविण्याचे काम केले. भागवत धर्माचा तुकोबा कळस ठरले. तुकोबारायांचा प्रत्येक अभंग स्वानुभवनिष्ठ व जगणे होता. त्यामुळे प्रत्येकालाच तो आपला वाटत होता. सामान्यमनाचा ठाव घेणारा त्याच्या चाली–रीती, सण–उत्सव, धर्म–कर्मकांड, श्रद्धा–अंधश्रद्धा या साऱ्यांचा परामर्श गाथेत आपणास आढळून येतो. संसार सागराच्या पलीकडे जाऊन मनुष्याने क्षणाक्षणाला आपल्या उद्धाराचा विचार करावा, असे तुकोबाराय सांगतात. देह नाशवंत, घर–दार–आप्तस्वकीय हे सगळे क्षणभंगूर आहे. संसारात कुठेही सुखाचा वास नाही तेव्हा व्यर्थ हव्यास कशासाठी करता, असे पदोपदी ते सूचित करतात. संसारात राहून देह परमार्थी लावण्याचा विचार करावा.

''कस्तुरीचे अंगीं मिनली मृत्तिका । मन वेगळी कां येईल लेखों ।।१।।
तयापरी भेद नाहीं देवभक्ति । संदेहाच्या युक्ति सरों घ्याव्या ।।धृ.२।।

[५८] डॉ. श. गो. तुळपुळे, पाच संतकविती, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. क्र. ११८

इंधने ते आगी संयोगाच्या गुणें । सागरा दरूषणें वोहोळ तोंचि ।।३।।

तुका म्हणे माझें साक्षीचें वचन । येथें तो कारण शुद्ध भाव ।।४।।'' [५९]

प्रस्तुत अभंगात महाराज हाच संदेश देतात की, मातीत कस्तुरी मिसळली तरी ती वेगळी करता येत नाही. त्याचप्रमाणे देव आणि भक्तांतही भेद करता येत नाही. काष्ठ अग्नीच्या सान्निध्यात गेले की, त्याचेही अग्निरूप होते. सागराला मिळालेली नदी सागररूप होते, तिचे वेगळे अस्तित्व राहत नाही, हे मी माझ्या स्वानुभवातून सांगितले आहे. कारण ह्याचे एकच आहे, मी शुद्ध भाव मनी धरून भेद. अभेदाच्या पलीकडे गेलो व त्या परमेश्वरास आपले केले, तसे तुम्ही पण करा. साध्या सोप्या आणि सरळ भाषाशैलीत तुकोबाराय आपले म्हणणे जगासमोर आणतात. तळागाळातील माणसांना ते पटविण्याचा प्रयत्न करतात, म्हणून त्यांच्याबद्दल ममत्व, प्रेम वाटते व आपलेसे वाटतात.

आपल्या निर्वाणासमयी महाराजांनी अभंगनिर्मितीने देह उजळून टाकला व सर्वसामान्यांना ज्ञानाचा मार्ग दाखविला. आपल्या निर्वाणाला तुकोबाराय माहेर असा उल्लेख करतात. संसार हे सासर आहे, मूळ स्वरूप हे परमार्थाचे स्थान आहे. त्याचा उल्लेख ते माहेर असा करतात.

''माहेरीचें आले ते मज माहेर । सुखानें उत्तर करीन त्यासी ।।१।।

पायावरी माथा आळिंगीन बाही । होईन लवलाही पायवणी ।।२।।

सुख समाचार पुसेना सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ।।३।।

आपुले जीवाचे सुखदुःख भावे । सांगेन आघवे आहे तैसे ।।४।।

तुका म्हणे वीट नेघें आवडीचा । बोलिलीच याचा बोलवीन ।।५।।'' [६०]

निर्वाणसमयी परम पित्या–परमात्म्याला तुकोबाराय माता–पिता संबोधतात आणि आपली माहेरची ओढ व्यक्त करताना महाराज म्हणतात, 'संतापाशी माझा माहेरचा निरोप अल्प आहे. माझी सुख–दुःख त्यांनी ऐकली आणि त्यांना माझी दया आली आहे. माझे आई–बाप मला

---

[५९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. २१७६, पृ.क्र. ४५३

[६०] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३५८७ पृ.क्र. ७५५

नेण्याच्या तयारीतच येत आहेत. मी त्यांच्या बोलावण्याची वाट पाहत आहे. त्यांच्या वाटेकडेच माझे चित्त लागले आहे' आणि आपणास येऊन ते घेऊन जातील अशी आशा ते प्रकट करतात.

तुकारामांच्या निर्वाणसमयीच्या प्रत्येक अभंगात वैकुंठाला जाण्याची आस, ओढ प्रकटतेने जाणवते.

''तुम्ही सनकादिक संत । म्हणवितां कृपावंत ।।१।।
एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ।।२।।
भाकावी करुणा । विनवी वैकुंठीचा राणा ।।३।।
तुका म्हणे मज आठवा । मूळ लवकरी पाठवा ।।४।।'' [६१]

तुकाराम महाराजांची विठ्ठलभक्तीची आर्तता प्रस्तुत अभंगात आपणास पहावयास मिळते. माझ्यावर उपकार करा, माझा निरोप वैकुंठनाथाजवळ काकुळतीने पाठवा. माझी आठवण करून मला लवकर बोलावणे करा.

तुकोबारायांनी पांडुरंगाला आर्त साद घालून आपणास आपल्या गावास घेऊन जाण्याची विनंती केली. तुकोबाराय आपल्या जीवनात तृप्त व समाधानी आहेत. समाज प्रबोधनासाठी त्यांना जे काही मांडता आले, जगाच्या हिताच्या कल्याणासाठी अत्यंत निष्ठेने आणि उत्कटतेने विठ्ठलाची भक्ती करत अभंगरचना केली. नाशवंत देहाची गोडी आम्हास लागू देऊ नको व शाश्वत असणाऱ्या विठ्ठलाच्या पायी आमचे मन रमून राहू दे, अशी विनंती ते विठ्ठलास करू लागले. विठ्ठलाच्या रूपाचे वर्णन आणि त्याच्या भेटीची व्याकूळता हाच ध्यास त्यांना लागून राहिला. आपल्याला पांडुरंगाने पांडुरंगमय करून घ्यावे, याची ओढ जाणवू लागली, म्हणून प्रस्तुत अभंगात ते पांडुरंगास विनंती करतात व जनसामान्यांना व्यवस्थित राहण्यासाठी सांगून आपल्या प्रस्तुत अभंगात महाराज म्हणतात–

''आम्ही जातों आपुल्या गांवा । आमुचा राम राम घ्यावा ।।१।।

---

[६१] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३६१२, पृ.क्र. ७६०.

तुमची आमची हे चि भेटी । येथुनियां जन्मतुटी ।।धृ।।

आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ।।२।।

येतां निजधमीं कोणी । विठ्ठलविठ्ठल बोला वाणी ।।३।।

रामकृष्ण मुखी बोला । तुका जातो वैकुंठाला ।।४।।'' [६२]

तुकारामांची काया, वाचा, मनबुद्धी ब्रह्मरूप होऊन गेली. गुरुकृपेचा वरदहस्त त्यांच्या डोक्यावर ठेवला. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी एका पांडुरंगाशिवाय त्यांना सारे निरर्थक वाटू लागले. विठ्ठलाने त्यांच्यावर कृपादृष्टी केली. अवघादेह त्यांच्या गायनात तल्लीन झाला. त्यामुळे तुकारामांचे अवघे विश्व ब्रह्मस्वरूप होऊन गेले.

४.३.४.६ : विरहिणीपर अभंग : विरहिणी या शब्दाचा अर्थ संत वाङ्मयात 'विराही' अशा अर्थाचा लावला जातो. राधा–कृष्णाच्या जीवनपटावर संत वाङ्मयात जास्तीत जास्त वेळा विराण्या दिसून येतात. विराणीमागील मुख्य भावना ही प्रेमाची आहे. प्रेम ही भावना अतिशय व्यापक स्वरुपाची आहे. तिचे सामर्थ्य अवर्णनीय आहे. ईश्वर प्राप्तीची भावना मानवाला ईश्वर प्रेमाची दिशा दाखवते. हेच संतांनी आपल्या वाङ्मयात प्रतीत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून संतांची सामाजिक संवेदनशीलता दिसून येते. द्वैत–अद्वैत भाव–भावनांचा आविष्कार विरहिणी प्रकारांत आढळून येतो. विरहिणी प्रकाराची मांडणी ही आर्त भावस्थिती दर्शविते व त्याचे वर्णन करते. संत तुकारामांच्या गाथेत पंचवीस विरहण्या (विराण्या) आढळतात. तुकाराममहाराज जेव्हा या विराण्या लिहितात. तेव्हा त्यांच्या भूमिकेशी ते एकरूप झालेले असतात.

विराण्या हा कीर्तनाचाच एक प्रकार आहे. तसेच भजनातही त्या गायल्या जातात. विरहिणी हा एक अभंगाचा प्रकार आहे. त्यात व्यतीत होणारा भाव हा, त्याची भूमिका बदलली की, त्याची अभिव्यक्तीही बदलताना दिसते. तुकारामांच्या अभंगांतील विरहण्या ह्या विशेष करून 'स्त्री'वर आधारित आहेत. तिची अभिव्यक्ती व्यक्त करताना महाराज विठ्ठल भक्तीचा आधार घेतात. अभंगाचा आशय आणि अभिव्यक्ती बदलली की, अभंग आपले अमंगल्य मूळ स्वरूपात

---

[६२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान श्री. क्षेत्र देहू , पुणे – २०१३, अ.क्र.–४४४८, पृ.क्र. ८९९

ठेवून नवीन रूप धारण करतो. तुकारामांच्या अभंगाचा विचार केला असता विरहणीची भूमिका एका स्त्रीची आहे. तुकारामांच्या विराण्यांमधून भक्ताचा परमेश्वरविषयीचा उत्कट प्रेमभाव, समर्पणशीलता दिसून येते. तुकाराममहाराज विरहिणीच्या रचनेतून विठ्ठलाविषयी असलेले प्रेम, भक्ती, त्यांच्याबद्दल असलेले नी:स्सीम भाव व्यक्त करतात. सर्वसाधारणपणे सर्वच संतांनी परमेश्वराविषयी असलेला आपला भाव व प्रेम त्यांच्याबद्दलचा विरह विरहणीच्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तुकाराममहाराजांची विरहणीतील भूमिका ही संसारातून चित्त हरपलेल्या व्यभिचारी स्त्रीची आहे. आपल्या भगवंताविषयीच्या प्रेमाचे साधर्म्य दर्शविण्यासाठी ते त्या 'स्त्री' पात्राची मदत घेतात. त्या भूमिका स्पष्ट करताना सुद्धा तुकारामांची अनुभव कक्षा किती रुंदावलेली आहे, याचा आपणास अंदाज येतो. तुकाराममहाराज एक स्त्री जिला आपल्या प्रपंचाचा क्षीण झाला आहे, कंटाळा आला आहे, तिचे चित्त भ्रमरांसारखे भिरभिर करीत आहे, हे मांडताना ती प्रस्तुत अभंगात तिची विचलता मांडतात व आपलीही भगवंताविषयीची ओढ दर्शवितात.

''अधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकीलयें ।।१।।
रात्रंदिवस मज पाहिजे जवळी । क्षण त्या निराळी न गमे घडी ।।२।।
नाम गोष्टी माझी सोय सांडा आता । रातलें अनंता तुका म्हणे ।।३।।''[६३]

तुकाराममहाराजांनी प्रस्तुत अभंगात एका व्यभिचारी 'स्त्री'चे रूपक घेतले आहे व आपली रचना मांडणी केली आहे. संसाररूपी पतीच्या सहवासात हवे ते सुख मिळत नाही. ती त्या प्रपंचरूपी सागरात त्याच्याबरोबर समाधानी नाही, म्हणून ती 'अनाशीशी रत' होण्याचा अट्टहास आहे. ती त्याच्या सुखासाठी व्याकूळ आहे.

व्यभिचारी स्त्रीला ज्याप्रमाणे व्यभिचार करताना समाजाची, सगे–सोयरे यांचे चाड राहत नाही तिच्या स्वैराताच एकांगीच विचार असतो. त्याचप्रमाणे ती आपल्या प्रियकरावर निस्सीम प्रेम करत असते. तो प्रियकर म्हणजे विठ्ठल होय. तुकाराममहाराजदेखील ह्याच प्रकारे आपल्या प्रपंचाचा, मायेचा त्याग करून परमेश्वरभक्तीत विलीन होण्यासाठी निघतात, ते एका

[६३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकारामहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकारामहाराज संस्थान श्री. क्षेत्र देहू , पुणे – २०१३, अ.क्र. ८, पृ.क्र. २

स्वैराणीसारखे. त्याचं प्रतीक ते आपल्या विरहणीमध्ये मांडतात. भक्ता–भगवंताविषयी त्याच प्रकारचा उत्कट भाव निर्माण व्हावा म्हणून, संतांनी स्त्रीच्या भूमिकेतून आपला भावानुभव व्यक्त केला आहे. ह्या रूपकाचे समर्थन करताना महाराज प्रेयसीच्या भूमिकेत जातात; तर भगवंत प्रियकराच्या भूमिकेत असतो.

तुकाराममहाराजांनी समाजाचे अत्यंत सुक्ष्म निरीक्षण करून अनुभवाद्वारे अभंगांची मांडणी केली आहे. त्यातीलच विरहणीची मांडणी आहे. आपल्या व भगवंताच्या प्रेमाचे उत्कट प्रदर्शन ते विरहणीतून करताना दिसतात. स्वैरिणीलाही आपल्या विशिष्ट अनुभवाच्या माध्यमातून अध्यात्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयास केला आहे.

''वाळो जन मज म्हणोत शिंदळी । परि हा वनमाळक्ष न विसंबें ।।१।।
सांडुनि लौकिक झालियें उदास । नाहीं भय आस जीवित्त्वाची ।।२।।
नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे झालें तुका हरिरत ।।३।।'' [६४]

प्रस्तुत अभंगात स्वैर स्त्रीचे वर्णन तुकाराममहाराज करतात की, ज्या स्त्रीला कशाचीही तमा नाही. लोक तिला शिंदळी म्हटली तरी आपल्या जिवाचे भय, चिंता तिला नाही. लोक काय म्हणतील याची तिला पर्वा नाही. ती समाजाची कसलीच फिकीर करीत नाही. बेदरकार होऊन ती आपल्या प्रेमाला आसुसली आहे. तिची तीच आस. तुकाराममहाराज आपल्या ठायी पाहत आहेत, जेव्हा ते हरीची भक्ती करतात तेव्हा त्यांना फक्त हरीच्या मिलनाचीच आस आहे.

''हाचि नेम आता नं फिरें माघारी । बैसलें शेजारी गोविंदाचे ।।१।।
घररिघी झालें पट्टराणी बळें । वरिले सांवळें परब्रम्ह ।।२।।
बळियाचा अंगसंग झाला आतां । नाही भय चिंता तुका म्हणे ।।३।।'' [६५]

---

[६४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान श्री. क्षेत्र देहू , पुणे – २०१३, अ.क्र. ७, पृ.क्र. २

[६५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान श्री. क्षेत्र देहू , पुणे – २०१३, अ.क्र. ९, पृ.क्र. ३

४.३.४.७ : अद्वैतपर अभंग : आनंदाची प्रचिती जेव्हा विश्वात सगुण रूपाने आकारात येते, तेव्हा संतांचा अवतार होतो. ज्ञान व कल्पना या दोघांचा समेळ जो आनंद घडवून आणतो तो म्हणजे साक्षात पांडुरंग होय. आत्मा हा सर्वज्ञ आहे. आत्मसाक्षात्कार ही अद्वैत अनुभूती आहे. जिथे स्वत:चा विसर पडतो. मोह, माया, राग, द्वेष, मद, मत्सर, अहंकार लोप पावतो. तिथे अद्वैत अनुभव प्रचितीस येतो. भेदा–भेद याचा समूळ नाश होऊन आत्मानुभूती अनुभवयास मिळते व त्याचे वर्णन म्हणजेच अद्वैतानुभवाचे वर्णन होऊ शकते. तुकाराममहाराजांनीही आपल्या अभंगांतून अद्वैताचे वर्णन केलेले आढळते. निःशंक, निःअहंकारी, निःसंदेहपणे परमेश्वराच्या चरणी एकरूप होऊन लीन होणे म्हणजेच अद्वैत भाव होय. प्रापंचिक अवस्थेत तुकाराममहाराजांनी सोसलेल्या हाल–आपेष्टा व दु:ख त्यांनी सहज स्वीकारले आणि प्रापंचिक अवस्थेतून ते आध्यात्मिक अवस्थेकडे सहजपणे वळाले आणि आपल्या पारमार्थिक जीवनाकडे वाटचाल करताना भाव आपल्या अनुभवविश्वाचे दर्शन त्यांनी आपल्या अभंगांतून घडवले. साधनेनंतर त्यांना जी सिद्धावस्था प्राप्त झाली, त्याचे वर्णन त्यांनी आपल्या अभंगांमधून मांडले. तुकारामांच्या अभंगांतून आपणास सामाजिक व धार्मिक कर्तव्यामधील संघर्ष, तसेच अद्वैत विचार व भक्तितत्त्व आढळून येते. तुकारामांचे अनुभवविश्व अफाट व सामर्थ्यवान आहे. त्यांच्या अभंगांत लौकिक, व्यावहारिक, पारमार्थिक आणि कौटुंबिक जीवनातील अनुभवांचे प्रकटीकरण म्हणजे तुकारामांची गाथा होय. तुकारामांची प्रतिमा ही वास्तववादी जीवनातून प्रकट होणारी दिसते. तुकारामांच्या प्रत्येक अभंगातून आपणास अनुभवाविष्कार दिसतो. तसेच प्रत्येक अभंगात दृष्टान्त, उपमा व प्रतिमाही दिसतात. तुकारामांचे काव्य हे विठ्ठलभक्तीला समर्पित झालेले दिसते. त्यांच्या अभंगांमध्ये भक्ती, द्वैत–अद्वैत भाव, नामसंकीर्तन, अंधश्रद्धा, व्यवहारचातुर्य याचा परामर्श केलेला दिसतो. तुकारामांचे अभंग हे स्वानुभवाचे प्रकटीकरण आहे. ते जे जे प्रकट करतात ती त्यांची स्वानुभूती आहे. तुकोबांच्या अभंगातून स्पष्टवक्तेपणा, तरलता, नम्रता, तीव्रता या साऱ्यांचा समावेश आहे. तुकारामांच्या साधकावस्थेचा विचार केला असता त्यांच्या हृदयातील जनसामान्यांच्या उद्धाराची तळमळ, विठ्ठल दर्शनाची आर्तता दिसून येते. तुकारामांचे अभंग आविष्कार म्हणजे प्रापंचिक अनुभवाचे धगधगते वास्तव होय.

''जेणें घडे नारायणी अंतराय । होत बापमाय वर्जावितं ।।१।।
येर प्रियापुत्रधना कोण लेखा । करिती ती दु:खा पात्र शत्रु ।। धृ ।।
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ।।३।।
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणिक उपाय दु:खमुळ।।४।।'' [६६]

प्रस्तुत अभंगात महाराज आपला अद्वैत भाव प्रकट करताना सांगतात आई–वडिलांच्या आज्ञेप्रमाणे वागण्यात जर आपला आणि नारायणाचा वियोग होत असेल तर प्रसंगी आपल्या आई–वडिलांचाही त्याग करावा. आई–वडिलांपुढे स्त्रिया, पुत्र, धन वगैरे याची काही गोष्टच नाही. ते तर आपल्याला दु:खच देणारे आहे. प्रल्हादाने आपल्या पित्याचा, बिभीषणाने आपल्या बंधूचा आणि भरताने आपल्या आईचा व राज्याचा त्याग केला अशी अनेक उदाहरणे आहेत. तेव्हा हरीचे पायच सर्वस्व आहेत आणि हरीचरणावाचून दुसरा काही उपाय नाही. तुकोबारायांनी आपल्या आत्मानुभव अभंगात अध्यात्मिक अनुभव विश्वाचे फक्त वर्णनच न करता त्याचे दर्शनही घडवतात. तुकाराममहाराज विश्व जाणून अजाण असल्यासारखे आहेत. परमेश्वराशी आपला भाव हा तरल स्वरूपाचा आहे. याचा अहंकार त्यांच्या हृदयाला स्पर्शतसुद्ध नाही. हेच अद्वैत अनुभूतीचे रहस्य होय. परमेश्वर आपल्या ठायी, आपण परमेश्वराच्या ठायी हा एकच भाव मनात येऊन द्वैत भाव दूर होऊन जातो. परमेश्वर प्राप्तीचे परमसुख प्राप्त झाल्यानंतर बाकी सारे मिथ्या वाटू लागते. यालाच अद्वैत भाव म्हणण्यास काहीच हरकत नाही.

''आपुलें मरण पाहीलें म्यां डोळा । तो झाला सोहळा अनुपम्य ।।१।।
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ।।२।।
एकदेशीं होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ।।३।।
फिटलें सुतक जन्म–मरणाचें । मि माझ्या संकोचें दुरी झालों ।।४।।
नारायणें दिला वसतीर ठावा । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ।।५।।

---

[६६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान श्री. क्षेत्र देहू , पुणे – २०१३, अ. क्र. १०८, पृ.क्र. २०.

तुका म्हणे दिलें उमटुनि जगीं । घेतलें तें अंगी लावुनियां ।।६।।'' [६७]

अद्वैताची अनुभूती तोपर्यंत होत नाही, जोपर्यंत माणसांची देहभूती नष्ट होत नाही. हे तुकोबारायांस ठाऊक होते. आपल्या मरणाची व मरणानंतरच्या विधीचे वर्णनही तुकाराममहाराज आपल्या अभंगात करतात. प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराजांचा अद्वैत भाव दिसून येतो. मी माझे मरण माझ्या डोळ्यांनी पाहिले तो सोहळा अद्वितीय होता. तिन्ही त्रिभुवने आनंदाने भरून गेली. सर्वात्मकपणाचा भोग प्राप्त झाला. अहंकाराचा त्याग केल्यामुळे सुकाळ आला. मी आणि माझे या संबंधीचे जे काही विचार होते, त्यापासून दूर गेलो. त्यामुळे जन्म–मरणाचे सुतक फिटले. नारायणाने आपल्या चरणी लीन करून ठेवले. तुकाराममहाराजांनी मृत्यूशी गळाभेट घेतली आहे. मरणावर मात करून मुक्तीच्या अवस्थेत तुकाराममहाराज निर्वाणाच्या स्थळी जातात. तुकाराममहाराजांच्या अंत:करणात मन, बुद्धी, चित्त, अहंकार या साऱ्यांवर विजय मिळवण्याची तळमळ त्यांच्या अंत:करणात आहे. प्रपंचाबद्दल अनासक्ती त्यामुळे त्यांचे जीवन वैराग्याच्या वाटेवर धावते. अंतर–बाह्य परब्रह्मची आस निर्माण झाली. देहात राहूनही चैतन्य सागरात बुडाल्याचा आत्मानुभव तुकाराममहाराजांनी व्यक्त केला आहे.

मी आणि माझे ही वृत्ती निर्माण झाल्याने द्वैत भाव निर्माण होतो; परंतु जेव्हा सत्य शुद्ध ब्रह्मज्ञानाचे स्वरूप प्राप्त होते. तेव्हा अद्वैत भाव निर्माण होतो. तेव्हा हे सांगताना तुकाराममहाराज प्रस्तुत अभंगात म्हणतात,

''न करी रे संग राहे रे निश्चळ । लागो नेदी मळा ममतेचा ।।१।।
या नांव अद्वैत खरे ब्रम्हज्ञान । अनुभवावाचून बडबड ते ।।२।।
इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पाही न ये वरी मन ।।३।।
तुका म्हणे न ये जाणीव अंतरा । अंतरी या थारा आनंदाचा ।।४।।'' [६८]

---

[६७] ह.भ.प. स.के. नेऊरगांवकर, श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. १७१२ – पान क्र. ३७९

[६८] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्रीतुकाराम महाराज गाथा, वै. ह.भ.प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ क्र. ८७ : पृ.क्र.३६

ममतेचा मळ आपल्या मनाला लागू देऊ नकोस. तू कोणताही संग करू नकोस, स्थिर रहा. ममत्व, भ्रांतीग्रस्त होऊ नकोस. वृत्तीरहित, अविचलित, स्थिर व शांत राहा व इंद्रियांवर विजय मिळव. मनात कसलाही संकल्प उठू देऊ नकोस. असे जेव्हा घडते तेव्हा साधकाच्या अंत:करणात अहंकार उत्पन्न होत नाही आणि केवळ आनंदच नांदू लागतो. तोच आनंद ब्रह्मज्ञानाचा ब्रह्मानंद होय आणि त्याच अद्वैत ब्रह्मज्ञान असे म्हणावे लागेल. हे विश्वची परमेश्वराने व्यापले आहे, असा तो सर्व व्यापक श्रीहरी एकटाच आहे. सर्व व्यापक श्रीहरीचे अद्वैतही सर्वव्यापक आहे व तो सर्व कर्मांचा कर्ता करविता आहे व श्री विठ्ठल हे परब्रह्माचे सर्वव्यापक श्रीहरीचे प्रतीक आहे. विठ्ठलाविना परब्रह्म अधुरे आहे.

''विठ्ठलावांचोनि ब्रम्ह जें बोलती । वचन ते संती मानु नये ।।१।।
विठ्ठलावांचूनि ज्या ज्या उपासना । अवघाचि जाणा श्रमचि तो ।।२।।
विठ्ठलावांचूनि सांगतील गोष्टी । वांयां ते हिंपुटी होती जाणा ।।४।।
विठ्ठलावांचूनि जें काही जाणती । तितुल्या विल्पति वाऊगीं या ।।४।।
तुका म्हणे एक विठ्ठलचि खरा । येर तो पसारा वाऊगाचि ।।५।।'' [६९]

प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज अद्वैत स्पष्ट करताना म्हणतात की, विठ्ठलाशिवाय वेगळे ब्रह्म आहे, असे सांगणाऱ्यांचे बोलणे संतांनी प्रमाण मानू नये. विठ्ठलावाचून इतर पूजा – अर्चा, उपासना या केवळ श्रमालाच कारणीभूत ठरतात. विठ्ठलावाचून जे कोणी काही सांगतील त्या गोष्टी व्यर्थ, दु:खी करणाऱ्या आहेत असे समजा. तसेच विठ्ठलावाचून जे काही ज्ञान असेल तो मान, विद्वत्ता व्यर्थ आहे असे समजा. एक विठ्ठल खरा आहे, बाकी सर्व व्यर्थ पसारा आहे, असे तुकाराममहाराज म्हणतात.

''आतां वाटों नेदी आपुले हे मन । न सोडी चरण विठोबाचे ।।१।।
दुजियाचा संग लागों नेदी वारा । आपुल्या शरीरावरूनियां ।।२।।
यावे जावे आम्ही देवाचे सांगातें । मागुनि करीत हेंचि आलों ।।३।।

---

[६९] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्रीतुकाराम महाराज गाथा, वै. ह.भ.प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ क्र. ३०२६,पृ.क्र. ६४३

काय वायां गेलो करूं तो उद्‌वेग । उभा पांडुरंग मागे पुढे ।।४।।

तुका म्हणे प्रेम मागतों आगळे । येथे भोगुं फळे वैकुंठीची ।।५।।'' [७०]

तुकारामांच्या ठायी सुद्धा जेव्हा अद्वैत भाव निर्माण झाला, तेव्हा ते प्रस्तुत अभंगात म्हणतात, ''हे विठ्ठला, मी तुझे चरण सोडणार नाही. माझे मन द्विधा होऊ देणार नाही. दुसऱ्याचा संपर्कसुद्धा माझ्या देहाला होऊ देणार नाही. त्यांचा असा मानस आहे. देवाच्या बरोबरच आम्ही ये – जा करावी, हेच आम्ही बहुतकाळ करीत आलो आहोत. स्वयं पांडुरंग आमच्या मागे – पुढे उभे असताना आम्ही दुसरे उद्योग का करू? वैकुंठातले दिव्य भोग इहलोकी मिळतील, असे दिव्य प्रेम मी मागत आहे. '' अशा प्रकारे तुकारामांच्या अनेक अभंगांतून आपणास अद्वैताचे दर्शन घडते. तुकाराममहाराज म्हणतात की, नामाच्या बळानेच मी ब्रह्मसमान झालो. त्यामुळे मी देवरूप झालो आणि देव भक्त झाला आणि आम्ही दोघे एकरूप झालो. प्रस्तुत अभंगात ते चित्र आपणासमोर येते. ''

''मुखी विठ्ठलाचें नाम । मग कैचा भवभ्रम ।।१।।

चालतां बोलतां खातां । जेवितां निद्रा करितां ।।२।।

सुखें असों संसारी । मग जवळीच हरी ।।३।।

मुक्तीवरील भक्ती जाण । अखंड मुखी नारायण ।।४।।

मग देव भक्त झाला । तुका तुकी उतरला ।।५।।'' [७१]

[७२]तुकाराममहाराजांचे अद्वैत स्पष्ट करताना डॉ. शैलजा मोळक 'जगद्‌गुरू श्री संत तुकाराममहाराज स्मारक ग्रंथ' या पुस्तकात पान क्र. १२८ वर सांगतात,

'श्री तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगसंहितेत 'सर्व खल्विदं ब्रह्म' या उपनिषदप्रणित 'अद्वैत–वादा'चे अद्वैत सिद्धान्ताचे मार्मिक विवेचन केले आहे. एकमेवाद्वितीय सत्–चित्

---

[७०] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्रीतुकाराम महाराज गाथा, वै. ह.भ.प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्र. ३२११, पृ.क्र. ६७७

[७१] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्रीतुकाराम महाराज गाथा, वै. ह.भ.प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ. क्र. ३२०९, पृ.क्र. ६७७

[७२] मोळक शैलजा (संपादक), जगद्‌गुरू श्री संत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ, शिवस्पर्श प्रकाशन, द्वितीयावृत्ती २०१४, पृ.क्र. १२८.

आनंदमय–अद्वय परब्रह्मच सर्वत्र आहे. या अखिल विश्वात सर्व देहांत अविनाशी एकच एक चैतन्य आहे. पिंड–ब्रह्माण्डाला व्यापून राहणारे आहे. ते चैतन्य सकलात्मक आहे. सर्वत्र परिपूर्ण – ओतप्रोत म्हणजे घनदाट भरले आहे. सर्व सापेक्ष सत्यें ही तात्पुरती खरी असतात. म्हणजे ते 'परिणामी' सत्य असतात. त्यांची केवळ व्यावहारिक सत्ता असते. सापेक्ष–सत्–असत् याहून निरपेण सद्वस्तू अतीत आहे. द्वैता–द्वैतातील अद्वय–वस्तू ही मूळचीच व सदाचीच सिद्ध असते. सापेक्ष – सर्व द्वंद्वांहून अतीत अशी तर अद्वय चिन्मय वस्तू होय. अद्वय नित्यसिद्ध परब्रह्म वस्तू होय.''

गाथेतील अभंगांच्या अंधाराने येथे अद्वय–वादाचा किंवा अद्वैतवादाचा विचार चिंतन म्हणून लिहिला आहे.

तुकारामांच्या आत्म साक्षात्काराच्या अभंगांतून त्यांची अद्वैतानुभूती व्यक्त झाली आहे. तुकाराममहाराज म्हणतात, आपले चित्त अखंड श्रीहरीच्या पायी ठेवून निर्धास्त मनाने जगाचा व्यवहार करणे हेच अद्वैत अनुभूतीचा गाभा आहे. मनुष्याची देहात्मक बुद्धीचा लोप पावून अद्वैत अनुभूती घडू शकते. मनुष्याला मृत्यूबद्दलचे भय नष्ट झाले पाहिजे व मृत्यूबद्दलच्या संकल्पना, वाचा, मळभ दूर झाले पाहिजे, असे तुकाराममहाराजांना वाटते. देहात्मक बुद्धी नष्ट होऊन अध्यात्मिक अनुभव तुकाराममहाराजांनी घेतला. तुकाराममहाराजांचे अद्वैत अनुभव विविध पद्धतीने व्यक्त झाले ते कधी म्हणतात आपुले मरण पाहिले म्या डोळा, तर कधी मीची मज भ्यालो.

''मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ।।१।।
आता पुरलें नवस । निरसोनि गेली आस ।।धृ.।।
झालों बारा बळी । गेलों मरोनि तें काळीं ।।३।।
दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ।।४।।'' [७३]

[७३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान श्री. क्षेत्र देहू , पुणे – २०१३ अ.क्र.–१३३२, पृ.क्र.२८७

अशा अनेक अभंगांमधून त्यांच्या अध्यात्मिक अभिवृत्तीचे दर्शन घडते. या अभंगात आपल्याला त्यांच्या अध्यात्मिक ज्ञानाचे दर्शन घडते. आपले मरण हे देहाचे नसून देव वासनेचे आहे. हे मरण प्रपंचातील आसक्तीचे आहे. आत्मशुद्धीच्या तळमळीने आपण पुनर्जन्म घेतला आहे. विठ्ठलाच्या ध्यासाने आपल्यातील अहंकार दूर होऊन अध्यात्मिक उंची वाढविण्यासाठी पुन्हा जन्माला आलो असे स्पष्ट करतात. देहभाव मरून आत्मभाव पुनर्जीवित झाला आहे, असे तुकाराममहाराज सुंदर अभंगात मांडतात. आत्मसाक्षात्काराच्या अभंगामध्ये तुकारामांच्या विविध भावावस्थेचे दर्शन घडते. तुकाराममहाराजांचे कवित्व जेव्हा त्यांच्या संतत्वाला स्पर्श करते तेव्हा त्यांच्या अभंगांतून अध्यात्मिक सौंदर्यानुभव पहावयास मिळतो, त्यांच्या अशा विविध अभंगांतून विविध अद्वैत अनुभूतिचा आविष्कार पाहावयास मिळतो.

''आत्मस्थिती मज नको हा विचार । देई निरंतर चरणसेवा ।।१।।
जन्मोंजन्मीं तुझा दास पुरूषोत्तम । हेंचि गोडी आम्हा देईं देवा ।।२।।
काय सायुज्यता मुक्तिसवें चाड । देव भक्त कोड तेथे नाहीं ।।३।।
काय तें निर्गुण पाहों कैशा परी । वर्णू तुझी हरी कीर्ति कैशी ।।४।।
गोड चरणसेवा देवभक्तपणें । मज देवा झणें दुराविसी ।।५।।
जाणिवेपासूनि सोडवी सत्वर । देई निरंतर चरणसेवा ।।६।।
तुका म्हणे गोडा गोड नलगे प्रीति । सेवेविण चित्तीं सार नाहीं ।।७।।'' [७४]

प्रस्तुत अभंगात तुकारामांचे वेगळे भावविश्व पहावयास मिळते. आत्मस्थितीत राहण्याचा विचार ते नको म्हणतात. तर परमेश्वरचरणी हे मागणे ते मागतात की, ''हे पुरुषोत्तम जन्मोजन्मी तुझा दास व्हावे, हीच आवड आम्हाला दे. देव आणि भक्त असे तिथे कौतुक नको. हे घरी मी निर्गुण घेऊन काय करू, तुझी कीर्ती मी कशी वर्णन करू. देवा तुझी चरणसेवा करणेच मला गोड वाटते. त्या सेवेपासून तुम्ही मला दूर कराल, तर तसे करू नका. मीच देव या जाणिवेपासून मला लवकर सोडव आणि तुझी चरणसेवा निरंतर घडू दे. जे मुळातच गोड आहे. त्याला दुसरे गोड गोड

[७४] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अं.क्र. १९५१, पृ.क्र.४३०

लागत नाही, म्हणून तुझ्या चरणसेवेशिवाय मला कुठेही अर्थ वाटत नाही. अशा प्रकारे अद्वैताचा निराळा परामर्श आपल्याला स्पर्श होऊन जातो. आत्माविष्काराच्या विविध अभंगांतून त्यांच्या उत्कंठ भावावस्थेचे दर्शन आपणास घडते. तुकारामांच्या आत्मानुभवाने परमेश्वराच्या सगुण–निर्गुण रूपाचे दर्शनही आपणास घडते. त्यांची अनुभवसृष्टी विशाल आणि व्यापक आहे. त्यांचा प्रत्येक अभंग जणू त्यांच्या अनुभवाचे दर्शन घडवितो. त्यांचा प्रत्येक अभंग आत्मचिकित्सक, आत्मसाक्षात्कारी भासतो. ''

४.३.४.८ : बालक्रीडापर अभंग : तुकोबारायांच्या गाथेत श्रीकृष्णाच्या जन्माच्या व बालपणीच्या खोड्यांच्या, तसेच त्यांच्या जीवनपटाचे अभंग शंभरच्या जवळपास आपणास आढळतात. श्रीकृष्णाच्या जीवनपटाच्या घटना रचनेनुसार अभंगांची रचना केलेली आढळते. गाथेत बालक्रीडेच्या अभंगांचे स्वतंत्र असे स्थान आहे. श्री संत तुकाराममहाराज अभंग गाथा या गाथेत बालक्रीडेचे एकूण शंभर अभंग आहेत. क्र. ४४८४ ते ४५८३ इतकी आढळते. तुकारामांनी बालक्रीडेचे अभंग अत्यंत ओजस्वी स्वरूपात त्यांचे वर्णन केले आहे. वासुदेव व देवकीचा त्याग, कृष्ण जन्म, गोकुळातील श्रीकृष्णाच्या खोड्या, गोपिकांच्या तक्रारी, गोपाळांचे खेळ, वनभोजन, कालियामर्दन अशा गोष्टींचे वर्णन बाळक्रीडेच्या अभंगात दिसतात. श्रीकृष्णाचा जन्म हा कंस वधासाठी वासुदेव व देवकीच्या पोटी झाला. जगाच्या कल्याणासाठी नाना चर्चा कृष्णाने आपल्या सभोवताली घडवून आणल्या. श्रीकृष्णाच्या जन्मावेळी नंदाच्या घरी साक्षात देवाधिदेव याने जन्म घेतला, अशा स्वरूपाची मांडणी करताना प्रस्तुत अभंगात तुकोबाराय श्रीकृष्ण जन्माचे वर्णन करताना म्हणतात,

''चिंता तें पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरीं केला देवें ।।१।।
देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा दैव आलें ।।२।।
आलें अविनाश धरूनि आकार । दैत्यांचा संहार करावया ।।३।।
करावया भक्तजनांचे पाळण । आले रामकृष्ण गोकुळासी ।।४।।
गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर ते लोक घरोघरीं ।।५।।

घरोघरी झाला लक्ष्मीचा वास । दैन्यदारिद्र्यास त्रास आला ।।६।।
आला नारायण तयांच्या अंतरा । दया क्षमा नरां नारीलोकां ।।७।।
लोकां गोकुळींच्या झालें ब्रह्मज्ञान । केलियावांचून जपतपें ।।८।।
जपतप काय करावीं साधनें । जें त्या नारायणें कृपा केली ।।९।।
केलीं नारायणें आपुलीं अंकित । तोचि त्यांचे हित सर्व जाणे ।।१०।।
सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणिक दुसरा नाहीं नाहीं ।।११।।
नाहीं भक्ता दुजें तिही त्रिभुवनीं । एका चक्रपाणीवांचूनि त्या ।।१२।।
त्याच्या सुखासंगे घेती गर्भवास । तुका म्हणे आस त्यजूनियां ।।१३।।'' [७५]

तुकाराममहाराज म्हणतात, ''अवघ्या गोकुळाची चिंता दूर पळाली जेव्हा देवाधिदेव याने नंदाच्या घरी प्रवेश केला. भक्तांचे पाळ करण्यासाठी आणि दैत्यांचा संहार करण्यासाठी रामकृष्ण गोकुळास आले. गोकुळात आनंदीआनंद पसरला आणि अवघे गोकुळवासी निर्भय होऊन गेले. घरोघरी लक्ष्मीचा वास आला. दैन्य, दारिद्र्य दूर झाले. प्रत्येकाच्या अंतरी साक्षात परब्रह्म नारायण येऊन वसू लागला. अवघ्या गोकुळवासीयांना ब्रह्मज्ञान प्राप्त झाले. जप–तप अशी साधने करण्याची गरज राहिली नाही. कारण प्रत्यक्ष नारायणानेच कृपा केली. एका चक्रपाणीवाचून त्रिभुवनी दुसरा कोणी नाही आणि तो सगळ्यांचे हात करणारा आहे, 'असे वर्णन बालक्रीडेच्या अभंगात तुकाराममहाराज श्रीकृष्णाचे करतात. अशा अनेक प्रकारे श्रीकृष्णाचे वर्णन आढळून येते. श्रीकृष्णाच्या बाललीला आपल्या अभंगात तुकाराममहाराज करतात.

बालक्रीडेच्या अभंगात कृष्णकथेचा महिमा तुकाराममहाराज वर्णन करतात. या कृष्णकथेच्या महिम्यात मनोरंजनात्मक काव्य आविष्कार असल्यामुळे श्रोत्यांना कृष्णजन्माच्या कथेचे वर्णन मनास भावते. कृष्ण व त्याच्या बाललीला गोपाळांसहित केलेल्या खोड्या, गोपिकांच्या केलेल्या खोड्या हा श्रोत्यांचा जिव्हाळ्याचा विषय असतो. कृष्णकथेतील वर्णनाच्या निमित्ताने प्रपंचात स्वत:ला बांधून ठेवलेल्यांना तुकाराममहाराज आपापली छबी दाखविण्याचा

[७५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.४४८६, पृ.क्र.९१८

प्रयत्न करतात. विशेषत: श्रीकृष्णाच्या काल्याच्या अभंगात द्वैत – अद्वैत परामर्श केला आहे. यमुना नदीच्या किनाऱ्यावर कृष्ण गायी चरावयास गेल्यानंतर घडणाऱ्या प्रसंगाचे कथात्मक वर्णन करताना त्यातील अध्यात्म शोधण्याचा प्रयत्न तुकारामांच्या अभंगरचनेत दिसून येतो. कृष्ण आणि गोपाळांच्या विविध भावभावनांचे अतिशय प्रभावशाली वर्णन तुकाराममहाराज आपल्या प्रस्तुत अभंगात करतात,

''त्यांनी धरणीवरी संग केला हरिसवे ।
देऊनी आपुलें तोचि देईल ते खावे ।।१।।
न ठेवी आभार प्रेमाचा भुकेला ।
बहु दिस संग हाचि निर्धार त्याला ।।२।।
कान्होबा तु जेवीं घासोघासी आळविती ।
आरूष गोपाळे त्यांची बहु देवा प्रीति ।।३।।
तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा ।
तोये वाचविले ऐसे सांगो रे दातारा ।।४।।'' [७६]

''घ्या रे भोकरे भाकरी । दहीभाताची सिदोरी ।
ताक सांडा दुरी । असेल ते तयापे ।।१।।
येथे द्यावे तैसे घ्यावे । थोडें परी निरें व्हावें सांगतो हें ठावें ।
असो द्या रे सकळां ।।२।।
माझे आहे तैसे पाहे । नाही तरी घरा जाये ।
चोरोनियां माये । नवीनत आणावे ।।३।।
तुका म्हणे घरीं । माझे कोणी नाही हरी ।
नका करूं दुरी । मज पायां वेगळे ।।४।।'' [७७]

---

[७६] वै. जोग महाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, वै. ह.भ.प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३७३०, पृ.क्र.७९३

गोपाळ कृष्णाभोवती आपल्या शिदोऱ्या सोडत आहेत व आपण हरीच्या संगतीत आपापली शिदोरी खात आहोत आणि श्रीकृष्णालाही कान्होबा तू जेव असे सांगून आपली शिदोरी जेवू घालत आहेत. कारण या गोपाळांची श्रीकृष्णावर माया आहे आणि त्याने आपल्याला कसे वाचविले, हे आपण घरी जाऊन सांगू असे वर्णन तुकाराममहाराज करतात. ''गोपाळांनी भाकरीचे लोणचे आणि भाकरी घ्या, दही घ्या, ताक सांडून द्या. इथे जसे घ्यावे तसे द्यावे म्हणून तुम्हीपण थोडेच, पण चांगले घ्या. श्रीकृष्ण गोपाळांना असे म्हणतो, माझी शिदोरी जरी शुद्ध व पुण्याची आहे. तशी तुमचीही आहे की नाही ते पाहा. नाहीतर घरी जाऊन लोणी घेऊन या. अशा प्रकारे गोपाळांच्या शिदोऱ्या या त्यांच्या पाप–पुण्याच्या शिदोऱ्या आहेत. तसेच त्यांचे खेळ हे माया–मोहरूपी प्रपंचाचा सारिपाटच आहेत. तसेच रानावनात चरणाऱ्या गायी म्हणजे विशे–वासरे गुंतणारी इंद्रिये आहेत आणि या साऱ्या भवसागरातून तारणारा श्रीकृष्ण त्यांचा सखा आहे. त्यामुळे त्याच्यापुढे साशंक मनाने गोपाळांनी असू नये व आपापल्या पाप–पुण्याचा भार श्रीकृष्णावर सोपवावा. '' असे वर्णन तुकाराम अनेक अभंगांतून करतात. बालक्रीडेतील काल्याचे अभंग म्हणजे कृष्णाच्या सहवासातील आनंदाचे वर्णन आहे. काला म्हणजे सर्व भेदाभेद नाहीसा करून निःशंक मनाने झालेली परमेश्वराची भेट होय. परमेश्वर हा आपल्या सभोवताली जीवन व्यवहारात एक नाट्य घडवून आणणारा नाट्यकार आहे. आपण सर्व त्याचे खेळिया आहेत व तो खेळवणारा आहे. जीवनपटाच्या या खेळामध्ये आपली सोडवणूक करणाराही तोच आहे. अशा प्रकारे तुकाराममहाराजांची अभंगरचना म्हणजे केवळ अध्यात्मपर अनुभव नसून, पारमार्थिक–प्रापंचिक व्यवहाराचे ज्वलंत उदाहरण आहे.

तुकाराममहाराजांनी कृष्ण वर्णनाच्या कथा आटोपशीर पद्धतीने मांडल्या आहेत. प्रत्येक कथा विविध वैशिष्ट्यांतून मांडण्याचे अभंगांतून प्रयत्न केले आहेत. तुकाराममहाराजांच्या गाथेत बाळक्रीडेचे एकूण शंभर अभंग आहेत. त्यात सांप्रदायिक पद्धतीने त्यांचे स्वरूप मांडले तर कृष्णजन्मापासून, कृष्णजन्म, कंसाचे अत्याचार, कृष्णाची बाळलीला, गोकुळात नंद–यशोदेची

---

[७७] वै. जोग महाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, वै. ह.भ.प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३७३१, पृ.क्र.७९३

बाळलीला, गाई गोधन, यमुनेच्या तीरावरील कालिया नागाचे मर्दन, कृष्ण व त्याच्या सख्यांनी गोवर्धन पर्वत उचलले. गोपिका–गौळणींबरोबरचा सहवास अशा पद्धतीने अभंग गाथेत या क्रमांनुसार अभंग आढळतात. बाळक्रीडेच्या अभंगात कृष्णवर्णन करीत असताना मनुष्य स्वभावाच्या पैलूचे निरीक्षण महाराज करतात. तुकारामांनी जीवनातील वैषम्य अनुभवले आहे. जीवनाचे जे वास्तव त्यांनी स्वीकारले त्याचा प्रत्यय त्यांच्या सांप्रदायिक रचनेतून आपल्याला प्रत्ययास येतो. अध्यात्म साधत असतानाही जीवनाची दाहकता स्वीकारून त्याची जाणीव जनसामान्यांना आपल्या बालक्रीडेच्या अभंगांतून करताना आढळून येते. श्रीकृष्णाच्या बाललीलेतून अनेक भाव–भावनांचे दर्शन गाथेतील अभंगांतून दिसून येते. तुकारामांनी गोपिका–गौळणींच्या भावविश्वाचीही स्वतंत्र मांडणी केली आहे. तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करताना कृष्णलीलेचे वर्णन करताना गौळणींचे सर्व विश्वच कृष्णमय आहे. अवघ्या विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. कृष्णाच्या सहवासात त्यांच्या चित्ताला समाधान प्राप्त झाले आहे. अशा प्रकारे तुकारामांनी आपल्या बालक्रीडेच्या अभंगामध्ये देव अशा स्वरूपाची मांडणी केलेली आढळते.

४.३.४.९ : रूपकात्मक अभंग : तुकारामांच्या गाथेचा अभ्यास करत असताना असे लक्षात येते की, तुकोबा अभंगात अनुभवांचे दृष्टान्त वापरतात. तुकाराममहाराज स्वानुभव आत्मसाक्षात्कारातून अभंग निर्मिती करतात आणि इतरांच्या जीवनातील कुठल्याही अनुभवाशी ते एकरूप होऊ शकतात आणि तो तेवढ्याच उत्कटतेने प्रकटही करू शकतात. तुकोबांचे अभंग विविध दृष्टान्तांनी व रूपकांनी सजलेले आहेत. तुकारामांचे निरीक्षण कौशल्य व दृष्टान्त निवडीचे चातुर्य अजोड आहे. दृष्टान्त दैनंदिन जीवनाशी परिचित असल्याने आशय सहजसुलभ लक्षात येतो. तुकारामांच्या अभंगातील रूपके ही वैविध्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण व नावीन्यपूर्ण आहेत. तुकोबाराय अध्यात्मिक आशयातील सार्वतत्त्व रूपकाच्या माध्यमातून मांडताना दिसतात. तसेच विविध खेळांची लय ओळखून त्याची अभिव्यक्ती वेगवेगळ्या रूपकात्मक अभंगांतून मांडणी केलेली आढळते. तुकारामांनी अनेक ठिकाणी विठ्ठलाचे रूपक मांडलेले आढळते. तुकारामांची उपमा दृष्टी विविधतेने

नटलेली आहे. सगुण–निर्गुण भक्त परमेश्वर याचा बोधही रूपकाच्या माध्यमातून घेतात. तुकारामांच्या अभंगामध्ये उपमा, प्रतिमा, रूपक, दृष्टान्त हे सारे समाविष्ट केलेले आढळते. खेळाच्या माध्यमातून एक वेगळी अनुभूती त्यांना व्यक्त करायची आहे. तुकारामांचे अभंग जेव्हा अनुभवायची अभिव्यक्ती जेव्हा नाट्यमय संवादात्मक व क्रीडात्मक पातळीवर व्यक्त होताना दिसते, तेव्हा त्यांचा अभंग मूळ रूप सोडून नवे रूप धारण करताना दिसतो. रूपकात्मक अभंगात आंधळे, पांगुळ, वासुदेव, जोगी, काला, चेंडुफळी, फुगड्या, हुतूतू, मृदंग पाट्या, दळण–कांडण, हमामा, टिपरी, सौरीक अशा विविध काव्यप्रकारांतून तुकारामांनी पारमार्थिक व आर्थिक विचारांची मांडणी केलेली दिसते. रूपकात्मक अभंगांत विठ्ठल नामाचे महत्त्व सांगताना प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज सांगतात,

''शेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायाचें ।।१।।
नाहीं वेठी जेवा सारा । जाहाती नाहीं म्हणियारा ।।२।।
सरीक नाहीं दुसरा । धनी सारा तुझा तूं ।।धृ।।
जपतप नांगरणी । न लगे आटी दुनवणी ।।३।।
कर्म कुळवणी । न लगे धर्मपाळी दोन्ही ।।४।।
ज्ञानपाभारी तिफणी । न लगे करावी पेरणी ।।५।।
बीज न लगे संचिताचे । पीक पिकलें ठायींचें ।।६।।
नाहीं यमाचें चोरटें । विठ्ठल पागोऱ्याच्या नेटें ।।७।।
पीक न वजे हा भरवंसा । करी उद्वेग तो पिसा ।।८।।
सराई सर्वकाळ । वायां न वजे घटिकापळ ।।९।।
प्रेम पिकलें अपार । नाहीं सांठवावया थार ।।१०।।
ऐसिये जोडी जो चुकला । तुका म्हणे धिग त्याला ।।११।।''[७८]

[७८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र. ११४२, पृ.क्र.२५२

विठ्ठलनामाचे शेत आहे. ते तुम्ही फुकट व निर्धास्त मनाने करा, या नामरूपी शेतात वेठबिगारीचा सारा म्हणजे खर्च भरावा लागत नाही. इथे कोणावरही जुलूम–अत्याचार नाही. त्याचा मालक तुझा तूच असणार आहेस. या शेतात जपा–तपाची नांगरणी करायची आहे. कर्म–धर्माची कुळवण करायची आहे. दुसरी धुनवणी काही करायची नाही. ज्ञानरूपी पाभर धरून, फणी–पेरणी करावी. असे केले असता संचिताचे पीक लागत नाही. तर पीक ठायीचे – ठायीच पिकते असे सांगून तुकाराममहाराज या रूपकातून भक्ताच्या भक्तीची तीव्रता प्रकट करताना दिसतात. तसेच विठ्ठलावरील आपली अमाप भक्ती व प्रेम व्यक्त करताना पुढील रूपकात्मक अभंगाचा सुंदर मेळ घडवून आणलेला दिसतो.

''सदा माझे डोळे जोडो तुझे मुर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ।।१।।
गोड तुझे रूप गोड तुझे नाम । देईं मज प्रेम सर्वंकाळ ।।धृ.।।
विठो माऊलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजीं ।।३।।
तुका म्हणे कांहीं न मागे आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ।।४।।'' [७९]

प्रस्तुत प्रार्थनेत तुकारामांनी सदा सर्वकाळ माझे डोळे तुझी मूर्ती न्याहाळण्यासाठी राहू दे. रखुमाईच्या पती सोयरिया असे संबोधले आहे व विठ्ठलाला तुझे प्रेम सर्वकाळ मला दे. तुझ्या हृदयामागे मीच राहू दे. तुझ्या पायी माझे सर्व सुख आहे. त्यामुळे तुझ्याजवळ राहण्याचाच वर मला दे. अशा या तुझ्या नामात आणि रूपात गोडवा आहे, असे संबोधून तुकाराममहाराज सुंदर रूपक साधतात.

अनेक खेळांच्या माध्यमातून तुकाराममहाराज आचरणाचे महत्त्व रूपकांच्या साहाय्याने करतात. चेंडुफळी, हमामा, लखोटा, टिपरी, दळण–कांडण आणि काल्याचे अभंग यांच्या साहाय्याने रूपकात्मक अभंगांची मांडणी केली आहे. बालक्रीडेचे अभंग पाहता कृष्ण, गोपी, गोपाळ, गौळणी यांच्या रूपकातून परमेश्वराच्या भक्तीचा मार्ग दाखवतात,

---

[७९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र. ३, पृ.क्र. १.

''झेला रे झेला वरचे वरी झेला ।

हातिचें गमावी तो पाठीसी खाय टोला ।।१।।

त्रिगुणांचा चेंडु हातें झुगारी निराळा ।

वरिलियां मुखें मन लावी तेथें डोळां ।।धृ.।।

आगळा होऊनि धरी वरिचिया वरी ।

चपळ तो जिंके गांढ्या ठके येरझरीं ।।३।।

हातीं सांपडलें उभें बैसों नेदी कोणी ।

सोरीमागें सोरी घेती ओणवें करूनि ।।४।।

डोईं पडिलिया सोसी दु:खाचे डोंगर ।

पाठीवरीं भार उभा भोंवताही फेर ।।५।।

तुका म्हणे सुख पाहे तयाचें आगळें ।

जिंकी तो हरीसी कोणी एका तरी काळें।।६।।'' [८०]

प्रस्तुत रूपकात्मक अभंगातून तुकाराममहाराज म्हणतात, 'देहरूपी चेंडू वरचेवर झेला. तो खाली पडला तर पाठीवर टोले खावे लागतील. त्रिगुणाचा जो चेंडू आहे, तो बाजूला झुगारून द्या. आपले मुख वरती करून तिथे मन व डोळे लावून बसा, पुढे सरकून चेंडू वरचेवर झेला. जो चपळ आहे, त्याचा जय होतो व जो गांढ्या आहे तो फेऱ्यांत अडकतो. ज्याच्या हाती सापडले तो बसू देणार नाही. मागे–पुढे उभे राहून तो सांभाळून घेईल. या डावात अडकल्यानंतर दु:खाचे डोंगर सोसावे लागतात. पाठीवर भार आणि भोवती फेर उभा राहतो.' पण तुकाराममहाराज म्हणतात, ''जो हरीला जिंकतो. त्याचे मुखी आगळेच फुगडी अभंगाचाही समावेश होतो.'' प्रस्तुत अभंगात फुगडीच्या खेळाची गती आणि मनुष्य देहात्मक भागाची गती याचे साधर्म्य स्पष्ट होते.

फुगडी :

''फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे ।

---

[८०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र. १३९, पृ.क्र.२५

लाज सांडोनि एकाएकी पाहे ।।१।।

फुगडी गे अवघे मोडी गे ।

तरीच गोडी गे संसार तोडी गे ।।धृ।।

मागे जे शिकलीस होती पोटीं ।

तेंची विचारूनि आतां उच्चारी ओठीं ।।३।।

त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं ।

सावरूनि धरीं घालीं मूळबंदी गांठी ।।४।।

आगळें पाऊल जिंकी एकाएक ।

पावसी मान हें मानवती तिन्ही लोक ।।५।।

तुका म्हणे तुज मजमध्यें एकभाव ।

सम तुकें बार घेऊं पावों उंच ठावा ।।६।।'' [८१]

फुगडीच्या या रूपकात्मक अभंगात दडलेले अध्यात्म उलगडून सांगताना तुकाराममहाराज म्हणतात, ''प्रपंचाची फुगडी घालताना खेळाप्रमाणे गोल रिंगण देहात्मक पातळीवर आपण घालत असतो. कोणत्याही आसक्ती मनामध्ये न धरता सर्व लज्जा सोडून एकतत्त्वाने पाहावे व सर्व संसारातील गोडी कमी करून तू गर्भामध्ये जे शिकली होती तीच परमार्थाची ओठी येऊ दे. त्रिगुणात म्हणजे रज, तम, सत्त्व या त्रिगुणाची वेणी पाठीवर उडते. इथे फुगडी खेळणाऱ्या दोघींना आपले अस्तित्व विसरावयाला भाग पडते. या अवस्थेत द्वैताचे भान हरपते आणि अद्वैताचा समरूप अनुभव जन्म घेतो. '' तुकारामांच्या फुगडी अभंगांतून एकात्म भाव प्रकट होतो.

खेळांच्या माध्यमातून तुकाराममहाराज परमेश्वराशी असलेली आपली एकरूपता मांडताना दिसतात. हमामा खेळाचे रूपक साधून आयुष्यातील चार टप्प्यांचे अंतर्मुख करणारे वर्णन हमामाच्या या प्रस्तुत अभंगात आढळते.

---

[८१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र. १५०, पृ.क्र. ३०

हमामा :

''हमामा रे पोरा हमामा रे । हमामा घालितां ठाकलीं पोरें ।
करी येरझार चौऱ्यांशींची ।।१।।
पहिले पहारा रंगासी आलें । सोहं सोहं सें बार घेतलें ।
देखोनि गडी तें विसरलें । डोईं पडिलें आपणचि ।।धृ. ।।
दुसऱ्या पहारा महाआनंदे । हमामा घाली छंदछंदें ।
दिसे वाढे तों गोडा वाटे । परि पुढें नेणें पोर काय होतें तें ।।३।।
तिसऱ्या पहारा घेतला बार । अहंपणे पाय न राहे स्थिर ।
सोसे सोस करीतां डाई पडसी । सत्य जाणे हा निर्धार ।।४।।
चौथ्या पहारा हमामा घालिसी । कांपविसी हातपाय ।
सुऱ्यापाटीलाचा पोर यम्या । त्याचे पडसील डोईं रे ।।५।।
हमामा घालितां भ्याला तुका । त्याने सांडिली गड्याची सोई ।
यादवाचा मूल एक विठोबा । त्यासवें चारितो गाई रे ।।६।।'' [८२]

प्रपंचातील जडण–घडणीचे वास्तव चित्र रेखाटलेले या अभंगात दिसते. तुकाराम महाराज सांगतात, ''हमामा घालताना जर तू थकलास तर ८४ लक्ष योनींची येरझार करीत राहशील. पहिला पहारा रंगात येतो. सोहं सोहं हा छंद तू घेतलास आणि प्रपंचातील गडी दिसले तेव्हा सोहं विसरलास आणि त्या डावात आपणहून पडलास. बाळपणाच्या दुसऱ्या प्रहरात महानंदाचा छंद घेऊन हमामा घालू लागल्यास दिवस जात तसे गोड वाटे; पण पुढे काय होणार ते कळत नव्हते. तरुणपणाच्या तिसऱ्या प्रहरात अहंपणाचा छंद घेतलास, मग एका ठिकाणी पाय स्थिर राहेन. प्रपंचाचा हा खेळ खेळता डावामध्ये पडशील हे निश्चितच करता डावामध्ये पडशील हे निश्चितच. म्हातारपणाच्या चौथ्या प्रहरात हमामा घालताना हात–पाय कापू लागतात. सूर्यपाटलाचा यम पोर आहे. त्याच्या डावात तू पडशील. '' तुकाराममहाराज हमामा घालताना सांगतात, ''मी भिऊन त्या गड्याची संगत सोडली आणि यादवांचे पोर–विठोबा त्याची संगत धरून त्याच्याबरोबर गाई

[८२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अं.क्र. १५५, पृ.क्र. ३२

चारतो. हमामा म्हणजे आयुष्यातील चढ–उतार, आयुष्यातील जडण–घडणीचा मेळ. बाल्यावस्था, तारूण्यावस्था, देहबुद्धीचा, अहंकाराचा, अहंपणाचा भाव या साऱ्यांसोबत मनुष्य आपले हात–पाय थरथरायला लागेपर्यंत म्हणजे वार्धक्यापर्यंत या डावात फसत जातो आणि मग मृत्यूचे भय वाटायला लागते. हे भय वाटू नये म्हणून तुकारामांनी देहरूपी प्रपंचाशी खेळताना विठोबाशी मैत्री केली व मुक्तपणे गाई चारणाऱ्या मुलाप्रमाणे आपली देहरूपी प्रपंचातून मुक्तता करून घेतली. ''अशाच पद्धतीने टिपरी खेळाच्या रूपकातूनही वारकरी सांप्रदायाचे वर्णन तुकाराममहाराज आपल्या अभंगातून करतात.

टिपरी :

''दोन्ही टिपरीं एकचि नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद रे ।
कुसरीं अंगे मोडीतील परी । मेळविती एकएका छंदें रे ।।१।।
कांहींच न वजे वांयां रे खेळिया । एकचि बसवंत अवघियां रे ।
सम विषम तेथें होऊंच नेदी । जाणऊनि आगळिया रे ।।धृ।।
संत महंत सिद्ध खेळतील घाईं । तेच सांभाळी माझ्या भाई रे ।
हात राखोन हाणिती टिपऱ्या टिपरी। मिळोनि जाय त्याची सोई रे ।।३।।
वितालाचें अवघें जाईल वायां । काय तें शृंगारूनि काया रे ।
निवडुनि बाहेर काढिती निराळा । जो न मिळे संतांचियां घाईरे ।।४।।
प्रकाराचें काज नाहीं सोडीं लाज । नि:शंक होऊनियां खेळें रे ।
नेणती नेणतींच एकें पावली मान । विठ्ठल नामचिया बळें रे ।।५।।
रोमांच गुडिया डोलविती अंगे । भावबळे खेळविती सोंगे रे ।
तुका म्हणे कंठ सद्गदित दाटे । या विठोबाच्या अंगसंगे रे ।।६।।'' [८३]

तुकारामांच्या रूपकात्मक अभंगांतून निरनिराळे भाव व्यक्त होताना दिसतात. त्या भावात्मक अनभूतिचेच विविध अविष्कार त्यांच्या अभिव्यक्तीतून दिसून येतात. अनुभवाची

[८३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अं. क्र. १९२, पृ.क्र. ४०

अभिव्यक्ती खेळाच्या माध्यमातूनही दिसून येते. तुकोबांची अभंगवाणी ही अचूक व सहजसुलभ आहे. तसेच त्यांचे काव्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख पटवते.

४.३.४.१० : विठ्ठल भक्तिपर अभंग : तुकोबारायांचा जन्म दृढ विठ्ठलभक्ती असलेल्या वारकरी सांप्रदायिक घराण्यात झाला. त्यामुळे निस्सीम विठ्ठलभक्ती त्यांच्यामध्ये रुजलेली होती. तसेच विठ्ठलाची उपासना ही परंपरेनेच त्यांच्याकडे चालत आली. तुकारामांचे विठ्ठलभक्तीचे अभंग पाहिले असता, विठ्ठलाचे ते उत्कट स्वरूप, आपल्यासमोर मांडतात त्याचे मूळ शोधायचे ठरल्यास त्यांच्या घराण्याची परंपरा आपल्या डोळ्यांसमोर येते. त्यांचे आठवे पूर्वज विश्वंभरबुवा यांची विठ्ठलभक्ती तुकोबांच्या कुळात पुरेपूर आली. विश्वंभरबुवांचा वारसा तुकोबारायांचे वडील बोल्होबा आणि आई कनकाई यांनी भावपूर्ण श्रद्धेने पुढे नेला. त्याचे ते संस्कार तुकोबाराय आणि त्यांच्या भावंडांच्या हृदयात पुरेपूर उतरले. विठ्ठलच आपले माता–पिता, बंधु–भगिनी आणि कुलदैवत असल्याचा भाव तुकारामांच्या अनेक अभंगांतून आपल्याला दिसून येतो. तुकोबारायांनी पुरातन भागवत धर्म सोडला नाही. तुकोबारायांची विठ्ठलावरील भक्ती दृढ होती. वारकरी संप्रदाय परंपरा त्यांनी कायम राखली. परमप्रिय श्री विठ्ठल, पुंडलिक, चंद्रभागा, तीर्थक्षेत्र पंढरपूर हे त्यांचे आराध्य होते. सर्वच संतांनी पंढरीला भूवैकुंठ समजले आहे.

''आमची मिरास्ती पंढरी । आमुचे घर भीमातिरी ।।१।।
पांडुरंग आमुचा पिता । रखुमाई आमुची माता ।।२।।
भाऊ पुंडलिक मुनी । चंद्रभागा आमुची बहिणी ।।३।।
तुका जुनाट मिराशी । ठाव दिला पायांपाशीं ।।४।।'' [८४]

आपल्या प्रेमळ भक्तांकरिता चंद्रभागेच्या पावन तीरी कर कटेवर ठेवून विटेवर समचरण उभा आहे. त्या या परमप्रिय पांडुरंगाची पंढरी म्हणजे सर्व संतांचे माहेरघर पंढरपूर आहे. तसेच ते तुकोबारायांचेही माहेरघर आहे. याचा परामर्श करताना प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज म्हणतात, ''आमचे घरच भीमेतीरी आहे व रुक्मिणी आमची माता आहे. तुका पंढरपूरचा जुना मिराशी आहे

[८४] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, वै.ह.भ.प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ. क्र. ३३५७, पृ.क्र. ७०७

आणि त्याला पांडुरंगाने आपल्या पायाशी आश्रय दिला आहे. '' तुकारामांच्या अनेक अभंगातून पांडुरंग आणि पंढरपूरचा महिमा पाहावयास मिळतो. कलियुगात मानवाचा उद्धार करणारे पांडुरंगासारखे दैवत आणि पंढरपूरसारखे तीर्थक्षेत्र कुठेच नाही. विठ्ठल महिमा वर्णन करताना तुकाराममहाराज म्हणतात,

''विठ्ठल आमचें जीवन । आगम निगमाचें स्थान ।
विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यानविसावा ।।१।।
विठ्ठल कुळींचे दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ।।२।।
विठ्ठल विस्तारला जर्नी । सप्तही पाताळे भरूनि ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसीं ।।३।।
विठ्ठल जिवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियला चाळाविश्व विठ्ठलें ।।४।।
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाही दुसरें ।।५।।'' [८५]

विठ्ठल त्यांचे जीवन आहे. सर्व साधनांची सिद्धी विठ्ठल आहे. तसेच ध्यानाने प्राप्त होणारा विसावाही विठ्ठल आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ विठ्ठल असून, ते प्राप्त करून देणाराही विठ्ठल आहे. विठ्ठल वित्त, गोत, चित्त असून आमचे कुळीचे दैवत आहे, असे तुकाराममहाराज म्हणतात. जो त्रिभुवनात व्यापला आहे, तो लोकांच्या मनामध्ये वास्तव्य करतो आहे. विठ्ठल जिवाचा जिव्हाळा असून लगेच कृपा करणारा आहे. माय, बाप, चुलता, भगिनी असा गोतावळाही विठ्ठलच आहे. त्यामुळे तुकाराममहाराज म्हणतात, आता मला विठ्ठलाशिवाय दुसरे कोणीही नाही. असा हा अद्वैत स्वरूप पांडुरंग निर्गुण आराध्य दैवत आहे. पांडुरंगाचे नामचिंतन हे

[८५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. ६११, पृ.क्र.१३९

तुकोबांच्या भक्तीचे अंतरंग आहेत. पंढरीच्या विठ्ठलाबरोबर आपले भावबंध जोडताना तुकाराममहाराज म्हणतात,

''विधवेसि एक सूत । अहर्निशी तेथे चित्त ।।१।।
तैसा तू मज एकला । नको मोकलूं विठ्ठला ।।धृ.।।
सुपुत्रालागीं बाप । अवघे तेथेचि संकल्प ।।धृ.।।
तुका म्हणे चित्तीं । पतिव्रते जैसा पति ।।३।।'' [८६]

ज्याप्रमाणे पतीच्या मृत्यूनंतर विधवेला एकच पुत्र असल्यावर तिचे चित्त कायम त्याच्यापाशी असते. तसा तू मला एकटाच आहेस त्यामुळे तू मला दूर लोटू नकोस. तसेच एकदा सुपुत्र असल्यावर तो वडिलांच्या हिताचाच विचार करतो आणि वडिलही त्याचे हीतच जपतात. तुकाराममहाराज म्हणतात, ''पतिव्रतेच्या चित्तात ज्याप्रमाणे पतिचेच चिंतन सर्वकाळ असते. त्याचप्रमाणे माझ्या चित्तातही तुझेच ध्यान आहे.'' विठ्ठलाशी असलेले आपले नाते अचूक व अर्थपूर्ण शब्दांत तुकाराम महाराज प्रस्तुत अभंगात वर्णन करतात. विठ्ठलाच्या नामस्मरणात फार मोठी शक्ती आहे. नामाचा छंद लागल्यावर शरीर भाव उरत नाही. भक्त आणि देव एकरूप होऊन जातात. ''नाम सुखाचा सोहळा स्वर्गात नाही'' असे तुकाराममहाराज म्हणतात. तसेच नामस्मरण हा अमृताचा सागर आहे, असाही ते उल्लेख करतात. नामस्मरणाने मनुष्य देह स्वतःच हरी रूप होऊन जातो, असेही त्यांना वाटते.

''कळे न कळे ज्या धर्म। ऐका सांगतो रे वर्म।
माझ्या विठोबाचें नाम । अट्टाहासे उच्चारा ।।१।।
तो या दाखविल वाटा । जया पाहिजे त्या नीटा ।।
कृपावंत मोठा । पाहिजे तो कळवळा ।।धृ।।
पुसतां चुका होतो वाटा । सर्वे बोळावा गोमटा ।
मोडों नेदी काटा । घेऊ साटा चोरासी ।।३।।

---

[८६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.४३४२, पृ.क्र. ८७७

तुका म्हणे मोल । नलगे द्यावे वेचा बोल ।

विठ्ठल विठ्ठल । ऐसा छंद मनासी ।।४।।'' [८७]

प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज लोकांना उद्देशून म्हणतात, ''ज्यांना धर्म कळत असेल किंवा नसेल त्या सर्वांसाठी मी धर्माचे वर्म सांगतो. माझ्या विठोबाचे नाव आग्रहाने घ्या. मग तो तुम्हाला मार्ग दाखवेल. त्याला भक्तांचा कळवळा आहे व त्याच्या अंतःकरणात कृपा आहे. पण भक्तांनासुद्धा त्याच्याविषयी कळवळा असावा. एखाद्याला सरळ वाट विचारली, तर त्याला माहीत नसल्यास तो चुकीची वाट दाखवतो. पण भगवंत आपल्यासोबत करतो व भक्ताला बरोबर वाट दाखवतो व त्याला नरकाचा काटा टोचू देत नाही. त्याची पुण्याई काम–क्रोधी चोराकडून चोरली जाणार नाही, याची दक्षता घेतो. विठ्ठलाचे चिंतन करणाऱ्याला काही मोल द्यावे लागत नाही. फक्त मनाला विठ्ठल नामाचा छंद लावावा लागतो. '' अशा प्रकारे विठ्ठल नामाचा महिमा विठ्ठलाच्या अनेक अभंगांतून विशेषतः क्षेपकाच्या अभंगातून दिसून येतात. विठ्ठलाची विविध रूपेही अभंगातून प्रकट होताना दिसतात. तसेच विठ्ठलाशी विविध नात्यांचे पाश बांधलेले आहेत. कित्येक ठिकाणी विठ्ठल गुरू, विठ्ठल सखा, विठ्ठल मित्र, बंधु विठ्ठल अशा बहुरुपात विठ्ठलाला त्यांनी पाहिले आहे आणि त्या विविध रुपांचे वर्णन आपल्या अभंगात त्यांनी मांडले आहे.

''विठ्ठल माझा जीव विठ्ठल माझा भाव ।

कुळधर्म देव विठ्ठल माझा ।।१।।

विठ्ठल माझा गुरू विठ्ठल माझा तारूं ।

उतरील पारू भवनदीचा ।।धृ.।।

विठ्ठल माझी माता विठ्ठल माझा पिता ।

विठ्ठल चुलता बहिणी बंधु ।।३।।

विठ्ठल हें जन विठ्ठल माझें मन ।

सोइरा सज्जन विठ्ठला माझा ।।४।।

---

[८७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. ३२०१, पृ.क्र. ६५३

तुका म्हणजे माझा विठ्ठल विसावा ।

नस्वरित गांवा जाईन त्यांच्या ।।५।।'' [८८]

प्रस्तुत अभंगात विठ्ठल हाच माझा जीव, देव, कुलधर्म तसेच भाव आहे. विठ्ठलच माझा गुरू व विठ्ठलच माझा तारू आहे. त्यामुळे मी भवनदीला पार करू शकेल. माझी माता–पिता विठ्ठल आहे. तसेच विठ्ठल हाच माझा चुलता, माझी बहिण बंधू आहे. विठ्ठलच माझे जन आणि मन आहे. विठ्ठलच माझा विसावा आहे आणि मी त्याच्या गावी जाणार आहे. अशा प्रकारे तुकाराममहाराजांनी आपले भक्तिरसाचे महत्त्व पटवून देण्यासाठी अनेक अभंगांची निर्मिती केली. तुकाराममहाराजांचे भक्तीचे वर्णन हे मनाचे आहे. भक्तीद्वारे प्रत्यक्ष परमेश्वर भक्तासाठी साक्षात उभा राहतो, याचे अनेक दाखले ते आपल्या अभंगांद्वारे देतात. तुकाराम महाराजांना मोक्षाची अभिलाषा नाही तर भक्तीची आस आहे. त्यामुळे ते पांडुरंगाला विनंती करतात –

''न लगे मुक्ती आणि संपदा । संत संगे देई सदा ।।'' [८९]

आम्हा काही मुक्ती आणि संपदा काही नको, तुझ्या नामस्मरणाला संतांचा सहवास दे हीच आस तुकारामांच्या हृदयात आहे. भक्तीचे वर्णन करताना तुकाराममहाराज म्हणतात, भावावाचून भक्ती केवळ अर्थहीन भक्ती आहे. परमेश्वराच्या भेटीची आस तुकारामांना इतकी आहे की, त्यांच्या तोंडातून सहज उद्‌गार बाहेर पडतात.

जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ।।१।।

ही तळमळ साक्षात पांडुरंगाची भेट घालून देणारी आहे आणि पांडुरंगाचे नामस्मरण हे त्याचे साधन आहे. या साधनेने संतत्व प्राप्त होते आणि संतत्व प्राप्त झाल्यावर अधिकार प्राप्त होतो आणि त्याच अधिकाराने तुकाराममहाराजांनी आपल्या विठ्ठल भक्तीचे दर्शन आपल्याला घडविले. भक्ती ही सर्वव्यापक, ईश्वराविषयीची प्रेमभावना आहे, तर तुकारामांना ती कधी सुळावरील पोळीही वाटते. नामस्मरण हे भक्तीचे साधन आहे व परमेश्वर हे साध्य आहे.

---

[८८] जगद्‌गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. ३०९८, पृ.क्र.६३५

[८९] श्री ज्ञानेश्वर महाराजकृत, हरिपाठ, श्रीताप्रेस गोरखपुर, मागणे अ.क्र. १, पृ.क्र. ४०

सारांश : संत तुकारामांचे 'अभंग' म्हणजे आत्मानुभव आहेत. संत तुकारामांची गाथा आशय व रचनेच्या दृष्टीने अतिशय वैविध्यपूर्ण आहे. गाथेत एकूण साडेचार ते पाच हजार अभंग आहेत; परंतु अभ्यासकांनी वेगवेगळी संख्या मांडलेली आढळते. अभंग हा एक वैशिष्ट्यपूर्ण छंद आहे. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१. स्वानुभवपर अभंग

२. आत्मपर अभंग

३. करुणापर अभंग

४. उपदेशात्मक अभंग

५. विरहणीपर अभंग

६. अद्वैतपर अभंग

७. बाळक्रीडापर अभंग

८. रूपकात्मक अभंग.

तुकारामांच्या कवितेतून अर्थात अभंगांमधून स्वानुभवांचे दर्शन होते. म्हणूनच 'तुका म्हणे' ही मुद्रा जीवनानुभवावर संबोधून आहे. त्यांच्या अभंगांमधून नावीन्य, अर्थगर्भता, शब्दप्रभुत्त्व व भक्तिभावातील उत्कटता ही वैशिष्ट्ये आढळून येतात. रुपके, दृष्टान्त लय व शब्दांच्या माधुर्यामुळे अभंगांचे सौंदर्य गाथेत दिसून येते. या वर्गीकरणानुसार तुकाराममहाराजांच्या अभंगातून प्रतिबिंबित होणारे लोकजीवनपर अभंग आढळून येतात. तुकारामांच्या अभंगाची शैली व त्यातील अनुभव हे त्या काळातील भाषाशैली व लोकजीवनावर दृष्टिक्षेप टाकणारे आहेत. त्यांच्या अभंगांतून जणू त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचे प्रभावशाली वर्णन दिसून येते.

* * *

४.४ : तुकाराममहाराजांचे लोकजीवनातील कार्य :

४.४.१ : प्रास्ताविक :

तुकोबारायांची गाथा वाचताना सतत तुकोबांच्या असामान्य प्रतिभाष्यकतेचा प्रत्यय येत राहतो. तुकोबांच्या अध्ययनाविषयी तुकोबांच्याच अभंगांत अनेक संदर्भ मिळतात.

''संतांची उत्तरे! विश्वासे आदरे करोनिया।''

तुकोबांचे घराणे गोसावी पंथ असल्यामुळे गीता, भागवत, शडदर्शनी इ. ग्रंथांचे संकलन त्यांच्याकडे होते. संत तुकाराम व्यवसायाने वाणी व सावकार असल्यामुळे व तसेच महाजनकीच्या व्यवसाय असल्यामुळे लेखन व वाचन कला तुकोबांना अवगत होती. वाचनाला पोषक असा ग्रंथसंग्रह तुकोबांच्या हाताशी होता. त्यांच्या अनेक अनुवादात्मक अभंगांवरून त्यांची संस्कृतीची जान लक्षात येते. तुकोबांनी वेद अध्ययन केले नाही. कारण त्यांना तो अधिकार नव्हता; तरीपण ते आत्मविश्वासाने सांगतात की,

''वेदांचा तो अर्थ, आम्हांसीच ठावा । येरांनी वाहवा भार माथां ।।१।।'' [९०]

या सर्वांचे कारण एकच, पांडुरंगाच्या कृपाप्रसादाने व त्याच्या घराण्याच्या पुण्याईने त्यांच्या बुद्धीला वेदार्थाचे स्फूरण उस्फूर्त होते. म्हणूनच तुकोबांच्या गाथेला पंचम वेद असे म्हणतात. अलौकिकतेचा स्पर्श, व्यासंगी व्यक्तिमत्व आणि असामान्य प्रतिभा या साऱ्यांचा मेळ ज्यांच्या ठिकाणी दिसतो, त्यास तुकोबारायांनी गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, नामदेवांचे अभंग, कबिराचे दोहे इ. अध्ययनाचा स्पर्श केलेला जाणवतो. वेदांचा खरा अर्थ लोकांपर्यंत पोहोचवण्याचा चुकीच्या अर्थाचे खंडन करीत सरळ साधे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य यांच्या अभंगातून दिसून येते. तुकोबांच्या असामान्य अलौकिक प्रतिभेचा प्रत्यय गाथेत पदोपदी जाणवतो. नामदेव विठ्ठलाच्या अलौकिक स्पर्शाने त्यांच्या काव्याला स्पर्श केलेला जाणवतो. विश्वात्मक आत्मतत्त्वाचा तुकोबांच्या प्रतिमेला व कवित्वाला व त्यांच्या अभंगाला जाणवतो. पराकोटीचा

---

[९०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. २२५६ पृ.क्र. ४६८

भक्तीचा जिव्हाळा प्रकाशतेने जाणवतो. संस्कृतीमध्ये लोकजीवन फुलत असते. तुकाराममहाराजांना सामाजिक व्यवहारातही भक्ती आणि आचार या नीतिमूल्यांची ओढ अभंगात जाणवते.

''जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरीवरी ।।१।।
अंतरींचें शुद्ध कासयानें झालें। भूषण तो केलें आपणया।।धृ.।।
वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचि ना ।।३।।
तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया स्फुंदां तुम्ही ।।४।।'' [९१]

तत्कालीन समाजाकडे दृष्टी टाकली असता असे दिसून येते की, समाजात समता, बंधुत्व, स्वातंत्र्य ही मूल्ये लोप पावलेली आहेत. समाजातील बहुजन समाजावर अन्याय, अत्याचार जुलमाचा भडिमार जाणवतो. मध्यमयुगीन काळात वारकरी संप्रदायाची स्थापना झाली. वारकरी धर्माला बळकटी यावी, वारकरी संप्रदायाचे नियम पाळावे व हा संप्रदाय समाजाचा आधारस्तंभ व्हावा या भक्तीच्या मार्गाने सामाजिक स्थिती बदलण्याचा प्रयत्न केला. समाज हा राष्ट्राचा पाया आहे. त्याचप्रमाणे कुटुंबाचा घटक आहे. कुटुंबात राहणारा प्रत्येक नागरिक राष्ट्राचा घटक आहे. त्या दृष्टीने समाजाच्या कल्याणाकरिता प्रत्येक माणूस चारित्र्यसंपन्न असावा. माणसाला माणूस घडविण्याची महाराष्ट्रीय संतांची सामाजिक क्रांती फार महत्त्वाची आहे. तुकोबांची भक्ती एकांगी नव्हती. ती डोळस विश्वव्यापक स्वरूपाची होती. 'हे विश्वची माझे घर' (ज्ञानेश्वरी, अध्याय १२ वा) हे त्यांचे अधिष्ठान होते. हा त्यांचा विश्वात्मक भक्तिप्रेम धर्म होता. समाजातील विषमता, व्यभिचार, दुष्कृत्य या समाज वैगुण्याची चीड येऊन आपल्या अभंगात न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी प्रसंगी कठोर शब्दांचा वापर त्यांनी केला. ज्याप्रमाणे एखादी माता आपल्या बाळाच्या कल्याणासाठी कठोर होते. त्याचप्रमाणे महाराज (तुकोबा) आपल्या अभंगात प्रसंगी समाजहितासाठी कठोर झालेले आपल्याला जाणवतात. समाजाला धर्म, नीती, आचार–विचार शिकवताना तुकोबांनी मानवतेचा प्रचार केला आहे व मानवतेच्या समतेचा

[९१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. १७२६ पृ.क्र. ३६५

प्रचार केला आहे. सर्वांना समदृष्टीने पाहिले. बहुजन समाजाच्या धर्मजीवनाला अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून दिली आहे. आत्मवृत्तीची प्रेरणा दिली. रूढीग्रस्तांना शूद्र जीवनातून वर काढण्याचा प्रयत्न केला. तसेच उच्चवर्णीयांना कर्मठ धर्मपाशातून सोडविण्याचा प्रयत्न केला. तुकोबांच्या अभंगांमधून आत्मोद्धाराबरोबरच लोक उद्धाराचीही ओढ दिसून येते. त्यांच्या काव्यरचनेतून मायेची, जीवनाची संपूर्ण शिदोरीच मिळते. माउलींच्याप्रमाणे आपल्या भक्ताचे ते वैचारिक पालनपोषण करतात. नितांत श्रद्धा, अमाप विनम्रता, सचोटीची कृतज्ञता त्यांच्या अभंगांतून दिसून येते. तुकोबांच्या अभंगात चतुरंग योग जाणवतो. तत्त्वज्ञ, कवितत्त्व, संततत्व, योगीतत्त्व अशी चतुःश्रेणीची रूपे त्यांच्या अभंगांत दिसून येतात. लोकांच्या अंत:करणाला स्पर्श करणारी उत्कटता त्यांच्या अभंगांत दिसून येते.

तुकोबारायांच्या जन्मापूर्वी महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात एक मर्म निर्माण झाले होते व ते वाढतही होते. परमेश्वराची आराधना करताना तुकोबांनी आपल्या अभंगात या सामाजिक दुरवस्थेची दखल घेतली. समाजाचे नेतृत्व करणारा विशिष्ट वर्ग गुंढाळलेला होता. स्वत:च्या स्वार्थासाठी परकियांची गुलामगिरी व स्वसंस्कृतीचा त्याग करायलाही समाज मागेपुढे पाहत नव्हता. याची दखल तुकोबारांच्या अभंगांत जाणवते. तुकोबारायांना फक्त दोनच जाती माहिती आहेत, त्या म्हणजे सुष्ट आणि दुष्ट.

तुकाराममहाराजांच्या कार्याचा अभ्यास करताना असे दिसून येते की, त्यांची वागणूक आणि त्यांचे लोकोत्तर जीवन याचा लोकमानसावर प्रभाव आहे. त्यांनी सृष्टीशी संवाद व विठ्ठलाशी भावसंवाद साधलेला दिसतो. परमार्थात तुकोबांनी बुद्ध, मुक्षू, साधक, सिद्ध या अवस्था जगल्या व त्या अवस्थेतून ते स्वत: व्यथित झाले. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून त्यांच्या जीवनाकडे पाहिले असता, स्वप्नभूमीतून त्यांची अभंगवाणी निर्माण झालेली दिसते. नीतिधर्म, अध्यात्म, साक्षात्कार यांचे तत्त्व तात्त्विक दर्शन यांच्या रचनेतून घडते. तुकोबांनी आपल्या नैतिक– अध्यात्मिक वादाची भूमिका सांगितली की, जीव, देह, चित्त, मनवी इंद्रीय यांना नैतिक दृष्टीने शुद्धतेचे वळण लागले की, त्याचे पर्यावसान ब्रह्मभाव आत्मज्ञान प्राप्ती आत्मशुद्धी, मोक्षसिद्धी यांमधील सहज परावर्तित

होते. तुकोबांच्या अध्यात्मिक जीवनाची वाट ही परमेश्वर निखळ भक्तीची व विठ्ठलमय आहे. आत्मा स्वत: शुद्ध व निर्मळ आहे व त्याच्या शुद्धतेचा विचार व निर्मळ भाव अध्यात्मिकतेसाठी आवश्यक आहे. तुकोबांनी विज्ञाननिष्ठ विचार मांडताना साऱ्या विश्वाचा विचार केलेला दिसतो. तुकोबांच्या अभंगांतील नव्या विचाराने प्रेरित होऊन लोकमाणसे भागवत धर्माच्या झेंड्याखाली संघटीत होऊ लागली. तुकोबा समाजाला जागृत करू लागले, तेव्हा सर्व धर्ममार्तंड त्रस्त झाले व तुकोबारायांना सामाजिक विरोध पत्करावा लागला. साध्या, सोप्या सरळ भाषाशैलीत तुकोबाराय आपल्या अभंगातून जनजागृती करू लागले. त्यामुळे बहुजन समाज नकळत तुकोबारायांकडे आकर्षिला जाऊ लागला. भागवत धर्माची तत्त्वे झपाट्याने प्रसार होऊ लागली. वर्णाश्रम वर्चस्वाची जाणीव समाजाला झाली. आपल्यावरील अन्यायाची जाणीव त्यांना होऊ लागली. तुकोबा आपल्या अभंगात वेद, उपनिषदे याचे रसाळ वर्णन करीत. तुकोबा कीर्तन करीत असत व या कीर्तनांना सर्व जाती–धर्माचे लोक जमत. ते कीर्तनात वेदांचा उच्चार करीत. हे समाजातील काही कर्मठ लोकांना सहन होत नसे. तुकोबा हे समाजसुधारक, लोकशिक्षक, धर्मोपदेशक होते. त्यांनी भागवत धर्म प्रसाराचे कार्य आपल्या अभंगांतून व कीर्तनातून अखंडपणे केले. सामाजिक दोषावर, दंभावर, ढोंगबाजीवर त्यांनी कडाडून टीका केली. हिंदू धर्म संस्कृतीचा प्रसार, प्रचार त्यांनी केला. सर्वसामान्यांना भक्तिमार्ग दाखवून परमेश्वर प्राप्तीची लालसा निर्माण करून दिली.

''वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । येरांनी वाहवा भार माथां ।।१।।'' [९२]

समाजातील समाजकंटकांना कोठडीवर आणून रंजल्या, गांजलेल्यांना आत्मविश्वास तुकोबारायांनी शिकविला. तुकोबा हे लौकिक, पारमार्थिक व अध्यात्मिक जीवन जगले, आणि त्याचा समाजाला सावरण्यासाठी एक संत म्हणून तारून नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. अशिक्षित समाजाला, बोली भाषेत, व्यवहारातून पारमार्थिक जीवन जगायला शिकवले. ते एक असे महान संत होऊन गेले की, त्यांच्या वैयक्तिक व त्यांच्या लौकिक जीवनात व त्यांच्या वाङ्मयीन जीवनात फारसा फरक दिसून येत नाही. गुरूकृपेने व पांडुरंगाच्या आज्ञेने तुकोबारायांनी

[९२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. : २२५६, पृ.क्र. ४६८

अभंगरचनेला सुरुवात केली व त्यांच्या या अभंगरचनेतूनच त्यांच्या लौकिक व वाङ्मयीन जीवनाचे दर्शन लोकांना घडले.

''आम्हां घरीं धन शब्दांचीच रत्नें ।''[९३]

असे म्हणत सर्वसामान्यांना आपल्या अभंगवाणीने आपलेसे करून टाकले. तुकोबांची अभंगवाणी म्हणजे अंतरंगातील भावविश्वातील स्वरूप अनुभवरूपी प्रकट करणारी आहे.

४.४.२ : लोकजीवनाची ओढ व प्रेरणा :

संत तुकाराममहाराजांच्या अभंग गाथेमध्ये लोकजीवन व्यक्त झालेले दिसते. तुकाराममहाराजांच्या अभंगांचा विविध अंगांने अभ्यास केला असता, तत्कालीन ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते. लोकजीवनात सामाजिक रूढी, परंपरागत नृत्य, जीवनविषयक साधने, प्राचीन काळांच्या रूढी–समजुती याचा समावेश आढळतो. लोकगीते, लोकनृत्य यांसारखे लोकप्रकारही लोकजीवनात आढळतात. लोकजीवन हे प्राचीन काळापासून ते सद्यःस्थितीत दिसून येते. तुकाराममहाराजांचा अभंगाचा काव्यप्रकार हा सर्वसामान्यांना जवळचा वाटणारा आहे. ज्ञानेश्वरांपासून ते एकनाथमहाराजांसारख्या संतकवींनी वापरलेला हा काव्यप्रकार खऱ्या अर्थाने तुकाराममहाराजांनीच लोकप्रिय केला. आपल्या सहज–सोप्या भाषाशैलीतून श्रोत्यांच्या हृदयात तुकारामांनी अमर्यादित स्थान निर्माण केले. त्यांच्या प्रत्येक अभंगातील शब्द व आशय अशा पद्धतीने मांडले जातात की, प्रत्यक्ष तुकाराममहाराज आपल्याबरोबर संवाद साधल्याचा भाव उत्पन्न होतो. अभंगातील अनुभवविश्व हे अफाट आहे. तुकारामांची प्रतिमा सृष्टी विश्वव्यापी आहे.

४.४.३ : लोकजीवनातील पारमार्थिक जागृती :

तुकारामांच्या काव्यात विविध पैलू निदर्शनास येतात. तुकारामांचे व्यक्तिमत्त्व, कवित्व आणि काव्याचा आशय या साऱ्यांचा मेळ त्यांच्या अभंगांमध्ये दिसून येतो. भक्ती, द्वैत–अद्वैत पावित्र्याचे सचित्र दर्शन त्यांच्या अभंगांत आपल्याला दिसून येते.

---

[९३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. : ३३८५, पृ.क्र. ६८८

[९४]वारकरी संप्रदाय आणि तुकाराममहाराज : लेखक डॉ. यशवंत पाठक हे आपल्या तुकाराममहाराजांच्या लेखाविषयी वर्णन करताना लिहितात, वारकरी पंथातले आदर्श म्हणजे तुकाराम! वारकरी परंपरा तुकारामांनी तंतोतंत पाळली. ते पक्के वैष्णव होते. त्यांनी वारकरी पंथाला वेगळे आयाम दिले. सर्वांना आपले मानून सामान्यांच्या मनाला जगण्यातला दृढ आत्मविश्वास दिला. वारकरी परंपरेतल्या नामसंकीर्तनाला विस्तारश: काटेकोर परिमाण दिले. लोकभाषेतून संवाद साधला. लोकभाषेला व्यंजना दिली. सर्वसामान्यांना जाणवणारा नेहमीचा अर्थ त्यातील विशेष अर्थासह दिला. लोकांपाशी ते होते; परंतु लोकांना ते माहिती नव्हते. लोकमनातल्या तळघरात तुकाराम शिरले नि त्यांनी लोकांना कितीतरी नव्या जागा दाखविल्या. तुकारामांच्या सुक्ष्म अवलोकनातून लोककाव्य व्यवहाराला नवे परिमाण मिळाले. 'तुझे आहे तुजपाशी' हे तर वारकरी पंथाचे बोधचिन्ह बनले. तुझ्यापाशी काय आहे, हेच मुळी तुला कळत नाही. त्यासाठी मी तू व्हावा लागतो. ते तू आहेस हे ही श्रुतीला (तत त्वम् असि।) सांगावे लागते. ते तुझ्यात आहे हे नीट लक्षात घ्यावे. ते काल होते आणि उद्या असेल असे नाही, ते अखंड आहे. ते अनादी अनंत आहे. ते सार्वत्रिक आहे. ते न बघता मर्त्य वस्तूंसाठी तुझे–माझे, माझे–तुझे कशाला करीत अनमोल आयुष्य संपवायचे, हा तुकारामांचा प्रश्न सनातन आहे. तुझे आहे ते तुझ्यात जन्मजात आहे. तेच तर जगण्याचे मूळ आहे. मूळ कितीही दाबले, तरी ते मरत नाही. ते मुळात मूळ धरून राहते. जन्मत: विठ्ठलाने तुला मुळातले निजानंदाचे माहेर दिलेय. ते न अनुभवता संसारातील द्वंद्वांचे जाळे विणत कोळीकोष्टकागत जीणे कशाला जगायचे? तुकारामांनी आपल्या जगण्याचे आणि या भूतलावर येण्याचे प्रयोजन सांगितले.

''आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।।'' [९५]

हे ते प्रयोजन आहे. तुकाराममहाराज सांगतात, 'आम्ही वैकुंठातले वैकुंठ म्हणजे संकुचितपणा नाहीसा होऊन व्यापक होणे. आम्ही सर्वांसाठी सार्वत्रिक होऊन आलोत.

---

[९४] पाठक यशवंत, **तुकारामांचे अभंग,** साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९५, पृ.क्र. ३१, ४४, (प्रस्तावना).

[९५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र.५२० पृ.क्रं.१२२

ऋषिमुनींनी जे सांगितले ते सांगून त्याप्रमाणे करून घेण्यासाठी आम्ही आलो. आम्ही मुळात त्रैलोक्यव्यापक ऋषिमुनी कुळातले, जगण्यासारखे सार कोळून प्यालेलो. आम्हाला जे समजले ते सांगायला आमचा जन्म आहे. सांगेन त्याचप्रमाणे करवून घेणे याला आत्मिक ताकद लागते. ती तुकारामांपाशी आहे. ती त्यांनी जनसामान्यांना काल्याचा प्रसाद म्हणून आनंदाने वाटली. '

तुकाराममहाराजांच्या जीवनात संकटांची मालिका सुरू झाली म्हणून ते संसारातून परमार्थाकडे वळाले असे नाही, तर प्रपंचात आलेल्या प्रापंचिक अनुभवाच्या शिदोरीवर त्यांची अभंगसृष्टी निर्माण झाली. जीवनाची परावलंबिता, दैवाधीनता, क्षणभंगूरता पाहून त्यांना प्रपंचाबद्दल समूळ वीट आला आणि तुकोबांच्या मनावरील पिढीजात भक्तीचे संस्कार जागृत झाले. तुकारामांच्या या दशेचे वर्णन करताना 'महिपती' म्हणतात. अविद्या रात्री सरूनी जाता ज्ञानसूर्य क्रांतिकाळ ठरला. त्यांच्या विचारसरणीची दिशाच बदलली. संसारतापाने तापलेले त्यांचे मन संसाराकडे पाठ फिरून वळले.

तत्कालीन सामाजिक परिस्थितीही विदारक होती. समाज दुष्काळाने अतिशय खंगून गेला होता सामाजिक नीतिमूल्ये रसातळाला गेलेली होती. समाजातील अंधश्रद्धा, व्रतवैकल्य, रूढी–परंपरा, नवससायास, विधिनिषेध, जादूटोणा, करणीकवटाळ, बुवाबाजी समाजात मोठ्या प्रमाणात रुजली होती. अशा सामाजिक जीवनाचे संत तुकारामांनी सुक्ष्म निरीक्षण करून समाज हिताच्या दृष्टीने अभंगरचना केली. तुकाराममहाराजांचे समाजचिंतन अतिशय सखोल, तसेच व्यापकही होते. ते स्वत: आपल्या अभंगातून सांगतात,

''उजळवया आलों वाटा । खरा खोटा निवडा ।।१।।
बोलविले बोलें बोल । धनी विठ्ठल सन्निध ।।२।।
तरी मनीं नाहीं शंका । बळें एक स्वामीच्या ।।३।।
तुका म्हणे नये आम्हां । पुढें कामा गबाळ ।।४।।'' [९६]

[९६] ह.भ.प. वै.शंकर महाराज खंदारकर, श्री तुकाराममहाराज गाथा भाष्य, भाग १ व २, वै. शंकरमहाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन, औरंगाबाद – २०१५, अभंग क्र . १७६, पृ.क्र. ४६.

पारमार्थिक जागृती झाल्यामुळे तुकाराममहाराज प्रस्तुत अभंगात म्हणतात, 'संतांचा मार्ग स्वच्छ करण्याकरता मी वैकुंठाहून आलो आहे. श्री 'विठ्ठल' माझ्याकडून त्यांना अपेक्षित बोल बोलून घेत आहे. 'विठ्ठलाच्या' सत्येनेच मी बोलत असल्याने माझ्या बोलण्याची शंका घेऊ नये.' 'कोणा एका गबाळ्याचे काम नाही', असे तुकाराममहाराज म्हणतात. तुकोबांच्या अभंगांमधून 'आत्मोद्धारा'बरोबरच 'लोकोद्धाराची' प्रचंड तळमळ दिसून येते. त्यांच्या काव्यातून आईच्या वात्सल्याची ओढ दिसून येते.

४.४.४ : संत तुकारामांचे अध्यात्मिक सार :

वारकरी संप्रादयातील सर्व संतांनी विठ्ठलास केंद्रस्थानी मानून त्याभोवती सर्व समाज एकत्र करण्याचा प्रयत्न केला. सर्व देव–देवतांस थोडे बाजूस सारून पांडुरंगाच्या भक्तीस सर्वसमावेशक व समन्वयवादी स्वरूप प्राप्त करून दिले. विठ्ठलास काना–कोपऱ्यात पोहचवण्याचे कार्य वारकरी संप्रादयातील संतांनी केले. तत्कालीन कर्मकांडाच्या पार्श्वभूमीवर सुटसुटीत असलेल्या वारकरी संप्रादयात जनमानसात आत्मविश्वास निर्माण करून दिला. तुकोबांची भक्ती ही 'सुळावरची पोळी' होती असे म्हटले जाते. तुकोबांची भक्ती ही डोळस भक्ती होती. सर्वसमावेशक व व्यापक परमेश्वराचे प्रतीक म्हणून त्यांनी पांडुरंगाची भक्ती केली. तुकोबारायांचे व्यक्तिमत्व हे अध्यात्मिक प्रवृत्तीचे होते. सर्वसामान्यांना आपलेसे वाटणारे होते. तसेच तुकोबारायांचे अध्यात्मिक रूप साक्षात्कारी होते. स्वानुभवातून आलेला लोकसंवाद हाच त्यांचा अभंग गाथा ठरला. 'अनुभव आले अंगा । ते या जगा देत असे ।' तुकोबारायांनी स्वानुभवातून अध्यात्मिक उद्धार केला. विविध अनुभवांतून व्यक्त आशय त्यांच्या अभंग गाथेतून दिसून येतो. प्रपंचात राहूनही त्यांनी आपले वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व घडविले व त्यांची अभंग गाथा मराठी मनाचा अविभाज्य भाग बनली आणि तेच अभंग पिढ्यांन्पिढ्या जोपासले गेले. सामान्य मनाचा ठाव घेणारी तुकोबांची अभंगरचना सहज मुखोद्गत होऊ लागली. आणि त्यामुळेच अध्यात्मिकदृष्ट्या तुकोबारायांची अभंगवाणी गेल्या ४५० वर्षांच्या काळात महाराष्ट्राची अविभाज्य घटक बनली. तुकोबारायांच्या पारमार्थिक किंवा अध्यात्मिक वाटचालीचे तीन टप्पे त्यांच्या

अभंगवाणीमध्ये दिसून येतात. पहिला टप्पा साधक दशेचा, दुसरा टप्पा आंतरिक तळमळीचा अन् तिसरा टप्पा आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर निर्माण झालेल्या आनंदाचा, सहज आणि सरळ स्वानुभव असा दिसून येतो. या तीन अवस्थांचा विचार केला असता, तुकोबारायांचा अध्यात्म सार लक्षात येतो. तुकारामांच्या साधक अवस्थेतील तळमळ यामुळे त्यांच्या कवित्वाला प्रेरणा मिळाली आणि ते परमार्थाकडे वळाले. पांडुरंगाजवळ अनवाणी आत्मनिवेदन, आत्मपरीक्षण इ. स्वरूपात त्यांची अभंगवाणी प्रकट होऊ लागली. त्यांच्या वाणीतून अध्यात्मिक सिद्धान्त सहजगत्या बाहेर पडू लागले. त्यांनी उपनिषदे आणि वेद यातील सार आपल्या रसाळ अभंगांतून उत्कृष्टरीतीने मांडला. त्यांच्या अभंगातून वेद, उपनिषदे, ज्ञानेश्वरी या ग्रंथातील अक्षरे मराठी रूप धारण करून व्यक्त होऊ लागली. तुकारामांचे अध्यात्मसार म्हणजे परमेश्वरप्राप्तीची ओढ व पांडुरंगाचे सगुण दर्शन होय. तुकारामांकडे भक्तीच्या अनेक साधनांची विपुलता असली, तरी अध्यात्मिक बैठकीसाठी तुकारामांनी विठ्ठल हे एकच दैवत निवडले आणि नामस्मरण हा एकच साधा–सोपा मार्ग निवडला.

४.४.५ : लौकिक जीवनाचा सार :

संत तुकाराममहाराज हे प्रामाणिक साधक होते. तसेच योगी व ज्ञानीही होते त्यांच्या स्वानुभवावरून व आचरणातून समाजापुढे एक आदर्श धर्मोउपदेशक म्हणून पाहिले, तर वावगे ठरणार नाही. तुकाराममहाराजांचे व्यक्तिमत्त्व विशाल आहे की, समग्र दर्शन घडविणारे आपल्या शक्तीच्या पलीकडे आहे. तुकाराममहाराजांची भक्ती ही सजीव आहे. त्यांची भक्ती नामाच्या माध्यमातून अभंगांतून आणि कीर्तनाच्या माध्यमातून दिसून येते. त्यांच्या लौकिक जीवनाचा सविस्तर विचार आपण केला आहे.

संत तुकाराममहाराजांच्या चरित्राचा अभ्यास महिपतबुवा तहराबादकरांनी तुकारामांच्या निर्वाणानंतर सुमारे २५० वर्षांनी म्हणजे इसवि सन १७७४ मध्ये केला. संत तुकारामांच्या उपलब्ध अभंगांच्या साहाय्याने तुकारामांच्या चरित्राचा चिकित्सक अभ्यासकांनी मांडला व त्याद्वारे त्यांचा लौकिक जीवनाचा सार विविध पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यात अनेक

लेखकांचा समावेश केला जाऊ शकतो. उदा. डॉ. शं. दा. पेंडसे, ल. रा. पांगारकर, डॉ. भालचंद्र नेमाडे, शं. ग. तुळपुळे, किशोर सानप, डॉ. सदानंद मोरे इ. अभ्यासकांनी त्यांच्या लौकिक चरित्रांचा भाग मांडलेला दिसतो. प्रत्येक अभ्यासकाचा तुकारामांच्या जीवनाविषयीचे मतप्रत्यंतरे आढळून येतात. प्रस्तुत प्रबंधात त्याचा सविस्तर विचार केला जाईल. अशाप्रकारे संत तुकारामांचे लौकिक जीवन वैविध्यपूर्ण असल्याचे निदर्शनास येते.

४.४.६ : अध्यात्मिक समतेची प्रेरणा :

भागवत धर्म आणि वारकरी संप्रदाय हा वेदप्रणित मार्ग. धर्म आणि तत्त्वज्ञान हाच वारकरी संप्रदायाचा पाया आहे. संत तुकाराम हे वेदांना प्रमाण मानतात आणि वेदांनी प्रतिपादिलेल्या धर्माने आचरण करतात, असे त्यांच्या अभंगावरून स्पष्ट होते. समाजातील सर्व घटकांची आत्मिक उन्नती घडून त्यांचा स्वत:चा साक्षात्कार घडवून आणण्याचा प्रयत्न श्री तुकाराममहाराज करतात. त्यांचे सुंदर उदाहरण देताना ते म्हणतात,

''वेदविहित तुम्ही आइका हो कर्मे । बोलतों ती वर्मे संतांपुढे ।।१।।
चारी वर्ण झाले एकाचित्रे अंगी । पापपुण्य भागी विभागिले ।।धृ.।।
प्रथम पाऊलीं पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ।।२।।
आंबे बोरी वड बाभुळा चंदन । गुणागुणी भिन्न अग्नि एका ।।३।।
तुका म्हणे मन उन्मन जो होय । तोंवरी हे सोय विधि पाळीं ।।४।।'' [९७]

प्रस्तुत अभंगात अध्यात्मिक समतेची संकल्पना दृष्टीस येते. वनाश्रम धर्म हे भगवंताच्या शरीरापासून झाले असले, तरी ते पाप–पुण्यावर आधारित आहेत. त्यासाठी त्यांनी वर्ण–धर्म समजावण्यासाठी व सर्वच वर्णीय आत्मस्वरूपाने एकच आहेत, हे सांगण्यासाठी वर्णन केले आहे. जसे आंबा, बोर, वड, जांभूळ, चंदन ही लाकडे गुणांनी भिन्न असली, तरी त्यांचा अग्नी एकच होतो. त्यामुळे ते म्हणतात जोपर्यंत, मन उन्मन होत नाही तोपर्यंत विधिनिषेधांची

[९७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३,अ क्र. १४६७, पृ.क्रं. ३११

वेदांनी लावून दिलेली विधिपूर्वक सोय आहे. धर्मरक्षण करण्यासाठीच संतांचा व तुकाराममहाराजांचा अवतार झाला आहे, असे ते आपल्या अभंगात सांगतात. सर्व वारकरी संतांप्रमाणे तुकोबा मानवतेला धर्माचा गाभा मानतात. मानवतावादी लक्षणे सांगताना तुकाराममहाराज म्हणतात की, सर्वांठायी भूतदया सर्वांविषयी आदर प्रेमांची भावना कनवाळूपणा ही उत्तम मानवाची लक्षणे आहेत. आपल्या अनेक अभंगांतून ते मानवता धर्माचे प्रतिपादन करतात. समाजाच्या प्रगतीसाठी व जगाच्या कल्याणासाठी संतांना समाजाला वारंवार हितोपदेश करावा लागतो. समाजातील काही घटकांची ओढ अध:पतनाकडे असते. ती बदलून त्यांना प्रबोधन करावे लागते व समाजहिताला बाधक ठरणारे विचार काढून टाकून तुकाराममहाराज आपल्या अभंगांद्वारे समाजहितासाठी प्रबोधन करतात. त्यांचा धर्मविषयक धारणेत कठोर जप–तप, व्रतवैकल्य, मंत्र–तंत्र, जादूटोणा भगवी वस्त्रे, ब्राह्मण दक्षिणा इत्यादींना मुळीच थारा नाही. त्यांचा अध्यात्मिक वारसा साधा सरळ होता की कोणत्याही अडाणी स्त्री–पुरुषास त्या धर्माचे पालन करणे सहजशक्य होते. भजनातील, कीर्तनातील परमेश्वराचा अद्वैताविषयी सर्वांमध्ये एकतेची भावना निर्माण करणे जमते. तुकोबारायांच्या कीर्तनास अनेक जाती–धर्माचे लोक येत व अभंगात व कीर्तनात रमून जात. तुकोबाराय समतेसंबंधी मूलभूत विचार मांडताना वर्ण, कुळ, जाती यांचा अभिमान सोडून द्यावा असे प्रस्तुत अभंगात सांगतात,

''वर्ण अभिमाने कोण झाले पावन । ऐसी दया सांगू मजपाशी ।।१।।''

अशा प्रकारे तुकाराममहाराजांनी पुरस्कार केला. तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रवास ऐहिकाकडून अलौकिकाकडे व सामान्याकडून असामान्याकडे होत गेलेला दिसतो. सर्वात्मक भावांचा अनुभव आल्यावर तुकाराम एका अधिकाराने व एक नीती शिक्षकाची भूमिका बजावताना दिसतात. समाजातील अनेक लोक फसव्या रूढींचा, ढोंगी साधूंचा, उच्च–नीच भेद भावाच्या चक्रात अडकलेले दिसतात. धर्माचे पालन करताना आणि पाखंडांचे खंडण करताना लहान–थोर हा भेद तुकाराम करीत नाहीत. धर्माचे प्रतिपादन करणे हे त्यांनी आपले जीवितकार्य मानले आहे.

तुकारामांचे बोलणे हे तत्कालीन समाजस्थितीला धरून असते. माणसातील समाजातील अवगुण सांगण्यासाठी तुकाराम यथायोग्य दाखले देताना दिसतात. संसारी माणसांना उपदेश करताना केवळ परमार्थावर भर न देता व्यावहारिक उपदेश ते करतात. तुकारामांनी कर्मकांडापेक्षा अंतःकरणाच्या शक्तीवर भर दिला. नवस–सायास, कर्मकांड यामुळे तत्कालीन समाजामध्ये जो अनाचार माजला होता, त्यावर त्यांनी ताशेरे ओढले. तुकाराममहाराज लोकधर्म सांगणारे लोकशिक्षण देणारे लोककवी होते. तुकारामांची समाजातील मानसिकता व्यापक होती. तुकारामांचे व्यक्तिमत्त्व सामाजिक व सांप्रदायिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. तुकारामांनी भक्तिमार्गाद्वारे सामाजिक समतेचा पुरस्कार केला. आपल्या भक्तीद्वारे समाजाचे शुद्धीकरण केले. समाज परिवर्तन कार्य त्यांनी आपल्या अभंगाद्वारे केले. तुकाराम महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची सामाजिक जाणीव, बांधिलकी व्यापक होती. ते परंपरागत समाजाच्या विचारप्रवाहाबरोबर न जाता प्रवाहाच्या विरोधातही जाण्याचे साहस करतात. समाजातील घातक रूढी, परंपरा, आचार–विचार, व्यवहार आणि विशिष्ट वर्गाची सामाजिक मक्तेदारी मोडीस काढण्याचा प्रयास करतात. त्यांच्या साहित्यातून समाज व तत्कालीन परिस्थितीचे दर्शन घडते. तुकाराम संत पुरुष होते. तसेच ते सामाजिक अन्यायाविरुद्ध लढा देणारे होते. तुकाराममहाराज विचारवंत सुधारक व मानवतेची कणव असणारे होते. त्याचे पुरावे त्यांच्या अभंग गाथेत आढळतात. त्यांच्या विचारात सर्वसामान्यांबद्दलच्या दु:खाची जाणीव होती. राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय स्थितीचे ज्ञान होते. अस्पृश्यतेला विरोध करून तुकाराममहाराज मनाच्या शुद्धतेला व पावित्र्यतेला अधिक महत्त्व देतात. तसेच समतेचा पुरस्कार करताना प्रस्तुत अभंगात ते म्हणतात,

''हरिहरां भेद । नाही करूं नये वाद ।।१।।
एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ।।धृ।।
भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ।।३।।
उजवे वाम भाग । तुका म्हणे एकचि अंग ।।४।।'' [९८]

[९८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. १२४, पृ.क्र. २२

स्पृश्य–अस्पृश्यता असा भेद माझ्या मनात उरला. हा भेद स्वार्थी मनाच्या माणसांनी केला आहे. मानवाचे श्रेष्ठत्व त्याच्या जातीवरून न ठरवता त्यांच्या गुणावरून ठरवावे. मानवाचे उत्तम कर्म हीच त्याची ओळख असावी. तुकारामांचे काव्य हे समाजातील दांभिकता उच्च– नीचता यावर कठोर प्रहार करताना आढळतात.

समतेच्या भावनेतून समाजसुधारणा करणाऱ्यांना त्यांनी लोकभाषेचा वापर केलेला आढळतो. सामाजिक, धार्मिक व सांप्रदायिक विचार मांडण्यासाठी लोक दृष्टान्ताची व प्रतिमानाची निवड केलेली दिसते. त्यांचे काव्य मानवी अनुभवातील श्रेष्ठ व आदर्श वचने ठरेल. भक्तिसाधनेच्या माध्यमातून सामाजिक व अध्यात्मिक मूल्ये समाजाला दिली. त्यांची काव्यनिर्मिती ही समाज परिवर्तनाची विचारधारा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वांची व्यापक निर्मिती आहे.

४.४.७ : सामाजिक लोकजीवनातील विषमता :

संत तुकारामांची सामाजिक ओळख समाजशिक्षक, समाजसुधारक, सांसारिक गृहस्थ व लोककवी अशा स्वरूपांची होती. रूढी–परंपरा, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, ढोंगीपणा इत्यादी समाजातील अन्यायाच्या स्वरूपात परखड व त्यांनी आक्रमक मते मांडली. तुकोबांचे हे अभंग प्रपंच नीट–नेटका कसा करावा हे सांगतात. संसारिक लोकांना त्यांनी मध्यम मार्ग दाखवला आहे. निवृत्त होऊन वैराग्य आणू नये. सुख भोगावे, पण परमार्थास सोडू नये, असे साधे लोकजीवनातील दाखले ते आपल्या अभंगात मांडतात. समाजातील दृष्ट प्रवृत्तीवर, पाखंडी व दांभिकपणावर त्यांनी प्रहार केला आहे. पिढ्यांन्पिढ्या चालत आलेली विषमतेची परंपरा त्यांच्या मनाला खिन्नता देते. अधर्माच्या, अन्यायाच्या व ढोंगीपणाच्या विरोधात ते सहज उभे राहतात. विषमतेचा धिक्कार करताना त्यांची भाषा स्पष्ट व परखड बनल्याचे जाणवते. धर्माच्या नावावर सोंगे ढोंगे करणाऱ्या भोंदू व वेषधारी साधूंवरही कडक शब्दांत टीका करतात. अंधश्रद्धेला बळी पडून कोंबडे–बकरे यांचा बळी मागणाऱ्या देव–देवता व 'भुते–खेते यांची उपासना करणाऱ्या लोकांवरही टीका करतात. तुकाराममहाराजांनी भक्तीच्या बाबतीत भक्तिप्रमाण व जाती प्रमाण मानून सर्व जातींच्या लोकांना हरिभक्तीचा सुलभ मार्ग सांगून जाती–भेदाची धार कमी केली.

लोकजीवनातील उच्च–नीचतेची भावना समूळ उपटून काढली. तुकारामांनी विविध जातींचे व्यवसाय, त्यांचे स्वरूप, त्यातील क्रूर अमानवी वृत्ती स्पष्ट केली. या लोकजीवनाकडे संत तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगांतून तत्कालीन स्थितीचे विदारक चित्र उभे केले. ग्रामरचनेची विस्कळीत घडी आपल्या अभंगांतून दाखवून दिली. दुष्काळामुळे विस्कटलेली लोकजीवनाची घडी त्यांनी बसवली. माणूसपणाचा उडालेला विश्वास त्यांनी आपल्या अभंगांतून मांडला आहे. मानवाच्या शूद्र जगण्याबद्दल एक प्रकारची अनासक्तीची भावना व्यापून राहिली. लोकजीवनाच्या विविध अभंगांमधून संत तुकाराम कालीन ग्रामव्यवस्थेतील स्थिती, गतीचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. त्यांच्या अभंगांमध्ये विविध जाती–जमातीचा उल्लेख आहे. जातीची गुणवैशिष्ट्ये भावार्थ समन्वय साधताना दिसतात व त्यांनी लोकजीवनातील जातिव्यवस्थेच्या माध्यमातून विविध अनुभव मांडलेले दिसतात व अध्यात्मातील उपदेशही या विषमतेच्या आधारे दर्शविला आहे. संत तुकाराममहाराजांनी जातीयवादाच्या कर्माचा, पुनर्जन्माचा विचार मांडून पाप–पुण्याचे दाखले दिले आहेत. अशा प्रकारे महाराजांनी बारा बलुतेदारांचे विविध अनुभव त्यांच्या पारंपरिक कर्माच्या माध्यमातून अध्यात्मातील काही विचार, मूल्यांच्या आधारे मांडले आहेत. तुकाराम आपल्या अभंगातून सण–उत्सव, यात्रा–जत्रा, नाती–गोती, पीक–पाणी, आचार–विचार, खेळ, भाव–भावना प्रकटीकरण, जन्मापासून ते मृत्यूपर्यंत, त्यांचे संस्कार, मोक्षप्राप्तीचे विधी, बलुतेदारांचे चित्रण या साऱ्यातून लोकजीवनातील त्यांचे कार्य व स्थान स्पष्ट केले आहे. अशा प्रकारे जाती–जमार्तीचा समृद्ध लोकजीवनाचा आरसा आपल्या अभंगाद्वारे त्यांनी मांडला.

''विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।१।।
आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित सत्य करा ।।२।।
कोणीही जीवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचे ।।३।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुखदु:ख जीव भोग पावे ।।४।।'' [९९]

[९९] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्र.२१, पृ. क्र. २२

प्रस्तुत अभंगात, सर्व जग विष्णूमय असल्यामुळे माणसां–माणसांत भेदाभेद करणे हा खरा धर्म नाही. कोणत्याही जिवांचा मत्सर करू नये. सर्व जीव एकच देहभावांचे असल्यामुळे त्याला दिलेला त्रास किंवा दु:ख हे एका पर्यायाने आपल्याला केलेला त्रास व भगवंताच्या ठायी दाखवलेला अविश्वास ठरू शकतो. माणसा–माणसाने मत्सर करू नये. निर्गुण किंवा सगुण ब्रह्मज्ञानांचा सामाजिकतेवर उपयोग झाला नाही तर ते ज्ञान निरुपयोगी ठरते. भेदभाव नष्ट व्हावा हाच प्रमुख उद्देश आहे. त्यासाठीच ज्ञानेश्वर महाराजांनी ब्रह्मविद्या मराठी भाषेत आणली. ब्रम्हविद्येचे ज्ञान अवगत होऊन समाजाला एकता कळावी व त्यांचे रूपांतर समतेत व्हावे, हाच तुकारामांचा हेतू होता. त्यांच्या 'अद्वैत' तत्त्वज्ञानाचा आणि भक्तीचा समाजाशी जवळचा संबंध आहे. माणसांचे मोठेपण हे त्यांच्या जातीवरून न ठरता त्यांच्या स्वभावावरून ठरते हे सांगताना ते म्हणतात,

''आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठुर अतिवादी ।।१।।
याति कुळ येथे असे अप्रमाण । गुणाचे कारण असे अंगी ।।२।।
काळे कुट पितळ सोने शुद्ध रंग । अंगाचेच अंग साक्षी देते ।।३।।
तुका म्हणे बरी जातीसवे भेटी । नवनीत पोटी साठविले ।।४।।'' [१००]

मनुष्य किती चांगल्या जातीचा, चांगल्या गुणांचा आहे हे त्याच्या अंगी असलेल्या गुणांवरून ठरते. ज्याप्रमाणे पितळ पिवळे खराब होते, सोनेही पिवळे असून खरे तसेच राहते. त्याप्रमाणे गुणवत्ता व्यक्तीला वेगळे ठरवते. त्यामुळे लोकांमधला भेद हा त्यांचा जातीवर न ठरवता त्यांच्या सद्गुणांवर ठरतो. भक्ती मार्गात ईश्वर प्राप्तीचा व भक्तीचा अधिकार सर्वांनाच असतो. वर्णाप्रमाणे कर्तव्ये भिन्न असली, तरी सर्व धर्मांत ब्रह्मच समत्वाने विराजमान असतो हेच तुकाराममहाराज आपल्या अभंगात सांगतात व मनुष्याचे गुण कर्माने येते. म्हणून वर्णव्यवस्थेत श्रेष्ठत्व, कनिष्ठता नसावी; सर्वत्र समभाव असावा, वर्णाने आणि जातीने किंवा जन्माने येणारे

[१००] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्रमांक १९५, पृ.क्र. ६२

श्रेष्ठत्व–कनिष्ठत्व समाजातील स्पृश–अस्पृशता तुकोबांना मान्य नव्हती. तुकोबारायांनी समाजाला विश्वव्यापक समभाव शिकवला.

४.४.८ : नैतिकतेचा पुरस्कार :

ब्रह्मज्ञानाचा आणि ईश्वर भक्तीचा प्रत्येकांच्या आचरणावर परिणाम दिसावा. समाज पोटार्थी, ज्ञानाचे व भक्तांचे सोंग आणणारा ढोंगी नसावा. अशा ब्रह्मज्ञानाच्या पोकळ गोष्टी सांगणाऱ्या व साधुतत्त्वाचे सोंग आणणाऱ्या ढोंगी समाजाला तुकाराममहाराज नैतिकतेचा पुरस्कार सांगतात. संतांची भक्ती ही परमेश्वर प्राप्तीची पारमार्थिक भक्ती नसून तिला लौकिक व्यवहाराची जोड आहे. मानवातील कृत्रिम भेद नष्ट व्हावा व त्यामध्ये समतेची पायाभरणी व्हावी हा भागवत धर्मातील मुख्य उद्देश आहे, असे तुकाराममहाराज सांगतात आणि प्राणिमात्रांच्या नैतिक आचरणाबद्दल सांगताना ते म्हणतात, आपले हित करावयाचे असेल तर ईश्वराचे सत्य रूप समजून घ्या. ईश्वर हा सर्वसमावेशक आहे. त्यामुळे कुण्याही जिवाचा मत्सर न करणे हे त्यांच्या भक्तीचे खरे वर्म आहे. सर्व प्राणिमात्रांच्या ठायी ईश्वराच्याच देहांचे अवयव आहे व ते आपापल्या कर्माप्रमाणे सुख–दु:ख भोगत आहेत. तेव्हा परस्त्रीस मातेप्रमाणे मानावे. परद्रव्याची अभिलाषा मनी न धरावी. संत वचनावर विश्वास ठेवावा. परनिंदा करू नये. सत्यवचन बोलावे अशा रीतीने जीवन जगत असल्यावर ईश्वराची प्राप्ती होते व त्यासाठी वेगळा अट्टहास करावा लागत नाही व ही भक्तीच व्यावहारिक नीती ठरते.

''खरे बोले तरी । फुकासाठी जोडे हरी ।।१।।
ऐसे फुकाचे उपाय । सांडोनिया वायां जाय ।।२।।
पर उपकार । एका वचनाचा फार ।।३।।
तुका म्हणे मळ । मने सांडिता शीतळ ।।४।।'' [१०१]

[१०१] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्रमांक – ९३४, पृ.क्र. २१६

नुसत्या सत्यवचनाने सुद्धा आपल्याला श्रीहरी प्राप्त होतो. सत्य आणि चांगले बोलणेही परोपकार होऊ शकते. मन निर्मळ केले तर ते शांत व शीतल होते व त्याच्यात परमेश्वर, परमात्म्याचा वास निर्माण होतो व अशाच ठिकाणी परमेश्वर नांदतो. नैतिक जीवनाचा पुरस्कार करताना तुकाराममहाराज आपल्या अनेक अभंगांमध्ये सदाचाराची शिकवण देतात–

''भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ।।१।।
ऐसं उफराटें वर्म । धर्माअंगींच अधर्म ।।धृ.।।
देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प ।।३।।
तुका म्हणे भीड खोटी । लाभ विचारांचे पोटीं ।।४।।''[१०२]

आसक्तीरहित भोग हाच मनुष्य धर्माचा खरा लाभ होऊ शकतो. अविचाराने केलेल्या कोणत्याही गोष्टीचा त्याग हा वास्तविक धर्म होऊ शकत नाही, तर अधर्मच होतो. ज्या कर्माने परमेश्वरप्राप्ती दुर्लभ होते ते कर्म कितीही चांगले असले, तरी ते अधर्मच आहे. आसक्ती, अहंकार, दंभ लोक यांचा लौकिक जीवनात त्याग करता यावा ही खऱ्या भक्तीची नीती आहे. परमेश्वर प्राप्तीसाठी कोणत्याही प्रकारे लौकिक व्यवहार सोडावा लागत नाही. रणांगणात जावे लागत नाही. अंतःकरण निर्मळ करून आपले सर्व लौकिक व्यवहार सचोटीने करावेत, परोपकार करावा, अंतरी ज्ञान, क्षमा, शांती असू द्यावी. परद्रव्याची, परस्त्रीची अभिलाषा न धरता परमेश्वर प्राप्तीच्या साधनाचा अवलंब करावा. काम, क्रोध, दंभ, अहंकार सोडून सचोटीने परमेश्वराच्या निकट जावे असे तुकोबाराय आपल्या अभंगात सांगतात. परमार्थासाठी साधुसंगतीची अत्यंत गरज आहे. याचे प्रतिपादन तुकाराममहाराज अनेक अभंगांतून करतात. संतांची प्राप्ती कशामुळे होते ती साधने, संतांची लक्षणे, संत भेटल्यावर संतांची सेवा कशी करावी या साऱ्या गोष्टी तुकारामांनी अभंगात सांगितलेल्या आहेत. नैतिक जीवनाचा स्वीकार करताना संतांची भेट घडणे आवश्यक. ही भेट होण्यासाठी आपण स्वत: काय केले पाहिजे हेही ते सांगतात. तुकारामांनी संतांना अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

---

[१०२] जगद्गुरू श्रंतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगाचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्रमांक ९३, पृ.क्र. १७

प्रस्तुत अभंगात नैतिक विचारांचा विचार करताना साधूची लक्षणे सांगताना तुकाराम महाराज म्हणतात,

''ऐसे ऐसियानें भेटती ते साधु । ज्यांच्या दर्शने तुटे भवबंधू ।
जे कां सच्चिदानंदी नित्यानंद । जे कां मोक्षसिद्धी तीर्थ वंदू रे ।।१।।
भाव सर्व कारण मूळ वंदु। सदा समबुद्धी नास्तिक्य भेदू ।
भूतकृपा मोडी द्वेषकंदु । शत्रू मित्र पुत्र समकरी बंधु रे ।।२।।
मन बुद्धि काया वाचा शुद्ध करी । रूप सर्वत्र देखोनि नमस्कारी ।
लघुत्व सर्व भावे अंगीकारी । सांडी मांडी मींतू पण ऐसी थोरी रे ।।३।।
अर्थकामा चाड नाही चित्ता । मानामान मोह माया मिथ्या ।
वर्ते समाधानी जाणोनी नेणता । साधु भेट देती तया अवचिता रे ।।४।।
मनी दृढ धरी विश्वास । नाही सांडीमांडीचा सायास ।
साधुदर्शन नित्यकाळ त्यास। तुका म्हणे जो विटला जाणिवेस रे।।५।।'' [१०३]

ज्यांचे दर्शन झाल्यावर संसाराचे बंधन तुटून पडते, अशा सच्चिदानंदांच्या ठिकाणी नित्य आनंद राहतो मोठा सिद्धी व तीर्थांना जे वंदनीय आहेत, असे साधू भेटण्यासाठी साधनाही तशीच करावी लागते. विषयभावनाविरहित मनाला बंधन घालून घे. सदा समबुद्धी ठेवा. नास्तिक भाव टाकून सर्व प्राणिमात्रांवर कृपा करावी. द्वेष सोडून शत्रू, मित्र, बंधू या सर्व ठिकाणी समभाव ठेवावा. काया, वाचा, मन, बुद्धी, शुद्ध करा. व्यर्थ मोठेपणा टाकून, लहानपणा घेऊन मीपण टाकून द्या. चित्तामध्ये द्रव्याची आशा ठेवू नका. मोह, माया, अपमान मिथ्थ्या समजून जे समाधानाने जगतात, त्यांना साधू भेटतो. तेव्हा मनामध्ये बळकट विश्वास ठेवून सांडी–मांडीचा सायास सोडून द्या, असे प्रस्तुत अभंगात नीती आचरणासाठी तुकोबांनी सार्थ विवेचन मांडले आहे.

---

[१०३] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्रमांक २०२, पृ.क्र. ६४

४.४.९ : लोकजीवनाचा आत्मिक विकास :

भावात्मक अनुभव हे वाङ्मयांचे प्रमुख क्षेत्र आहे. आणि लोकवाङ्मय हे लोकजीवनातील भावनात्मक गरजा भागवण्यासाठी निर्माण झालेले प्राचीन मराठी वाङ्मय आहे. ओवी आणि अभंग या लोकप्रिय रचनेतून लोकवाङ्मय व संत वाङ्मयात त्यांचा प्रभाव दिसतो. लोकजीवनातील भावभावनांचा आणि विचारांचा प्रभाव लोकवाङ्मयात व संतवाङ्मयांत आहे. लोकवाङ्मय ही सामाजिक निर्मिती असल्यामुळे लोकजीवनात ते सहजतेने स्वीकारले जाते. लोकवाङ्मयातून अभिव्यक्त होणारा अनुभव हा सुख–दु:खाचा असून, त्यातून लोकजीवनाला प्रबोधन व मनोरंजन मिळते. लोकवाङ्मयात लोकांनी लोकजीवनासाठी निर्माण केलेले साहित्य आढळून येते. या साहित्यात लोकगीते, स्त्री गीते, कौटुंबिक नात्यातील भावबंधन, कौटुंबिक ताण–तणाव यांचा समावेश दिसून येतो. लोकजीवनात ओवी या वाङ्मयीन प्रकारात स्त्रियांनी आपला आत्मा ओतला आहे. हे वाङ्मय घराघरांत जात्यावर दळण दळताना, पाळणा हलवताना, झोक्यावर झोके घेताना सहजपणाने विकसित होतात. ग्रामीण स्त्री माहेराचा जिव्हाळा या भाव–भावनांचाही समावेश यात केला जातो. ओवी व अभंग छंदाचा आश्रय घेऊन संतांनी लोकजीवन समृद्ध केले आहे.

तुकाराममहाराजांच्या अभंगांचे प्रयोजन हे केवळ मनोरंजन नसून, त्यातून समाजात आमूलाग्र परिवर्तन, शीलता व आत्मिक विकास घडावा हे होते. कीर्तन व भजनाच्या साहाय्याने भक्तीचा मार्ग दाखवून समाजाला अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून देणे हा मानस होता. अभंगाच्या साहाय्याने स्वायत्त अस्तित्वाची जाण समाजाला दिली. तुकोबांच्या अभंगाने आंतरिक वेदनेला व सुखाला वाट करून दिली. तुकोबांचे अभंग लोकजीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करताना आढळतात. तुकोबांचा अभंग लौकिक अथवा अलौकिक अशा कुठल्याही पातळीचा असला, तरी तो लोकमानसांत अलौकितेच्या पातळीवर जाऊन पोहचतो. समाजप्रबोधन व त्यांचा विकास हे तुकोबांच्या अभंगाचे मूळ प्रयोजन आहे. लोकवाङ्मय हे परिवर्तनशील गती देणारे आहे. तात्विक लोकजीवनाचा विकास करताना कीर्तने भजन इ. लोक प्रकटन संस्थांचाही वापर संतांनी आपल्या

प्रतिमासामर्थ्याने केलेला दिसतो. संतसाहित्यातील लोकजीवनाचे स्वरूप विश्वात्मक व परंपरेने लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे आहे.

लोकसाहित्य हे लोकांच्या जीवनातून आलेले असते. त्यामुळे राग, लोभ, आशा, आकांक्षा या साऱ्या दृष्टिकोनाचा अंतरंग ऊर्मीतून प्रकटलेल्या बदलांचा समावेश तुकोबारायांनी आपल्या वाङ्मयात केला. ज्या सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात मनुष्य जन्माला येतो व त्यांचा सामाजिक व संस्कृत पर्यावरणात त्यांचे व्यक्तिमत्त्व घडते व हे व्यक्तिमत्त्व घडत असताना लोकतत्त्वांचा, लोक परंपरांचा प्रभाव, त्यांचा अनुभव विश्वावर पडतो. लोकमाणसांवरील रूढी–परंपरा, व्रतवैकल्य, लोक–समाज, लोक– विश्वास यांचा प्रभाव लक्षात घेऊन तुकोबारायांनी सुक्ष्म निरीक्षण व चिंतन करून आपल्या अभंगात त्याचे प्रकटीकरण केले आहे. तात्पर्य : तत्कालीन लोकसंस्कृतीत लोकजीवनाच्या आधारे सामाजिक परिवर्तन, प्रबोधन करण्याचे कार्य तुकोबारायांनी आपल्या गाथेत केले आहे.

४.४.१० : सामाजिक अंधश्रद्धा :

तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांचा जीवनानुभवांचा प्रभाव त्यांच्या अभंगातून व्यक्त होताना दिसतो. तुकारामांच्या अनुभव विश्वात डोकावले असता समाजातील सोंग, ढोंग, पाखंडीपणा यांच्यावर जोरदार हल्ला केल्याचे दिसून येते. अधर्मपणा, ढोंगीपणा उघडा पाडायचा असेल, तर सहजसाधेपणातून केलेला उपदेश कळणार नाही याची जाणीव तुकारामांना होती. शब्द हे त्यांचे साधनेतून साध्य होते. समाजातील ढोंगी व अंधश्रद्धाळू लोकांच्या सवयी मोडून काढण्यासाठी वेळप्रसंगी तुकारामांनी आपल्या परखड व शिवराळ भाषेत त्यांचे खंडण केले आहे. लोकोद्धाराच्या तळमळीतून व समाजकल्याणाच्या उद्देशातूनच तुकारामांची अभंग गाथा निर्माण झाली आहे.

तुकारामांची ही तळमळ तात्पुरती किंवा वरवरची नव्हती. समाजोद्धाराच्या स्वानुभव ज्ञानाचा त्यांनी समाजाचे निरीक्षण समर्थपणे केले व त्यांची जोड आपल्या अभंगांना दिली.

समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, समाजाने ढोंगीपणाच्या मागे लागू नये, यासाठी ते लोकपणावर व अंधश्रद्धेवर चौफेर टीका करताना आढळतात. तुकारामांच्या वाणीचे सामर्थ्य आणि त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य त्यांच्या स्वानुभवांचे फलित आहे व त्यांच्या शुद्ध व स्वच्छ चारित्र्यात आहे. सर्व सुलभ अशा उपदेशात त्यांनी समाजकंटकांचा समाचार घेतलेला आढळतो. जीवनात कुठलीही गोष्ट प्राप्त करावयाची असेल, तर नवस-सायास प्रवृत्तीचे त्यांनी प्रखर वाणीने खंडण केले. नवस-सायासाने पुत्रप्राप्तीचा लोकसमृद्धीवर, अंधश्रद्धेवर प्रहार करत त्यांनी लोकजीवनाला वेगळा मार्ग दाखवायचा प्रयत्न केला. संत तुकाराममहाराजांच्या अभंगांमधून दांभिकतेवर हल्ला करण्यात आला आहे. जिथे जिथे त्यांना अंधश्रद्धा दिसते, तिथे तिथे त्यांना मागे-पुढे न पाहता विरोध केला. वर्णाचा अभिमान बाळगणाऱ्या संकुचितपणाच्या वृत्तीस ही कठोर टीका करीत. तसेच कर्म-कांडावरही त्यांनी आपल्या अभंगातून उपदेश केला आहे. जप-तप, मुंडन, यज्ञ ही सर्व कर्मकांडे फळांच्या अपेक्षेने ठेवून केली, तर सगळे विधी निरर्थक ठरतात. अहंकाराने गर्व झालेल्या विद्वान माणसांपासून चार पावले दूर राहणे हे हिताचे आहे, हे जनसामान्यांच्या मनात रुजवण्याचा प्रयत्न केला. ज्ञान, धर्म, हवन, पूजा या गोष्टींची निरर्थकता पटवून यांचा सर्वांना सहजतेने अंगीकारता येणार हे त्यांनी आपल्या अभंगांतून मांडले आहे. स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव मिटवून वर्ण विषमतेमुळे व अंधश्रद्धेमुळे काही ठरावीक समाजाची होणारी अवहेलना त्यांनी थांबवण्याचा प्रयत्न केला. लोक-भ्रमाचा पगडा तुकारामकालीन समाजावर बराच होता. उदा. मातृत्वाची इच्छा अतृप्त राहिलेल्यांची नजर बाळाला चटकन लागते. तुकाराममहाराज प्रस्तुत अभंगात म्हणतात,

''आळविती बाळे । माते ते सुख आगळें ।।१।।
द्यावे आवडी भातुकें । पाहे निवे कवतुकें ।।२।।
लेववूनि अळंकार । दृष्टी करवी सादर ।।३।।
आपुलीये पदी । बैसवूनि कोडे वंदी ।।४।।
नेदीं लागों दिठी । उचलोनि लावी कंठी ।।५।।

तुका म्हणे लाभा । वारी घ्या वो पद्मनाभा ।।६।।'' [१०४]

या अभंगात तुकोबा आईच्या हळुवार मनाचे चित्रही रेखाटतात. बाळाला ती अलंकाराने नटवते व स्वत:चीच दृष्ट बाळाला लागेल म्हणून घाबरून धास्तावलेल्या मनाने त्याला उचलून घेते. बाळाला आईची नजर लवकर लागते हा भ्रम तुकोबांच्या या अभंगातून व्यक्त होतो.

दृष्टिबाधेसाठी वापरलेल्या शक्तीमध्ये यातून शक्ती असते. या शक्तीचा प्रभावामुळे दुष्टशक्तीचा प्रभाव कमी होतो. असा लोकमाणसांचा विश्वास आहे व तो आजही रूढ आहे. ही दृष्ट विश्वजनक श्रीकृष्णालाही लागते, असे भागवत कथेत पण आहे. पायरव होणे, जेवणावर आलेली दृष्टी काढा, शकुन–अपशकुन यांसारख्या अनेक अंधश्रद्धांनी समाज पोखरला गेला होता. शकुन–अपशकुनांच्यामध्ये काही वस्तू, प्राणी, वृक्ष यांचाही समावेश केला जातो. उदा. कुत्र्यांचे रडणे वाईट समजले जाते. कारण रात्रीच्या भीषण शांतेत कुत्र्यांचे रडणे भयाण वाटते. त्यामुळे त्या आवाजाशी अशुभ संकेत केला जातो. शरीराचा एखादा अवयव स्फुरण पावू लागला की त्यांच्यांशीही शकुन–अपशकुनांची कल्पना जोडली जाते. मांजर आडवे गेल्यावर व्यक्ती चार पावले मागे सरकते, कारण एखाद्या कामाला निघताना मांजर आडवे गेले ते कार्य सिद्धीस जात नाही असा समज माणसात खोलवर रुजला गेला व तुकारामकालीन समाजात या गोष्टींना अवाजवी महत्व होते.

तुकारामांच्या अभंगांचा विचार करताना कुलदैवत व त्यांचा कुलधर्माचा उल्लेख तत्कालीन लोकमाणसांच्या मनातील कुलदैवतावरील श्रद्धेचे व अंधश्रद्धेचे दर्शन घडवतो. कुळांचे कुलदैवत, कुळाचार पाळला नाही त्यात अधिक उणे काही झाल्यास कुलदैवता कोपते अशी लोकमाणसांत भीती होती. कुळाचार पाळला, तर ती प्रसन्न होते अन्यथा कोपते आणि कुळावर कितीही मोठे संकट आले, तर कुलदैवत त्यांचे निवारण करते असाही कुलदैवतावरचा विश्वास आणि सुरक्षिततेची भावना होती. तेव्हा तुकोबांनी आपल्या अभंगांतून अवघ्या महाराष्ट्राला विठ्ठल हे

---

[१०४] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्रमांक ९९५, पृ.क्र. २२९

कुलदैवत दिले आणि जनमाणसांतील कुलधर्माची भीती काढण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज म्हणतात,

''विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरूषार्थ । आवडे मात विठलाची ।।२।।
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि–मानसीं ।।३।।
विठ्ठल जिवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमांचा पुतळा । लावियेलें चाळा विश्वविठ्ठलें ।।४।।
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलें विण चाढ नाहीं गोता । तुका म्हणे आता नाहीं दुसरें ।।५।।'' [१०५]

समाजाला पाप–पुण्याची, धर्मशास्त्रीय संज्ञा स्पष्ट करून देतात. तंत्र, मंत्र इत्यादीचे स्तोम माजवून लोकांना नादी लावणाऱ्या समाजाचा तुकाराममहाराज निषेध करताना म्हणतात,

''ब्रह्महत्या मारिल्या गाई । आणिक कांहीं पाप केले ।।१।।
ऐका जेणे विकिली कन्या । पवाडे त्या सुन्यांचे ।।२।।
नरमांस खदली भाडी । हाका मारी म्हणोनि ।।३।।
अवघे पाप केले तेणें । जेणें सोने अभिलाषिलें ।।४।।
उच्चारितां मज ते पाप । जिन्हे कांप सुटतसे ।।५।।
तुका म्हणे कोरान्न रांड । बेटा भांड मागेना कां ।।६।।'' [१०६]

ब्रह्महत्या करणे, गायीची विक्री व हत्या करणे, नरमांस खाणे, सोन्याची अभिलाषा करणे ही सर्व पापे आहेत, असे तुकोबा सांगतात. भूतपिशाच्च बाधा, देव अंगात येणे ही लोक माणसांची

---

[१०५] संपादक ह.भ.प. स. के. नेऊरगांवकर, श्री तुकाराममहाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती – २००३, अभंग क्रमांक २५७८, पृ. क्र. ५७८

[१०६] संपादक ह.भ.प. स. के. नेऊरगांवकर, श्री तुकाराममहाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती – २००३, अभंग क्रमांक : ३४८९, पृ.क्र. ८४६

श्रद्धाही तुकोबा आपल्या अभंगात व्यक्त करतात. मांत्रिक भूत उतरवणे यावरचा तत्कालीन विश्वास तुकोबांच्या अभंगातून व्यक्त होतो.

भुतांची झाडणी करणे, भूत पळवून लावण्याचा तंत्र–मांत्रिक विधीचा उल्लेख तुकोबा करतात. भुतांना संतुष्ट करण्यासाठी अन्न, शिधा, कोंबडी, बकरी, रेडा बळी देण्याची प्रथा आढळते. तुकारामकालीन काळात त्यांचे स्पष्ट संकेत त्यांच्या अभंगांत आढळतात.

'' मांस खातां हाऊस करी । जोडोनि वैरी ठेवियेला ।।१।।
कोण त्याची करील कीव । जीवें जीव नेंणती ।।२।।
पुढीलासाठी पाजळी सुरी । आपुली चोरी अंगुळी ।।३।।
तुका म्हणे पुढे कुटती हाडे । आपल्या नाडे रडतील ।।४।।'' [१०७]

बळी प्रथेचे खंडण करताना प्रसंगी तुकोबाचे अभंग कणखर झालेले आढळतात. तुकोबा आपल्या अनेक अभंगांतून लोकांना अंधश्रद्धेतून बाहेर काढण्यासाठी मदत करतात. त्यांच्या मते जिथे आत्मविश्वास संपतो तिथे अंधविश्वासाचा व अंधश्रद्धेचा प्रारंभ होतो. प्रयत्नाची पराकाष्ठा केल्यानंतर वैफल्य येते आणि पुनः पुन्हा अपयश येऊन नैराश्य येते, तेव्हा मनुष्य आपली विवेकबुद्धी हरवून बसतो. विवेकबुद्धी, तारतम्यभाव, आत्मविश्वास यांचा अभाव जीवनात निर्माण झाला की, मनुष्य अंधश्रद्धाळू होतो. धर्मकांडांच्या आणि कर्मकांड चक्रात अंधश्रद्धेला बळी पडून समाजात मन अधिकाधिक गुंतत जाते. अंधश्रद्धेच्या काळात अडकलेल्या लोकांना अधिकाधिक भीती घालून आपली दुकानदारी चालवणाऱ्या लोकांविरोधात तुकाराममहाराज बंड पुकारतात. समाजात रूढ झालेल्या, नवस–सायास, अंगात येणे, जादूटोणा, श्राद्धविधी इत्यादी तथाकथित धर्मकांडात आपल्या अभंगातून घणाघाती टीका करतात.

अंगात येणे, देवी संचारणे या साऱ्या गोष्टींच्या आधारावर भोळ्या भाबड्या लोकांना भुलविणाऱ्या मानसिक विकृतीचा व अंधश्रद्धेचा तुकाराम धिक्कार करतात. [१०८]डॉ. अ. ह. साळुंखे

[१०७] वै. जोगमहाराज सांप्रदायिक सार्थ श्री तुकाराम गाथा वै. ह.भ. प. देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्रमांक : १६२५, पृ.क्र. ३५८.

[१०८] डॉ. आ. ह. साळुंखे, विद्रोही तुकाराम, सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, पुणे, द्वितीयावृत्ती १९९९, पृ.क्र. ९

अंधश्रद्धेविषयी लिहितात– सर्वसामान्य माणसे असे प्रकार करणाऱ्या ढोंगी लोकांच्या मागे लागून कशी काय फसतात, याची कारणमीमांसा विज्ञान युगाच्या काळात केली आहे. हे ध्यानात घेतले की प्रथमदर्शनी थक्क होऊन जातो.

४.४.११ : लोकजीवन ज्ञानेश्वर, एकनाथ व बहिणाबाई :

वारकरी संप्रदायामध्ये अनेक संतांनी अभंगरचना व विविध ग्रंथ लिहिले. भागवत धर्माचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला. नामदेव, एकनाथ आदी संतांनी त्यांची धुरा सांभाळली व संत तुकाराम त्याचा कळस झाले. ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथ, नामदेव, तुकाराम हे चारही संत वारकरी संप्रदायाचे शिल्पकार म्हटले जातात. ह्या संतांची ग्रंथसंपदा आपल्या भावनिक वाङ्मयीन संपदेने नटलेली आहे. त्यांच्या वाङ्मयाने समाजाला अध्यात्मिक मार्ग दाखवण्याचे कार्य केले आहे. संतांनी वारकरी संप्रदायाची धुरा सांभाळून ज्ञान, अध्यात्म, तत्त्वचिंतन यांचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले आहे. तुकाराम शिष्य संत बहिणाबाईंनी या संप्रदायाला इमारतीची उपमा आपल्या अभंगांतून देऊन त्यांचे मार्मिक भावार्थ दर्शन घडविले आहे.

''संतकृपा झाली। इमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।।३।।
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।।४।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।५।।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केले ।।६।।'' [१०९]

प्रस्तुत अभंगावरून ज्ञानदेवांनी संप्रदायाचा पाया रचला असून, त्याचा प्रसार आणि प्रचार करण्याचे कार्य ज्ञानदेवांनी केले आणि भागवत ग्रंथाच्या माध्यमातून एकनाथमहाराज या संप्रदायाचे आधारस्तंभ ठरले आणि त्यांच संप्रदायाचा कळस जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराममहाराज झाले. याशिवाय अनेक संतांनी योगदान देऊन या संप्रदयाचा प्रचार, प्रसार करण्यास सिंहाचा

[१०९] संत बहिणाबाई, बहिणाबाईंची गाणी, सुचित्रा प्रकाशन, मुंबई, नववी आवृत्ती – (महाजाल) www.bookganga.com

वाटा उचलला. उदा. निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताई, गोरा कुंभार, नरहरी सोनार, चोखोबा, सेना न्हावी, विसोबा खेचर, कान्होपात्रा, बहिणाबाई या आदी संतांनी स्वत:च्या कर्मात विठ्ठलाला पाहिले आणि भागवत धर्माचा प्रसार केला.

४.४.११.१ : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज : वयाच्या १६व्या वर्षी जगाला अध्यात्मिक बैठक व अधिष्ठान देणारे संत ज्ञानेश्वर एकमेवाद्वितीय संत. जगाला पसायदानाच्या माध्यमातून उपदेश करून,

''जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणिजात ।।'' [११०]

असे दान देणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराजांनी संप्रदायाचा पाया घातला व आपल्या ज्ञानाच्या जोरावर ग्रंथसंपदा जगापुढे ठेवली. सर्वसामान्य बहुजन समाजाला ज्ञानाची कवाडे खुली केली

१. ज्ञानेश्वरी – भावार्थदीपिका
२. अमृतानुभव –
३. चांगदेव पासष्टी
४. ज्ञानदेवाचे अभंग व स्फूट गाथा
५. हरिपाठाचे अभंग

यांसारख्या प्रमुख ग्रंथांचा समावेश होतो.

काव्य व तत्त्वज्ञान यांचा मनोहर तात्त्विक संगम जगाच्या वाङ्मयात ज्ञानेश्वरीइतका अन्य ग्रंथांत सापडणार नाही. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी असो वा अमृतानुभव असो, तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथ, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अवजड होत नाही. ज्ञानेश्वरी हा भगवद्गीतेचा एक भाष्य ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे. मूळ गीतेमध्ये असलेल्या ७०० ओव्यांची ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत १८ अध्यायांच्या स्वरूपात

[११०] श्री संत ज्ञानेश्वर महाराजकृत, पसायदान, गीता प्रेस, गोरखपूर, पृ.क्र. ६१.

मांडणी केली आहे. हा विस्तार सांगताना ज्ञानेश्वरांनी अनेक सिद्धान्त मांडले आहेत. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जनसमुदायाच्या भावनिक विश्वात रमण्याचे सामर्थ्य आहे. हा भावार्थ सर्वसामान्यांना आपला करतो, त्यामुळे तिची नित्य पारायणे केली जातात. अनेकजण आपल्या भजन–कीर्तनात त्याचा समावेश करतात. श्रीकृष्णाच्या प्रशंसा, स्तुती, भक्ती, महिमा, महाभारत आदींचे वर्णन काव्यात्मकदृष्ट्या भावस्पर्शी आहे. वाचकाला नव्या सृष्टीचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य या अलौकिक ग्रंथात आहे. त्यांनी आपल्या या ग्रंथात शांतरसाला महत्त्व दिले आहे. त्यातील भाषा थोडी ग्रहण करण्यास उच्च पातळीवरचा अनुभव देते. भाषा ही संस्कृतमिश्रित आहे. रचनावैविध्य हे त्यांच्या अभंगरचनेचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. अनेक अभंग प्रासादिक आहेत. ज्ञानेश्वरांच्या अभंगातून भक्तीच्या विविध भावछटा उमटतात. तसेच जीवनविषयक तत्त्वज्ञान प्रकट होताना दिसते. असे अनेक अभंग ओव्या वाचल्यावर सहज आकलन होऊ पाहते; पण काही ओव्या आकलनशक्तीच्या पलीकडे आहेत. ज्ञानेश्वरीत चैतन्यपूर्ण अनुभूती येते. गीतेचे भावार्थकाव्य, कौशल्य त्यात आहे. ज्ञानेश्वरांची प्रतिभासृष्टी अतिशय उच्च प्रतीची आहे. त्यांची काव्यभरारी ही गरूडभरारी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ज्ञानेश्वरांच्या काव्यात रस, रंग, गंध, स्पर्श इत्यादी संवेदना जाणवतात. आपले अध्यात्मिक शास्त्र समाजाला देताना त्यांनी लौकिक काव्याला कमी महत्त्व दिले आहे. तेराव्या शतकात ज्ञानभक्तीचा प्रसार करून त्यांनी संप्रदायाला नवी दिशा दिली. त्यामुळे सामाजिक आणि नैतिक घडीला हातभार लागला. अर्थ आणि काम या मूलभूत गरजांवर अध्यात्मिकदृष्ट्या मार्गस्थ करण्याचे सामर्थ्य ज्ञानेश्वरीत आहे. आसुरी प्रवृत्तीवर विजय मिळवून प्रेम, दया, शांती, सत्य या अध्यात्मिक गुणांची बैठक ते आपल्या ग्रंथात देतात. कुठल्याही धर्म– संकल्पनेला धक्का लागू न देता ते आपले कार्य करतात.

ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाचे प्रवर्तक श्री संत ज्ञानेश्वरमहाराज महाराष्ट्राच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. अलंकारिकदृष्ट्या समृद्ध अशा या ग्रंथाने ज्ञानाचा वारसा महाराष्ट्राला दिला.

अमृतानुभव : स्वानुभवांचे कथन ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव ह्या ग्रंथात केले आहे. ह्यात ज्ञानेश्वरांनी चिद्विलास तत्त्वज्ञान मांडले आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथासारखेच त्यात तत्त्वज्ञान सामावले आहे. या ग्रंथात १० प्रकरणे व ८०४ ओव्या आहेत.

चांगदेव पासष्टी : चांगदेवांना उपदेशात्मक अत्यंत लहान वयात केलेले पत्रलेखन आहे. तत्त्वज्ञानाच्या साहाय्याने विश्वाच्या स्वरूपाचे दर्शन त्यात आढळते.

ज्ञानदेवाचे अभंग व स्फूट गाथा (पदे) : तौलनिकदृष्ट्या ज्ञानेश्वरी अमृतानुभव या आदी ग्रंथांच्या तुलनेने या रचनेची भाषाशैली सर्वसाधारण आहे. भक्तिमार्ग दाखविताना त्यांनी अभंगरचना केली आहे.

हरिपाठाचे अभंग : वारकरी संप्रदायाचे हरिपाठ हा जीत्वांचा आत्मा आहे. हरिपाठाशिवाय वारकरी आत्माविरहित भासतो–

''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी ।
तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।।
हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा ।
पुण्याची गणना कोण करी ।।'' [१११]

हरिपाठाने प्रत्येक वारकऱ्याचे जीवन उजळून जाते. जीवनाचा आध्यात्मिक सार हरिपाठात व्यक्त होता व शिक्षित, अशिक्षित प्रत्येकाच्या मुखात तो इतका सहज विराजमान होतो की प्रत्येकालाच तो आपलासा वाटतो इतक्या साध्या व सोप्या भाषा शैलीत हरिपाठातील अभंगरचना आहे.

४.४.११.२ : संत एकनाथ : संत परंपरेत एकनाथमहाराजांनीही भागवत धर्माची पताका पुढे नेण्याचे कार्य केले. चतु:श्लोकी भागवत हा नाथांचा पहिला ग्रंथ असून, जनार्दन एकनाथ। स्तंभ दिला भागवत।। असे वर्णन एकनाथमहाराजांचे वारकरी संप्रदायात केले जाते. मूळचे पैठणचे

[१११] श्री संत ज्ञानेश्वर महाराजकृत, पसायदान, गीता प्रेस, गोरखपूर, अ.क्र.२

रहिवासी असलेले एकनाथमहाराज हे जनार्दनस्वामींचे शिष्य होय. विद्वानसंपन्न समाजातील ठरावीक वर्गापासून ते बहुजन समाजातील लोकांना समजेल अशी रचना नाथांनी आपल्या काव्यात केली. नाथांनी सुमारे ४००० अभंग लिहिले. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या श्री संकल संत गाथा (खंड २) मध्ये एकनाथांचे ४००१ अभंग दिले आहेत. यामध्ये नाममहिमा, कृष्णमहिमा, पंढरीच्या पांडुरंगाचा महिमा, कृष्णजन्म, बालक्रीडा, संतमहिमा, कीर्तनमहिमा, सद्गुरूमहिमा, विठ्ठलवर्णन, उपदेश, आत्मानुभूती या गोष्टींचा समावेश आहे.

एकनाथांनी अनेक वाङ्मयीन निर्मिती केली व वैविध्यपूर्ण अशा रचना जनमाणसांपुढे ठेवल्या त्यामध्ये

१. चतु:श्लोकी भागवत
२. एकनाथी भागवत
३. रूक्मिणी स्वयंवर
४. भावार्थ रामायण.
५. अभंग, भारूडे, पदे, गवळणी व स्फूट अभंग इ.

या ग्रंथांचे भांडार जनसमुदायास एकनाथांनी खुले करून दिले.

१. चतु:श्लोकी भागवत : चतु:श्लोकी भागवत हा एकनाथांचा पहिला ग्रंथ आहे. भागवत ग्रंथाच्या द्वितीय स्कंधावरील निवडक श्लोकांवर हा ग्रंथ आधारित आहे. या ग्रंथात एकनाथाच्या तत्त्वज्ञानाचे व नीतिबोधाचे विचार प्रकट होतात. या ग्रंथामध्ये एकूण १०३६ ओव्या आहेत. प्रत्येक ओवीत त्यांची विनयशीलता झळकते. आचार – विचार – कर्म – धर्म संयोग समजावून सांगताना नाथ सुंदर उदाहरण देतात. ते म्हणतात, तप म्हणजे योग नव्हे याग – ज्ञान नव्हे । तप म्हणजे वासना त्याग ।। व्यवहार चातुर्य वापरून अत्यंत बुद्धिचातुर्याने ते रूढ प्रचलित शब्दांतून अर्थ काढीत आपल्या भक्तांना प्रपंच व परमार्थाची योग्य सांगड घालताना प्रस्तुत ग्रंथात दिसतात.

२. एकनाथी भागवत : एकनाथी भागवत ही भागवतातील एकादश स्कंधावरील ओवीबद्ध टीका आहे. गुरुकृपेच्या आशीर्वादाचे प्राबल्य पदोपदी ग्रंथात जाणवते. एकनाथांची प्रतिभा, ज्ञान आणि भक्ती भागवतात ओतप्रोत भरलेली दिसते. भक्तिपर ग्रंथाने एकनाथांची संप्रदायात वेगळी ओळख करून दिली. या ग्रंथात एकनाथांचे रसाळ व भावस्पर्शी वर्णन स्तब्ध करते.

एकनाथी भागवत हे ज्ञानेश्वरीवरील भाष्यच आहे. ज्ञानेश्वरीतील भक्ती आवाहनाच्या, विनंती, क्षमा–याचना भागवत ग्रंथातही आढळतात. या ग्रंथामध्ये जवळपास १८८०० ते २० हजार इतक्या ओव्या आहेत. एकादश स्कंध कृष्ण–उद्धव संवादरूप असून त्याचे मूळ स्वरूप कायम राखत भागवताची सुंदर झालर आपल्या ग्रंथात दिली आहे.

३. रुक्मिणी स्वयंवर : नाथांचा हा ग्रंथ अनोखा आहे. भागवतातील दशम स्कंधात यांचा समावेश आहे. आपल्या रसाळ, भावपूर्ण, संवेदनशील नाट्यपूर्ण प्रसंगांनी भक्ताच्या डोळ्यांपुढे जिवंत चल चित्रपटाप्रमाणे केला आहे. हुबेहूब प्रसंग रंगवण्याचा चपखल प्रयत्न नाथांनी रुक्मिणी स्वयंवरात करून आजतागायत भक्तांच्या मनात संप्रदायात अव्याहत अधिराज्य गाजवले आहे.

४. भावार्थ रामायण : भावार्थ रामायणात रामकथेचा समावेश केला आहे. हा ग्रंथ रूपकात्मक आहे. रामकथेतून प्रपंच करून परमार्थ कसा साधावा, याचा मेळ घातलेला दिसतो. तसेच वाल्मिकी रामायण, अध्यात्म रामायण, वसिष्ठ योग, शिवरामायण, कलिकाखंड इत्यादी गोष्टींचा समावेश केला आहे. नाथांचे निरूपण कौशल्य भावार्थ रामायण दिसते. प्रपंचात अध्यात्म साधण्यासाठी त्यांनी राम म्हणजे परमात्मा आणि सीता म्हणजे चित्ताक्ती कौशल्या म्हणजे सद्विया, कैकयी अविधा, मंथरा कुविधा, विश्वामित्र म्हणजे विवेक, सीतेची पतिनिष्ठा म्हणजे अद्वैत भक्तीचा वास.

५. अभंग, भारूडे, गवळणी, स्फूट अभंग : संत एकनाथमहाराजांनी भागवताप्रमाणेच इतर अनेक रचना केल्या. त्यात अभंग, भारूडे, गवळणी, स्फूट अभंगांचा समावेश आहे. विद्वानांसाठी आपले ग्रंथ भांडार जसे उपलब्ध केले, तसेच समाजाच्या सर्वच स्तरांसाठी प्रबोधन, मनोरंजनाच्या

साहाय्याने आत्मानुभूती घडवून आणण्याचा यशस्वी प्रयत्न आपल्या रचनेत त्यांनी केला. त्यांची गवळणी व भारूडे लोकांनी डोक्यावर विराजमान केली. एकनाथांची एकूण १०० ते १२५ विषयांवर भारूडांची रचना आढळते. नाथांची भारूडे ही विविध स्वरूपाची आहेत. त्याच्या माध्यमातून सर्व सामान्यांशी संवाद साधलेला आहे. त्यांच्या भारूडाच्या माध्यमातून भक्तिरस, शब्दमाधुर्य व अध्यात्मसार यांचा समावेश आढळतो. विविध रूपकाच्या साहाय्याने त्यांनी समाजाशी संवाद साधलेला आहे. विविध रूपाने भारूडांच्या माध्यमातून नाथांनी सर्वसामान्यांच्या संसारातील त्याच्या परिचयाचे अनुभवसदृश सांगून भक्तिमार्गाकडे त्यांना आकर्षित केले आहे. मनोरंजनातून परमार्थ शिकविला.

एकनाथांच्या गौळणींचीही रचना महत्त्वपूर्ण आहे. अनेक पदे रचली आहेत व त्यात बालक्रीडेचे अभंग व रूपके व्यवस्थितरीत्या मांडणी केलेली आढळते. दत्त संप्रदाय – वारकरी संप्रदाय, काव्य – तत्त्वज्ञान प्रपंच – परमार्थ यांचा योग्य समन्वय एकनाथांच्या ठायी दिसतो.

४.४.११.३ : संत बहिणाबाई : संत बहिणाबाई सिऊरकर या तुकारामांच्या शिष्या होत्या. बहिणाबाईंचा बालविवाह झाला होता. कौटुंबिक कलहानंतर त्यांनी घर सोडले अशी आख्यायिका आहे. तुकारामाचे अभंग बहिणाबाईंच्या ऐकण्यात आले तेव्हा त्यांच्या शोधार्थ त्या देहूस आल्या. तुकारामांच्या अद्वैत पदांचा छेद बहिणाबाईंना लागला. तुकारामांच्या रचनांनी व दर्शनाने त्या प्रभावित झाल्या. प्रपंच व परमार्थ दोन्ही साधणारी बहिणाबाई ही एकटीच संत स्त्री होती. तुकारामांच्या अभंगांची किमया बहिणाबाईंच्या मनावर अंतःर्बाह्य झाली व तुकारामांना गुरूस्थान देऊन त्या स्वतः अभंग रचना करू लागल्या. त्यांच्या अभंगांवरही तुकारामांचा प्रभाव दिसून येतो. संतसंग हा उत्तमच असतो. हे सांगण्यासाठी बहिणाबाई तुकारामांच्याच दृष्टांतांचा वापर करताना आढळतात.

''चंदनाचा संग जालिया निंबासी । चंदनत्वा त्यासी ठसावले ।।

तैसा संतसंग कळला हा जाणिजे । विवेक हा कीजे मनामाजी ।।'' [११२]

बहिणाबाईंचा काळ अनीती, अनाचार यांनी बोकाळलेला होता. समाजात अनेक समज – गैरसमज दिसत होते. भोंदुगिरी समाजमनावर अधिराज्य गाजवत होती. तेव्हा तुकारामांप्रमाणेच बहिणाबाई त्या काळाला कलियुग असेच दर्शवितात. तुकारामांच्या काव्याचा प्रभाव बहिणाबाईंवर असल्यामुळे त्यांचेही अभंग निर्भीड, तेजस्वी, समाज प्रबोधनाचा वारसा घेतलेले आढळतात.

४.४.१२ : ऐतिहासिक आढावा :

महानुभवीय साहित्यातून तत्कालीन राजकीय परिस्थितीचे दर्शन घडते. तसेच लोकतत्त्वाच्या आधारे यादवकालीन समाजजीवनाचे व लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. यादव घराण्याच्या पूर्वी सातवाहन, पूर्व चालुक्य, उत्तर चालुक्य या राजघराण्यांचे राज्य होते. या काळानंतर यादवकालीन सत्तेस प्रारंभ झाला. यादवकालीन सत्तेत वैदिक, महानुभाव, भागवत इ. धर्मपंथांना चांगला राजाश्रय दिला. यादवकालीन कालखंडात तत्कालीन संगीतरत्न, पंडित आदींनी संस्कृत वाङ्मयात भर घातली. पण ती बहुजन समाजासाठी निरूपयोगी होती. म्हणून ज्ञानेश्वरांच्या काळात ज्ञानेश्वरांनी लोकभाषेचा, मराठीचा पुरस्कार केला आणि सांस्कृतिक वाटेवर वारकरी संप्रदायाचा उदय झाला.

तुकारामांचा काळ हा महाराष्ट्रातील यवनी सत्तेच्या अधःपतनाचा काळ होता व शिवाजीमहाराजांच्या स्वराज्याचा प्रारंभीचा काळ होता. याच काळात समाजात धर्मकांड, कर्मकांड आदी गोष्टींद्वारे एका ठरावीक वर्गाने अराजकता माजवली होती. ती मळभ दूर करून वारकरी संप्रदायाने आपल्या साहित्यातून जनजागृती करून बहुजन समाजाला नवी दिशा दाखवली.

४.४.१३ : तुकोबांची राष्ट्रजागृती :

यादवकालीन खंडाच्या अस्तास महानुभाव पंथ व भागवत धर्माची मुहूर्तमेढ झाली व बाराव्या–तेराव्या शतकात महाराष्ट्रातील वारकरी चळवळीला प्रारंभ झाला. अंधश्रद्धा, धर्मकांड,

[११२] संत बहिणाबाई, बहिणाबाईंची गाणी, सुचित्रा प्रकाशन, मुंबई, नववी आवृत्ती – २००४, (महाजाल) www.bookganga.com

कर्मकांड या साऱ्यात अडकलेल्या समाजाला भक्तीचा मार्ग दाखवण्याचे काम वारकरी संप्रदायाने अव्याहतपणे केले.

ज्ञानेश्वरांच्या काळात यादवांचे राज्य होते. ज्ञानोबारायानंतर संत एकनाथ, संत तुकोबारायांच्या कालखंडात परकीय राजवटीचे सावट पसरले. मराठी सरदारांमधील आपापसांतील भांडणे विकोपाला जाऊ लागली. मराठी मायभूमी मुस्लिम राजवटीकडे जाऊ लागली. त्यामुळे घडणाऱ्या राजकीय घडामोडींचे समर्थन न करता शिवरायांनी धाडसी पाऊल उचलून स्वराज्याची स्थापना केली. तुकोबाराय व राजा शिवछत्रपती हे समकालीन राजवटीतील आहेत. तुकोबाराय आपल्या कीर्तनातून, अभंगांतून करीत असलेली राष्ट्रजागृती शिवरायांच्या कानापर्यंत येऊन पोहचली, तेव्हा तुकोबारायांच्या भेटीस शिवाजीराजे स्वत: आले. तुकोबारायांनी सामाजिक बांधिलकी जपली. सामाजिक व धार्मिक क्रांतीची प्रेरणा तुकोबारायांच्या अभंगांतून दिसून येते.

''न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दु:खी होतें ।।१।।
काय तुम्ही येथें नसालसें झालें । आम्ही न देखीले पाहिजें हें ।।२।।
परचक्र कोठें हरिदासांच्या वासे । न देखीजे ते तद्देशे राहातिया ।।३।।
तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जीणें झालें ।।४।।'' [११३]

समाजातील भेदभावनेचा तटबंदी पाडण्याचा प्रयत्न तुकारामांनी केला. भेदाभेद हे भ्रम समजून या अमंगळ गोष्टींचा त्याग केला पाहिजे, असे तुकाराम आपल्या अभंगात सांगतात. तुकोबारायांनी तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थितीवर आसूड ओढले आहेत. स्वकियांविरुद्ध तलवार काढून आपापसांत लढाई करणाऱ्या सरदारांना अनेक अभंगांतून तुकाराम उपदेश करतात.

[११३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अं. क्र. ५५७, पृ. क्र. १२९

आपल्या निःस्पृह वृत्तीने तुकोबारायांनी आपल्या अनुभवसंपन्न विश्वाचे वर्णन अभंगांतून व कीर्तनातून राष्ट्रजागृतीसाठी केले. राष्ट्रनिर्माणासाठी समाजाला नैतिक प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले. त्यामुळे छत्रपती शिवरायांना सुद्धा तुकारामांबद्दल पराकोटीचा आदर होता. तुकारामांच्या अलौकिक धर्मसामर्थ्याने समाजपरिवर्तन घडून येते. तुकोबारायांबद्दलची महती ऐकून शिवरायांनी त्यांना भेटीदाखल सोने–हिरे–जवाहर दिले; परंतु तुकोबारायांनी ते परत करून तुमचे धन मला मृतीकेसमान आहे. तेव्हा मला ते नको, असे सांगितले. संत तुकोबारायांनी सामाजिक विषमतेवर, अंधश्रद्धेवर आणि भोंदूपणावर शब्दांचा सशस्त्र हल्ला करून समतेशी लढाई केली. त्यांचे छत्रपती शिवरायांना मोलाचे सहकार्य झाले. तुकोबारायांची तत्त्वनिष्ठा व त्यांचे अंगी राष्ट्रभक्तीचे प्रबोधन गौरवशील आहेत.

४.४.१४ : तुकोबांच्या अभंगातील सांस्कृतिक जीवन :

तुकाराममहाराजांच्या अभंगांतून अत्यंत व्यापक अर्थाने समाज दर्शन घडते. तत्कालीन समाज हा लोकसंस्कृतीचा उपासक होता. तुकाराममहाराजांनी लोकसंस्कृती विषयीची ओढ तत्कालीन समाजातील जाणून त्यांच्यातील अध्यात्मिक दृष्टी आविष्कृत करण्यासाठी, मानवी धर्माचे कल्याण करण्यासाठी प्रबोधनात्मक कार्य केले. तत्कालीन लोकसमूहाचे दैनंदिन चालीरीती परंपरा, आचार–विचार, दैववादी मानसिकता यांचे सुक्ष्म निरीक्षण करून आपल्या अभंगांत त्याचे प्रकटीकरण केले. तसेच धर्मविधी, व्रत–वैकल्य सण–उत्सव मोठ्या उत्साहाने पार पाडले जात असत. तत्कालीन लोकजीवनात सण–उत्सव साजरे करताना झिम्मा–फुगडी, हमामा, विटी–दांडू इत्यादी खेळ खेळले जात असत. लग्न समारंभ, बारसे, डोहाळे यात पुराणकथेच्या साहाय्याने देवी–देवतांची गाणी म्हटली जात असत. या उपासनेतील आणि उत्सवातील नृत्य–नाट्य परंपरेचा लोकमाणसांवर विलक्षण प्रभाव होता. या प्रभावाचे साहाय्य घेत तुकाराममहाराजांनी लोकसंस्कृतीतून समाजपरिवर्तनाचे कार्य केले. वासुदेव, गोंधळी, पोतराज, भारूडी, पांगुळ, वाघ्या–मुरळी या लोकसंस्कृतीचा वारसा चालविणाऱ्यांना आपल्या अभंगांत मानाचे स्थान दिले व समाजात बोलीभाषेत आपली अभंगरचना करून लोकपरंपरा जपण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन

लोकजीवनाच्या, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक बदलाचा प्रभाव तुकारामांनी आपल्या अभंगांत प्रकट केला. गाथेतून त्यांनी भारतीय संस्कृती ही अत्यंत महान स्वरूपाची आहे हे दाखवण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला त्यांच्या अभंगांमध्ये दिसून येतो. जगातील इतर संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन व प्रभावित करणारी आहे. इथे संस्कार व तत्त्वांची जोपासना केली जाते. तसेच सांस्कृतिक मूल्ये जपली जातात, म्हणून या संस्कृतीचे खरे वैभव म्हणजे येथील संतपरंपरा होय. तुकारामांच्या अभंगांतून तत्कालीन लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

४.४.१५ : तुकारामांचे तत्त्वचिंतन व संकल्पना :

संतांच्या मार्गावर आम्ही पदक्रमण करीत आहोत. संतांचा मार्ग झाडण्यासाठीच आमचा अवतार आहे, असे तुकारामांनी स्पष्ट मत मांडले आहे. संत तुकोबा भागवत धर्माचे उपासक व वारकरी संप्रदायाचे प्रेरक होते. भागवत धर्माने प्रपंच व परमार्थ यांचा उत्कृष्ट समन्वय आणि सामान्य मनाला आल्हाददायक अशी जीवन जगण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे भागवत धर्माचे आचार–विचार सर्वसामान्यांना आपलेसे वाटले व त्यांचे आराध्य दैवत विठ्ठल हे त्यांच्या जीविचा जिव्हाळा वाटला. संत तुकारामांचे अभंग आत्मानुभवाचे घटक आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक अभंगात आशय व अभिव्यक्ती एकच होताना दिसते. त्यांच्या अभंगातील तत्त्वचिंतन मराठी मनाचा अविभाज्य घटक बनला. संत तुकारामांच्या ठिकाणी सर्वात्म भाव दिसून येतो. तसेच त्यांच्या ठिकाणी अद्वैत भावाचे प्रकटीकरण झाल्याने भक्त व परमेश्वर एकरूपच असल्याचे त्यांच्या अभंगात निदर्शनास येते. तुकारामांच्या काव्यात परमेश्वराविषयी भक्ती व तळमळ दिसून येते. तुकारामांची हीच भक्ती ही, परमेश्वराची आसक्ती आहे. त्यात कुठल्याही लौकिक किंवा ऐहिक सुखाची लालसा आढळत नाही. त्यांच्या आत्मिक सुखाचा परमोच्च क्षण म्हणजे पांडुरंगाची भेट हा होय. ते स्वत:साठी काहीही न मागता जगाच्या उद्धारासाठीच आपली झोळी ईश्वरापुढे पसरतात. तुकाराम आत्मविन्मुख होऊन जगापुढे स्वानुभवातून तत्त्वज्ञान मांडतात. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान हे अस्तित्ववादी तत्त्वज्ञान भासते. त्यांच्या ठायी सर्वात्म भावाचे, स्वानुभूतीचे दर्शन घडते. तुकारामांनी संसार करताना त्यातल्या यातना अनुभवल्या. जन्म–मरणाच्या चक्राच्या

कल्पनेने ते निःस्तब्ध झाले आणि मग त्यांनी भक्तिमार्गाची निवड केली. त्यांच्यावरील आघातांनी व आपत्तींनी त्यांना मोक्षाचा मार्ग दाखवला व त्यांच्या भक्तिमार्गाला उजळून टाकले. अशा तऱ्हेने तुकाराम आपल्या अभंगांच्या साहाय्याने अद्वैताकडे सर्व द्वैत बंधनातून मुक्त झाले.

''अद्वयचि द्वय झालेंचि कारण । धरिलें नारायणें भक्तिसुख ।।१।।
अपरोक्ष आकार झाला चतुर्भुज । एकतत्वीं बीज भिन्न नाहीं ।।धृ।।
शून्य निरसूनि राहिलें निर्मळ । तें दिसे केवळ विटेवरी ।।३।।
सुखें घ्यावें नाम वदना ही चाड । सरिता वापी आड एक पाणी ।।४।।
तुका म्हणे मीच आहे तेणें सुखें । भेद नाहीं मुखें नाम गातां ।।५।।'' [११४]

जीव–शिव, आत्मा–परमात्मा, भक्त–परमेश्वर यांच्या एकतत्वरूपी आस्तित्वाची जाणीव आपल्या प्रस्तुत अभंगात महाराज करतात. देहात्म भागाच्या परिघात फिरणाऱ्या माणसाच्या अनुभवाचे प्रतीक आपल्या अनेक अभंगांत मांडतात. सर्वसामान्यांच्या अनाकलनीय अशा व्यापक तत्त्वांचा बोध तुकाराममहाराज आपल्या अभंगातून देतात. देहभाव खरा मानून जगणाऱ्या माणसाच्या जगण्यावर तुकाराम अनेक अभंगांत भाष्य करताना आढळतात. माणसाच्या प्रापंचिक दैनंदिन व्यवहारांतून परमार्थाकडे वळल्यानंतर प्रपंच निरर्थक वाटू लागतो, याचे दाखले ते देतात. तुकोबांचे तत्त्वज्ञान आत्मोन्नती व समाजोन्नतीचे अद्वैत उपदेशपर तत्त्वज्ञान आहे. मानवी कल्याणाचा आणि मानवी उद्धाराचा तात्त्विक मार्ग आपल्या अभंगांच्या साहाय्याने दाखविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या अभंगगाथेचे चिंतन केले असता, समाजाच्या कल्याणासाठी मांडलेले तत्त्वज्ञान एकमेवद्वितीय तत्त्वज्ञान वाटू लागते. तुकारामांची गाथा ही अतिशय आकृतिबंध व प्रबोधनात्मक आढळते. तुकारामांच्या मनात असलेले अध्यात्मिक, सामाजिक व धार्मिक तत्त्वांची रचना त्यांनी आपल्या सामाजिक अनुभवातून केलेली आहे. धर्मतत्त्व ज्ञानाला नीतीचे व विवेकाची झालर दिलेली आढळून येते. तुकारामांनी वेद नाकारून अध्यात्माचा नव्या विचारांचा पाया

[११४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्रं. ३७३७, पृ. क्र. ७५३

मांडला. समाजघटकांतील विषमता ही वेदतत्त्वाशी बांधलेली असल्यामुळे तुकारामांनी त्या वेदाला भेदाची उपमा देऊन साधे–सरळ तत्त्वज्ञान आपल्या अभंगात मांडले.

''वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहवा भार माथां ।।१।।
खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भार धन वाही मजुरीचें ।।धृ.।।
उत्पात्तिपाळणसंहाराचें निज । जेणे नेलें बीज त्याचे हातीं ।।३।।
तुका म्हणे आम्हां सांपडलें मूळ । आपणचि फळ आलें हाता ।।४।।'' [११५]

वेदविषयक आशयाचा व्यापक अर्थ प्रस्तुत अभंगात तुकारामांनी मांडला वेदांचे श्रेष्ठत्व दाखवताना समाजातील धर्मव्यवस्थेवर त्यांनी मार्मिक स्पष्टीकरण दिले आहे. तुकारामांचे काव्य हे नवीन जीवनमूल्य मांडणारे व समाजव्यवस्थेची समतावादी मूल्यतत्त्वांवर मांडणी करणारे आहे. त्यासाठी ते शब्दरूपी आसूड ओढायलाही मागेपुढे पाहत नाहीत. त्यांच्या मते अल्प ज्ञानामुळे अंगात दांभिक व खोटा अभिमान बळावतो व तो समतेच्या समाज मूल्यांना घातक ठरतो. समाजातील अन्यायाच्या विरोधात आपल्या अभंगांद्वारे त्यांनी विद्रोहाचीही भूमिका बजावली. परंपरागत धर्माच्या विरोधात विद्रोहाचे तत्त्वज्ञान त्यांनी जगास शिकविले. त्यांच्या या विद्रोहामागे सामाजिक समतेचा, न्यायाचा व मानवतेचा व्यापक अर्थ होता. त्यांनी जगापुढे एक व्यापक अर्थाचे तत्त्वज्ञान मांडले व ब्रह्मज्ञानास विठ्ठल भक्तीचा पर्याय दिला, वेदाभ्यासाला नामाचा महिमा सांगितला. कर्मकांड यज्ञाला भजन–कीर्तनाचे महत्त्व पटवून दिले व जातीय विषमतेला भक्तिमार्गातील समता निदर्शनास आणून दिली. अंधश्रद्धेला प्रयत्नवादाचा पर्याय दिला.

''हेचि माझें तप हेंचि माझे दान। हेंचि अनुष्ठान नाम तुझें ।।१।।
हेचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत । सत्य हे सुकृत नाम तुझें ।।२।।
हेंचि माझे कर्म हाचि माझा धर्म। हाची नित्यनेम नाम तुझें ।।३।।
हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ । हेंचि तप ध्यान नाम तुझें ।।४।।
हाची कुळाचार हाचि कुळधर्म। हाचि नित्यनेम नाम तुझें ।।५।।

---

[११५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्रं. २२५६, पृ. क्र. ४६८

हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें ।।६।।

तुका म्हणे दुजे सांगायासी नाहीं । नामेंविण कांही धनवित्त ।।७।।'' [११६]

प्रस्तुत अभंगाद्वारे तुकारामांनी साधेसोपे तत्त्वज्ञान जगापुढे मांडले. विठ्ठलभक्ती हेच आपले व स्वार्थापासून परमार्थाकडे मार्गक्रमण करावे याचे अभेद ज्ञान तुकोबारायांनी आपल्याला अभंगांद्वारे दिले. तुकोबांच्या अनेक काव्यात प्रतिमा सृष्टीचा वापर करून प्रापंचिक मनुष्यास परमार्थाची शिकवण देतात.

तुकोबारायांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दिसतात. त्यांचे प्रत्येक अभंग स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आहेत. तुकारामांनी अभंग रूपाने उच्च प्रतीचे वाङ्मय जन्मास घातले आहे. तुकारामांच्या काळात समाज हा अज्ञान व अंधश्रद्धेने ग्रासलेला होता. विषमता वाढली होती. समाज अधःपतनाच्या मार्गावर होता. तेव्हा तत्कालीन परिस्थिती पाहून तुकोबारायांनी अध्यात्मिक उद्‌बोधन व प्रबोधन केले. धर्माच्या नावाखाली सामान्य माणसांची परिस्थिती बिकट केली जात होती. देव, नवस–सायास, ढोंगीपणा यालाच धर्माचे स्वरूप मानले जाऊ लागले. तीर्थयात्रेचे प्रमाण वाढले. संप्रदायातली, तसेच समाजातील विषमता, उच्च–नीचता यांचे स्तोम वाढले. तेव्हा तुकोबारायांनी आत्मपरीक्षण आणि समाजपरीक्षण केले व वारकरी संप्रदायात नवचैतन्य निर्माण करून सर्वस्त्रातील लोकांना भक्तीचा मार्ग दाखवून भागवत धर्माच्या झेंड्याखाली एकत्र आणून अध्यात्मिक लोकशाही निर्माण केली व भक्तीच्या अध्यात्माच्या क्षेत्रात समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तुकोबारायांच्या अभंगरूपी बंडखोरीमुळे त्यांची समाजोद्धाराची तळमळ दिसून येते.

''मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसें ।।१।।

मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ।।धृ।।

भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठ्याळाचे काठी देऊं माथां ।।३।।

मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रुहूनि ।।४।।

अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ।।५।।

---

[११६] जगद्‌गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्रं. ३७४३, पृ. क्र. ७५४

तुका म्हणे आम्ही अवघेची गोड । ज्याचें पुरे कोड त्याचेपरी ।।६।।''[११७]

तुकाराममहाराज प्रपंचात विन्मुख आणि परमार्थात सन्मुख झालेले आढळतात. तुकारामांनी मनातील अध्यात्मिक आशय व्यक्त करण्यासाठी काला, चेंडुफळी, हमामा, फुगडी, लखोटा, हुतूतू, मृदंग पाट्या, दळण–कांडण, टिपरी अशा रूपकात्मक अभंगांची निर्मिती त्यांनी केली. अशा प्रकारे मनुष्याने आपले दैनंदिन व्यवहार पार पाडत असताना परमेश्वराचे अखंड स्मरण ठेवले पाहिजे व आपली जन्म–मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती करून घेतली पाहिजे. असा अध्यात्मिक सार व तत्त्वज्ञान अनेक अभंगांमध्ये तुकाराम मांडतात. तुकारामांनी विठ्ठलभक्ती हेच धर्मकार्य मांडले. त्यामुळे जप–तप, व्रत, यज्ञ, दान–धर्म इत्यादी कर्मकांड दूर सारून विठ्ठल नामातच अध्यात्मिक अनुष्ठानाचा मार्ग शोधला. त्यांनी विविध प्रकारच्या सांप्रदायिक रचना केल्या. प्रामुख्याने त्यात भागवत पुराणाच्या श्रीकृष्णाच्या बाळक्रीडा, गौळणी, विरहिणी यांचा समावेश आहे.

४.४.१६ : तुकारामांचे व्यावहारिक ज्ञान व सामाजिक बांधिलकी :

तुकोबारायांनी आत्मनिरीक्षणाबरोबरच समाजाचेही सुक्ष्म निरीक्षण केले. समाजातील सर्वसामान्यांच्या व्यवहाराचेही निरीक्षण केले. तुकारामांना मानवी व्यवहाराचे रूप एखाद्या क्रीडेसारखे वाटते. त्यामुळे त्यांना आयुष्य म्हाणजे एक खेळ वाटतो व तो प्रत्येकाने हसत–हसतच खेळावा व त्या खेळातील यशापयश भगवंताच्या स्वाधीन करावे. हा खेळ खेळत असताना मनुष्यातला अहंभाव गळाल्याशिवाय तो जीवन व्यवहारातून यशस्वीपणे बाहेर पडत नाही. तुकोबारायांना आलेल्या स्वानुभवातून त्यांनी आपली अभिव्यक्ती प्रत्येक अभंगात मांडण्याचा प्रयत्न केलाय. क्रीडा सदृश व्यापारात रममाण झाल्यानंतर आपल्यातला दुजाभाव गळून एका अनामिक सुखाच्या ओढीने मनुष्य गरिशील राहतो. हे खेळाच्या व खेळसदृश व्यापाराच्या माध्यमातून घडते असे ते मानतात. जनसामान्यांपर्यंत भक्तीचे तत्त्वज्ञान रूपकातून व मनोरंजन साधनेतून मांडून तुकाराममहाराज एक प्रकारे लोकशिक्षण देण्याचाही प्रयत्न करतात.

---

[११७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्रं. ९८१, पृ. क्र. २१७

सारांश : अशा प्रकारे तुकाराम महाराजांचे भक्तिमार्ग व तत्त्वज्ञानाचे स्वरूप असून, त्यातून परमार्थ आणि अध्यात्म व त्यांच्याशी समन्वय साधत असलेला जीवन व्यवहार यांच्यातील सखोल भाव व अनुभूती प्रकट होते. भक्तिमार्ग व तत्त्वज्ञानाच्या अभंगात उत्कट जिव्हाळा आणि भेदकताही आहे. यातील प्रतिमा सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवन व्यवहारातील असून दृष्टान्त परिचयाचे वाटतात. सर्वसामान्यांच्या मनाला साद घालताना अभंगरचना आढळते. अभंगातील तुकारामांचे डोळस समाजचिंतन आणि सुक्ष्म निरीक्षण पहावयास मिळते. अशा विविधतेने नटलेले अभंग म्हणजे तुकारामांचा आयुष्याचा सार होय.

* * *

४.५ तुकाराममहाराजांच्या अभंगांतील लोकजीवनाचा आढावा :

४.५.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये विविध पद्धतीचे लोकजीवन आढळते, तसेच विविध धर्मांचे तत्त्वज्ञान, विविध कौशल्यपूर्ण व्यवसाय, कला तसेच विविध देव, देवता, सण, उत्सव यांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. मानवी जीवनाचे सामूहिक प्रतिपादन म्हणजे संस्कृती होय. लोकांनी स्वीकारलेल्या जीवन व्यवहारातील कौशल्ये, दैनंदिन व्यवहार, सण–उत्सव यांचा समावेशही संस्कृतीमध्ये आढळून येतो. या संस्कृतीमध्ये मानव एकमेकांसोबत बांधला गेला आहे व ही बांधिलकी जपताना लोकरूढी, लोकसमजुती, परंपरागत सवयीतून स्वीकारलेला लोकव्यवहार सामाजिक बांधिलकी लोकसमूहात मोडली जाते. धर्म, समाज आणि कुटुंब या तीन संस्थांच्या माध्यमातून तो आपले लोकव्यवहार सांभाळत असतो. हे लोकव्यवहार सांभाळत असताना रूढी, समजुती, परंपरागत सवयी, प्रथा, अंधश्रद्धा यांचा त्यांच्या जीवनावर परिणाम करीत असतात, आणि त्याचेच दर्शन आपल्याला लोकजीवनातून होते.

संत तुकाराममहाराजांच्या अभंगगाथेतही हे लोकजीवन व्यक्त झालेले आढळते. तुकारामांनी आपला भक्तिमार्ग, अध्यात्म विचार जनसामान्यांत रूजवण्यासाठी समाजातील लोकजीवनाचा वापर मोठ्या हुशारीने केलेला आढळतो. या लोकजीवनात जाती–जमाती, गुरे–ढोरे, कृषिसंबंध, व्यवसायाभिमुखता, लोकांची आर्थिक, सामाजिक स्थिती तत्कालीन गावगाडा, गावातील लोक भूमिका, कृषीसंदर्भ गोधन संदर्भ खेळ, उत्सव, सण–समारंभ, स्त्री जीवन, दळण कांडण, स्त्रियांचे सण–समारंभ इत्यादींचा वापर लोकसंस्कृतीच्या साहाय्याने व लोकजीवनाचा आढावा घेताना तुकारामांनी केलेला आढळतो.

४.५.२ : लोकजीवन – व्याख्या व व्याप्ती :

'लोक' म्हणजे संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग; लोक म्हणजे समाजातील मानवी समूह असा एक सर्वसामान्य अर्थ आहे. लोकजीवनामध्ये अनेक गोष्टींचा समावेश होतो. लोक या शब्दाच्या अनेक व्याख्या प्रचलित आहेत. लोक म्हणजे पृथ्वीतलावरील मानवी समुदाय असाही लावता येईल. 'लोक' हा शब्द विशिष्ट अर्थामध्ये मर्यादित न राहता अमर्याद असे समाजाचे गतिशील जीवन होय. सर्वसाधारणपणे जगातील मानवी समूहासाठी लोक असा व्यापक शब्द वापरला जातो. लोकजीवन हे मानवी समाजाच्या संस्कृतीचा भाग असे समजले जाते. प्राचीन परंपरेने शहरी, ग्रामीण असा भेद न करता मानवी समूहाने एकत्रित येऊन आपले जीवन सुसह्य होण्यासाठी एका विशिष्ट परंपरेचा अवलंब केलेला दिसतो. लोकांच्या जीवनरहाटीचे कृतिशील प्रतिबिंब हे त्यांच्या लोकजीवनातून व्यक्त होत असते.

[११८]ना. गो. कालेकर लोक व लोकजीवनाविषयी म्हणतात, 'लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीने दर्शन घडविणारा वर्ग, ही संस्कृती स्वाभाविकपणे जपते आणि निसर्गाला अगदी जवळची आहे. बाह्य संस्कारापासून अलिप्त राहिल्यामुळे तिच्यात पुराणतत्त्व असे निर्भळ अवशेष अधिक प्रमाणात मिळू शकतात. ती आद्य संस्कृती नसली, तरी तिची जुन्यात जुनी उपलब्ध होऊ शकणारी अवस्था ही अवस्था काही माणसांच्या जीवनविषयक सवयीतून, रूढीतून परंपरागत नृत्यगीतांच्या कलाकृतीतून प्रकट होऊ शकते. या माणसांनी बनलेला समाज म्हणजेच लोक. याचाच अर्थ असा होतो की, संस्कृतीचे दर्शन घडविणारे समूह म्हणजे लोक. लोकजीवनामध्ये प्राचीन काळापासून ते आत्तापर्यंतच्या काळापर्यंतचे समज, गैरसमज आढळून येतात. लोक हे संस्कृतीचे दर्शन घडवितात व ही संस्कृती काळाच्या प्रवाहाप्रमाणे प्रवास करत असते. लोकजीवन हे कायम एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपविले जाते. लोकजीवनामध्ये सांस्कृतिक पाया रचला जातो व त्याची जपणूक केली जाते. लोकजीवनात लोकजीवन हे रूढी, सवयी, श्रद्धा, भावना, परंपरा या सर्वांनी जपले जाते. लोकजीवनात लोकांची एक सांस्कृतिक

[११८] कालेलकर ना. गो., **भाषा आणि संस्कृती,** मौज प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. ९४.

जडणघडण घडत जाते. निसर्गाच्या जवळ जाणारी. निसर्गाशी एकरूप होऊन जीवन जगणे म्हणजेच लोकजीवन होय. लोकविश्वासावर लोकधर्म अवलंबून असतात. विविध प्रकारचे रीतीरिवाज, रूढी, परंपरा, धार्मिक, विधी, निसर्ग घटक जसे – आकाश पृथ्वी विविध प्रकारच्या वनस्पती, डोंगर, दऱ्या, मानवनिमित वेगवेगळ्या वस्तू, भविष्यवाणी, पाप–पुण्य, शकुन अपशकुनाच्या सामाजिक घडण लोकसमजुती, लोकसाहित्यातील विविध घटक, विविध प्रकारचे साक्षात्कार, दृष्टान्त, देवदेवतांचे अवतार, मंत्र–तंत्र तोडगे, विविध विधिप्रक्रिया या साऱ्यांचा विचार लोकजीवनामध्ये करावा लागतो. लोकजीवनामध्ये पिढ्यान्पिढ्या चालत आलेले नियम व संकेत यांना जपले जाते. बऱ्याचदा भक्तिवादाच्या कसोटीवर अनेक निकषाच्या संबंधांवर लोक व लोकजीवनाने स्वीकारलेले नियम टिकत नाहीत. लोकजीवनात लोकतत्त्वांचा समावेश असतो. लोकसाहित्यात,''लोकश्रद्धा, अंधश्रद्धा, चालीरीती, नृत्य, नाटके इत्यादी सादरीकरण समाविष्ट असूनही ते लोकसंबंधाचे शास्त्र नाही, तर लोकपरंपरा आणि लोकवाङ्मयाचे ते शास्त्र आहे.

'समाज या संकल्पनेलाच आपण लोक अशी संज्ञा वापरतो.' लोक म्हणजे धार्मिक, वांशिक, सामाजिक, भावनिक उद्दिष्टांचे अनुकरण करणारा समाज. सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी असणारा व्यक्तिसमूह म्हणजे लोक होय. लोकजीवन हे आपल्या प्रथा, परंपरा, रूढी, नृत्य, कला, संगीत या असंख्य माध्यमांतून निश्चित केले जाते. [११९] रा. चिं. ढेरे यांनी संतसाहित्य आणि लोक साहित्यिक ही अनुबंध या आपल्या ग्रंथात समर्पक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. लोकजीवनाचे, लोकसंस्कृतीचे दर्शन मौखिक वाङ्मयातून घडते. अभंग, ओवी, कविता, लोकगीते यातून लोकजीवनाचे दर्शन घडते. लोक रूढी, विधी– विधाने, आचार–विचार, परंपरा ही तत्त्वे कळत नकळत लोकजीवनात स्वीकारली जातात. अभंगांतून लोकसमाज, लोकविधी, शुभ–अशुभच्या घटना लोकरूढी लोक परंपरा अशा प्रकारच्या संदर्भाचे उल्लेख दिसून येतात. जीवनात चालत आलेल्या परंपरेने लोकजीवनातील रूढी, परंपरा, आचार–

[११९] ढेरे रा. चिं., **संतसाहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९७८, पृ.क्र. ४५, ३९, ४०

विचार, लोकसमजुती, लोक, श्रद्धा, लोक विश्वास, लोक धर्मांतर्गत येणाऱ्या बाबी संस्कार विधी धर्मविधी लोककला आणि मौखिक, वाङ्मय इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होतो.

मध्यमयुगीन मराठी साहित्य हे लोकभाषा, लोकप्रथा ओवी, अभंग यांनी सजलेले दिसते. उदा. वासुदेव, वाघ्या, मुरळी, पोतराज, डोंबारी, पोनाटी, जोतीशी, सरोदी इत्यादींचा उल्लेख सर्वच संतांनी केलेला आढळतो. ग्रंथात आपल्याला तो जास्त प्रमाणात पहावयास मिळतो. लोकजीवनात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व अध्यात्मिक जीवन आपल्याला दिसते. अभंगांतून सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक दर्शन घडते. अभंगाचा अभ्यास करताना लोकजीवनाचे संदर्भ आढळतात. लोकजीवनातील विधी, आधार, विचार, शुभ–अशुभ, जन्म–मृत्यू त्या वेळच्या चालीरीती व समजुती, सण–उत्सवाचे सादरीकरण हे अभंगांतून दिसून येते.

संत तुकाराममहाराज लोकमानसांत वावरणारे संत होते. ग्रामव्यवस्थेतील सर्व घटकांच्या सामाजिकतेचा त्यांनी डोळसपणे वेध घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या अभंगांमधून लोकजीवन ठसठशीतपणे व्यक्त झालेले दिसते. लोकजीवनाला अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण झाल्यानंतर इतर गरजांकडेही लक्ष द्यावे लागते. लोकजीवनाचा हा टप्पा म्हणजे लोकधर्माचा प्रवास होय. समाजामध्ये विविध मानसिकतेचे लोक राहत असतात. त्यांच्या वृत्ती, प्रवृत्तीचे, नियमन करण्यासाठी, नियमांची आवश्यकता निर्माण होते. परिस्थितीनुसार हे नियम लोकजीवनाकडून सामाजिकरीत्या निर्माण केले जातात व स्वीकारले जातात. विठ्ठल वाघ लोकधर्माचा पाया स्पष्ट करताना म्हणतात, 'जनमानसाचा स्वत:चा एक लोक धर्म असतो. त्यालाच ते शास्त्र मानते. त्याविषयी सहज सरळ धारा ठेवते. सच्चेपणाने त्याचे आचरण करते. त्याविषयीच्या खरेपणाबद्दल ते निःशंक असते. कधी साशंक झाले, तर त्यामुळे पाप लागण्याची भीती ते बाळगत असते. त्यातून काही दुर्दैव होण्याचे भय बाळगते. या श्रद्धा म्हणजे लोक धर्माचा पाया असतात. तुकाराममहाराजांच्या अभंग गाथेमध्ये असे लोक धर्म व लोकजीवन व्यक्त झाले आहे. तुकाराममहाराजांनी देह–धर्म, मूर्ती, देवळे, पूजा आरत्या, पोथ्या, पुराण, भजन, कीर्तन, तीर्थक्षेत्र व यात्रा यांमधून विविध लोकजीवन स्पष्ट केले आहे. तत्कालीन सामाजिक श्रद्धा व

अंधश्रद्धा, पाप–पुण्य संकल्पना, नवस–सायास त्यांनी व्यक्त केले आहे. सण–उत्सव, नवस–सायास, लोक–ब्रह्मलोक समजुती यांचे स्वरूप करते होते, हेही त्यांनी आपल्या अभंगांतून व्यक्त केले आहे. लौकिक जीवनात माणसाला अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात व त्या निवारण करण्यासाठी मानव कल्याणाच्या भूमिकेतून मानवतावादी प्रयत्न करताना दिसतो. त्याचे लौकिक जीवन सुस्थिर करण्यासाठी आपल्या सोईप्रमाणे लोक परंपरा, लोकरूढी, लोकविधी, लोकसंकेत याचा समावेश आचरणात आणलेला दिसतो. लोकतत्त्व आणि यहवादाचा संबंध माणसाच्या लौकिक जीवन जगण्याच्या परंपरेनुसार भौतिकवादी आणि विज्ञानवादी, दृष्टीने विकास करण्याचा प्रयत्न करतो. अभंग हे वेगवेगळ्या प्रसंगानुसार भावनेनुसार म्हणजे भक्तियोग उपदेश, नामस्मरण, सामाजिक जाणीव, ढोंगी साधू, समाजातील वाईट प्रथा, रूढी–परंपरा, गोंधळ, पांगुळ, डंका अशा व इतर अनेक प्रासंगिक अभंग गाथेत दिसतात. वैज्ञानिक जाणीव, भौतिक प्रगती, मानव कल्याणाची मानवतावादी भूमिका दारिद्र्य निवारण, शुभ–अशुभ कल्पना, संस्कृतीचा विकास यांसारख्या गोष्टींचा समावेश लोकजीवनामध्ये आढळून येतो. तुकारामांच्या अभंग गाथेतील अभंग व ज्यातील लोकजीवन हे अत्यंत अमूल्य आहे. त्यांच्या उपदेशाचे संस्काराचे प्रतिबिंब अभंगांतून दिसून येते. याचा अभ्यास केला असता लोकांचे जीवन दर्शन त्या काळातील विधी–परंपरा, सण–उत्सव, लोकगीते, लोकसंस्कृतीचे दर्शन आपल्याला अभंगांतून पहावयास मिळते. अभंगांतून माणसांचे आचार–विचार, भावभावना मानसिकता जीवनातील अध्यात्मिक, भौतिक संकल्पना, त्यातील व्यापकता आणि विविधता ही तत्त्वे अभंगांतून ओसंडून वाहतात. समाजात सण उत्सव, परंपरा, रूढी–परंपरा जोपासण्याची प्राचीन परंपरा आढळते. अध्यात्मिक लोकतत्त्व व वाङ्मयीन जीवन अभंगाच्या स्वरूपातून समाजात मांडले. संत तुकाराममहाराजांनी हजारो अभंग, तुकाराम गाथेत मांडले. अनेक अभंगांमधून लोकजीवनाचा विचार मांडला. त्यांनी अभंगांतून समाजातील वाईट गोष्टींवर कोरडे ओढले. समाजातील वाईट प्रथा, रूढी–परंपरा, शुभ–अशुभ कल्पना समजुती, चालीरीती यावरही भाष्य अभंगांतून जाणवते. लोकजीवनामध्ये प्राचीन काळांच्या रूढीचे समृद्धीचे अवशेष सापडते. लोकजीवनामधून लोकगीते, लोकनृत्ये हे लोकप्रकार दिसून येतात. थोडक्यात, लोकजीवन हे प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे व भविष्यातही राहील.

जनसमुदायाचे 'लोकजीवन' हे निसर्गाच्या अधिक जवळ जाणारे असते. लोकजीवनात रूढी, सवयी, श्रद्धा यांना महत्त्वाचे स्थान असते. लोकजीवनात लोकांची विशिष्ट जडणघडण घडत असते. त्यामुळे एका ठरावीक साचात त्याची व्याप्ती करणे अवघड आहे. लोकजीवनाचा अभ्यास करताना लोकतत्त्व निर्मितीस साह्यभूत असलेल्या घटकांचा विचार करावा लागतो. निसर्गातील दृश्य–अदृश्य, भूत पिशाच्च शक्ती यांचा अर्थ लावताना, परमेश्वराचा शोध घेताना कौटुंबिक, सामाजिक, सुखसमृद्धी आचरण, विविध समजुती, लोकतत्त्व निर्मितीसाठी साह्यभूत होतात.

१. लोकविश्वास व लोकसमजूत :– विविध समजूती, शकुन–अपशकुन इ. संदर्भातील समज.

२. लोकसंस्कार :– जन्म, मृत्यू, उपनयन, विवाह, इ. संस्कार मानवी जीवनात १६ संस्कार मानले जातात.

३. लोकजीवन सण–उत्सव :– व्रत, अनुष्ठान ऋतू व परंपरेनुसार नाती–गोती

४. पाप–पुण्य – नाती–गोती याच्याशी संबंधित विविध कृत्ये

५. लोकव्यवसाय :– शेती, पशुपालन, १२ बलुतेदारी, कृषी संस्कृतीशी संबंधित सारखे सजीव, निर्जीव घटक.

६. लोकजीवनातील सामान्य घटक :– वस्त्रालंकार, वेशभूषा, आचार–विचार

७. लोकभाषा :– म्हणी, सुभाषिते, उखाणे इ. देवधर्म, पूजा, अर्चा

८. कला–क्रीडा :– लोकगीत, लोक कथा, लोककला, नृत्यकला, चित्रकला, गायन, वादन इ. विविध खेळ.

९. विविध लोकजीवनातील मनोरंजन :– गोंधळी, वासुदेव, वाघ्या, मुरळी इ.

लोकजीवनाचे वर्गीकरण हे सामाजिक लोकजीवन, सांस्कृतिक लोकजीवन व अध्यात्मिक लोकजीवन असे केले जाईल. लोकजीवनाची ही व्याप्ती स्वयंपूर्ण खेड्यांमध्ये वर्षानुवर्षे जपली जाते. लोक साहित्याने लोकगीते जपली जातात. लोकसाहित्य लोकजीवनामध्ये विविध प्रकारच्या लोककथांच्या माध्यमातून व्यक्त केल्या जातात. या कथा अनेक प्रकारच्या असतात. उदा :– बोधकथा, दंतकथा, हास्यकथा, उत्यत्तिकथा, देविकथा, धार्मिक कथा यांसारख्या माध्यमातून व्यक्त केल्या जातात. लोकजीवन हे विविध रंगांनी सजलेले आहे. वाघ्या–मुरळी, भराडी, भुते, धनगर, पोतराज, गोंधळी, वासुदेव विविध प्रकारची कला सादर करतात. विविध सण–उत्सवांच्या प्रसंगी गाणी गायली जातात. उदा. नागपंचमीची गाणी, वसुबारस, बैलपोळा, हम्मामा, फुगडी, हुतूतू, गौरी, गणपती यांमधून लोकजीवन प्रकट होत असताना दिसते. लोकजीवनामध्ये श्रमाला विशिष्ट प्रकारचे महत्त्व आहे. श्रमपरिहार करण्यासाठी 'भलेरी'सारखी सामुहिकगाणी गायली जातात. भाषेच्या माध्यमातून लोकजीवनातील भाव–भावना जपल्या आहेत. लोकजीवनात विविध लोकविश्वासाच्या गोष्टी दिसून येतात. लोकभ्रमाचा पगडा लोकजीवनात दिसून येतो. करणीबाधा, भुते–खेते, शकुन–अपशकुन अशा लोक समजुतीही लोकजीवनात आढळतात. पाप–पुण्याच्या संकल्पना, सण–उत्सव, पूजा, अर्चा यांचा समावेश दिसतो. भालचंद्र नेमाडे यांनी लोकजीवनाची व्याप्ती अशी मांडली आहे. ''पुराण, प्रवचन, पारायण, पाठ यांसारख्या धार्मिक प्रकारांबरोबरच ओवी, अभंग, पदभूपाळी, पाळणे, गण–गौळण, विराणे, श्लोक, कृष्णलीला, पद्यचरित्र यांसारख्या नाट्यात्मक आणि संगीतात्मक प्रकारांचाही काही प्रसंगी प्रयोग होतो. मंत्र, नामस्मरण आणि हरिपाठ हे वैयक्तिक पूजेसाठी, तर कथा, पोथी, सप्ताह, कला, पालखी, दिंडी, वारी, भजन या गोष्टी मोठ्या समूहाच्या एकत्र येण्यावर अवलंबून असतात. या सर्व कलाप्रकारांमध्ये खेड्यातील लोकांच्या विविध भूमिका फार महत्त्वाच्या असल्याने त्यांच्यातील सर्जक गुणांच्या आविष्काराला भरपूर वाव मिळतो. यामधून लोकजीवनाची अधिक व्याप्ती स्पष्ट होते.

तुकाराममहाराजांनी लोकजीवनातील विविध रूढी, परंपरा, समाज जीवन, राजकीय जीवन, आलुतेदार, बलुतेदार, फिरस्त्या जाती, विविध सण, व्रतवैकल्ये, विविध देवतांच्या पूजा–

अर्चा, कीर्तन, प्रवचन या साऱ्यांच्या वर्णनांतून व्यापक अर्थाने लोकजीवन मांडले आहे. लोकजीवनामध्ये पिढ्यान्‌पिढ्या चालत असलेले नियम व संकेत यांना जपलेले असते. बुद्धिवादाच्या कसोटीवर, तर्कावर व कारण कार्यसंबंधाच्या निकषावर लोकजीवन टिकत नाही, तर ते पारंपरिकता श्रद्धा भावना यांच्या आधारे ढोबळमानाने जपले जातात.

लोकसाहित्य, लोकवाङ्मय याची निर्मिती समूहात होत असते. त्यामुळे त्यांचा निर्माता कोणी व्यक्तिनिष्ठ नसून लोक असतो. हा लोक म्हणजेच एक प्रकारचा सांस्कृतिक जडणघडणीतून निर्माण होणारा मानवी समुदाय होय. लोकमानस संस्कृतीची जडणघडण करतो आणि ही जडणघडण व्यक्तिनिष्ठ नसून अनेक पूरक गोष्टींच्या माध्यमांतून व्यक्त होताना दिसते. लोकसंस्कृतीला पारंपरिकतेचा आधार असतो. पारंपरिक जीवनातील रूढी, श्रद्धा, विश्वास, आचार, लोककला आणि पारंपरिक लोकांचे वाङ्मय यातूनच लोकसंस्कृतीची घडण होत असते. लोकांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व भौतिक, जीवन विषयाचे प्रतिबिंब लोकसंस्कृतीत आपणास दिसून येते. लोकजीवनात लोकसंस्कृती, लोकधर्म व लोकवाङ्मय लोकतत्त्वांचा समावेश होत असतो.

४.५.३ महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा :

मध्यमयुगीन कालखंडात मानवी जीवन हे धर्मकेंद्रित होते. धर्माच्या आधाराशिवाय कोणत्याही गोष्टींना महत्त्व नव्हते. धार्मिक विचारांचा स्वीकार करून त्या रूढी–परंपरांवर आचरण करणाऱ्या व्यक्तींचा एक विशिष्ट गट होता. वैदिक–अवैदिक अशा स्वरूपाचाही संघर्ष तत्कालीन सुरू होता. कर्मकांडांचे स्तोम माजले होते. बहुजनांच्या मुक्तीसाठी त्यांच्या अस्तित्वाची जाणीव श्री चक्रधर स्वामी, गौतम बुद्ध व वारकरी संप्रदायाने करून दिली. तद्‌नंतर महानुभाव व वारकरी संप्रदाय महाराष्ट्रात निर्माण झाले. या पंथांच्या प्रवर्तकांनी शाश्वत सुखाची व विश्वात्मक भावनेची संकल्पना लोकांसमोर मांडली. ही संकल्पना सर्व सरळ–सोपी वाटल्याने लोकांनीही तिचा स्वीकार केला. महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांची ही भूमिकाही महत्त्वपूर्ण आहे. ही परंपरा बाराव्या शतकापासून सुरू झाली. सर्वांना समजेल अशा भाषेतच संतांनी उपदेश केला व

अध्यात्म लोकांपर्यंत नेऊन पोहचवले. तत्कालीन महाराष्ट्रातील सर्व समाजाला एकत्र ठेवू शकेल असा राजकीय, धार्मिक किंवा सांस्कृतिक पातळीवर कोणताही प्रभावी विचार नव्हता. अंधश्रद्धा, व्रतवैकल्य व कर्मकांड समाजात शिगेला जाऊन पोहोचली होती. भ्रमाचे सर्वजनिक स्वरूप जाऊन तो व्यक्तिगत स्वरूपाचा झाला होता. अशा पार्श्वभूमीवर संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांनी धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक आंदोलन उभारले व ते जोमाने पुढे नेले. वारकरी संप्रदायाने बहुजन समाजाला धार्मिक समाधान आणि आनंद मिळवून दिला. वारकरी संप्रदायाचे अद्वैत तत्त्वज्ञान महाराष्ट्रात हळूहळू रुजू लागले. संतांनी लोकांचे मानसशास्त्र जाणून मनोरंजनाच्या साहाय्यातून प्रबोधनाचे कार्य केले. संत एकनाथ व संत तुकारामांनी अभंग, गौळणी, हरिपाठ, स्फूटपदे, भारूडे या साऱ्यांची परंपरा जपून तत्कालीन लोकांना वाट दाखविण्याचा प्रयत्न केला.

सामूहिक लोकजीवनात व्रत–वैकल्ये, सण–वार, धार्मिक लोकउत्सवांना महत्त्व असते. तेराव्या शतकात प्रामुख्याने कुळधर्माचे व धर्मभावनेचे प्राबल्य होते. महाराष्ट्रातील लोकजीवनावर विविध कर्मांचा व सांस्कृतिक संस्थांचा फार मोठा प्रभाव पडलेला होता. बहुजन समाजावरही या लोकसंस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. त्यामध्ये गोंधळी वासुदेव, भुते, पोतराज, पिंगळा, पांगळू, वाघ्या–मुरळी बहुरूपी यांचा समावेश होतो. तसेच कीर्तन, ललित, भजन इत्यादी लोक प्रकटन संस्थांचाही वापर संतांनी या कालखंडात केलेला दिसतो. लोकउद्धाराचे कार्य करताना संतांनी लोकजीवनाचे अत्यंत सुक्ष्मपणे निरीक्षण केलेले दिसते. याच कालखंडात संत तुकारामांचेही कार्य लोकपरंपरेला धरून लोकसंस्कृतीचा आधार घेऊन पार पाडलेले आढळते.

लोक उद्धाराचे कार्य करताना तुकोबारायांनी लोकजीवनाचे अत्यंत सुक्ष्मपणे अवलोकन केले आहे. लोकभावना व लोकश्रद्धा न दुखवता त्यांच्या विचारांना योग्य दिशा देण्याचे कार्य तुकोबारायांनी केले आहे. सहज, सुलभ, जातीनिरपेक्ष स्त्री–पुरुष भेदविरहित विचार या सर्व गोष्टींचा आधार घेत संत तुकारामांनी व्यक्तिगत व सामाजिक नीतीवर अतिशय भर दिला.

समाजाला डोळस भक्तीच्या साहाय्याने धर्म, नीती, दया, पाप–पुण्य इत्यादी संकल्पना स्पष्ट केल्या.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा विचार केला असता मध्यमयुगातील तत्कालीन लोक खेड्यापाड्यात राहत असल्याने सामाजिक परिस्थितीवर नागरी संस्कृतीपेक्षा लोकप्रधान संस्कृतीचाच प्रभाव दिसून येतो. प्राचीन काळापासून चालत आलेल्या रूढी–परंपरा, उत्सव यांना धरून राहिलेला समाज दिसतो. संतांनी धर्मप्रसाराच्या दृष्टीने लोकसंस्कृतीच्या विविध माध्यमांचे बारकाईने अवलोकन केलेले आढळते. लोकप्रतिभेच्या साहाय्याने आपल्या सुख–दु:खाचे स्पष्टीकरण करताना ते आढळतात.

४.५.४ : महाराष्ट्राचा सांस्कृतिक कालखंड :

तेराव्या शतकात जी राजकीय–धार्मिक प्रवर्तने झालीत त्यामध्ये महाराष्ट्रातील संतांची समाजासाठी योगदानाची भूमिका महत्त्वाची ठरते. संतांनी आपल्या कार्यास ज्ञानाचे सत्याचे व विवेकाचे भक्कम अधिष्ठान याच कालखंडात दिले. अंधश्रद्धा, बुवाबाजी, भोंदूपणा या साऱ्या पार्श्वभूमीवर भागवत धर्माच्या झेंड्याखाली बहुजन समाजाला आणण्याचे कार्य लोकशिक्षक या नात्याने या कालखंडात संतांनी केले. नीती व धर्म या तत्त्वावरच त्यांनी आपापले कार्य केले. या कालखंडात संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदयाचा पाया रचला व या संप्रदायाला सामाजिकदृष्ट्या अधिक कार्यक्षम केले. समता, स्वातंत्र्य व अहिंसा आदी तत्त्वांचा समावेश करून समाजाला नवा दृष्टिकोन दिला.

संत एकनाथांच्या काळात दक्षिणेत इस्लामी राजवट सुरू होती. ती संत तुकारामपूर्व काळापर्यंत अबाधित होती. या सत्तेने हिंदूंच्या सांस्कृतिक जीवनावर आघात करून इस्लामी संस्कृतीचा पुरस्कार केला. त्याचा परिणाम मराठी स्थळ, नाम, व्यक्तिनाम, पोशाख इत्यार्दीवर झाला. सांस्कृतिक आक्रमण व राजकीय आक्रमण अशा दुहेरी ओझ्याखाली हिंदू समाज दडपून गेला.

अशा परिस्थितीत महानुभाव, वारकरी संप्रदाय सामाजिक जागृतीचे कार्य करत होते. संत एकनाथांनी बहामनी काळात आपले कार्य सिद्धीस नेले तर संत तुकारामांनी शिवराय काळात आपले कार्य सिद्धीस नेले.

४.५.५ : संतसाहित्य व सांस्कृतिक दर्शन :

वारकरी संप्रादयाने महाराष्ट्रातील सामाजिक सांस्कृतिक जडण–घडणीच्या दृष्टीने मोलाचे योगदान केले आहे. संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम या प्रमुख संतांनी संतसाहित्य व आपआपल्या वाङ्मयाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील समाजाला नवी दिशा व नवा विचार देऊन समाज जागृतीचे अनन्य महत्त्वाचे कार्य केले आहे. सामाजिक व सांस्कृतिक जडण–घडण जपण्यासाठी त्यांनी समाजात समता आणि एकात्मता स्थापित केली. कर्मकांड, व्रत–वैकल्य, नवस–सायास अशा अज्ञानी विधी व प्रवृत्तींना ज्ञानेश्वरांनी सामाजिकदृष्ट्या एकरूप करून स्वधर्माची आठवण करून दिली. तसेच समाजाला स्वधर्माचरण शिकवून सर्वसामान्यांना आत्मविश्वास निर्माण व्हावा या हेतूने संत साहित्याची निर्मिती झाली. आपल्या साहित्यातून त्यांनी भक्तीची सूत्रे, तसेच सामाजिक एकात्मतेची जाणीव करून दिली व लोकांना आत्मविश्वासाचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी वैदिक धर्माचा व सामाजिक जीवन धर्माचा पाया बळकट करून जनसामान्यांच्या मनात एक नवीन जीवननिष्ठा निर्माण केली. तेराव्या शतकाच्या अखेरीस ज्ञानदेव आणि नामदेव यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीला प्रारंभ केला. बुरसटलेल्या समाजाला स्वधर्म सामाजिक नीती जातिभेद रहित मानवतेची शिकवण दिली. त्यामुळे संप्रदायाच्या एका छत्राखालील अठरापगड जातीतील संत एकत्र येऊन त्यांनी आपले अध्यात्मिक कार्य केले. भागवत धर्माच्या प्रसाराबरोबरच समाजातील अपप्रवृत्तीविरूद्धही त्यांनी लढा दिला. साऱ्या समाजाला नीतिमूल्यांची आठवण आपल्या साहित्यातून करून दिली. समाजव्यापी धर्मकार्य करण्याचे मोलाचे कार्य संप्रदायाने आपल्या साहित्यातून केले. वर्णभेद, जातिभेद भक्ती परंपरेच्या साहाय्याने दूर करून संप्रदायाने सामाजिक प्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले. तत्कालीन संतांनी समाजाला नवा विचार देऊन नीतिमूल्यांचा आधारस्तंभ निर्माण करून

दिला. संत साहित्याने डोळस भक्तीचा पुरस्कार केला. तेराव्या–चौदाव्या शतकातील साहित्याकडे पाहिले असता त्यांचे असे स्वतंत्र वाङ्मयीन अस्तित्व दिसून येते. या साहित्यात सहिष्णुतेचा भाव सामाजिक प्रबलीकरण मानवतावादी भावना आढळून येते. म्हणूनच महाराष्ट्रातही संतांची भूमी आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही व महाराष्ट्रात अनेक 'संत' उदयास आले व त्यांचे कार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. तसेच आपल्या साहित्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांना प्रेरणा व अद्वैत भावाची शिकवण त्यांनी दिली. संतांच्या भूमीत व बहुजनांच्या मनामनांत मोलाचे स्थान प्राप्त करून दिले.

४.५.६ : गाथेतील समाजदर्शन :

संत तुकारामकालीन समाजात लोक प्रकटन संस्था निर्माण झाल्या. त्या धार्मिक विधी उपासना आणि देव भक्तीशी जोडलेल्या प्राचीन लोक संस्कृतीतील लोकजीवनाची, मनोरंजनाच्या साधनांशी जोडल्या गेल्या. लोक संस्कृती मनोरंजनासाठी जी साधने उपलब्ध करीत ती धार्मिक विधी व देवधर्माशी जोडलेली असेल, तसेच शरीरसौष्ठव, शरीरकौशल्य निर्मिती आणि त्या संदर्भात निगडित असलेले खेळ या साऱ्यांशी जोडली जात असे. दळण–कांडण, आडसण यांसारख्या तसेच पेरणी, नांगरणी, कोळपणी अशा जीवनातील दैनंदिन कष्टपूर्ण क्रिया तत्कालीन स्त्री–पुरुष करत, तेव्हा श्रमपरिहारार्थ तत्कालीन समाज गाणी, काला, चेंडुफळी, फुगड्या हमामा, हुंबरी, हुतूतू, टिपरी, विटी–दांडू, मृदंग, आट्या–पाट्या यांसारख्या लोकपरंपरेतील खेळ दैनंदिन गोष्टीला ग्रामव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान मिळाले होते. अशिक्षित भाबड्या परंपरा प्रिय समाज क्रीडात्मक मनोरंजनाचे प्रकार हे तत्कालीन समाजाचे जिव्हाळ्याचे विषय होते. म्हणूनच संत तुकारामांनी रूपकात्मक अभंगांचा लोकजीवनात वापर करून आपला अध्यात्मिक आशय मांडला. गाथेच्या अभ्यासांतर्गत तुकारामांच्या बालपणी खेळलेल्या अनेक खेळांचे संदर्भ येतात. तुकारामकालीन लोकजीवन अनेक पारंपरिक क्रीडांनी संपन्न आढळून येते. विटी–दांडू, चेंडू–फळी, लगोऱ्या, हम्मामा, हुंबरी, घोंगडी अशी अनेक अपरिचित नावेही आढळतात. खेळाची लोकप्रियताही तुकारामांच्या अभंगांतून दिसून येते.

४.५.६.१ गावगाडा : तत्कालीन गाव गाड्यात लोकधर्म, लोकगीते, लोककला, नंदी बैल, लोकसंस्कृतीचाही समावेश दिसून येतो. तुकारामकालीन गावगाड्यातील गावाची संकल्पना, गावाची एक विशिष्ट व्याख्या मांडता येते. ज्याच्याभोवती वहिवाटीला योग्य जमीन आहे आणि ज्याच्या अंतर्गत मातबर शेतकरी व ते करण्यासाठी मुबलक प्रमाणात मजूर आहेत व अशा लोक समूहाच्या ठिकाणाला 'गाव' असे संबोधले जाते. साधारणपणे गावातील जमिनीचे दोन भाग पडतात. ज्या भागावर मनुष्य आपल्या निवासाची सोय करतो व गुरेढोरे सांभाळतो ती पांढरी आई किंवा तिला गावठाण असे म्हटले जाते.

ज्या भागात पिके घेतली जातात तिला काळी आई किंवा रान आणि शिवार असे म्हटले जात असे. गावामध्ये राहून शिवारातील शेती करणे कठीण जाऊ लागले. त्यामुळे लोक गावठाण सोडून शिवारात वस्ती करू लागले. गावे ही शेतीविषयक व्यवहारात गुंतलेली असे वेदांत वर्णन आहे. वेदकाळातील ग्रामीण जीवनावर शेतीव्यवहाराचा पगडा होता.

४.५.६.२ जाती, पोटजाती, वर्ण, बलुतेदार : संत तुकारामांच्या अभंगांमध्ये विविध जाती–जमातींचा उल्लेख आला आहे. हे अभंग जातीचे गुणवैशिष्ट्ये व अध्यात्मिक भावार्थ याचा समन्वय साधताना आढळतात. तुकारामांनी आपल्या अभंगांतून तत्कालीन लोकस्थितीचे विदारक चित्र उभे केले आहे. समाजातील विविध स्थितीचे दर्शन त्यांच्या अभंगांतून घडते. समाज आणि लोकसमूह याचा संबंध तत्कालीन ग्रामव्यवस्थेशी मोठ्या प्रमाणावर जोडला जातो. [१२०] डॉ. किशोर सानप म्हणतात – तुकोबांना आपल्या आयुष्यात खूप दु:खे भोगावी लागली. इ. स. १६२९ पूर्वीच त्यांचे वडील बोल्होबा व आई कनकाई मरण पावली. साऊजीची पत्नी मरण पावली. साऊजी संन्यास घेऊन घरून निघून गेला. दुष्काळाचा भयावह व चित्तथरारक काळ त्यांना पाहावा लागला. डोळ्यादेखत अनेक लोकांना मरताना पाहिले मुसलमानी शतकामध्ये वारंवार होणाऱ्या दुष्काळामुळे देहूच्या आसपासचा प्रदेश दहशतीखली वावरत होता. नंतर पटकीची बिमारी आली आणि लोक बिमारीने मेले. अन्नान्नदशा झाली, शेती पिकली नाही, दोन वर्षे पाऊस झाला नाही.

[१२०] सानप किशोर, **तुकाराम व्यक्तिमत्व आणि कवित्व,** लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९९५, पृ.क्र. २०.

लोक झाडाचा पाला खाऊन जगू लागले. शेती आणि व्यवसाय बुडाले. याच दुष्काळात तुकारामांची पत्नी आणि संतोबा तडफडून गेले. परपीडा स्वत:च्या व्यवसायाची धुळधाण त्यांना असह्य झाली. त्यांच्या स्वभावातली 'संत' प्रवृत्ती जागी होऊन महाकाय दु:खाच्या अनुभवाने ते अस्वस्थ झाले. संसार तापाने चिंतीत झाले. पटकीने पटापट मरणाऱ्या लोकांची ही अवस्था पाहून मानवाच्या क्षुद्र जगण्याबद्दल एक प्रकारची अनासक्तीची भावना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला व्यापून राहिली. तुकाराममहाराजांच्या कुटुंबाचे हे स्वरूप हे प्राथमिक स्वरूप आहे. त्या स्वरूपावरून अवतीभवती असलेल्या समाजाचे विदारक चित्र डोळ्यासमोर येते आणि या परिस्थितीतून अध्यात्मिक जीवनाकडे वाटचाल करणारे तुकाराममहाराज एकमेवाद्वितीय व्यक्ती होते आणि त्यांचे अभंग तत्कालीन ग्रामव्यवस्थेला धरून होते. त्यामुळे त्यांच्या अभंगांतही जाती–पोटजाती, वर्ण बलुतेदारी दृष्टीस पडते. तसेच संत तुकारामांच्या अभंगामध्ये विविध जाती–जमातिचाही उल्लेख आला आहे. तो उल्लेख ग्रामजीवनात जोडलेल्या व्यवस्थेशी संबंधित आहे. जातिव्यवस्थेचे उदात्तीकरण करण्यासाठी नाही हे लक्षात येते, हे महत्त्वाचे आहे. उलट विविध जाती व्यवस्थेवरतीही ते मार्मिक शब्दाने घाला घालताना दिसतात.

तेराव्या शतकामध्ये वर्णव्यवस्थेच्या चौकटी ठरलेल्या होत्या. हिंदू समाज वेगवेगळ्या जाती–पोटजातींवर आधारलेला होता. तत्कालीन राज्यकर्त्यांना वर्णव्यवस्था मान्य असल्यामुळे समाजातील जातीय विषमता टिकून होती. वर्ण व्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण मानले जात होते. यात ब्राह्मण वर्णाला उच्च दर्जा प्राप्त होता व त्यांना राजदरबारी मान्यता होती. समाजातील धार्मिक व कर्मकांडांचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. त्यामुळे त्या समाजाकडे बुद्धिवादी समाज म्हणून पाहिले जात होते. त्याच कारणाने त्यांच्या अंगी एक प्रकारे अहंकार असल्याचे दिसून येते. तुकारामांच्या प्रस्तुत अभंगामध्ये उच्चवर्णीयांची संकुचित वृत्ती आढळून येते.

''महारशी शिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ।।१।।
तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करीतां नाहीं ।।धृ.।।
नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ।।३।।

ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो तें याती ।।४।।'' [१२१]

तुकारामांच्या अभंगातून वृत्त झालेले विचार पारंपरिक जातिव्यवस्थेला स्पष्ट विरोध करणारे आहे. कर्मकांडात गुरफटलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन दिला व तत्कालीन धार्मिक नेतृत्वास आव्हान देऊन क्षुद्र समजल्या जाणाऱ्या समाजाचे नेतृत्व स्वीकारले. तुकारामांनी सामान्य लोकांना भागवत धर्माच्या झेंड्याखाली संघटित केले. त्यांच्या शिष्य परिवारात विविध जातिधर्मांतील लोकांचा समावेश होता. त्यांनी आपल्या अभंग आणि कीर्तनाद्वारे समाजात एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

वर्णव्यवस्थेच्या दुसऱ्या क्रमांकावर क्षत्रीय हा वर्ण होता. या वर्णात सारांश रूपात राज्यकर्ते मोडत होते. त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे समाजाचे पालन–पोषण करणे व सामाजिक व आर्थिक व्यवस्था सांभाळणे होते. आपले शौर्य पणाला लावून राज्यकर्त्यांसाठी राज्यात सुव्यवस्था नांदण्यासाठी प्रयत्न करणे.

तिसरा वर्ण म्हणजे वैश्य होय. यांचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती हा होय. वैश्य समाजातील वैश्यांकडे समाजाचे भरण–पोषणाचे दायित्व होते. त्यामुळे शेती व्यवसाय सांभाळून गुरेढोरे सांभाळणे, समाजाला अन्न–धान्याचा पुरवठा करणे अशा पद्धतीची कामे वैश्य करीत असत. त्यामुळे उच्चवर्णीयांना कराच्या मोबदल्यात बहुतांशी पिकलेला भाग देणे त्यांना सक्तीचे होते.

सर्वांत शेवटची वर्ण व्यवस्था म्हणजे क्षुद्र होय. हा समाजातला कनिष्ठ दर्जाचा समजला जाणारा वर्ग होता. प्रत्यक्षात तो समाजाचा अविभाज्य घटक होता व त्यावर पूर्ण वर्णव्यवस्था अवलंबून होती. तरीही त्यांच्याकडे तुच्छ भावनेने पाहिले जात होते. जन्माने प्राप्त झालेली जात व मिळालेला पिढीजात व्यवसाय त्यांना करावा लागत असे. धार्मिक व सार्वजनिक ठिकाणी व पाणवठ्यावर जाण्यास त्यांना बंदी होती. वर्ण व्यवस्थेत उच्च ठिकाणी असलेले लोक त्यांच्या

---

[१२१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्रं. ५५, पृ. क्र. १०

स्पर्शाचा विटाळ करीत असत. त्यांच्या बुद्धिमतेला गुणवत्तेला वाव नव्हता. त्यामुळे त्यांची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती झाली नाही. म्हणजेच वर्णव्यवस्था ही कर्मावर आधारित होती. त्यामुळे वर्ण संघर्षावरून अनेक जाती–पोटजाती निर्माण झाल्या व विविध व्यवसायांवरून जातिवाचक नावे जमातीला पडू लागली. उदा. कोष्टी, खाटिक, फकीर, महार, मांग, ढोर इत्यादी.

तत्कालीन समाजात अठरापगड जाती बलुतेदार निर्माण झाले. तसेच लोकजीवनाचा अभ्यास करताना तुकारामांनी आपल्या अभंगांमधून आलुतेदार, बलुतेदार याहून वेगळ्याही जातींचा उल्लेख केला आहे. उदा. कुणबी, सोनार, नंदीवाला मुंढा, दरवेशी, गारूडी, देवदासी, जोगी, कोल्हाटी इत्यादींचा समावेश दिसून येतो.

यामध्ये लोकजीवनाच्या अभ्यासाच्या महत्त्वाच्या दृष्टीने यावर थोडा प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

कुणबी :

वर्णव्यवस्थेतील वैश्यांमध्ये कुणबी समाज गणला जात असे. कुणब्याने शेती करावी व धान्य पिकवून समाजाला द्यावे हाच त्याचा व्यवसाय होता. स्वत: तुकाराममहाराजही कुणबी शेतकरी होते. कुणबी समाज आपल्या कर्मास अत्यंत महत्त्व देत असे, हे तुकारामांच्या प्रस्तुत अभंगात दिसून येते.

''मढें झांकूनियां करिती पेरणी । कुणबियाची वाणी लवलाहें ।।१।।
तयापरी करीं स्वहित आपुलें । जयासी फावलें नरदेह ।।धृ.।।
ओटीच्या परीस मुठीचें तें वाढें । यापरी कैवाडें स्वहिताचें ।।३।।
नाहीं काळसत्ता अपुलिये हातीं । जाणते हें गुंती उगविती ।।४।।
तुका म्हणे पाहें आपली सूचना । करी तो शहाणा मृत्युलोकीं ।।५।।'' [१२२]

[१२२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्रं. ८१७, पृ. क्र. १८७

प्रस्तुत अभंगात शेतकरी आपल्या शेतीच्या कामाला इतके प्राधान्य देतो की, वेळप्रसंगी एखाद्याचा मृत्यू जरी झाला तरी झाकून ठेवून पेरणी उरकून घेतो. लोकजीवनात कुणबी कसा होता, तो कार्याला किती महत्त्व देत होता हे यावरून लक्षात येते.

सोनार :

सामाजिक व्यवस्थेत एकमेकांवर सर्व सामाजिक संस्था अवलंबलेली आहे. विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या विविध जाती निर्माण होऊन, जातिव्यवस्था अस्तित्वात आली. त्यातच सोन्याचे दागिने घडविणारा सोनार यालाही लोकजीवनात अत्यंत महत्त्व होते. लग्न–समारंभ, विविध उत्सव या साऱ्यांचे औचित्य साधून दागिने घालण्याची हौस स्त्री वर्गात प्राधान्याने दिसून येते. ते अलंकार घडविणाऱ्या सोनारासही तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगांमधून महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते शुद्ध सोने नैसर्गिक रूपात असते; परंतु त्याला सोनार घडवून त्याचे मुळ स्वरूप घालवतो. हे तुकारामांनी अतिशय मार्मिकपणे आपल्या अभंगामध्ये सांगून हीन जातीतील न्यूनगंड दूर करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्याचा परिणाम म्हणून हीन समजल्या गेलेल्या जातींतून अनेक संत मंडळी पुढे आली व त्यांनी आपापल्या परीने समाजजागृतीचे कार्य केले. आपल्या अभंगांतून विविध प्रकारचे कलावंत व फिरस्ते, तसेच नंदीवाला यांचे वर्णन केले आहे व त्यांचे लोकजीवनातील विशिष्ट प्रकारे स्थान दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातीलच दरवेशी, कोल्हाटी, गारूडी यांचे स्थान अबाधित केले आहे. अस्वलाला घेऊन गावोगावी फिरणाऱ्या त्या दरवेशामध्येही तुकोबारायांनी समतेचा संदेश देणारा परमेश्वरच पाहिला आहे. तुकोबारायांनी नंदीबैलाची रचना मांडली.

''अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज ।
गाऊ बछरे तिस चलावे यारी बाघो न सात ।।१।।
ख्याल मेरा साहेबका बाबा हुवा करतार ।
व्हांटे आघे चढे पीठ आपे हुवा असिवार ।।२।।
जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्या अंदर भेस ।

कहे तुका जो नर बुझे सोहि भया दरवेस ।।३।।''[१२३]

प्रस्तुत अभंगात संत तुकाराममहाराज दरवेशातही संत शोधतात व ते म्हणतात, जर ईश्वराच्या मनात असेल तर सामान्य मनुष्यदेखील ईश्वराचा मुकुट होऊ शकतो. मनात आणले तर गाईसुद्धा आपल्या वासरासह वाघाबरोबर मित्रत्वाचे संधान बांधू शकतात. देवाच्या चिंतनेत वेळ व्यतीत करणारे नीज पदावर जाऊन पोहोचतात. म्हणूनच सर्वांभूति जो विराजमान आहे परमेश्वर त्याचे चिंतन करा आणि आयुष्याचे हे वर्म ज्यास समजते तोच दरवेशी म्हणजेच संत होय, असेही ते म्हणतात.

दरवेशाप्रमाणेच मुस्लिम धर्माचा गुरू म्हणजे मुढा होय. मुढा ही फकिरवेश धारण करून परमेश्वराच्या चिंतनात दारोदार फिरत असतो व लोकांमध्ये वावरत असतो. हे सारे लोकजीवनाचे अविभाज्य घटक बनून सामान्यांच्या हृदयात आपापल्या परीने परमेश्वराच्या चिंतनाची ओढ निर्माण करून देतात. तुकाराममहाराज लोकव्याख्येच्या स्वरूपात पटवून देताना अनेक अभंगांचा आधार घेतात.

''आवल्ला नाम आल्ला बडा लेते भूल न जाये ।
इलाम त्याकालजमुपरताही तुंब बजाये ।।१।।
अल्ला एक तुं नबी एक तुं ।
काटतें सिर पावों हाते नहीं जीव डराये ।।धृ.।।
आगले देखो पिछे बुझो । आपे हुजूर आय ।।३।।
सब सबरी नचाव म्याने खडा अपनी सात ।
हात पाव रखते जबाब नहीं अगली बात ।।४।।
सुनो भाई बाजार नहीं सबहि हार चलावे ।
नन्हा बडा नहीं कोय एक ठोर मिलावे ।।५।।
एक तरि नहीं प्यार जीवतनकी आस ।

[१२३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र.४४३, पृ. क्र. १०३

काहे तुका सोहि मुंढा राखलिये पायेनपास ।।६।।'' [१२४]

मुंढा :

लोकजीवनातील मुंढाच्या साहाय्याने तुकाराममहाराज बहुजनांच्या अंतर्मनाला स्पर्श करण्याचा प्रयत्न करतात. प्रथम देवाचे नाव घेण्यास विसरू नका, वीणा वाजवीत प्रेमपूर्वक देवाचे नाव घ्या. डोके, हात, पाय या साऱ्यांच्या रक्षणकर्ता तोच आहे, तेव्हा ते कापल्या जाण्याची तमा बाळगू नका. तोच रक्षणकर्ता आहे म्हणून त्याच्यावर विश्वास आणि श्रद्धा ठेवा. आपली पंचेंद्रिये परमार्थाकडे लावा. लहान–मोठ्यांची निवड न करता सर्वांनी एकत्र काम करा. श्रीहरीच्या ठिकाणी जिवाचा लोभ न धरता तन, मन व धनाने त्याची सेवा करा.

''नजर करे सो हि जिंके बाबा दुरथी तमारी देख ।
लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ।।१।।
काहे भुला एक देखत । आंखो मारतडांगो बाजार ।।धृ।।
दमरी चमरी जो नर भुला । सोत आघो हिलत खाय ।।३।।
नहि बुलावत किसे बाबा आप हि मत जाय ।
कहे तुका उस असाके संग फिरफिर गोते खाये ।।४।।'' [१२५]

दरवेशी, मुंढा यांच्यामार्फत लोकजीवन सांगताना प्रस्तुत अभंगाचा समन्वय साधून तुकाराममहाराज म्हणतात की प्रपंचाचा तमाशा दुरूनच पाहा. मोहमायेच्या बाजारामध्ये अनेक वेशधारी तुला भुलविण्यासाठी बसलेली आहेत आणि त्यांना का भुलतोस तू. त्यांना भुलून जाऊ नकोस. प्रपंचाचा समन्वय साध आणि परमेश्वराशी एकरूप हो, असे तुकाराममहाराज म्हणतात.

तत्कालीन लोकजीवनातला अविभाज्य घटक म्हणजे गारूडी, कोल्हाटी, जोगी हा होय. यांचाही तुकाराममहाराज आपल्या अभंगांमधून एक समाज प्रवर्तक व प्रबोधनकार या नात्याने उपयोग करतात. गारूडी साप घेऊन ज्याप्रमाणे गावोगावी साप खेळाच्या माध्यमातून पैसे

---

[१२४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र.४४०, पृ. क्र. १०२

[१२५] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभग क्रं. ३९३५, पृ. क्र. ८७६

कमवतो व आपल्या वाद्याच्या साहाय्याने त्या नागालाही भुलवतो हे उदाहरण प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज स्वत:ला संबोधून घेतात. ते पांडुरंगाला म्हणतात, माझेही वाद्याच्या नादात त्या भुलवणाऱ्या सापाप्रमाणे झाले आहे. प्रपंचात मीही तसा भुलून गेलो आहे. तेव्हा हे परमेश्वरा, तुझ्यावाचून माझी सुटका होणे अशक्य आहे. नदीत गळाला लागलेल्या माशाप्रमाणे माझे प्राण तडफडू पाहत आहे, पारध्याने घरट्यावर जाळे टाकल्यानंतर पिले व पिलांसाठी कासावीस होणारे त्यांचे आई–वडीलही ज्याप्रमाणे त्या चक्रात ओढले जातात. माझीही अवस्था वेगळी काही नाही. गोडीच्या लोभाने गुळावर बसलेली माशी अधिकाधिक गुळात रूतून बसते. त्याप्रमाणे माझेही प्रपंचात झाले आहे. तेव्हा तू मला यातून बाहेर काढ हेच प्रबोधन प्रस्तुत अभंगात तुकाराम करतात.

''सर्प भुलोन गुंतला नादा । गारूडियें फांदा घातलासे ।
हिंडवूनि पोट भरी दारोदारीं । कोंडूनि पेटारी असे रया ।।१।।
तैसी परी मज झाली पांडुरंगा । गुंतलों तो मी गा सोडवी आतां ।
माझें मज कांही न चलसें झालें । कृपा हें तुज न करितां ।।धृ.।।
अविसें मीन लावियला गळीं । भक्ष तो गिळी म्हणुनियां ।
काढूनि बाहेरी प्राण घेऊं पाहे । तेथें बाप माये कवण रया ।।३।।
पक्षी पिलयां पातलें आशा । देखोनियां फांसा गुंते बळें ।
मरण सायासें नेणें धांवोनि वीरसे । जीवित्वा नास झालीं बाळें ।।४।।
गोटपणें मासी लिगाडीं गुंतली । सांपडे फडफडी अधिकाधिक ।
तुका म्हणे प्राण घेतला आशा । पंढरीनिवासा धांव घाली ।।५।।'' [१२६]

गारुड्याप्रमाणेच लोकजीवनात कोल्हाटी जमातीचाही महत्त्वपूर्ण समावेश तत्कालीन समाजात होत होता. विविध कसरती करून लोकमनोरंजन करणे, स्वत:च्या जिवावर उदार होऊन दोरीवरून हातात बांबू घेऊन चालणे, तान्ह्या मुलांना घेऊन हृदयस्पर्शी हालचाली करणे,

[१२६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र. १०८७, पृ.क्र. २३९

या साऱ्या खेळांतून उदरनिर्वाह करून जनांचे मनोरंजन करणे हेच त्यांचे ध्येय असे. या कोल्हाट्यांच्या संदर्भातही आपणास अनेक अभंग आढळतात.

जोगी : जगाच्या उद्धारासाठीच आपला जन्म आहे असा दृढ निश्चय ज्यांच्या ठायी आहे ते शिव उपासक वारकरी संप्रदायातील एक भाग आहेत आणि ते स्वत:ला जोगी असे म्हणून घेतात. हे जोगी अंगाला विभूत लावून गळ्यात भगवी झोळी, कपाळाला गोपीचंद, हातात भिक्षापात्र घेऊन गावोगावी फिरत असतात. जोगी हा संप्रदायातीलच एक भाग आहे. तत्कालीन लोकजीवनात त्यांचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. त्याचे वर्णन करताना तुकाराममहाराज प्रस्तुत अभंगात म्हणतात.

''जग जोगी जग जोगी । जागोजागे बोलती ।।१।।
जागता जगदेव । राखा कांहीं भाव ।।धृ।।
अवघा क्षेत्रपाळ । पुजावा सकळ ।।३।।
पुजापत्र कांही । फल पुष्प तोय ।।४।।
बहुतां दिसां फेरा । आलाया नगरा ।।५।।
नका घेऊं भार । धर्म तोचि सार ।।६।।
तुका मागे दान । द्यावें जी अनन्य ।।७।।'' [१२७]

लोकजीवनातील लोकउपासकांच्या आधारे तुकाराम महाराजांनी अध्यात्मिक अधिष्ठान प्रकट करण्याचा प्रयत्न आपल्या अभंगांमधून केला आहे. भिक्षापात्र घेऊन गावोगावी फिरणारा हा योगी कर्तव्य कर्माचे दान मागत आहे. प्रत्येक मनुष्याने आपल्या कर्तव्याविषयी जागे राहून हे जग म्हणजेच देव आहे. तेव्हा परमेश्वराने निर्माण केलेल्या प्रत्येक जिवावर प्रेम करावे, त्यास देवस्वरूप मानून क्षेत्रपाल म्हणजे शिव–विष्णूस्वरुप म्हणून त्याची पान, फुले, फळ वाहून पूजा करावी, असे हे जोगी सांगत फिरतात. तुकाराममहाराजांनी आपल्या अभंग गाथेतून लोकजीवनाचे विविध रंग विविध अभंगांच्या साहाय्यातून मांडले आहेत. ग्रामव्यवस्था,

[१२७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अभंग क्र. ४३६, पृ. क्र. १००

जातिव्यवस्था, आलुतेदार, बलुतेदार यांच्या माध्यमातून आध्यात्मिक विवेचन मांडले आहे व लोकजीवनातही त्याला अध्यात्मिक जोड दिली आहे.

गोपाळ : ग्रामीण भागातील गाई–वासरांचा सांभाळ करणारा गुराखी यालाच गोपाळ असे म्हटले जाते. गावातील सर्व गाय–वासरांची जबाबदारी त्यांच्यावर असते. सकाळी आपापली शिदोरी बांधून सगळी गाय–वासरे गोळा करून चारण्याकरिता रानात घेऊन जाणे हे त्याचे काम होते व संध्याकाळी ती गुरे घेऊन परत गोठ्यात बांधणे असे त्यांचे काम होते. त्याबदल्यात त्यांना धान्य, वस्तू किंवा पैसे मिळत असत.

''गाई गोपाळ यमुनेचे तटीं । येती पाणिया मिळोनी जगजेठी ।
चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं । चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो ।।१।।
ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी । चित्त विव्हळतें देखावया हरी ।
मिस पाणियाचें करितील घरीं।बारा सोळा मिळोनी परस्परी वो ।।धृ।।'' [१२८]

यमुनेच्या तीरावर गाई व गोपाळ पाणी पिण्याकरिता येतात. त्या वेळेला कृष्णासोबत गोपिकाही चेंडू खेळण्याकरिता व पाहण्याकरिता येतात. अशा प्रकारे गोपाळांचे वर्णन आपल्याला अनेक अभंगांत दिसून येते.

''काम सारुनी सकळ । आले अवघे गोपाळ ।
झाली आतां वेळ । म्हणती आणा सिदोऱ्या ।।१।।'' [१२९]

''गाईन ते लीळा चरित्र पवाडे । राखिले संवगडे सहित गाई ।।१।।
चोरीलें नवनीत बांधविला गळा । जे तुम्ही गोपाळा छंद केले ।।२।।'' [१३०]

---

[१२८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ. क्र. ३९६, पृ.क्र. ८६

[१२९] ह.भ.प. स.के. नेऊरगांवकर, श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अ.क्र. २८५२, पृ.क्र. ६७८

[१३०] ह.भ.प. स.के. नेऊरगांवकर, श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अ.क्र. २७४७, पृ.क्र. ६४३.

गोपाळ, गोपिका आणि भगवंत श्रीकृष्णाची लीला प्रस्तुत अभंगांमध्ये दिसून येते. तुकाराममहाराज आपल्या अभंगांमध्ये सांगतात, श्रीहरीचे गोपाळांवरती अतिशय प्रेम आहे. त्यामुळे गोपाळांना त्यांचे मन तृप्त होईपर्यंत हरीची संगत मिळाली आहे. तसेच त्याच्याबरोबर गाई चरता–चरता खेळण्याचाही योग आला आहे. श्रीकृष्ण भगवंताबरोबर शिदोऱ्या खाण्याचेही भाग्य गोपाळांना लाभले आहे. गोपाळ प्रेमाचे भुकेले असल्यामुळे श्रीहरीची त्यांच्यावर मर्जी आहे. ग्रामीण लोकजीवनातील गुराखी हा गावगाड्याचा अविभाज्य भाग होता. गोपालाच्या रुपकातून गुराखीजीवन आणि शिवारालाच ते उभे करीत होते.

गोंधळी : लग्न समारंभाच्यावेळी देवीच्या उपासनेचे एक कर्मकांड म्हणून गोंधळाकडे पाहिले जाते. तत्कालीन समाजातील अंधश्रद्धेचा भाग म्हणूनही गोंधळ मांडला जातो. अमानवी शक्तीला संतुष्ट करणे, देवीचा कोप टाळणे इत्यादीसाठी गोंधळ्याचा उपयोग होतो.

''सुदिन सुवेळ तुझा मांडिला गोंधळ वो ।
पंच प्राण दिवटे दोनी नेत्रांचे हिल्लाळ वो ।।१।।
पंढरापुरानिवासे तुझे रंगी नाचत असें वो ।
नवस पुरवीं माझा मनींची जाणोनिया इच्छा वो ।।धृ.।।'' [१३१]

महाराष्ट्रात गोंधळाला कुळाचाराची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. गोंधळ हा देवीच्या उपासनेचाच एक विधी आहे. अंगात अंगरखा घालून, डोक्यावर पगडी व गळ्यात कवडीच्या माळा असा त्यांचा वेश असतो. गोंधळाला संबळ व तुणतुण्याची साथ असते. गोंधळाकडे एक धार्मिक विधी म्हणूनही पाहिले जाते. तुकारामांचे गोंधळ या सदराखाली तीन अभंग आढळतात. गोंधळी हे लोकधर्माचे पुरोहित आहेत, असे डॉ. रामचंद्र देखणे यांनी म्हटले आहे. लोकाचारामध्ये गोंधळींचा सहभाग लक्षात घेऊन तुकोबारायांनी गोंधळ्यांवर रूपके लिहिली.

[१३१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. ४४६, पृ.क्र.१०४

४.५.६.३ कुटुंबव्यवस्था : कुटुंब हा समाजाचा पायाभूत घटक आहे. मनुष्याला सुरक्षिततेची जाणीव कुटुंबातून मिळते. कुटुंबात पारंपरिकता जपली जाते. कुटुंबातील कुळाच्या परंपरा, व्यवसाय, आचार–विचार इत्यादिंची देवाण–घेवाण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कुटुंब संस्थेतच घडत असते. [१३२]डॉ. प्रकाश बोबडे कुटुंब संस्थेच्या संस्कृतीवर बोलताना म्हणतात, ''संयुक्त कुटुंबाच्या साहाय्याने संस्कृती सातत्यदेखील कायम राखले जाते. परंपरागत आचार–विचार, रुढी व प्रथा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीत सहज हस्तांतरित करता येतात. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांचा इतरांवर प्रभाव असतो. कौटुंबिक जीवनासंबंधीची सांस्कृतिक तत्त्वे इतरांकडून आपोआप आत्मसात केली जातात व सांस्कृतिक वारसा कायम ठेवला जातो.'' प्रत्येक समाजाच्या संस्कृतीची तत्त्वे भिन्न असतात. ती कुटुंबाकडून स्वीकारली जातात.

भारतीय कुटुंब परंपरा ही एकत्र स्वरूपाची आहे. त्यात आजी, आजोबा, भाऊ, बहीण, मुले यांचा समावेश एकत्र कुटुंबामध्ये होतो. व्यक्तीच्या नात्यापरत्वे त्याचे अधिकार व कर्तव्ये ठरविली जातात. कुटुंब व्यवस्थेमध्ये स्त्री–पुरुषांचे अधिकार वेगवेगळे ठरविले जातात. त्यात १. मातृसत्ताक अधिकार व २ पितृसत्ताक अधिकार असे दोन अधिकार ठरविले जातात. आपली भारतीय संस्कृती ही पितृसत्ताक व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करीत असते; परंतु एकोणिसाव्या शतकात पाश्चात्त्य विचारांचा प्रभाव भारतावर पडू लागला. त्यामुळे समाजसुधारकांनी समान अधिकाराची पद्धत रुजविण्यासाठी प्रयत्न केले. परिणामी कुटुंबव्यवस्थेवरील त्याचा परिणाम झाला आणि विभक्त कुटुंब पद्धत सुरू झाली.

तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवनातील आढावा घेत असताना यादवकालीन कुटुंबव्यवस्थेचे सर्व पैलू त्यांच्या अभंगांतून पाहायला मिळतात. तुकाराममहाराज सांसारिक गृहस्थ असल्यामुळे प्रपंचातील चांगल्या–वाईट अनुभवांची शिदोरी त्यांच्याजवळ होती.

---

[१३२] डॉ. बोबडे प्रकाश, **भारतीय समाज रचना पारंपारिक व अधुनिक,** श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९४, पृ.क्र.१५७

४.५.७ : तुकारामांचे कुटुंब :

विश्वंभर या मूळ पुरुषापासून सुरू झालेला तुकाराममहाराजांच्या पूर्वजांचा प्रवास तुकारामांपर्यंत थांबतो. त्याची सविस्तर चर्चा तुकारामाचे चरित्र यात आहे. यादवकालीन लोकजीवनातील कुटुंब व्यवस्था पाहण्यासाठी तुकाराममहाराजांच्या अभंगाचा आधार घेतला, तर तत्कालीन कुटुंब व्यवस्थेचे प्रतिबिंब अनेक अभंगांत दिसते. नाते संकल्पना ही अभंगामधील लोकजीवनात दृढ होती. याचा अंदाज विठ्ठलाच्या प्रेमाची प्रतिमा अभंगापर्यंत येते.

४.५.८ : अभंग, मातृ–पितृ जिव्हाळा :

परमेश्वराशी असलेले आपले भक्तीचे नाते तुकाराम महाराजांनी विविध प्रतिमांच्या साहाय्याने प्रदर्शित केले. त्यातीलच एक भाग म्हणजे कुटुंब व त्यातील नातीगोती जिव्हाळा ते आपल्या अनुभवाच्या शिदोरीवर अभंगाच्या माध्यमातून मांडतात. त्यातील सर्वाधिक वत्सल प्रतिमा म्हणजे माऊली व बाळ या नात्यामधील आहे. तुकाराममहाराज स्वतःला नेणत्या बाळाची उपमा देतात. नेणत्या म्हणजे तान्ह्या बाळाच्या प्रतिमेतून ते पांडुरंगाच्या जवळ जातात. तुकाराममहाराज माऊलीच्या नात्यातूनही लोकमानसाबरोबर नाते जोडतात. कुठलीही देवाण–घेवाणीच्या पलीकडचे हे निखळ, निरागस नाते असते. विशुद्ध प्रेम, अपार माया यांनी ओतप्रोत भरलेले असे हे शब्दांच्या पलीकडचे नाते असते. बाळ कौतुकात दंग झालेली माऊली कधी आपल्या तान्ह्या बाळाच्या रूपाने विठ्ठलाच्या प्रतिमा पाहते. माता व मुलामधील स्नेहभाव तुकाराममहाराज आपल्या अभंगात सहज मांडतात.

''नलगे मायेसी बाळे निरवावें । आपल्या स्वभावें ओढे त्यासी ।।१।।
मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे माथां ।।धृ।।
गोड धड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ।।३।।
खेळतां गुंतलें उमगूनि आणी । बैसोनिया स्तनीं लावी बळें ।।४।।
त्याच्या दु:खें पडे आपण खापरीं । लाही तळी वरी होय जैसी ।।५।।

तुका म्हणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागों नेदी ।।६।।'' [१३३]

माता बाळाला दूध पिण्यासाठी जवळ घेते. तेव्हा आईच्या आईपण तृप्त करणाऱ्या प्रसंगाचे व बाळाच्या मनाच्या तृप्तीने सुंदर वर्णन तुकाराममहाराज प्रस्तुत अभंगात करतात. ईश्वराची वत्सलता कोठे पहावयाची असेल तर आईच्या हृदयात पाहावी. निरपेक्ष प्रेम आई आपल्या मुलावर करीत असते. आईचे प्रेम हे सर्व जीवांचे जीवन आहे. ईश्वराची मूर्तिमंत कृपा आहे. ह्या अभंगातून स्वतः तुकारामांनी अनुभवलेले मातृप्रेम जाणवते. वसंतातील वाऱ्याप्रमाणे मातेचा स्पर्शही हळुवार आणि आल्हाददायक असतो. अत्यंतिक अत्मीयतेचे प्रतीक म्हणून तुकाराममहाराज मातेकडे पाहतात. संत तुकाराममहाराजांना आई–वडिलांचे प्रेम हे देवाच्या प्रेमासारखे वाटते. आई–वडील आपल्या मुलाबाळांसाठी कितीतरी प्रकारचे कष्ट करतात. त्या कष्टाची किंवा आईच्या ऋणाची फेड कशाही पद्धतीने करता येणार नाही, असे त्यांना वाटते. माऊलीचे वर्णन करताना ते विठ्ठलाशी समीप जातात.

''मायेविण बाळ क्षणभरी न राहे । न देखतां होय कासावीस ।।१।।
आणिक उदंड बुजाविती तरी । छंद त्या अंतरीं माऊलीचा ।।धृ.।।
नावडती तया बोल आणिकांचे । देखोनियां नाचे माय दृष्टी ।।३।।
तुका म्हणे माझी विठ्ठल माउली। आणिकांचे बोलीं चाड नाहीं ।।४।।'' [१३४]

आईविणा लेकरू क्षणभरी राहत नाही. त्यांच्या हृदयात माऊलीचाच छंद असतो. माय दृष्टीस पडल्यावर बाळ नाचते. तसेच माझी विठ्ठल माऊली मला भेटल्यावर माझी अवस्था होते, मला जनाची लाज वाटत नाही.

४.५.९ नाती–गोती :

तुकाराममहाराज गृहस्थाश्रमातून अध्यात्मिक जीवनाकडे वाटचाल केलेले संत आहेत. त्यामुळे कुटुंबवत्सल्यता त्यांच्या अंतर्मनावर कोरली गेली. नाती–गोती, तसेच विश्वात्मकताच्या

---

[१३३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. १२२८, पृ.२६६.

[१३४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. ३९०३, पृ.क्र. ७८७

भावनेतून त्यांनी साऱ्या विश्वाशी नाते प्रस्थापित करीत प्रत्येक नात्यांच्या आविष्कारांचा वापार आपल्या अभंगात केला आहे. नात्याचा आढावा घेताना दोन टप्प्यांवर त्याची विभागणी केलेली आढळून येते. १. लग्नसंबंधातून निर्माण झालेली नाती आणि २. रक्तसंबंधातून निर्माण झालेली नाती.

रक्तसंबंधातून निर्माण झालेली नाती : रक्तसबंधांतून विविध नाती निर्माण होतात. तत्कालीन परिस्थितीत एकत्र कुटुंब पद्धतीमुळे एकाच कुटुंबात अनेक नात्यांची वीण विणली जात असे व त्यात आपलेपणाचा भावही असे. उदा. कुटुंबप्रमुख म्हणून आजी–आजोबा यांना आदराचे स्थान होते. तद्नंतर आई–वडील, काका–काकू, बहीण–भाऊ, मुलगा–मुलगी, आत्या, आतेबहीण, भाऊ, मामा–मामी, मामे–भाऊ (मेहुणा), मामे बहीण (मेहुणी), भाचा, मावशी–काका इ. नात्यांची वीण लोकजीवनात गुंफलेली आहे.

तुकाराममहाराज पांडुरंगाकडे आईच्या ममतेने आपल्याकडे पाहण्यासाठी सांगतात. ते पांडुरंगास म्हणतात, मी तुझ्याजवळ पक्ष्याच्या पिलाप्रमाणे पंख पसरून करुणेची लडिवाळ याचना करतोय. ती तू माझा हट्ट समजून पूर्ण कर. तसेच लोकजीवनातील आई व पुत्र यांच्या नात्यांचे उदाहरण देताना तुकाराममहाराज म्हणतात–

''बाळ मातेपाशी सांगे तानभूक । उपायाचें दुःख काय जाणे ।।१।।धृ।।
तयापरी करीं पाळण हें माझें । घेऊनियां ओझें सकळ भार ।।धृ।।
कासया गुणदोष आणिसील मना । सर्व नारायण अपराधी ।।२।।
सेवाहीन दीन पतकांची रासी । आतां विचारिसी काय ऐसें ।।३।।
जेणें काळें पायीं अनुसरलें चित्त । निर्धार हें हित जालें ऐसें ।।४।।
तुका म्हणे तुम्ही तारिलें बहुतां । माझी कांहीं चिंता असों दे वो ।।५।।'' [१३५]

लहान मूल ज्याप्रमाणे आईजवळ तहान–भूक लागल्यावर आईस सांगते, त्याप्रमाणे मीही माझ्या भाराचे ओझे तुझ्यावर टाकून मोकळा झालो आहे. माझे चित्त मी तुझ्या पायी ठेवले

[१३५] श्री तु. अभंग गाथा, शासकीय प्रत, अ.क्र. १०३०, पृ.क्र. १८२

तेव्हाच माझे हित होणार आहे. हा माझा निर्धार आहे. तू जसे बहुतांना तारलेस तशीच माझीसुद्धा चिंता तुला असूदे.

''न घडे मायबापा घात । आपणांदेखत होऊं नेदी ।।१।।
कां मी मनीं चिंता वाहूं भय धाक । काय नव्हे एक करितां तुज ।।२।।
वर्म जाणें त्याच्या हिताचे उपाय । तहान भूक वाहे कडिये खांदीं ।।३।।
तुका म्हणे तूं गा कृपावंत भारी । ऐसें मज हरी कळों आलें ।।४।।'' [१३६]

माय–बापाकडून बालकाचा घात होतच नाही व ते कधी होऊनही देत नाहीत. त्यामुळे बालक भयचिंतामुक्त असतात. तसेच बालकाच्या हिताचे वर्ग आई–बाप जाणतात. त्याची तहान–भूक जाणतात. हे लोकजीवनातील दृष्टान्त मांडता–मांडता तुकाराममहाराज आध्यात्म सांगतात. अशाच प्रकारचे आई–वडिलांच्या नात्यावर दृष्टिक्षेप टाकणारे...

तुकोबांची अभंगगाथा शासकीय प्रत, अ. क्र. ३९७७, ३२२७, ३१५३, ३९१८, ३३८ असे अभंग आढळतात.

एकत्र कुटुंबपद्धतीतील काका–काकू, आत्या यांचे नाते स्पष्ट करणारे दाखले ते देतात आणि त्यातूनच परमेश्वराशी असणारे दृढ नातेही सांगून जातात,

''बाळ बापा ह्मणे काका । तरी तो कां निपराध ।।१।। ।।धृ.।।
जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ।।धृ।।
साकरेसि ह्मणतां धोंडा । तरि कां तोंडा न रुचे ।।३।।
तुका म्हणे आरुष बोल । नव्हे बोल आहाच ।।४।।'' [१३७]

तत्कालीन एकत्र कुटुंब पद्धतीत मुलांच्या कानावर जे शब्द पडत असत त्याचे आकलन पटकन होते. तेव्हा घरात असलेल्या काकाला काका म्हणता म्हणता मुलगा आपल्या बाबांनाही

---

[१३६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. ४१०८, पृ.क्र. ८२७

[१३७] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. १३५, पृ.क्र. २०

काका म्हणतो. तसे झाल्याने त्यांचे नाते नष्ट होत नाही. उलट त्यातून त्यांचा निरागस भाव प्रकट होतो. ज्याप्रमाणे साखरेला दगड म्हटल्यामुळे तिच्यातील गोडवा कमी होत नाही. तसेच परमेश्वरही आपल्या भक्ताला नातेसंबंधासारखेच समजून उमजून घेत असतो. रक्ताच्या नात्यासारखेच आपलेही परमेश्वराशी नाते आहे, असेही तुकाराममहाराज सांगतात. प्रस्तुत अभंगात आपल्याला त्याचा अनुभव येतो.

''कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधु चुलता कृष्ण माझा ।।१।।
कृष्ण माझा गुरू कृष्ण माझें तारुं । उतरी पैल पारू भवनदीची ।।धृ।।
कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोईरा सज्जन कृष्ण माझा ।।३।।
तुका ह्मणे माझा श्रीकृष्ण विसावा । वाटे न करावा परता जीवा ।।४।।'' [१३८]

परमेश्वराशी असलेले आपले नाते स्पष्ट करताना तुकाराममहाराज रक्तसंबंधातून निर्माण झालेल्या नात्यांचा दृष्टान्त देतात. कृष्ण माझी माता आहे, कृष्ण माझा पिता आहे, कृष्ण बंधू, चुलता व सखाही आहे. कृष्ण माझा गुरू आहे. त्यामुळे माझ्या भवनदीचा तीर तो पार करणार आहे. आपल्या मनामध्ये, जनामध्येही कृष्ण वसत आहे. आपले सगेसोयरे नातेवाईक श्रीकृष्णच दिसत आहे. रक्ताच्या नात्यांप्रमाणेच कृष्णाशी आपले नाते ते स्पष्ट करतात.

बहीणभाऊ : बायको आणि भावाचे, दीर आणि भावजयीचे अशी प्रस्तुत अभंगात चारही नाती स्पष्ट करताना तत्कालीन कुटुंब व्यवस्थेतील कुटुंबामध्ये भाऊ बायको आल्यानंतर कशाप्रकारे नाचतो व बायकाही आपल्या पतीची माता, पिता, बहीण, भाऊ यांच्यापासून कशी ताटातूट करतात याचे वर्णन केले आहे. त्यामुळे तुकाराममहाराज म्हणतात, नात्या–गोत्याची आसक्ती सोडावी व परमेश्वराशी जवळीक साधावी. अशाच पद्धतीने पुत्र व कन्या यांचेही नाते तुकाराममहाराज आपल्या अभंगाद्वारे स्पष्ट करतात,

''बाळ काय जाणे जीवनउपाय । मायबाप वाहे सर्व चिंता ।।१।।

---

[१३८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.५१६, पृ.क्र.९७)

आइतें भोजन खेळणें अंतरीं । अंकिताच्या शिरीं भार नाहीं ।।धृ.।।

आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ।।३।।

तुका ह्मणे माझा विठ्ठल जनिता । आमुची ते सत्ता तयावरी ।।४।।''

पुत्र : आई–वडिलांच्या छत्रछायेखाली मुले निर्धास्त असतात. आई–वडील मुलांची सर्वतोपरी काळजी घेत असल्यामुळे मुलांना जीवनाची चिंता नसते. त्याच पद्धतीने पांडुरंग परमात्माही सर्व विश्वाची काळजी घेत असतो.

अशा प्रकारे नातेसंबंधातील आणखी महत्त्वाचे नाते म्हणजे कन्या होय. कन्येचे नाते स्पष्ट करणारे अनेक अभंग लोकजीवनात येतात.

''कन्या सासुऱ्यासि जाये । मागें परतोनी पाहे ।।१।।

तैसें झालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ।।धृ।।'' [१३९]

मुलगी जेव्हा सासरी जायला निघते तेव्हा ती सारखी मागे वळून पाहत असते. तिची ती अवस्था विशद करताना तुकाराममहाराज सांगतात, तिची जी भावावस्था असते. त्याचप्रमाणे माझ्या मनाचीही अवस्था पांडुरंगाच्या भेटीसाठी झालेली आहे. सासरी चाललेल्या मुलीची ही भावना लोकजीवनातील माहेरच्या नात्याचे आणि प्रेमाचे भावदर्शन दर्शविते.

लग्नसंबंधातून निर्माण झालेली नाती : लग्नाच्या बंधनामुळे निर्माण झालेल्या नात्यांनाही समाज रचनेत महत्त्वाचे स्थान आहे. या नात्यात पती–पत्नीचे नाते निर्माण होऊन त्या नात्याच्या अनुषंगाने दोघांचीही अनेक नाती निर्माण होतात. या नात्यांना मोठी परंपरा लाभते. उदा. पती–पत्नी, सासू–सासरे, वहिनी, नणंद, दीर, आक्कड सासू–मेहुणा, इ. नातेसंबंधाची वीण विणली जाते.

---

[१३९] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २६६, पृ.क्र. ४५

पती–पत्नी : संसारामध्ये पती–पत्नीची महत्त्वाची भूमिका असते. पत्नीचे आपल्या पतीबद्दलचे असलेले प्रेम, पत्नी धर्म, स्त्रीचा कुळाचारही तुकाराममहाराज आपल्या अनेक अभंगांतून दर्शवितात –

''पतिव्रते आनंद मनीं । शिंदळ खोंचे व्यभिचार वचनीं ।।१।।
जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भलें जगीं ।।धृ।।'' [१४०]

पतिव्रतेला ज्याप्रमाणे पतीवाचून इतरांची स्तुती माहीत नसते. पती हा तिच्या ध्यानीमनी सर्व भावाने असतो. त्याप्रमाणे तुकाराममहाराज म्हणतात, माझे मन विठ्ठलाशी एकनिष्ठ झालेले आहे. पांडुरंगाशिवाय मनाला दुसरे काही आवडत नाही. त्याचे वर्णन प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज करतात–

''पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ।।१।।
तैसें माझें मन एकविध जालें । नावडे विठ्ठलेंविणे दुजें ।।धृ।।
सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेंसी ।।२।।
तुका ह्मणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकाचे नावडती ।।३।।'' [१४१]

पतिव्रतेला आपला पती सर्वप्रमाण असतो. तसाच आम्हास नारायण प्रमाण आहे. तुकारामांचे एकविद्य झाले आहे. विठ्ठलावाचून दुसरे काही महत्त्वाचे त्यांना वाटत नाही. समाजात पतिव्रतेला किती महत्त्वाचे स्थान होते आणि पतिव्रता स्त्री ही किती आदर्श होती, हे सांगताना ते भक्ताचे देवाशी असणारे नाते हे पतिव्रतेच्या पतीवर असणाऱ्या नात्याइतकेच शुद्ध आणि दृढ असते असे म्हटले आहे. भक्तिप्रेमाच्या रूपात ते लोकजीवनातील पतिव्रतेला ते उभे करतात.

''पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आह्मां नारायण तैशापरी ।।१।।
सर्वभावें लोभ्या आवडे हें धन । आह्मां नारायण तैशापरी ।।२।।

---

[१४०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र. १७४८, पृ. ३६९)

[१४१] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.१६२१, पृ.क्र. २८८

तुका ह्मणे एकविध जालें मन । विठ्ठलावाचून नेणें दुजें ।।३।।'' [१४२]

४.५.१० स्त्री जीवन :

भारतीय संस्कृती पुरुषप्रधान असली तरी स्त्रीचे एकंदर समाजातील आणि कुटुंबातीलही स्थान महत्त्वपूर्ण आहे. स्त्रीची संपूर्ण सृष्टीची अधिष्ठांगी म्हणून गणना होते. वैदिक काळातही स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते. संत तुकाराममहाराज यांनी आपल्या अभंगामधून स्त्री–जीवनाचे विविध पैलू उलगडून दाखविले आहेत.

अभंगातील लोकजीवनाचा स्त्री अविभाज्य घटक आहे व तिला लोकजीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्त्रीचे विविध पैलू समाजात व गाथेत पहावयास मिळतात. प्रपंचाला अध्यात्मिक अधिष्ठान देऊन फक्त प्रपंच सांभाळणाऱ्या स्त्रिया, कुटुंबवत्सल संसारी, सासरकडील सर्व मंडळींचा आदर करणाऱ्या स्त्रिया, संसारातील कामे, व्यावसायिक कामात मदत करणाऱ्या, घरातील आपला दर्जा सांभाळून आदरातिथ्य करणाऱ्या, नाती जपणाऱ्या अशा अनेक स्त्रियांचे वर्णन अभंगामध्ये तुकाराममहाराज करतात. कुळाचार न पाळणाऱ्या व्यभिचारी स्त्रियांचेही वर्णन महाराज आपल्या अभंगात करतात. सण–उत्सव, कांडण, जाते, ओव्या यामधूनही स्त्री जीवन मांडले आहे. स्त्रीला एक आदर्श निर्माण करण्यासाठी लहानपणापासून त्या काळी तसे संस्कार रुजविले जात असत. घरातील थोरामोठ्यांशी कसे वागावे, कुलाचार तिला समजावून सांगितला जात असे, कर्मयोगाची तिची जडण–घडण तशी संस्कारली जात असे. घरातील कर्मयोगाचे स्वरूप सांगणारे तसे संदर्भ देणारे अनेक अभंग संत तुकारामांनी गाथेत दिले आहेत. त्यावरून तत्कालीन सामाजिक दृष्टिकोन लक्षात येतो. स्त्रीने पहाटेपासून घरातील सारी कामे करावीत, घरातील सदस्यांचा यथायोग्य आदर–सन्मान करावा. त्यांच्या भोजनाची व इतर सर्व गोष्टींची जबाबदारी घ्यावी. कोणत्याही तक्रारीशिवाय अशी अपेक्षा केली जात असे.

''स्वामिसेवा गोड । माते बाळकाचें कोड ।।

---

[१४२] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ९४२

जेंजें मागावें भातुकें । तेंतें पुरवी कौतुकें ।।

खेळविलें कोडें । हरुषें बोले कीं बोबडें ।।

तुका ह्मणे लाड । तेथे पुरे माझें कोडे ।।'' [१४३]

प्रस्तुत अभंगात स्त्री जीवनाची प्रचिती येते. पतीची सेवा करणे तिने गोड मानावे, बाळाने जे जे मागितले ते ते स्त्रीने त्याचे लाड पुरवावे. तसेच लोकमानसातील स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा परिचय तुकारामाच्या अभंगात प्रतित होतो. 'पतिव्रता' हे भारतीय संस्कृतीत, एकनिष्ठ अनन्यभक्तीचे प्रतीक आहे. प्राचीन संस्कृतीत ही पतिव्रतेची अनेक उदाहरणे दिली आहेत. स्त्री एकनिष्ठता पाळत असे. पण तिने पाळलीच पाहिजे, असे बंधनही तत्कालीन परिस्थितीत होते. इतिहासाचे दाखले त्यासाठी दिले जातात. सीता, सावित्रीची उदाहरणे देऊन स्त्रीला आदर्शवादाच्या बंधनात ठेवले जात असे व स्त्रीही ते बंधन प्रेमाने स्वीकारत पतीशी मन, वचन, देह यांनी एकनिष्ठ राहून प्रपंचाचा भार समर्थपणे सांभाळत होती. पतीशिवाय स्वप्नातही परपुरुषाचा विचार म्हणजे 'पाप' आहे. तिची पतीशी असणारी एकनिष्ठा हा आदर्श कुटुंबाचा भाग होता. तुकाराममहाराज म्हणतात–

''विधवेसि एक सुत । अहर्निशीं तेथें चित्त ।।१।।

तैसा तूं मज एकला । नको मोकलूं विठ्ठला ।।धृ।।

सुपुत्रालागीं बाप । अवघे तेथे चि संकल्प ।।२।।

तुका ह्मणे चित्तीं । पतिव्रते जैसा पति ।।१।।'' [१४४]

विधवेला जसा एकच पुत्र असल्यावर रात्रंदिवस त्याचाच विचार करते तसेच..

''पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हा नारायण तैशापरि ।।

तुका म्हणजे एकविध जाले मन । विठ्ठल वांचून नेणे दुजे ।।१।।'' [१४५]

---

[१४३] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ४२१५, पृ.क्र. ६८८.

१४४ श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ४३६५, पृ.क्र. ७१४

[१४५] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ९४२, पृ.क्र. १६८

पत्नीने पतीजवळ एकचित्त असावे, पतीवरती एकनिष्ठता असावी व स्त्रीला शोभणारीच आहे तेव्हा तिने ते संकेत पाळलेच पाहिजे, अशी धारणा होती. तशीच धारणा तुकारामाची विठ्ठलाशी आहे, हे सांगण्यासाठी ते पतिव्रतेचे ते प्रमाण देतात.

पतिव्रता स्त्रीचे दाखले अभंगात आढळतात. त्याचप्रमाणे तत्कालीन लोकजीवनात परित्यक्ता विधवा यांच्याबद्दलची लोकमानसिकता जाणवते व तोही स्त्रीजीवनाचा समजून घेण्याचा मोठा भाग आहे. सुधारकांच्या भूमिकेसाठी तो महत्त्वाचा विषय आहे. पतीने सोडून दिलेल्या तसेच विधवा स्त्रियांना प्राचीन काळापासून आजतागायत उपेक्षेला सामोरे जावे लागते. ते आपल्या अभंगात मांडताना तुकाराममहाराज म्हणतात,

''संतांच्या धिक्कारें अमंगळ जिणें । विश्वशत्रु तेणें सांडी परि ।।१।।
कुळ आणि रूप वांयां संवसार । गेला भरतार मोकलितां ।।धृ.।।''[१४६]

पती सोडलेल्या स्त्रीची अवस्थेचे वर्णन तुकाराममहाराज करतात.

''सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावें चि ।।१।।
सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ।।२।।
न व्हावी तें जाली आमुची भंडाई । तुका ह्मणे काई लाजों आतां ।।३।।''[१४७]

परित्यक्ता होणे नशिबी येते म्हणजे तो तिच्या संचिताचा, प्रारब्धाचाच भाग असतो. तिची सासर–माहेर दोन्हीकडे अवहेलनाच होते. तिला अशुभ मानले जाते. दुर्दैवी ठरवणे. सासर–माहेर दोहांकडे तिची उपेक्षाच होते. हे तत्कालीन लोकजीवनातील विदारक चित्र महाराज आपल्या अभंगात मांडतात.

---

[१४६] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. १३९९, पृ.क्र. २४४

[१४७] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २३, पृ.क्र. ४

अशीच अवस्था विधवास्त्रीची ही असते, हे सांगताना ते म्हणतात...

''कुंकवाची ठेवाठेवी । बोडकादेवी काशाला ।।
दिवस गमा भरा पोट । कां गे नट नटावा ।।धृ.।।
दिमाख हा कोणां दावा । लटकी जीवा चरफड ।।२।।
तुका ह्मणे झोंडगीं हो । फुंदा कां हो कोरडी ।।३।।'' [१४८]

विधवेसाठी 'बोडकेपण' हा शब्दप्रयोग केला जात आहे. तत्कालीन ग्रामव्यवस्थेत विधवा स्त्री ही अपवित्र मानली जात असावी. विधवेबाबत कठोर मानसिकता प्रस्तुत अभंगात आढळते. पती नसल्यामुळे तिने केशवपन करणे, साजशृंगार न करणे असे कठोर अनुशासन तिच्या बाबतीत वापरले जात असे, असे आढळते.

महाराष्ट्रातील तत्कालीन परिस्थितीची जाणीव संत तुकोबांना होती. लोकमानसात जगणारे संसारी व त्याच तोलामोलाचे अधिकार प्राप्त झालेले सत्पुरुष आपल्या वाणीतून लोकाचारांचे संदर्भ जेव्हा सांगतात, तेव्हा त्यांच्यातील अनुभवसंपन्नतेचे दर्शन घडल्याशिवाय राहत नाही. स्त्राविषयी संकुचित भावनेचे एक समाजजीवनच तुकोबा अभंगातून आपल्यापुढे ठेवतात. तसेच पतिव्रता स्त्रीने कुटुंबातील तिचे वर्तन कसे असावे, हे सांगण्यासाठी प्रस्तुत अभंग मांडतात,

''पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ।।१।।
तैसें माझें मन एकविध जालें । नावडें विठ्ठलेंविण दुजें ।।धृ.।।
सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेंसी ।।२।।
तुका ह्मणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ।।३।।'' [१४९]

''पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्याभिचारवचनीं ।।१।।

---

[१४८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ४०३६, पृ.क्र. ६६०

[१४९] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. १६२१, पृ.क्र. २८२

जळो वर्म लागो आगी । अशुद्धपण भलें जगीं ।।धृ।।

सुख पुराणीं आचारशीळा । दुःख वाटे अनर्गळा ।।२।।'' [१५०]

''अहेव मरणाची । किती सूयांनो मौज ।

पुढे चाले कंथ । मागे गोताची फौज ।।''

असे अनेक अभंगाची पार्श्वभूमी पाहता तत्कालीन स्त्री जीवन आपल्या दृष्टीत येते. स्त्रीही संवेदनशील आहे, तिची घरातील भूमिका सर्वांची आशा–अपेक्षा ती पूर्ण करते स्त्रीची वेगवेगळी मानसिकता तुकाराममहाराज आपल्या अभंगात मांडतात. सासरी निघालेली कन्या, माहेरच्या माणसांचा झालेला विरह व नात्यांची वीण तुकाराममहाराज आपल्या अभंगात मांडतात. लग्न झाल्यावर सासरी निघालेल्या स्त्रीचे भावदर्शन ते अतिशय समर्पकपणे मांडतात. त्यातून तिची माहेराविषयीची आर्तता आणि प्रेमच प्रकटते.

''कन्या सासुऱ्यासि जाये । मागें परतोनी पाहे ।।१।

तैसें जालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ।।धृ।।

चुकलिया माये बाळ हुरू हुरू पाहे ।।२।।

जीवना वेगळे मासोळी । तैसा तुका तळमळी ।।३।।'' [१५१]

प्रस्तुत अभंग हा स्त्री जीवनावरील अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच लोकजीवनातील अर्थगर्भतेसाठी ही त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रबंधातही तो अनेकार्थी वापरला गेला आहे.

सासरी चाललेली मुलगी आपल्या माता–पित्याकडे मागे वळून परत परत पाहत आहे, तिचे मन त्यांच्यासाठी व्याकूळ होत आहे. तुकाराममहाराज आपल्याही मनाची अवस्था पांडुरंगाच्या भेटीसाठी अशीच झाली आहे. हे सांगण्यासाठी अभंगाचे प्रयोजन करतात.

---

[१५०] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. १७५४, पृ.क्र. ३०३

[१५१] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ. क्र. २६६, पृ.क्र.४५

तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवन हे तत्कालीन स्त्रीभोवती मोठ्या प्रमाणात गुंफलेले आढळते. नाती–गोती सण–उत्सव, दळण, कांडण करताना पारंपरिक खेळ या साऱ्या गोष्टीत स्त्री जीवनातील धागेदोरे आढळतात. अशाच एक सासूबाई सूनबाईला उपदेश करतात. सासुरवास करणारी सासू पंढरीला जायला निघते; पण तिचे मन सुनेच्या संसारातच गुंतल्यामुळे वारीच्या वाटेवर वेशीपर्यंत गेलेली सासू परत कधी येते याचे गमतीशीर पण वास्तव चित्रण तुकोबाराय त्या अभंगातून मांडतात.

''परिसें गे सुनेबाई नको वेचूं दुध दहीं ।।१।।
आवा चालिली पंढरपुरा । वेसीपासून आली घरा ।।धृ.।।
ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ।।२।।
माझे हातींचा कलबडू । मजवांचुनि नको फोडूं ।।३।।
वळवटक्षिरीचें लिंपन । नको फोडूं मजवांचून ।।४।।
उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ।।५।।
भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ।।६।।
भक्षी परिमित आहारू । नको फारसी वरो सांरू ।।७।।
सुने ह्मणे बहुत निंके । तुह्मीं यात्रेसी जावें सुखे ।।८।।
सासुबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ।।९।।
सुनमुखीचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंची मनीं ।।१०।।
सवतीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे ।।११।।
आतां कासया यात्रे जाऊं । काय जाऊनि तेथें पाहूं ।।१२।।
मुलें लेंकरें घर दार । माझें येथें चि पंढरपुर ।।१३।।
तुका ह्मणे ऐसें जन । गोवियेले मायेंकरून ।।१४।।'' [१५२]

तुकारामांच्या अगाध कवित्वाचा साक्षात्कार प्रस्तुत अभंगात येतो. लोकजीवनाचा गाभा यात गवसतो. या एकाच अभंगात सासू, सून, सवत अशा तीन स्त्री जीवनाचा परामर्श आढळतो.

[१५२] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ४२१९, पृ.क्र. ६८९.

एक सासू पंढरपूरला जाण्याकरिता वेशीपासून आपल्या घरी संसारातील आसक्तीने परत येऊन सुनेला म्हणते की, अगं, सूनबाई तू माझे ऐक आपल्या घरी असणारे दही, दूध हे जास्त खर्च करू नको ते जास्त वापरू नको. तू माझे बोलणे नीट ऐक. मी गोवऱ्या ह्या लिपून ठेवल्या आहेत. खीर करण्यासाठी केलेल्या शेवयांचे पात्र मी येण्यापूर्वी तू अजिबात फोडू नकोस. आपल्या घरी एखादा भिक्षा मागण्याकरिता जर भिक्षुक आला तर त्यास तू 'माझी सासू पंढरपूरला विठोबाच्या दर्शनाला गेली आहे, असे सांगून त्यास परत पाठव' सासूबाई आपल्या घराची काही काळजी करू नका. मी तुमचे सर्व काही ऐकले आहे. सुनेचे हे वाक्य ऐकून सासूला तिच्या रूपात सवत दिसते. म्हणून मग ती म्हणते, मी भरलेले घर सोडून काही यात्रेला जात नाही. माझे इथेच पंढरपूर म्हणत पुन्हा सुनेच्याच प्रपंचात डोकावत राहते. सासू–सुनेच्या वागण्याचे इतके समर्पक लोकदर्शन कुठे पाहायला मिळणार? त्या सासूप्रमाणे सारे जीव या मायेतच अडकतात, असे ते सांगतात.

तत्कालीन स्त्री ही कुटुंबवात्सल्य होती. पहाटे लवकर उठून ती रात्री निजेपर्यंत फक्त ती कुटुंबासाठी कुटुंबातील नात्यासाठी झटत असे. सूर्योदयापूर्वी उठून ती दळण–कांडण–आडसण करीत असे. त्याचाही उल्लेख तुकारामांच्या गाथेत आढळतो.

दळण–कांडण आणि आडसण या धान्यशुद्धीच्या प्रकिया आहेत. कांडण करताना स्त्री ज्याप्रमाणे धान्य व भुसा वेगवेगळा करते तसेच तुकाराममहाराज आत्मा–अनात्माभावाचे कांडण आपल्या अभंगात करीत आहेत. त्याला अध्यात्माची जोड देत आहेत. लोकजीवनातील स्त्रीच्या प्रतिमेचे प्रयोजन करून ते आत्मानुभूतीचे सार निवडा असा उपदेश करीत आहेत. आपल्या माहेरच्या आठवणींची गाणी गात लयबद्ध हालचालीत हातातील बांगड्याचा आवाज होतो. त्याच तालावर तत्कालीन स्त्रीचे कांडण चालू असते. त्या नादाशीच ती एकरूप होते.

''शुद्धीचें सारोनी भरियेली पाळी । भरडोनी वोंगळी नाश केला ।।१।।
आडसोनी शुद्ध करीं वो साजणी । सिद्ध का पापिणी नासियेलें ।।२।।
सुपीं तोंचि पाहें धड उगटिलें । नव्हता नासिलें जग झोडी ।।३।।

सुपीं तोंचि आहे तुज ते आधीन । दळिल्या जेवण जैसें तैसें ।।४।।

सुपीं तोंचि संग घेंई धडफडी । एकसा गधडी नास केला ।।५।।

दळितां आढळे तुंज कां न कळे । काय गेले डोळे कान तुझे ।।६।।

सुपीं तोंचि वोज न करितां सायास । पडसी सांदीस तुका ह्मणे ।।७।।'' [१५३]

अशा प्रकारे आत्मा–अनात्माभावाचे वर्णन प्रस्तुत अभंगात करताना लोकजीवनातील स्त्रीपात्रास मध्यवर्ती घेऊन म्हणतात– शुद्ध परमार्थाने दळण बाजूला सारून, अशुद्ध विषयाने मनबुद्धिरूपी जात्याची पाळी विषयासक्त भरडले व त्यामुळे नरदेहाचा नाश झाला आहे. ते हे सख्यांनी आत्मानात्म विवेकाच्या रूपाने शुद्ध आत्मभाव अवसान घ्या. नरदेहरुपी सुखाचा जोपर्यंत योग आहे, चांगले–वाईट यांची पारख करा. तेव्हाच तुमचे आत्मकल्याण आहे. त्याचे नाशरुपी दळण झाले म्हणजे कर्माने जो जन्म मिळेल तो स्वीकारला पाहिजे. जोपर्यंत नरदेहाच्या सुखाचा सुयोग आहे. तोपर्यंत स्वरूपाची संगती स्वीकारा. देहबुद्धी धरून अनेक वाईट कर्माचे दळण दळल्याने अनेक जन्माच्या फेऱ्यात अडकावे लागेल. तेव्हा सत्कर्माचा स्वीकार कर असे अध्यात्मिक सार दळण–कांडण व स्त्री प्रतिमांच्या साहाय्याने ते व्यक्त करतात. अशा प्रकारे गाथेत 'दळण–कांडण' प्रकारात सदर तीन अभंग तुकाराममहाराज व्यतीत करतात. हे दळण प्रपंचाचे आहे. त्यतून सत्त्वाचे पीठ घडवायचे आहे. जाते, सूप, कांडण, दळण, हासडणे, भरडणे या साऱ्या घटना रूपकात्मक पद्धतीने मांडल्या आहेत.

''करीत शुद्ध दळणाचे सुख सांगो काई । मानवत असे सईबाई ।।१।।

शुद्ध तें वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ।।२।।

शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ।।३।।

शुद्ध त्याचा पाक शुद्धचित्त चांगला । अविट तयाला नाश नाहीं ।।४।।

तुका म्हणजे शुद्ध नावडे सकळां । भ्रतार वेगला न करी जीवें ।।५।।'' [१५४]

---

[१५३] ह.भ.प. स.के. नेऊरगांवकर, श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती – २००३, अ.क्र. २८८१, पृ.क्र. ६८९

[१५४] संपादक नथुसिंग डोंगरसिंग राजपूत, श्री संत तुकाराममहाराजांची सार्थ गाथा, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २५८, पृ.क्र. १५५.

शुद्ध आचरणरूपी दळणाचे सुख काय सांगावे. शुद्ध आचरणाचे दळण हे लवकर होते. दळण दळताना अष्टांग शांत ब्रह्म स्वरूप होतात. शुद्ध परमार्थाचे स्वरूपाचे ध्यान होऊन देह व मन शांत होते. व मग परमार्थरूपी स्वरूपाची गोडी काही अवीट असते. जी स्त्री सदाचाराचे दळण शुद्ध परमार्थाचा पाक करते. तिला श्रीहरी वेगळा करीत नाही, असे अवीट सौंदर्य स्त्री जीवनात मांडताना तुकाराममहाराज दिसतात.

कांडण – स्त्री जीवनाला मध्यवर्ती भूमिका देऊन कांडणाच्या अभंगाची निर्मिती आढळते. कांडणात दोनच अभंग आहेत.

''सावडी कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ।।१।।
मुसळ आधारीं आवरूनि धरीं । सांवरोनि थोरी घाव घालीं ।।धृ.।।
वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीतीं।।३।।
कांडितां कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तो ।।४।।
तुका म्हणे रूप उमटे आरिसा । पाक त्यासरिसा सिद्ध झाला ।।५।।'' [१५५]

कांडण स्त्रीजीवनाचा अविभाज्य घटक आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतो. स्त्रीला सर्व मसाले, धान्य साफ करणे इ. कामे घरच्या घरीच करावी लागत असत. उखळात मुसळाचा घाव घालण्याच्याा स्त्रीच्या कृतीला समर्पक दाखल्यासाठी ते उभे करतात.

कांडण करताना तू नारायणाच्या स्वरु चिंतनाने ते आवर. ते असे कर ज्यायोगे सार व असार आपोआप वेगळे होतील. विवेकरुपी मुसळाला तू सावरून धर व मग घाव घाल. तुझ्या बांगड्या निनांदात तू गाणे गा. पण ते गाणे पांडुरंग–रुक्मिणी तुझे माता–पिता संबोधून तू गाणे गा. जोपर्यंत श्रमपरिहार होणार नाही. ज्याप्रमाणे स्वतःचे प्रतिबिंब आरशामध्ये प्रतीत होते. त्याचप्रमाणे स्वात्मानुभवाची पाक सिद्धी होणार नाही.

''सिद्ध करुनियां ठेविलें कांडण । मज सांगातीण शुद्ध बुद्धि गे ।।१।।

[१५५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ. क्र. १५८, पृ.क्र. ३३

आठव हा धरीं मज जागें करी । मागिले पहारी सेवटींचा गे ।।२।।

सम तुकें घाव घाली वो साजणी । मी तुज मिळणी जिवें मिळें ।।३।।

एक कशी पाखडी दुसरी निवडी । निःशेष ते सडी ओज करी ।।४।।

सरलें कांडण पाकसिद्धी करी । मेळवण क्षिरीसाकरेचें ।।५।।

उद्धव अकूर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ।।६।।

तुका म्हणे मज माहेरी आवडी । म्हणोनी तांतडी मूळ केलें ।।७।।'' [१५६]

भल्या पहाटे उठून कांडण करणाऱ्या लोकजीवनातील प्रतिताचे वर्णन कांडण करणाऱ्या त्या स्त्रीला तुकाराममहाराज करतात. आत्मा मनाचे कांडण त्यांनी स्वतः सिद्ध करून ठेवले आहे. आत्मभानाची जागृती कर. सर्वांठायी परमात्म्यातूनच ही भावना ठेव. म्हणजे तुझ्या–माझ्या जिवाचा योग परब्रह्माच्या ठायी एकच होईल. स्थूल देहाच्या विवेकाने सडणे झाले आहे. विचारांनी सुक्ष्म देहाची सड झाली. म्हणजे त्यापासून आत्मबुद्धी निवडून घे. असे करीत ज्ञानरूप सिद्ध आत्मभावाचा पाक कर व त्यात आत्मआनंदांची साखर मिसळ, कारण उद्धव व अंकुर हे दोघे भाऊ जेवावयास बसणार आहेत. लोकजीवनात स्त्रीच्या वाट्याला आलेले दळण, कांडण, जाते, पाखडणे, हाडसणे ही सारी क्रिया, कर्मे एकीकडे लोकजीवनाचा भाग म्हणून उभी राहतात. तर दुसरीकडे त्यातून अध्यात्मिक रूपके उभी करून परमार्थाचा उपदेशही करतात.

४.५.११ : पाळणा :

अशा प्रकारे लोकजीवनातील महत्त्वाचा दळण, कांडण, हाडसण्यामधून स्त्रीची प्रतिमा दिसून येते. तसेच त्यातीलच एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'पाळणा'. स्त्री मग ती कोणत्याही समाजातील, कोणत्याही स्तरातील असो. ती आपल्या बाळाला जोजवण्यासाठी अंगाई गीत गाते व त्यास पाळणा असे म्हणतात. हा पाळणा कृष्णाला संबोधला जातो. तसेच तो प्रत्येक माता आपल्या लेकरासाठीही गाते. अशाच एका पाळण्याची रचना संत तुकाराममहाराज आपल्या अभंग गाथेत करतात.

---

[१५६] संपादक नथुसिंग डोंगरसिंग राजपूत, श्री संत तुकाराममहाराजांची सार्थ गाथा, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अभंग क्र. २६०, पृ.क्र. १५६

'पाळणा' गाण्याची परंपरा ही अतिप्राचीन आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी ही पाळण्याची रचना केलेली आढळते. त्यात तुकाराममहाराजांचाही समावेश होतो. अभंग गाथेत 'पाळणा' हा विशिष्ट रचनाप्रकार आढळतो. ममतेच्या मायेने जेव्हा एखादा अनुभव समाजासाठी तुकाराममहाराज देऊ करतात. तेव्हा त्यांचे शब्दरूप पाळण्याच्या रूपाने अभिव्यक्त होतात.

''जननिया बाळका रे घातलें पाळणा ।
पंचतत्वीं जडियेल्या वारतिया चहू कोणा ।।
अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा ।
वैखरी धरूनि हातीं भाव दावी खेळणा ।।१।।
निजीं रें निजीं आतां । म्हणोनि परिये दे माता।
खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां ।।धृ.।।
खेळतां बाहेरी रे मुला लोकांच्या सवें ।
बागुल काळतोंडा नाहीं नेतों ते ठावें ।
खेळतां दुश्चिता रे देखोनि ते न्यावें ।
म्हणोनि सांगे तुज शीघ्र वचन पाळावें ।।३।।
संचित मागें शुद्ध तुज होते सांगाती ।
तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं ।
आणिक नेलीं मागें काय जाणों तीं किती ।
आलासी वेधवरी थोर पुण्यें बहुतीं ।।४।।
खेळतां शुक देवा खोरे लागला पाठीं ।
लपाला वरूषें बारा तिये मातेचे पोटीं।
रिघतां बाहेरी रे पळे घेऊनि कासोटी ।
तेचि परी झाली स्वामी भेणें रिघें कपाटीं ।।५।।
खेळतां चक्रवर्ती जनका लागला धाक ।
पडिलासे अग्निमाजी पाव जळत एक ।

भरलासे कांप अंगीं सुख नाठवे दुःख ।

आप पर तें ही नाहीं देहभाव सकळीक ।।६।।

सिबीया चक्रवर्ती कव पडिली अवचिती ।

धीट तो न भे तया मांस कापिलें हातीं ।

टाकिलें तयावरी खुणें गोविला अंती ।

पावला मायबाप हिरोन घेतला हातीं ।।७।।

बांधलें अजामेळा वेश्या गणिका कैसीं ।

मारिली हाक धाकें कळलें मायबापासी ।

घातली धांव नेटें वेगीं पावला त्यासी ।

हिरोनि नेलीं दोघें आपणयां तीं पासीं ।।८।।

धरुनि आठवूं रे बाळा राहे निश्चळ ।

खेळतां दुश्चिता रे नको जाऊं बरळ ।

टोंकताहे तुजलागीं दिवस लेखूनी काळ ।

मग नेदी आठवूं रे नेत्रीं घालीं पडळ ।।९।।

ऐसी तीं कृपावंतें बाळा मोहिलें चित्त ।

सुस्वरे कंठ गाये मधुर आणि संगीत ।

तेणें तें चित्त राहे होवूनियां निवांत ।

पावती तुका म्हणे नाहीं विश्वास ते घात ।।१०।।'' [१५७]

ध्रुवपदासहित १० कडवे या पाळण्यात आहेत. या पाळण्याचा आशय बोधप्रद व आशयदृष्ट्या अध्यात्मिक स्वरूपाचा आहे. संतरूपी मातेने जीवात्मरूपी बालकास पंचतत्त्वाच्या देहरूपी पाळण्यात घातले व पंचतत्त्वाच्या ठिकाणी चारही देहांचे चार कोपरे त्याठिकाणी चारही वाणीरूपी स्त्रिया अखंड जडलेल्या आहेत. सोहम् अशा भावनेने त्या खेळकर मुलाने राहावे असे त्या बालकाला सुचविले आहे. निजस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होण्यासाठी आई बाळाला झोके

[१५७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रेक्षेत्र देहू, पुणे – २०१३, अ.क्र..२४७७, पृ.क्र.५१३

देते आहे. तुकाराममहाराज बालकाला उद्देशून आत्मस्वरूपाचे महत्त्व सांगतात की, तू आत्मस्वरूपाला जाणल्यामुळे तुझे अनेक जन्म परिघात करावे लागत आहे. ते बाळाला सांगतात, बाह्यरूपी जगाशी तू क्रीडा करण्यात रममाण झाला आहेस. पण काळरूपी बागुलबुवा येईल आणि तुला घेऊन जाईल हे तुला कळणार पण नाही. हा बागुलबुवा अशांना घेऊन जातो, की जे दुःखरूपी तर्क करण्यात व्यस्त असतात, असेच मानवी देह येऊनही संसाराने अधोगतीला जातात. तुला पुण्याई हा नरदेह प्राप्त झाला आहे. तेव्हा तू निजस्वरुपाची ठिकाणी स्थिर हो शेवटी बाळरूपी समाजाला तुकाराममहाराज उपदेश करतात, 'हे बाळू, तू श्रीहरीचा आठव कर. काळ वाट पाहत आहे, तेव्हा बेसावध राहू नकोस. तुकाराममहाराज पाळण्याच्या साहाय्याने मातेच्या व मायेच्या ममतेने समाजाला प्रबोधन करतात. एकाच 'पाळणा' या रचनेची निर्मिती झाली असली, तरी आशय व अनुभव अभिव्यक्तीच्या दृष्टीने अफाट सामर्थ्य पाळण्यात दिसते. लोकजीवनातला प्रत्येक घराघरांत गायला जाणारा प्रकार सर्वपरिचित असल्यामुळे सामान्यांच्या मनावर ठसतो.

पाळणा हा बाळाला झोपविण्यासाठी गायला जातो. पाळण्याच्या गीतातून ती बाळाशी जणू बोलत असते. संवाद करीत असते. माय–लेकराच्या लौकिक प्रेमाचे एक सहजसुंदर काव्य पाळण्यातून प्रकटते. बाळाला पाळणा गाताना तिचे आनंदविश्व मातृप्रेमाने भरून गेलेले असते. लोकजीवनात या मातृप्रेमाची अनुभूती पाळण्यातून व्यक्त होते. तुकोबारायांनी पाळणा या प्रकारात रचना करून लोकजीवनातील पाळणासंस्कृती मांडली आहे, तर दुसरीकडे निजरूपाशी जागा हो म्हणून अध्यात्मिक तत्त्वाची अपेक्षाही व्यक्त केली आहे.

तुकारामांनी लिहिलेल्या उपरोक्त सर्वच रचनांमधून कोणत्याही कारणाने अनुभवाची अभिव्यक्ती प्रतीत होती. रचनेचे उद्योग व प्रकार वेगवेगळ्या अनुभवातून जाते. तात्पर्य अनुभवाची अभिव्यक्ती बदलली, की तुकारामांचा अभंग आपले मूळ रूप सोडून नवे रूप धारण करतो.

अशाप्रकारे स्त्री जीवनाशी निगडित असलेले लोकजीवन अभंगातून समोर येते.

४.५.१२ : सण – उत्सव :

लोकजीवनात सण–उत्सवाला सांस्कृतिक प्राचीन काळापासून सणांची महती आढळते. सण–वार लोकजीवनात त्या–त्या रूढी–परंपरेने जपलेले दिसतात. सण–उत्सव हेही लोकसंस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत. सणाचे संदर्भही अभंगात येतात. भ्रम संस्कृतीमध्ये थोड्या वेळाच्या विसाव्यासाठी आप्त–नातलगांच्या भेटीसाठी नेहमीच्या कामकाजातून सवड काढून मनाला रिझविण्यासाठी सण–उत्सवांची योजना करण्यात आली आहे. त्यात दिवाळी–दसरा हे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. दिवाळी या सणाला आत्यंतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

परंतु संत तुकारामांना संत भेटीतच दिवाळी–दसरा वाटतो. दिवाळी या सणाला लोकजीवनाच्या आत्मीयतेने जपले आहे. पहाटेचे अभ्यंगस्नान, फराळाचे विविध पदार्थ, सडा–रांगोळ्या यामधून दिवाळीचे वातावरण निर्माण केले जाते.

तुकाराममहाराजांच्या दिवाळीचे वर्णन करणाऱ्या एका प्रसिद्ध अभंगातून ते दिसून येते,

''भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रीं दिवस वाट तुझी ।।१।।
पुर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ।।धृ.।।
दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली । पाहतसे वाटुली पंढरीची ।।२।।
भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परि माउलीची ।।४।।
तुका ह्मणे मज लागलीसे भूक । धांवूनि श्रीमुख दावीं देवा ।।५।।'' [१५८]

प्रस्तुत अभंगात ते पांडुरंगाच्या भेटीची आस व्यक्त करताना दिवाळीच्या सणाचा आधार घेतात. लेकी ज्याप्रमाणे दिवाळीला माहेरी जावेसे वाटते, त्याचप्रमाणे यांना पंढरपुराला जाण्याची ओढ ते व्यक्त करतात.

---

[१५८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २८२१, पृ.क्र. : ४७३

अशा प्रकारे अनेक अभंगातील चरण दिवाळी व दसरा सणाची आठवण करून देणारे अभंग गाथेत आहे.

''तुका ह्मणे त्याचे घरींची कष्टावळी । मज ते दिवाळी–दसरा सण ।।'' [१५९]

''दसरा दिवाळी तो चि आह्मां सण । सखे संतजन भेटतील ।।'' [१६०]

''तुका ह्मणे संत आले घरा । तो चि दिवाळी दसरा ।।'' [१६१]

दिवाळी सणाप्रमाणेच तत्कालीन समाजजीवनात 'दसरा' सणाला फार महत्त्व होते. तुकाराम महाराजांच्या अभंगात दिसते. दिवाळी–दसऱ्याला बहीण आपल्या भावाकडे चोळीबांगडीची आशा करते व आपल्या भावाची वाट पाहते. दसरा सण साडेतीन मुहूर्तामधील एक मुहूर्त मानला जातो. या दिवशी शस्त्राची पूजा करतात. हा सण अश्विन महिन्यात नवरात्रीनंतर येतो. सीमोउल्लंघनाची प्रथा या दिवशी आहे. त्या सणाविषयी तुकाराममहाराज अभंगात म्हणतात,

''पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा ।
सांपडला तो साधा आजि मुहूर्त बरा ।।१।।
गर्जा जयजयकार हरि हृदयीं धरा ।
आळस नका करूं लहानां सांगतो थोरां ।।१।।''[१६२]

''सिलंगणीचें सोनें । ठेवूं नये तें गहाण ।। '' [१६३]

---

[१५९] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ३८६१, पृ.क्र. : ६३२.

[१६०] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ३९२०, पृ.क्र. : ६४२.

[१६१] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ९९४, पृ.क्र. : १७६.

[१६२] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ५०६, पृ.क्र. : ९५

[१६३] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ४३००, पृ.क्र. : ७०३

''सिलंगणीचे सोनें । त्यानी गहाण ठेवी कोण ।।'' [१६४]

''आपटा संवदड रानचारा । दसऱ्याचा होय तुरा ।।'' [१६५]

अशा प्रकारे दसरा सणाचे वर्णन अभंगात आढळते.

४.५.१३ : नृसिंह जयंती :

तत्कालीन लोकजीवनात नृसिंह जयंतीही साजरी केली जात असावी. कारण तशा स्वरूपाचे वर्णन अभंगात आढळते. तुकाराममहाराजांनी नृसिंह जयंतीच्या स्वरूपाबाबत, तसेच नृसिंहाचे माहात्म्य वर्णन करून सांगितले आहे.

''अग्निकुंडामाजी घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ।।१।।
पितियासी ह्मणे व्यापक श्रीहरि । नांदतो मुरारी सर्वा ठायीं ।। धृ ।।
अग्निरुपें माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हाक मारी ।।२।।
तुका ह्मणे अग्नि जाहाला शीतळ । प्रताप सबळ विठो तुझा ।।३।।'' [१६६]

प्रल्हादाला परमेश्वराचे नामस्मरण करू नको म्हणून अनेक वेळा मारण्याचा प्रयत्न हिरण्यकश्यपूने केला. त्या वेळी प्रत्येक प्रसंगात परमेश्वरच त्याला वाचवतो. कारण अखंड नामस्मरणच प्रल्हादाच्या मुखामधून होत होते. चराचरी व्यापलेल्या मुरारीला सर्वांनी शरण जावे असे ते सांगतात.

---

[१६४] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ४१९५, पृ.क्र. : ६८४

[१६५] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ४४४९,

[१६६] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ३०९४, पृ.क्र. : ५१७

इतर सण उत्सवाचाही उल्लेख अभंगांमधून आढळतो. होळीचा उत्सव, कृष्णाष्टमी, रामनवमी, एकादशी यांचेही तुरळक का होईना, संदर्भ गाथेत सापडतात. यामधून लोकजीवन व लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

अभंगांमधून विविध लोकधर्म व्यक्त होतात. त्या प्राचीन संस्कृतीपासूनच अस्तित्वात आहेत. यांचेही दर्शन घडते.

४.५.१४ : लोकधर्म :

लोकजीवनाचा एक टप्पा म्हणजे लोकधर्म होय. लोकजीवनात लोकांचे जीवनमान त्यांना आवश्यक असलेल्या बाबी लक्षात घ्याव्या लागतात. लोकधर्म हे समूहातून निर्माण होतात. लोकजीवन व लोकधर्म यात जवळचा संबंध आहे. हे लोकविश्वासावर अवलंबून असतात. विविध प्रकारचे रीतीरिवाज, रूढी, परंपरा, धार्मिक विधी, निसर्ग इत्यादी घटक पाप–पुण्य शकुन–अपशकुन, सामाजिक समजुती भविष्यवाणी, लोकसमजुती या साऱ्यांचा विचार लोकधर्मामध्ये केला जातो.

संत तुकाराममहाराज हे लोकमानसात वावरणारे संत होते. त्यामुळे समाजातील सर्व गोष्टींचे बारीक निरीक्षण त्याच्या अभंगात दिसून येते. लोकधर्म केवळ पारंपरिकता, श्रद्धा व भावना या संकेतावर पाळले जातात. तुकाराममहाराजांच्या अभंग गाथेमध्ये लोकधर्म व्यक्त झालेले आहेत. देवधर्म, मूर्ती, देवळे पूजा–अर्चा, पोथ्या–पुराण, भजन–कीर्तन, तीर्थक्षेत्र, यात्रा–जत्रा या विविध माध्यमांमधून लोकधर्म स्पष्ट होताना दिसतो.

४.५.१४.१ : देव, मूर्ती, देवळे : देव–देवता, मूर्ती व देवळांच्या अनुषंगाने विविध लोकधर्म स्पष्ट केले आहे. कर्मकाडांत गुरफटलेल्या लोकांवर कठोर शब्दांत टीका करतात. दगडाला शेंदूर फासून त्यांची देवळे व पूजा करणाऱ्यावर तुकारामांनी वैचारिक हल्ला केला आहे.

''आणिकांच्या कापिती माना । निष्ठुरपणा पार नाहीं ।।१।।

करिती बेटे उसणवारी । यमपुरी भोगावया ।।धृ।।

सेंदराचे दैवत केलें। नवस बोले तयासि ।।

तुका ह्मणे नाचति पोरें । खोडितां येरें अंग दुखे ।।३।।'' [१६७]

लोकधर्मात कुलदैवताबद्दल नितांत श्रद्धा असल्याचे दिसून येते. वर्षातून एकदा आपल्या कुलदैवताला जाणे, लग्न झालेल्या जोडप्याला पाया पडायला नेणे आदी गोष्टींत ती दिसून येते. शिखर शिंगणापूर, तुळजाभवानी, जेजुरीचा खंडोबा, पालीचा खंडोबा इ. कुलदैवत महाराष्ट्रात दिसतात. तुकाराममहाराजही आपल्या अभंगात त्याचा उल्लेख करतात.

''नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।।

बळिया माझा पंढरीराव । जो ह्या देवांचाही देव ।।धृ.।।

रंडी चंडी शक्ती। मद्यमांस भक्षिती ।।३।।

बहिरव खंडेराव । रोटी सुटीसाठीं देव ।।४।।

गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ।।५।।

मुंजा म्हैसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ।।

वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळे ।।

तुका म्हणे चित्तीं । धरा रुखमाईचा पती ।।'' [१६८]

कर्मकांडात मानवाला गुरफुटून ठेवणाऱ्या रूढी–परंपरा व देव–देवता यांच्यापेक्षा फक्त भक्तीचा भुकेला रुखमाईचा पती पांडुरंग एकटा खरा आहे, असे तुकाराम ठामपणे सांगतात. तेव्हा ते म्हणतात, एकत्र पंढरीचरणी माझ्या कुलांचे कुलदैवत आहे. त्याची भक्ती म्हणजे खरी परमार्थ साधना आहे व ईहलोकांची सुटका आहे.

---

[१६७] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २५६, पृ.क्र. : ४३

[१६८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २३८४, पृ.क्र. : ४०७

४.५.१४.२ : पोथ्या–पुराण : पोथ्या पुराणाबद्दलही श्रद्धा समाजामध्ये प्रचलित असते. पोथी–पुराणे वाचणे व त्यावर निरुपण करणे हा लोकजीवनातील श्रद्धेचा महत्त्वाचा भाग असतो. तुकाराममहाराजांनी पोथी–पुराणातील विविध कथा आपल्या अभंगांत मांडल्या आहेत. तसेच विविध अवतारही जसे मस्त्य अवतार, नृसिंह अवतार, वामन अवतार, कूर्म अवतार, वराह अवतार, परशुराम अवतार, राम अवतार, कृष्ण अवतार, बुद्ध अवतार, कल्की अवतार आपल्या अभंगांमधून मांडले आहेत.

तसेच अभंगामध्ये पुराणांचाही उल्लेख दिसतो.

१. स्कंद पुराण,

२. नृसिंह पुराण,

३. अग्निपुराण,

४. नारद पुराण,

५. वायुपुराण,

६. हरिवंश पुराण,

७. स्कंधपुराण इ. पुराणाचे दाखले महाराज आपल्या अभंगात देतात. रामायण, महाभारत, भागवत यांचीही वर्णने गाथेत आढळतात. पोथ्या पुराणे यांचे भक्त प्रल्हाद, ध्रुव यांच्या संदर्भातील अभंग...

‘‘मागें शरणागत तारिले बहुत । ह्मणती दीनानाथ तुज देवा ।।१।।
पाहिले अपराध नाहीं याती कुळ । तारिला अजामेळ गणिका भिल्ली ।।धृ.।।
अढळपदीं बाळ बैसविला धुरू । श्रीराचा सागरू उपमन्या ।।२।।
गजेंद्रपशु नाडियें जळचरें । भवसिंधुपार उतरिला ।।३।।
प्रल्हाद अग्नींत राखिला जळांत । विषाचें अमृत तुझ्या नामें ।।४।।
पांडवां संकट पडतां जडभारी त्यांचा तूं कैवारी नारायण ।।५।।

तुका ह्मणे तूं या अनाथाचा नाथ । ऐकोनियां मात शरण आलों ।।६।।'' [१६९]

तुकाराममहाराज पांडुरंगाला सांगत आहेत की, तू दीनांचा नाथ आहेस. तू पातक करणाऱ्या अजामेळ, वेश्या, गणिका, शबरी, भिल्लीण यांच्या भक्तीला साद घालून त्यांना तारले आहेस. तसेच ध्रुवाला अटकपदावर बसविले, गजेंद्र हत्तीला पैलतीर गाठवलास, प्रल्हादाची अनेक संकटांतून मुक्तता केलीस. पांडवांचे रक्षण केलेस, तसेच आता तू माझे पण रक्षण कर, मी तुला शरण आलो आहे.

पोथ्या, पुराणे, पुराणकथा, महाभारतातील व्यक्तिरेखा व पुराणपुरूष, देव, भक्त यांच्याही कथा लोकमानसांत रूढ असतात. त्या लोकश्रद्धेचा महत्त्वाचा घटक असतात. तुकोबारायांनी आपल्या अभंगांतून या चरित्र कथांचे अनेक संदर्भ देऊन समाजातील आदर्शांनाही मांडले आहे.

४.५.१४.३ : पूजा – अर्चा : तुकाराममहाराज देवपूजा म्हणजे माणूस पूजेला महत्त्व देतात. भजन–कीर्तन यांमार्फत देवाच्या पूजेला नामस्मरणाला महत्त्व देतात. अंधश्रद्धा दूर करून श्रद्धेला महत्त्व देणे ते योग्य समजतात.

''करावी ती पुजा मनें चि उत्तम ।
एकादशी सोमवार न करिती । कोण त्याची गति होईल ।।'' [१७०]

एकादशी व सोमवार हे व्रत न करणे, त्याची गति काय होईल हे सांगता येत नाही.

''कंठी कृष्णमनी । नाही अशुभ ते वाणी ।।''

ज्याच्या वाणीमध्ये कृष्णाचे नाव नाही त्याची वाणी काय गोड असणार आहे ?

''भवसागर तरतां । कां रें करितसां चिंता ।
पैल उभा दाता । कटीं कर ठेवूनियां ।।१।।'' [१७१]

---

[१६९] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. १०२३, पृ.क्र. : १८१

[१७०] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ७१–७२, पृ.क्र. : १०–११

संसारसागरात तारणारा दाता कर कटेवर ठेवून उभा आहे, तो पाठिराखा आहे मग काळजी कमी असे प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज सांगतात.

कर्मकांडामुळे समाजाची वृत्ती संकुचित होते. व्रत, दान, यज्ञादी कर्मकांडापासून सर्वसामान्य माणसाला वाचविण्याचा प्रयत्न केला. शुद्ध आचरणाने परमेश्वराची प्राप्ती होते. त्यासाठी कोणतेही स्तोम माजविण्याची गरज नाही. त्यांनी हे समाजाला पटवून देण्यासाठी फार मोठा दिलासा दिला आहे. परमेश्वराचे अस्तित्व मनात रुजविले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना एक प्रकारचा दिलासा मिळाला आहे. जप–तप, दान, धर्म, नवस तीर्थयात्रा इ. गोष्टींमुळे तत्कालीन समाजाची दिशाभूल झाली होती. ती परिस्थिती सुधारण्यासाठी संत तुकारामांनी अनुभवनिष्ठ आचरण सांगितले.

४.५.१४.४ : जत्रा – यात्रा : लोकजीवनात यात्रे–जत्रेला फार महत्त्व आहे. देवदेवतांच्या उत्सवाच्या जत्रा–यात्रा भरविल्या जातात. जत्रेयात्रेच्या माध्यमातून अध्यात्मसाधना होत असे, यात्रेला खरेदी–विक्री होत असे, यात्रेच्या निमित्ताने उत्सव भरून मनोरंजन घडत असे. यात्रेच्या निमित्ताने लोकसमूह एकत्रित येत व आपुलकीने नातेवाइकांकडे मुक्काम करण्याचे प्रसंग होत असे. त्यामुळे संघटनही चांगल्या पद्धतीने होत असे.

४.५.१५ : निसर्ग–पर्यावरण–कृषिसंदर्भ :

तुकाराममहाराजांची अभंग गाथा ही बहुतांशी तत्कालीन ग्रामव्यवस्थेवर अवलंबून आहे. शेती हीच उपजीविकेचे साधन असल्यामुळे तत्कालीन समाज शेतीव्यवस्थेवर अवलंबून होता. तसेच गुरे–ढोरे, पाळीव प्राणी हे सारे शेतीपूरक व्यवसाय लोक करत असत.

---

[१७१] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ३४६, पृ.क्र. : ५७

भारत हा कृषिप्रधान देश आहे. वेदातील काळापासून निसर्गाशी मानवाचे अतूट असे नाते आहे. त्यामुळे भारतीय संस्कृती पर्यावरण, कृषी व्यवसायाशी व शेतीशी निगडित आहे. डॉ. रामचंद्र देखणे आपल्या [१७२]'संत साहित्यातील पर्यावरण विचार' या पुस्तकात निसर्गाची भूमिका मांडताना म्हणतात, 'निसर्ग हा ज्ञानमूर्ती आहे. निसर्गातील सारे घटक मानवाला काही तरी देण्यासाठी सदैव तयार आहेत. निसर्गाचे ज्ञान हेच यथार्थ ज्ञान आहे. ज्याला निसर्गज्ञान झाले तोच पूर्ण ज्ञानी होतो; परंतु त्यासाठी निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी असावी लागते. पर्यावरण आणि निसर्ग यांचे मोठेपण अनंतकाळापासून ऋषिमुनींनी गायले आहे. पर्यावरणाचे संतुलन आणि पावित्र्य राखणाऱ्या निसर्गालाच परमेश्वर म्हणून गौरविले आहे. भौतिक आणि अध्यात्मिक जीवनाला निसर्ग–घटकांची किती आवश्यकता आहे. याचे ठायीठायी विवेचन केले आहे. ऋषिमुनींची ही पर्यावरणाची दृष्टी संत–महंतांनी आपल्या वाङ्मयातून पुन्हा निर्माण केली.

तुकाराममहाराजांच्या अभंगगाथेतील अभंगामधून निसर्गाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेतीमुळे आदिमानवाची भटकंती संपून तो स्थिर झाला. ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक आपत्तीपासून सुरक्षित राहण्यासाठी त्याला घर व गोठ्याची आवश्यकता भासू लागली. भारताच्या दृष्टीने विचार करता वैदिक काळात शेतीचे संदर्भ सापडतात. ऋग्वेदातही शेतीचा उल्लेख सापडतो. यावरून तत्कालीन कालही कृषिप्रधान असल्याचे सापडते. प्राचीन समाज कृषिप्रधान होता. कृषी हाच समाजाचा मूलाधार होता. शेती, वृक्ष, गुरे–ढोरे, अवजारे ग्रामीण लोकजीवनाशी एकरूप होती आणि याच्या परस्परसंबंधातूंन कृषी संस्कृती जपली जात असे. तुकाराम महाराजांनी आपल्या भावविश्वातील प्रतिमांना साकार करण्यासाठी निसर्गाचा व निसर्गातील घटकांचा आधार घेतलेला दिसतो. संत तुकाराममहाराज एकांतात असताना निसर्गच त्यांचा सखा सोबती होता. ध्यान साधनेसाठी ते निसर्गाच्या सान्निध्यात भंडारा व भामचंद्रावर जात असत. तुकोबांच्या जीवनकार्याचे मूल्यमापन करावयाचे ठरल्यास तुकोबा एक सर्जनशील शेतकरी असल्याचे भासतात. त्यामुळे त्यांच्या अभंगांत कृषिसंदर्भाचे अनेक दाखले मिळतात. त्या दाखल्यांच्या आधारे तुकोबांनी

[१७२] डॉ. देखणे रामचंद्र, संत साहित्यातील पर्यावरण विचार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे – १९९४, पृष्ठ क्र. १५ ते १७.

शेतकऱ्यांना आणि समाजातील सर्वच घटकांना दांभिक मनोवृत्तीच्या कचाट्यातून सोडविण्याचा प्रयत्न केला. कष्टकरी शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक उंची वाढविण्यासाठी त्यांनी आपल्या अभंगातून प्रबोधन केले आहे. संत तुकाराममहाराज निसर्गातील घटक व त्यावर होणारा परिणाम यामधील कार्यकारण संबंध स्पष्ट करतात. लोकजीवनासाठी निसर्ग कसा उपयोगी आहे. निसर्गापासून ज्ञान कसे पाप्त करून घ्यावे.

''पर्जन्यें पडावें आपुल्या स्वभावें । आपुल्याला दैवें पिके भूमि ।।१।।
बीज तेंचि फळ येईल शेवटीं । लाभ हानि तुटी ज्याची तया ।।२।।
दीपाचीये अंगीं नाही दुजा भाव । धणी चोर साव सारिखेचि ।।३।।
काऊळें ढोंपरा कंकर तित्तिरा । राजहंस चारा मुक्ताफळें ।।४।।
तुका म्हणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जया तैसा ।।५।।'' [१७३]

निसर्गचक्रानुसार पाऊस जमिनीवर पडतो. माणसाचे जसे दैव असते, त्याप्रमाणे जमीन कधी कमी–अधिक प्रमाणात पिकते. जे बीज पेरलेले असते ते धान्य रूपाने प्राप्त होते; परंतु धान्याच्या बाजारात जो भाव असतो, त्याप्रमाणे पैशाचा लाभ व तोटा मापात कमी–अधिकपणा मापात विक्री करणाऱ्यास किंवा घेणाऱ्यास लाभ व हानी प्राप्त होते. हा सर्व प्रकार ज्याचा त्यालाच भोगावा लागतो. दिव्याच्या अंगी जसं प्रकाश देताना भेदभाव नसतो. कावळ्याला जनावराचे हाडे खाणे आवडते, तर राजहंस पक्षी मोत्याचाच चारा खातो. या दृष्टान्ताच्या साहाय्याने तुकाराममहाराज परमार्थाकडे नेतात व सांगतात. ज्याची जशी आवड असेल तसे फळ त्याला मिळते. हा असा निसर्गाचा नियम आहे. तुकाराममहाराजांच्या निसर्गप्रेमाची प्रतिभा त्यांच्या निसर्ग वर्णनावरून अनुभवायास मिळते.

''वृक्ष वल्ली आह्मां सोयरीं वनचरें । पक्षी ही सुस्वरें आळविती ।।१।।
येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ।। धृ.।।
अकास मंडप पृथिवी आसण । रमे तेथें मन क्रीडा करी ।।२।।

---

[१७३] ह.भ.प.वै. शंकरमहाराज खंदारकर, श्री तुकाराममहाराज गाथाभाष्य, भाग १, वै.शंकरमहाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, अ.क्र. १९२६, पृ.क्र.४८२

कंथाकुमंडलु देहउपचार । जाणवितो वारा अवसरू ।।३।।

हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ।।४।।

तुका ह्मणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांसी ।।५।।'' [१७४]

प्रस्तूत अभंगाद्वारे तुकाराममहाराज निसर्गाच्या समीप जातात आणि म्हणतात, 'वृक्ष–वल्ली हेच आमचे सोयरे आहेत. पक्षी सुस्वरे राग आळवीत आहेत. एकांतात राहण्याचा व निसर्ग सहवासाचा आनंद काही वेगळाच आहे. निसर्गात रममाण होताना आकाश मंडपासारखे भासते तर पृथ्वी ही आसन होते. आणि अशाच ठिकाणी मन रमते. अशा वातावरणात स्वतःचाच स्वतःच्या मनाशी संवाद होतो. आणि हे सारे घडते निसर्गाच्या सहवासात असे तुकाराममहाराज आपल्या अभंगात प्रतिपादित करतात. प्राचीन संस्कृतीचा मूलाधार शेतीच आहे. तुकाराममहाराज यांच्या अभंगामध्ये तत्कालीन लोकजीवन शेतीशी निगडित होते. त्यामुळे स्वतः तुकाराममहाराज शेतकरी असल्याचा अभिमान बाळगतात.

''बरें देवा झाले कुणबी केलों । नाहीं तरी दंभे असतों मेलों ।।१।।

भले केले देवराया । नाचे तुका लागे पायां ।।२।।

विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ।।३।।

सेवा चुकतो संतांची । हेंचि नागवण फुकाची ।।४।।

गर्व होता ताठा । जातो यमपंथे वाटा ।।५।।

तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमाने ।।६।।'' [१७५]

आपल्या कुळाचा स्पष्ट उल्लेख तुकाराम करतात व आपण शेतकरी असल्याचा अभिमानही दर्शवितात. तुकारामकालीन शेतकरी अहंकारापासून दूर होता. समाजाचा अन्नदाता असूनही त्याच्या स्वभावधर्मात दंभ नव्हता. त्याच्यासाठी तुकाराममहाराज म्हणतात.

''तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत । एक पंढरिनाथ विसंबेना ।।'' [१७६]

---

[१७४] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २४८१, पृ.क्र. ४२२

[१७५] ह.भ.प.वै. शंकरमहाराज खंदारकर, श्री तुकाराममहाराज गाथाभाष्य, भाग १, वै.शंकरमहाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, अ.क्र. १७८, पृ.क्र. ४६

प्रस्तूत ओळीतून तत्कालिन शेतकरी हा पंढरीचा खराखुरा वारकरी असून, पंढरीचा पांडुरंग त्याचे आराध्य दैवत आहे. तत्कालीन शेतकरी हा शेतीला पूरक व्यवसाय सुद्धा करीत असे. दूध, दही, ताक, पशुपालन इ. व्यवसायसुद्धा शेतकरी करीत असे. यांचे विविध संदर्भ तुकोबांच्या अभंगांत येतात. शेतकऱ्यांची मुले शिक्षणाभावी घरी राहत असल्याने विविध खेळ खेळण्यात दंग राहत असत. त्याचा उल्लेख तुकाराममहाराज आपल्या अभंगात करतात. तत्कालीन शेतकऱ्याच्या आर्थिक दुरावस्थेचेही चित्रण तुकारामांच्या अभंगांतून दिसते.

''पाहुणे घरासी । आजि आले हृषीकेशी ।।१।।
काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ।
कण्या दरदर । पाण्यामाजी रांधिल्या ।।धृ।।
घरी मोडकिया बाजा । वरि वाकळांच्या शेजा ।।२।।
मुखशुद्धि तुळसी दळ । तुका ह्मणे मी दुर्बळ ।।३।।'' [१७७]

आपल्या लोकसंस्कृतीप्रमाणे अतिथी हा देवासमान मानला जातो. त्याच्या पाहुणचारासाठी ग्रामीण व्यवस्थेतील स्त्री शेजारून भांडी आणताना दिसते. ग्रामव्यवस्थेतील शेतकऱ्याच्या घरातील वर्णन करताना तुकाराममहाराज म्हणतात, शेतकऱ्याचे घर म्हणजे छोटीशी झोपडी. त्याच्या घरात उकळत्या पाण्यात रांधलेल्या खदखदणाऱ्या ज्वारीच्या कण्या आहेत. अंगणात पडलेली मोकळी बाज आहे. तिच्यावर टाकलेली वाकळ आहे व त्यावर घरातील सर्व वाकळींचा ढीग टाकलेला आहे. त्यावर विठ्ठलाचे आदरातिथ्य केले जाते. त्याला खायला विड्याचे पान नसल्यामुळे दारातील तुळशीचे पान मुखशुद्धीसाठी दिले जाते. असे तत्कालीन शेतकऱ्याचे स्वरूप तुकाराम महाराज आपल्या अभंगात मांडताना म्हणतात, की विठ्ठल धनाढ्य घरी न जाता निर्मन भक्ती करणाऱ्या शेतकऱ्याच्या घरी जाण्यास त्याला आनंद वाटतो.

---

[१७६] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१,अ.क्र. ४३९२, पृ.क्र. ७१८

[१७७] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. १६००, पृ.क्र. २७९

तुकाराममहाराजांनी शेतकऱ्यांना नव्या विचारांचा कृषिधर्म सांगितला आहे. स्वतः कुणबी शेतकरी असलेल्या तुकाराममहाराजांनी शेती करताना अनेक बरे–वाईट अनुभव घेतले. शेती आणि शेतकरी अलुतेदार–बलुतेदार यांच्यातील संबंध बारकाईने पाहिले. उत्तम शेती करण्यासाठी, भरघोस उत्पन्न येण्यासाठी कोणते उपाय योजावेत, कोणती दक्षता घ्यावी याचे सविस्तर मार्गदर्शन ते अभंगात करतात. शेतकरी कठीण परिस्थितीतही आपली शेतीविषयक कर्तव्ये पार पाडीत असतो. याचे वर्णन करताना तुकाराममहाराज प्रस्तुत अभंगात म्हणतात–

''मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लावलाहें ।।१।।
तयापरी करीं स्वहित आपुलें । जयासी फावलें नरदेह ।।धृ।।
ओटीच्या परिस मुठीचें तें वाढे । यापरि कैवाडें स्वहिताचें ।।२।।
नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं । जाणते हे गुंती उगविती ।।३।।
तुका ह्मणे पाहें आपुली सुचना । करीतो शाहाणा मृत्युलोकीं ।।४।।'' [१७८]

याचा अर्थ खांदारकर महाराजांच्या सार्थ गाथेत देताना ते म्हणतात, योग्य वेळी पाऊस पडून जमिनीला वापसा मिळाला आणि इतर शेतकऱ्यांच्या पेरणीचा हंगाम सुरू झाला आणि एवढ्यात शेतकऱ्याच्या घरात कोणी मरण पावले, तर जातीचा शेतकरी त्या वेळी शोक करत न बसता मढे झाकून ठेवतो. व प्रथम पेरणी करून घेतो. त्याचप्रमाणे तुकाराममहाराज सांगतात, शहाणा मनुष्य हितासाठी जागा असतो. हिताची गोष्ट तो प्रथम करतो. ओटीत घेतलेले धान्य पेरणीसाठी चाळ्यावर धरताना मुठीत घेतलेले असते. मुठीतले धान्य कमी असते, तरी पेरल्यानंतर ते अनेक पटीने वाढते. असेच आपल्या मनुष्यजन्माचे आहे. तेव्हा त्याचे सार्थक करा, असे तुकाराममहाराज सांगतात. जातीचा शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. तो धरणीमातेची सेवा करतो व धान्य पिकवतो. या धान्यावरच जगाचे रहाटगाडगे चालते. एक प्रकारे समाजावर त्याचे ऋण असते. कारण आपले सुख, दुःख बाजूला ठेवून तो शेतीच्या कामाला स्वतःला झोकून देतो.

[१७८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ८२३, पृ.क्र. १५१

शेतकऱ्याला शेती हा व्यवसाय वडिलोपार्जित चालत येतो; परंतु त्याला स्वतःला त्यात कष्ट करावे लागते.

शेती करण्याच्या पद्धती, जमिनीचे प्रकार : शेती करण्याचे दोन प्रकार असतात. बागायती आणि जिरायती शेती. बागायती शेती बारा महिने पाण्यावर असते. जिरायती शेती पावसावर अवलंबून असते. तसेच तुकोबांनी जमिनीची प्रतवारी उत्तम, मध्यम, कनिष्ठ अशी निर्देशित केली आहे. जमीन करताना ही प्रतवारी लक्षात घेऊनच तिथे पीक घ्यावे. जी जमीन ज्या पिकासाठी पोषक ठरते. त्या त्या जमिनीत तीती पिके घ्यावीत. शेतकऱ्याची शेती ही पावसाच्या लहरीवर चालते. शेतीला योग्य पद्धतीने पाणीपुरवठा झाल्यावर शेती बहरून निघते. त्यासाठी साडेचारशे वर्षांपूर्वी तुकाराम महाराजांनी सिंचनाचे महत्त्व सांगितले आहे.

''सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ।।१।। धृ।।
नको पृथकाचे भरी । पडों एक मूळ धरीं ।।धृ।।
पाणचोऱ्याचें दार । वरिल दाटावें तें थोर ।।२।।
वश जाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा ।।३।।
एक चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ।।४।।
तुका ह्मणे धांवा । आहे पंढरी विसांवा ।।५।।'' [१७९]

सिंचनाने शेतात मुबलक पीक मिळते. तुकाराम काळातही कोरडवाहू शेतीचे प्रमाण अधिक होते म्हणून त्यांनी सिंचनाचे महत्त्व विशद केले आहे. तसेच शेतीला पाणीपुरवठा करणारी आणखी एक पद्धत म्हणजे मोट

विहिरीतून पाणी घेऊन मोटेद्वारे शेताला पाणीपुरवठा करून उत्तम पद्धतीने शेतात पीके घेतली जात असत.

''पंच भुतें तंव चर्माचिया मोटा । येथें खरा–खोटा कोण भावं ।।२।।

[१७९] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. २०२८, पृ.क्र. ३५०

तुका म्हणे नाहीं बोलावया जागा । का देवा वाउगा श्रम करूं ।।३।।'' [१८०]

येथे मोटेचा रूपकात्मक वापर तुकाराममहाराज करतात. विहिरीतले पाणी मोटेमार्फत उपसले जाते व पिकांना दिले जाते.

तुका ह्मणे बरी झऱ्याची ते चाली । सांचवण्या खोली कैसीयांची ।।३।। [१८१]

प्रस्तुत अभंगाचा संदर्भ देत तुकाराममहाराज मुळाशी पाणी देण्याची पद्धत तत्कालीन व्यवस्थेत असावी, असा विचार मांडत आहेत. शेती व्यवसाय फक्त जमिनीवर व कष्टावर अवलंबून नसून तो पाण्यावरही तितकाच अवलंबून आहे, हे सांगण्यासाठी ते सांगतात–

''प्राण गेलिया शरीर । काय करील वेल्हार ।।
तुका म्हणजे जीवनेवीण । पीक नव्हे जाण ।।'' [१८२]

मशागत : शेतीचे एक रूपक मांडताना त्यांनी मनशुद्धीच्या शेतीला सर्वश्रेष्ठ शेती असे म्हटले आहे. कारण मनशुद्धी मशागतीनंतर 'मोक्ष लाभाचे' पीक मिळते. नामाच्या शेतीमुळे आयुष्याची सार्थकता येते. मन शुद्ध करण्यासाठी महाराजांनी अनेक उपाय सुचविले आहेत. उत्तम जीवन व्यतीत करण्यासाठी मनाची शेती व्यवस्थित करणे गरजेचे आहे. मनाच्या मशागतीसाठी पारंपरिक शेतीचे विविध दाखले तुकाराममहाराज देतात व त्याला भक्तीची जोड देतात.

''सेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायाचें ।।१।।
नाहीं वेठी जेवा सारा । जाहाती नाहीं म्हणियारा ।।
सीरक नाही रे दुसरा । धनी सारा तुझा तूं ।।धृ।।
जपतप नागरंणी । न लागे आटी दुनवणी ।।२।।
कर्म कुळवणी । नलगे धर्मपाळी दोन्ही ।।३।।

---

[१८०] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ३६५८, पृ.क्र. ६०१

[१८१] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ३८१९, पृ.क्र. ६२५

[१८२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे, २०१३ अ.क्र.७५९, पृ.क्र. १७७

ज्ञानापाभारी तीफणी । न लगे करावी पेरणी ।।

बीज न लगे संचिताचें । पीक पिकलें ठार्यीचें ।।५।।

नाहीं यमाचे चोंरटें । विठ्ठल पागोऱ्याच्या नेटे ।।६।।

पीक न वजे हा भरवसा । करी उद्वेण तो पिसा ।।७।।

सराई सर्व काळ । वायां न वजे घटिकापळ ।।८।।

प्रेम पिकलें अपार । नाहीं सांटवावया थार ।।९।।

ऐसीये जोडी जो चुकला । तुका ह्मणे धिग त्याला ।।१०।।'' [१८३]

लोकजीवनातील कृषिप्रधानतेचे महत्त्व विशद करताना प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज म्हणतात, शेती करताना शेतकऱ्याला नांगरणी, दुनवणी करावी लागते, तसेच पेरणी करून धाऱ्याला कणसे लागली, की कणी हाती धरावी लागते. धान्य कणगीला लागेपर्यंत शेतकऱ्याला नाना कष्ट, यातना सहन कराव्या लागतात. पण भक्तीच्या शेताचे मात्र तसे नाही. या शेताचा मालक दुसरा–तिसरा कुणी नाही, तर आपण स्वतः त्याचे मालक आहोत. आपल्या नामाच्या शेतात दुसरे कोणी वाटेकरी नाही, नसते. आपल्या शेताचे फळ आपल्यालाच मिळते. शिवाय जेवढे आपण कष्ट घेऊ तेवढा परतावा आपल्याला मिळणार आहे, याची खात्री बाळगा असे तुकाराममहाराज सांगतात. लोकजीवनातील या शेतीचे महत्त्व सांगताना म्हणतात. नामशेती करणारा भक्त हा आपल्या नामशेताचा संपूर्ण धनी असतो. तेथे जप–तपाच्या रूपातील नांगरट करावी लागत नाही. कसलीही अटी म्हणजे सायास करावा लागत नाही. त्याला शेतातील पिकाची भीती नसते. तिथे करावी लागते ती निःसीम भक्ती व त्याद्वारे आपला देहात्मक शेतीचा फुलोरा फुलवा असे नमूद करतात.

या मनशुद्धतेच्या शेतीमधून असे पीक येते; ज्याची इच्छा माणसे करीत असतात ते पीक एवढे अमाप येते, की त्याला मोजणे नाही, पण नामरूपी देहात्मक शेती सतत करावी लागते.

---

[१८३] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र. ११४७, पृ.क्र. २०५

शेतात ज्याप्रमाणे बीजांचे महत्त्व आहे, जसे बीज असेल तशी फळं लागणार हा साधा सिद्धांत आहे. हे सांगण्यासाठी तुकोबा सदर दाखले देतात.

''शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं।।'' [१८४]

बीज शुद्ध असेल, आपला आंतरिक भाव निर्मळ असेल, तर आपल्याला फळही गोड, मधुरच चाखावयास मिळेल. भाव शुद्ध ठेवला, तर परमात्मा पिता आपल्याजवळ आपल्याला घेईल.

''बीज पेरी सेतीं । मग गाडेवरी वाहाती ।।'' [१८५]

मूठभर बीज पेरले, की गाडीभर धान्य आपण काळ्या मातीतून घरी घेऊन जातो. तसेच शुद्ध आचरणाचे एक भाव अंतरी ठसवला, तर आपले जीवन समृद्ध होऊन जाईल, असे तुकोबा शेतीचे दाखले देताना सांगतात.

''बीज नाही ठाव । कैचे फळ शेवटी।।''

शेतात बीज पेरल्यानंतर जर त्याचा ठाव म्हणजे ठिकाण निश्चित झाले नाही, ते खोलवर रुजले नाही तर फळ कसे चांगले येईल. तसेच मनाच्या देहरूपी मातीत चांगल्या आचार–विचारांची बैठक बसवली नाही, तर देहरूपी महासागर पैलतीर कसा गाठणार?

''बीजा ऐसे फळे । उत्तम का अंमंकाळे ।।''

शेतात जे व ज्या पद्धतीचे बीज पेरले आहे. त्यावर किती मेहनत घेतली आहे, तसेच फळ आपल्या पदरी पडणार आहे. तसेच आपल्या चित्तवृत्तीची मशागत नित्य होणे गरजेची आहे. मग आपल्याला जन्म सार्थकतेचे महत्त्व कळेल. नररूपी देहास परमार्थाची गोडी लागल्यावर संसार गोड होईल.

---

[१८४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे, २०१३, अ.क्र.६२, पृ.क्र. १२

[१८५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे, २०१३, अ.क्र.२०७५, पृ.क्र. ४३५

शेतीच्या माध्यमातून आलेला दृष्टान्त देऊन मानवी जीवनाची सार्थकता कशात आहे हे सांगून जातो. अशा प्रकारे शेतीप्रमाणेच तुकारामांची लेखणी माणसाच्या मनोभूमीतही उदात्त विचारांचे बीजारोपण सहज–सरळ करते.

लोकजीवनाचा आढावा घेताना लोकजीवनाशी निगडित अभंगाचे वर्गीकरण केले आहे. त्यात खेळ, घोंगडीचे अभंग, शकुन–अपशकुन, कुळाचार, लोकाचार, शिदोरी काव्याचे, लौकिक कसा राहावा (उपदेशपर) अभंग, उपदेश, शिदोरी, खेळ, गोपालन, देव–धर्म, कर्मकांड मांडणारे अभंग, कांडण, स्त्रीजीवन, वासुदेव, जोहार, विटी–दांडू अशा प्रकारांतील अभंगाचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

सारांश : काव्य हे मानवी भावविश्वाचे प्रचंड ताकतीचे व श्रेष्ठ माध्यम आहे. तुकाराममहाराजांचे अभंगरूपी काव्य मानवी मनाला व मानवी जीवन उद्धारासाठी प्रेरक ठरते. ते लोकजीवनावर आधारित आहे. संत तुकाराममहाराज हे जनसामान्यांतील संत आहेत. आत्मनिष्ठ वृत्तीने आपल्या अनुभवविश्वाची मांडणी त्यांनी अभंगाद्वारे केली आहे. तुकोबांचे अभंग एक जीवनदृष्टी आहे. जीवन आनंदमय जगण्याची एक प्रेरणा देते. मानवनिर्मित समतेच्या समाजव्यवस्थेची ध्येयपूर्ती हे तिचे उद्दिष्ट आहे. त्यांचे अभंग, कविता वास्तववादी, जीवनवादी आणि अनुभववादी आहे. परंपरागत व्यवसाय, त्यांच्यावरील संस्कार, तत्कालीन सामाजिक, धार्मिक परिस्थिती समजते. मानवी जीवनाचे सखोल चिंतन, अनुभवनिष्ठ दांडगा अभ्यास, दुःखितांचे दुःख, तीव्र इच्छा, सत्याची ओढ सामाजिक, धार्मिक निवारण्याचा अध्यात्मिक विशेष आहेत. तुकारामांची काव्यनिर्मिती आणि समाज परिवर्तनाची विचारधारा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची व्यापक निर्मिती आहे.

तुकारामांचे काव्य समाजातील दांभिकतेवर रूढी–परंपरा, उच्चनीचता आणि स्त्रीजीवनावर कठोर प्रहार करतात. समाज, दर्शनाच्या माध्यमातून ते प्रबोधन करतात. तुकोबांचा एक एक अभंग हा सामाजिक दृष्टी दाखवतो. गाव गाड्याच्या माध्यमातून समाज दर्शन घडवितो.

लोकजीवनातील, लोककला, लोकपरंपरा, लोकाचार, प्रथा, रूढी परंपरा, या माध्यमातून तुकाराममहाराज गावगाड्याचे लोकजीवन उभे करतात. मध्ययुगीन मराठी वाङ्मयात लोकजीवनाचे दर्शन होते. संतांनी लोकजीवन डोकावताना आढळते. ह्या अभंगांच्या निमित्ताने प्रबोधनाचा मार्ग मिळतो.

* * *

४.६ : अभंगाची भावविश्वता

(लोकजीवनातील म्हणी, वाक्प्रचार, शेतीसंदर्भ आणि लोकाचार)

४.६.१ : प्रास्ताविक :

संत तुकोबारायांची अभंगवाणी, अभंगगाथा हे महाराष्ट्राचे अमूल्य संस्कारिक, प्रेरक, वैचारिक, तात्त्विक धन आहे. जनसामान्यांपासून ते विद्वानांपर्यंत तुकाराम महाराजांचे अभंग सर्वांना आकर्षित करतात. लोकमानसातील जीवनविषयक दृष्टिकोन अभंगात प्रकट होताना दिसतो. सर्वस्पर्शी तत्त्वज्ञान अनुभवनिष्ठता गाथेच्या माध्यमातून लोकांना मिळतो. त्यामुळे मराठी अभ्यासकांना गाथेचा अभ्यास हा आवाहानात्मक आहे. हे निश्चितच अभ्यासकांना परिपूर्णतेसाठी चौफेर दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विशाल उदात्त होता. त्यांचे काव्य हे पारमार्थिक, अध्यात्मिक व वाङ्मयीनदृष्ट्या बहुमोल आहे.

प्रस्तुत प्रकरणात त्यांची अभंगरचनेतील विविधता व विविध विषयांवरील अभंगरचना यांचा अभ्यास करून अभंगातील प्रकट झालेले भावकाव्य व त्या अनुषंगाने प्राप्त झालेले तत्त्वज्ञान काव्यातील अलंकार, अभंगाची भाषाशैली, वैशिष्ट्ये, अभंगाची अवतरक्षमता, तसेच अलंकार, म्हणी व वाक्यप्रचार, लोकगीते यांचा आदी संदर्भात अभ्यास होणे, महत्त्वाचे व आवश्यक ठरते हे लक्षात घेऊन पुढील विचार मांडला आहे.

४.६.२ : लोकजीवनाचा पाठीराखा विठ्ठल :

संत तुकारामांनी भक्ती हा आपल्या जीवनातील पंचम पुरूषार्थ आहे, असे आपल्या अभंगांच्या माध्यमातून मांडले आहे. विठ्ठलभक्ती हेच त्यांचे कवित्व आहे. त्यांनी विठ्ठलाशी सर्वतोपरी नाते जोडले आहे. विठ्ठलाला सार्वभौम, सत्ताधीश मांडले आहे, पंढरी राव पंढरीचा राणा अशी अनेक संबोधने त्यांनी विठ्ठलास दिली आहेत. वैष्णवांच्या जीविचा जिव्हाळा हा विठ्ठल आहे. वारकरी संप्रदायाचे विठ्ठल हे आराध्य आहे. संत तुकारामांनी विठ्ठलाठायी त्यांचे सर्वस्व विठ्ठलमय केले आहे. भावभक्तीची पेठ म्हणून त्यांनी पंढरीचा उल्लेख केला आहे. ते पंढरीबाबत म्हणतात...

''पंढरीसी जाय । तो विसरे बापमाय ।।१।।

अवघा होय पांडुरंग । राहें धरूनियां अंग ।।धृ.।।

न लगे धन मान । देह भावें उदासीन ।।३।।

तुका म्हणे मळ । नाशी तात्काळ तें स्थळ ।।४।।'' [१८६]

पंढरीला पोहोचताच मायबापांचाही विसर पडतो. तेथे सर्वत्रच आनंदी आनंद आहे. त्यामुळे धन, मान, पान लागत नाही. देहभाव विसरून अंत:करणातला मळ नाहीसा होतो. असे ते स्थळ आहे, असे तुकाराममहाराज म्हणतात. तुकाराममहाराजांना विठ्ठलाचे सार्वभौम राज्य ईहलोकांवर प्रस्थापित करावयाचे आहे. तत्कालीन समाज भक्तिमार्गावर अस्ताव्यस्त झाला असताना तुकोबांनी विठ्ठलभक्ती हीच आर्त भक्ती आहे हे पटवून दिले. सर्व सुखाचे भांडार असणाऱ्या पंढरीचे वारकरी मोक्षाचे अधिकारी होतात, असा निर्वाळा ते करतात.

''चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहुं ।।१।।

डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ।।धृ.।।

संता महंता होतील भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ।।३।।

ते तीर्थांचें माहेर । सर्व सुखाचे भांडार ।।४।।

जन्मा नाहीं रे आणिक । तुका म्हणे माझी भाक ।।५।।'' [१८७]

प्रस्तुत अभंगात तुकाराममहाराज वारकऱ्यांस म्हणतात, 'चला पंढरीसी जाऊ रूखमाई समवेत असलेला पांडुरंग पाहू. आपल्या मनाला तेथे समाधान मिळेल. डोळे तृप्त होतील, मोठमोठे संत तेथे भेटतील. तेच सर्व तीर्थांचे माहेर आहे. सर्व सुखांचे तीर्थे भांडार आहे. पंढरीची वारी केल्यानंतर दुसरा जन्म नाही. जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून मुक्तता आहे.' याची ग्वाही तुकाराम देतात. विठ्ठल तुकाराम आणि विठ्ठल यांच्यातील भक्तीचा दुवा कशा पद्धतीने जीवन उपयोगी पडतो हे गाथेच्या अभ्यासात जाणवते. तुकाराम रूढ अर्थाने तत्त्वज्ञ नव्हते; पण तत्त्वज्ञानाने

---

[१८६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्रं. ८५१, पृ. क्र. १९५

[१८७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्रं. १७००, पृ. क्र. ३५९

भरलेल्या वैचारिक स्वरूपाच्या खुणा त्यांच्या प्रत्येक अभंगात आढळतात. विठोबाची चरणसेवा हीच खरी सेवा ते मानतात. विठ्ठलाच्या भक्तीचे सार्थ वर्णन करताना ते म्हणतात,

''विठ्ठल आमचें जीवन । आगमनिगमाचें स्थान ।
विठ्ठल सिद्धीचे साधन । विठ्ठल ध्यानविसावा ।।१।।
विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरूषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ।।२।।
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनि ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसीं ।।३।।
विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोवळा ।।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियला चाळाविश्व विठ्ठलें ।।४।।
विठ्ठल बापमाय चुलता । विठ्ठल भगिनी आणी भ्राता ।
विठ्ठलेविण चाड नाही गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरे ।।५।।'' [१८८]

असा हा विठ्ठल तुकाराम महाराजांच्या संपूर्ण आयुष्यावर साम्राज्य गाजवतो. हेच साम्राज्य तत्कालीन समाजाच्या मनावर भक्तीच्या मार्गाने ठसावे म्हणून तुकाराममहाराज सतत प्रयत्नशील होते. विठ्ठलाचे वर्णन करतानासुद्धा तुकोबाराय पंढरीचा राजा असे लोकतत्त्वीय विशेषण त्यास लावतात.

[१८९]डॉ. रा. चिं. ढेरे हे वर्णन करताना आपल्या 'संतलोक आणि अभिजन' या पुस्तकात म्हणतात, संतांनी आपल्या आराध्याचे नाना परींनी वर्णन केले आहे. नाना रूपांत त्याला पाहिले आहे. नाना भूमिकांतून त्याला बघितले आहे. त्यातलीच त्याला राजा म्हणण्याची एक कौतुकाची परी आहे, असे मानून आपण विठ्ठलाच्या या राजेपणाची उपेक्षा केली आहे. संतांच्या लेखी मात्र त्याचे माऊलीपण जेवढे असाधारण महत्त्वाचे आहे, तेवढेच त्याचे राजेपणही महत्त्वाचे आहे. विठ्ठलाच्या या राजेपणाचे स्वरूप आपण यथार्थतेने जाणून घेतले पाहिजे; या राजाच्या सत्ताकक्षा

[१८८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्रं. ६११, पृ. क्र. १३९

[१८९] ढेरे रा. चिं., **संतलोक आणि अभिजन,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण २०१३, पृ.क्र. ४६ ते ४७.

आपण निरखल्या पाहिजेत; या सत्ताकक्षेत संतांचे स्थान काय आहे, ते आपण समजून घेतले पाहिजे आणि या सत्तासंकल्पनेचा परिणाम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर आणि महाराष्ट्राच्या इतिहासावर काय झाला याचा आपण गंभीरपणे शोध घेतला पाहिजे. संतांच्या विठुरायाची, त्यांच्या पंढरी घराण्याची ही राजवट इतर सर्व लौकिक राजवटीपेक्षा अधिक परिणामकारक कशी ठरली, याचे भान आपल्याला जेव्हा येईल तेव्हा महाराष्ट्राच्या राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन इतिहासाची अनेक अलक्षित वैशिष्ट्ये आपल्याला जाणवू लागतील.

मुक्तीलाही लाजविणारे सुख पंढरीच्या पांडुरंगाच्या नामस्मरणात आहे. त्यामुळे तुकोबाराय मोक्ष सुखापेक्षा नाम सुखालाच महत्त्व देतात. मुक्ती आणि भक्तीमध्ये तुकोबाराय विठ्ठल भक्तीचाच मार्ग निवडतात व भक्तीचाच सोहळा त्यांना प्रिय आहे, असे ते मानतात. त्यामुळे नरदेह प्राप्त झाल्यानंतर विठ्ठलाचे दास होऊनच कीर्तन करण्यामध्ये व नामस्मरणामध्ये ते आपली धन्यता मानतात.

४.६.३ : लोकजीवनातील तुकोबांचे भावकाव्य व तत्त्वज्ञान :

तुकोबारायांच्या अभंगांची भाषा ही साधी, सोपी, सहज–सुलभ व भावस्पर्शी असल्यामुळे सर्वसामान्यांतील अशिक्षित माणसांनाही त्यांचे अभंग मुखोद्‌गत आहेत. भावस्पर्शी काव्य व विनयशीलता, त्यांचे अभंग हे स्वानुभवाचे प्रकटीकरण असल्यामुळे अधिक प्रत्ययकारी ठरतात. त्यांच्या अभंगांना काव्यात्मकता प्राप्त झालेली आहे. त्यांच्या अभंगांत विविध रस सामावलेले आहेत. त्यांचे प्रत्येक अभंग हे स्वयंपूर्ण आहे. तुकोबांची भावकविता जनसामान्यांच्या मनावर विशिष्ट भावावस्थेचा संस्कार करते. ही भावावस्था त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधते. तुकोबांचे काव्य हे स्वयंपूर्ण काव्य असल्यामुळे व जीवनाच्या सुख–दु:खाच्या अनुभवाची शिदोरी असल्यामुळे त्यातील अनुभव हा तुकारामांचा न वाटता तो प्रत्येकास स्वत:चाच वाटतो. त्यांच्या काव्यात स्पष्टपणा परखडपणा आहे; तसेच मृदू सोज्वळ भावही आहे. त्यांचे काव्य विविध भावभावनेचे प्रकटीकरण करताना आढळते. लोकजीवनातील विवाह संस्काराचा व सासरी निघालेल्या मुलीची भावावस्था मांडताना प्रस्तुत अभंगात लक्षात येते.

''कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ।।१।।

तैसें झालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ।।२।।

चुकलिया माये । बाळ हुरूहुरू पाहे ।।३।।

जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ।।४।।'' [१९०]

सासरी निघालेली मुलीची भावावस्था प्रकट करताना हरवलेल्या मुलाला ज्याप्रमाणे आई शोधते, तसेच पाण्यावाचून तडफडणाऱ्या मासोळीची भावावस्था या साऱ्यांचे प्रयोजन करून तुकारामांनी आपली विठ्ठल भेटीची आस व्यक्त करताना अतिशय सुंदर पद्धतीने साध्या सरळ प्रतिमेतून आपली भावावस्था प्रतीत केली आहे.

''आतां पंथ पाहे माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें ।।१।।

काय करूं आतां न गमेसें झाले । बहुत सोसिलें बहु दिस ।।२।।

घर लागे पाठी चित्ता उभें वारें । आपुलें तें झुरे पहावया ।।३।।

तुका म्हणे जीव गेला तरी जावो । धरिला तो देव भाव शुद्ध ।।४।।'' [१९१]

सासुरवाशिणीची माहेराच्या लोकांना भेटण्याची झालेली व्याकूळ अवस्था इतक्या उत्कटपणे अभिव्यक्त केली आहे, की ती सहज सरळ अंतर्मनाला साद घालते. हीच व्याकुळता व आर्तता विठ्ठल भेटीसाठी तुकारामांचीही झाली आहे. विठ्ठलाच्या ध्यासाने तुकोबांचे मन सैरभैर होऊन सासुरवाशिणीप्रमाणे तडफडत आहे. विठ्ठल भेटीसाठी कासावीस होणाऱ्या मानसिक अवस्थेचे यथार्थ चित्रण प्रस्तुत अभंगात दिसते. तुकोबांच्या अभंगात येणारी व्याकूळ भावावस्थेचे चित्रण विरहणीमध्ये अधिक पहावयास मिळते. तुकारामांच्या या काव्याबद्दल बोलताना पुन: तुकाराम या आपल्या ग्रंथात दिलीप चित्रे यांनी प्रस्तावनेत अनेक ठिकाणी तुकारामांच्या

---

[१९०] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्रं. ६४४, पृ. क्र. १४३

[१९१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्रं. १९०२., पृ. क्र. ४०१

काव्याबद्दल अनेक मार्मिक विधाने केली आहेत. त्यांच्या मते कवी असणे ही तुकोबांच्या आत्मभावनेची प्राथमिक अट आहे. [१९२]

तुकोबांच्या अभंगांतून शाश्वत भाव–भावनांचा उत्कट अनुभव निर्माण झाल्यामुळे या अभंगांना विश्वव्यापकता निर्माण झाली आहे. तुकोबांच्या अभंगांतून शाश्वत मानवी मूल्यांचे दर्शन घडते. अनुभवाची उत्कट भावावस्था दर्शविण्यासाठी तुकोबा अभंगांतून अनेक दृष्टान्त वापरतात. तुकोबा जितके प्रखर अस्तित्ववादी आहेत तितकेच उत्कट भावना हेलावून टाकणारे भावकवीसुद्धा आहेत. डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी तुकारामांच्या काव्याचा सार्थ गौरव केला आहे. ते म्हणतात, तुकारामानंतर मराठीच्या बहुतेक श्रेष्ठ कवींनी तुकारामांचे ऋण मानले आहे. त्यांच्या भाषेचा आणि काव्यशैलीचा परिणाम न झालेला कवी मराठीत सापडणे कठीण आहे. [१९३]

तुकारामांच्या अभंगांचा आढावा घेताना त्यांच्यातील कवित्व शक्तीचे विविध अंगाने दर्शन घडते. त्यांचे सर्व व्यापक व सर्वसमावेशक अनुभव विश्व हे त्यांच्या कवित्व शक्तीचे बलस्थान आहे. त्यामुळे त्यांच्या अभंगांतून अनेक संदर्भ मांडता येतात. त्यांचे काव्य चैतन्यस्वरूप व वेदांत तत्त्वज्ञानाचा मूलभूत सिद्धान्त मांडताना आढळतात. त्यांनी या तत्त्वांचा अनुभव आपल्या अध्यात्म साधनांतून घेतला आहे. तुकारामांचे काव्य हे त्यांच्या संतत्वाचे आणि कवित्वाचे समेय दर्शन आहे. त्यांच्या काव्यामध्ये जीवन प्रवाहाला प्रफुल्लित करण्याचे निर्विवाद सामर्थ्य आहे. गाथेच्या अभ्यासांतर्गत तुकारामांच्या काव्यसृष्टीचे स्वरूप व त्यांची आवाहन क्षमता वाखाणण्याजोगी आहे.

४.६.४ : लोकजीवनातील तुकोबांचे काव्य अलंकार :

तुकाराममहाराजांना जीवनात करावा लागलेला संघर्ष त्यांच्या अभंग गाथेतून आविष्कृत होतो. आपल्या अनुभवातून आयुष्याशी झगडण्याचा धडा समाजाला देऊन त्यांचे जीवन सुसह्य करण्याची ताकत गाथेत दिसून येते. लोकमानसाला तुकाराम आपले जीवनानुभवाचे उदात्त विचार

[१९२] चित्रे दिलीप, पुन्हा तुकाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ.क्र.१२४.
[१९३] नेमाडे भालचंद्र, तुकाराम, साकेत प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती २०१३, पृ.क्र. ३०, ३२.

देऊन वज्रासारखे कठीण बनविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे तुकारामांच्या गाथेत काव्य लक्षणांची संख्या ही वेगवेगळ्या व विपुल प्रमाणात दिसून येते. त्यामध्ये अलंकारांचाही वापर केलेला आढळतो. तुकारामांचे काव्य सहेतुक अलंकारी नसून ते त्यांना सहजपणे जसजसे स्फुरले तसतसे त्यांनी ते मांडले, म्हणूनच ते श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय होऊ शकले. तुकारामांनी आपली भाषा मुद्दाम अलंकारांनी सजवली नाही. तरीही त्यांच्या काव्यात मोठ्या प्रमाणात अलंकार दिसून येतात. तसेच अनुभवाची प्रचिती घडविण्यासाठी त्यांच्या अभंगांत दृष्टान्तही आढळतात. भक्तिभावनेची जाणीव केंद्रस्थानी ठेवून तुकोबा आपले दृष्टान्त, रूपके व प्रतिमांच्या साहाय्याने अभंगांची मांडणी करतात. त्यामध्ये यमक अलंकार, अनुप्रास अलंकार, उपमा अलंकार, रूपक अलंकार, दृष्टान्त अलंकार याचा वापर ते करतात. त्यांच्या अभंगांत सुभाषितेही मोठ्या संख्येने आढळतात.

१. यमक अलंकार :-

''कामामध्यें काम । काहीं म्हणा रामराम ।
जाईल भवश्रम । सुख होईल दु:खाचें ।।१।।
कळों येईल अंतकाळीं । प्राणप्रयाणाचे वेळीं ।
राहती निराळीं । रांडापोरें सकळ ।।२।।
जीतां जीसी जैसा तैसा । पुढें आहे रे वोळसा ।
उगवुनि फांसा । काय करणे तें करी ।।३।।
केले होतें याचि जन्में । अवघे विठोबाच्या नामे ।
तुका म्हणे वर्मे । जाणेनियां तरती ।।४।।'' [१९४]

[१९४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र. ३९७९, पृ. क्र. ८०१

२. अनुप्रास अलंकार :

''आनंदाचे डोहीं आनंद तरंग ।।१।।
आनंदाची अंग आनंदाचे ।।धृ।।'' [१९५]

''काय काहिचिया बाही ।
पुढे चालली नाही आवडीने ।।१।।
गर्भाची आवडे मातेचा डोहाळा ।
तेथीचा जिव्हाळ तिथे विंबे ।।१।।''

३. उपमा अलंकार :

''शुद्ध बिजापोटीं फळें रसाळ गोमटीं ।।'' [१९६]

''कन्या सासुऱ्यासी जाये । मागे परतोनी पाहे ।।'' [१९७]

''ढेकर जेवण दिसेसाचे । नाही तरी काचे कुंथाकुंथी ।।१।।
गव्हंचिया होती परी । पुकेवरी खाऊं नये ।।२।।
तुका म्हणे असे हातीचे कांकण । तयासी दडपण विल्लहळक ।।३।।'' [१९८]

उपमानेही दैनंदिन जीवनातील असल्यामुळे ती सहजपणे बहुजन समाजाच्या मुखी बसतात. व्यवहारातील दृष्टान्तांनी व दैनंदिन उदाहरणांनी समेळ घालून उपमांच्या साहाय्याने तुकारामांच्या अभंगात पदोपदी दृष्टीस पडते. उपदेशाच्या हेतूने सहजपणे तुकोबांनी

---

[१९५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र. ३२४१ पृ. क्र. ६६०

[१९६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र. ६२, पृ. क्र. १२

[१९७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र. २६६, पृ. क्र. ५७

[१९८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र. ७०, पृ. क्र. १३

जनसामान्यांच्या हृदयाचा ठाव घेत अलंकारांचा वापर आपल्या काव्यात करत नवा दृष्टिकोन देत प्रबोधन घडवले.

४. रूपक अलंकार :

''सांठविला वाण । पैस घातला दुकान ।।१।।
जें ज्या पाहिजे जें काळीं । आहे सिद्धचि जवळी ।।धृ.।।
निवडिलें साचें । उत्तम मध्यम कनिष्ठाचें ।।३।।
तुका बैसला दुकानी । दावी मोला ऐसी वाणी ।।४।।'' [१९९]

तुकारामांनी आपल्या अभंगात वाणिज्य, व्यवसाय, समुद्र, भरती, तुफान, जमीन, शेतकरी व शेतीतून निघणारी पिके, युद्धविषयक रूपकेही अभंगरचनेत आढळून येतात.

५. दृष्टांत अलंकार :

लोकजीवनात दृष्टांत अतिशय लोकप्रिय आहे. लोकमानसांत ती सहज व चटकन प्रचलित होते व कीर्तन व अभंगांच्या साहाय्याने लोकांच्या मुखी अगदी अनाहूतपणे येते. तुकारामांच्या अभंगात दृष्टांताचा जास्त प्रमाणात वापर झालेला दिसतो. परमेश्वराविषयीची आपली उत्कट भावना व्यक्त करताना पतिव्रतेचा दृष्टांत तुकाराम सांगतात,

''पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशापरी ।।१।।''

आणि

''चंदनाचे हात पायही चंदन । परीसा नाहीं हीन कोणी अंग ।।१।।
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगी साखर अवधी गोड ।।२।।
तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळेचिना ।।३।।'' [२००]

---

[१९९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र. ८८४, पृ. क्र. १८९

[२००] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र. २९०, पृ. क्र. ६१

''लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।'' [२०१]

''बेगडाचा रंग राहे कोण काळ । अंग हे पितळ न देखतां ।।१।।'' [२०२]

दृष्टांत आणि उपमा याची एकत्र उदाहरणेही त्यांच्या गाथेत अनेक ठिकाणी आढळतात.

''निंबाचिया झाडा । साखरेचें आळें । आपुलीं तीं फळें न संडीच ।।१।।'' [२०३]

''अर्भकाचे साठीं । पंतें हातीं धरिली पाटी ।।१।।'' [२०४]

''गोडपणें जैसा गुळ । तैसा देव झाला सकळ ।।१।।'' [२०५]

अशा प्रकारचे अनेक घरगुती दृष्टांतही आपल्या अनुभवाच्या माध्यमातून त्यांनी गाथेत मांडले आहेत. त्यांच्या अभंगातील दृष्टांत हे अभ्यासकांच्या अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय ठरू शकेल. तुकारामांनी लोकव्यवहाराचे अतिसुक्ष्मपणे मार्मिक निरीक्षण केले आहे. त्यांच्या अभंगवाणीतून प्रकट होणारे प्रसंग हे रोजच्या व्यवहारातून टिपलेले आहेत. तुकारामांचे अभंग म्हणजे ज्ञान, वैराग्य आणि अध्यात्म यांचे परिपूर्ण दर्शन आहे. तुकारामांच्या काव्यात अलंकाराचा, दृष्टान्ताचा आणि प्रतिमांचा वापर अशा पद्धतीने केला आहे, की जनसामान्यांना भक्ती, प्रबोधन आणि मनोरंजनाच्या साहाय्याने मार्ग दाखवतात.

---

[२०१] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र.२९० पृ.क्र. ६८

[२०२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्रं.२१५५ पृ.क्र. ४४९

[२०३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र.३३८९ पृ.क्र. ६८९

[२०४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र.४०६२ पृ.क्र. ८१८

[२०५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अभंग क्र.५८१ पृ.क्र. १३४

४.६.५ : अभंगांची अवतरण क्षमता, भाषाशैली व वैशिष्ट्ये :

तुकारामांच्या अभंगांतील अवतरण क्षमताही श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यांच्या अभंगांचा आशय मानवी जीवनाभोवती प्रकट होताना दिसतो. त्यांचे काव्य लोकमानसाच्या हृदयात खोलवर रुजून राहते. यातच त्यातले सामर्थ्य लक्षात येते. त्यांच्या अभंगाचे वैशिष्ट्य म्हणजे ते संवादात्मक आहेत. लोकजीवनाच्या प्रबोधनासाठी ते लोकांना आपल्या कीर्तनातून त्यांच्याबरोबर थेट संवाद साधताना आढळतात. आपल्या मनातील भाव सहज व सोप्या मोहक स्वरूपात मांडून ते लोकांची मने जिंकतात. त्यांचे काव्य हे स्वानुभवाची वाङ्मयीन रचना असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या काव्यात व्यक्त होताना दिसतो ते लोकांना संबोधून म्हणतात,

''तुज आहे तुजपाशी । परी तू जागा चुकलाशी ।।
मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण।।'' [२०६]

अशा अनेक संबोधनात्मक अभंगरचना आपणास गाथेत आढळतात. तुकोबारायांच्या या रचनांमध्ये अनेक अलंकारांचा समावेश आढळतो. त्यांच्या अनुभव प्रचितीमुळे व आत्मभानामुळे सत्याचा प्रत्यय पदोपदी येतो. तुकाराममहाराजांची अलौकिक अनुभवांची शिदोरी जनसामान्यांच्या अनुभवास येते. त्यांच्या काव्यरचनेत अवतरणक्षमता अधिक प्रमाणात आढळते. त्याला निरीक्षणाची जोड आहे व अवलोकनाला सांस्कृतिक पाठबळ आहे. त्यामुळे ती जनसामान्यांच्या हृदयावर खोलवर रुजते. त्यांच्या काव्यातील अवतरणक्षमता हा एक सहज व मार्मिक आकलनाचा भाग आहे. मार्मिक अर्थाचा विचार केला असता अनेक शब्दसमूहांत मांडावेसे वाटणारे जीवनाचे मर्म ते एका ओळीतही आपल्या अनुभव शैलीच्या आधारे मांडतात. त्यामुळेच त्यांच्या अभंगांना अवतरण क्षमतेबरोबरच सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार इत्यादी तत्कालीन सांस्कृतिक अस्मितेच्या खुणा त्यांच्या अभंगांतून आढळतात. त्यांचा प्रत्येक अभंग नवीन अवतरण क्षमता घेऊन जन्माला येतो.

---

[२०६] www.maayboli.com, १ एप्रिल, २०१४ महाजाल (इंटरनेट)

''तुका म्हणे संत । सोशी जगाचे अगाध ।
महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती ।''

अशी कितीतरी अवतरणाची उदाहरणे गाथेंतर्गत देता येतील. अभंगांतून अवतरणे अशा प्रकारे डोकावतात, की समाजाचा भाषिक व्यवहार अधिक समीप जाऊन साधता येतो. सर्वसामान्य जनांना कळतील, उमजतील अशी तुकारामांची अवतरणे वाटतात. त्यांच्या वाङ्मयातून गाथेंतर्गत तत्कालीन संस्कृतीचे, समाजाचे व त्यांच्या जीवनशैलीचे अचूक संदर्भ आढळतात. तेच संदर्भ सद्यःस्थितीतील समाजालाही उपयोगी पडतात. काव्यातील अनुभवसंपन्नता, वैचारिकता, सुभाषिते, म्हणी, सुविचार, प्रतिमासृष्टी या साऱ्यांची अवतरणक्षमता अभंगांमध्ये उच्च प्रतीने वापरलेली आढळते. कमीत कमी शब्दांत मोठी आशयगर्भता दर्शविताना आढळतात.

तुकारामांच्या अभंगांची भाषा ही साधी, सोपी, सुटसुटीत व सहज–सुलभ आहे. त्यांची अभंगवाणी लोकभाषेत आहे. लोकभाषेतून साकार झालेले त्यांचे काव्य याला स्वत:चे स्वतंत्ररीत्या लाभलेले एक विशिष्ट स्थान आहे. तसेच त्यांच्या अभंगांची रचना ही अल्पाक्षरी आहे. तुकारामांचे संतत्व हे जन्मसिद्ध स्वरूपाचे नाही, तर ते कष्टप्राय व वैराग्यसिद्ध आहे. त्यामुळेच त्यांचा प्रत्येक अभंग हा जीवन संघर्षाचा अभंग ठरला आहे. अध्यात्म व परमार्थ समाजातील खालच्या थरातील व्यक्तीस सुद्धा आचरणात आणता यावे इतके सुलभ अध्यात्म शास्त्र सांगणारी तुकोबांची गाथा वारकरी संप्रदायातील न भुतो न भविष्यति अशी रचना आहे. त्यामुळे सामान्य माणसाला जाणवणारी ममता गाथेंतर्गत आहे. त्यांच्या वाङ्मयांतर्गत मिळालेले संतपण हे सहजासहजी मिळाले नसून, त्यांना त्यासाठी स्वत:शी व जगासाठी सतत झगडावे लागले. गाथेची रचना म्हणजे भागवत संप्रदायाचा नाही तर मराठी साहित्याचा अलौकिक ठेवा आहे. तुकारामांची गाथा ही वाङ्मयीन संपत्ती आहे व ती महाराष्ट्राच्या साहित्यातील रत्नांची खाण आहे. त्यांच्या अभंगरचनेतून परमार्थ, अध्यात्मिक जीवन व्यवहार सखोल अनुभूती प्रकट होते.

सर्वसामान्यांच्या व्यवहारातील लोकभाषा यांचा वापर तुकारामांचा काव्यातील अवतरणक्षमता असल्यामुळे ती अधिक लोकप्रिय आहे. डॉ. दिलीप धोंगडे तुकारामांच्या काव्यातील अवतरणशक्तीच्या स्वरूपाबाबत म्हणतात, सुट्या–सुट्या वाक्यांची अवतरण क्षमता म्हणजेच वैखरी. म्हणजेच संज्ञापन व्यवहार घडवून आणणारी भाषा.

४.६.६: अभंगातील म्हणी व वाक्प्रचार :

संत तुकारामांनी आपल्या अभंगासाठी दैनंदिन व्यवहारातील भाषा वापरली आहे. तत्कालीन ग्रामव्यस्थेचा त्यात समावेश केलेला दिसतो. तसेच लोकजीवनाचे दाखलेही अभंगामध्ये आढळतात. तसेच 'ज्ञानाच्या खाणी' समजल्या जाणाऱ्या म्हणी अभंगांत आढळतात सर्वसामान्यांच्या बोली भाषेत म्हणींचे प्रयोजन होते. मानवी जीवनात येणारा अनुभव एका वाक्यात सहजसुंदर प्रभाव टाकणारा असतो व ती लोकांच्या सतत वापरातही येतात. त्यामुळे लोकांच्या मुखी सतत म्हटली जातात. म्हणून त्यांना म्हणी असे म्हणतात. म्हणी या बोधप्रद असतात. व्याकरणाच्या दृष्टीने संपन्न असतात. गाथेतील अभंगांद्वारे प्रकट झालेल्या म्हणी पुढीलप्रमाणे.

४.६.६.१ : म्हणी :

१. पायीची वाहाण पायी बरी ।
२. दोन्ही पेवांवरी ठेवा जाता हात । शेवटी अपघात शरीराचा ।
३. ठेकणाचे बाजे सुखाची कल्पना ।
४. कार्य दिनकरा । केला कोंबड्याने खरा ।
५. मुंगी होऊन साखर खावी ।
६. मांजरे देखिला लोणियांचा गोळा । लावुनिया डोळा बैसलेसे.
७. निचपणा बरवे देखा ।
८. मस्तकी सहावे ठांकियासी जाण । तेवा देवपण भोगावेगा ।
९. सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ।
१०. गाजराची पुंगी । तैसे नवे जाले जोगी ।

११. असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास तुका म्हणे ।।

१२. तुका म्हणे असे हातांचे काकण । तयासी दर्पण विल्हाळक ।।

१३. नवसे कन्यापुत्र होती । तरी का कारणे लागे पती ।।

१४. पालथे घागरी घातले जीवन । न धरीच जाण ते ही त्याला ।

१५. तेज्या इशारत । तटा लोक वरी घेतो ।।

१६. पेरल्या बिजाचे । फळ होई शेवटी ।

व्याली कुऱ्हाडीचा दांडा । वर न घालीच तोंडा ।

१७. सिणले ते गेले सिणील्यापासी । नाही त्या दोघांची एक गती ।।

१८. निंदक तो परउपकारी । काय वर्णू त्याची थोरी ।

१९. करिना नव्हे नीट श्वानाचे ते पुच्छ ।

यांसारख्या अनेक म्हणी महाराष्ट्रातील जनतेच्या मुखोद्‌गत आहेत. साध्या-सोप्या भाषणशैलीत ही म्हणी वापरल्या जातात.

४.६.६.२ : वाक्‌प्रचार :

शब्दांतून होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला 'वाक्‌प्रचार' असे म्हणतात. यालाच 'वाक्यसंप्रदाय' असेही म्हणले जाते. 'म्हणी' व 'वाक्‌प्रचार' हा लोकजीवनाचा अविभाज्य घटक आहे. तुकारामांच्या अभंग गाथेत अनेक ठिकाणी वाक्‌प्रचाराचा वापर झालेला दिसतो. आशयगर्भ थोड्या शब्दांत सांगण्याचे ते कौशल्य आहे. उदा.

१. फाडफाडू खाती डोळे रे पाय नेतील कर ।

पोटीचे होटा आणवी देतो सयांझि तैसें ।

२. नेणे फुंको कान । नाही एकांजीचे ज्ञान ।

३. आंधळ्याची काठी । हिरोनिया कडा लोटी ।

४. न म्हणे कोणासी उत्तम वाईट । सुखे माझी कट खावी मागे

५. चाटावे तुमचे बोल रे। भूक लागल्या पोटी ।

६. तुक्यांबधू म्हणे फिटला । पांग नाही बोलायला ।

७. जडित विमाने बैसवितो माने ।

८. पोटा लागलीसे चट । धरी वाट देवळाची ।

९. ऐसिही पापिणी वाहिली विमानी ।

१०. तुका म्हणे धाले पोट । मग बोट चटणी ।

११. तुका म्हणे नेले वाऊनि विमानी ।

४.६.७ : शेती संदर्भातील अभंग :

१. शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।। [२०७]

२. बीज पेरुनिया तें चि घ्यावें फळ । डोरकीस केळें कैंचें लागे ।। [२०८]

३. बीजापोटी पाहे फळ । विध न करितां सकळ ।।
तया मुळ म्हणावे वेडे । कैसें तुटले सांकडे ।। [२०९]

४. पाळी नांगर पाभारी । तन निवडुनि सौंकरी ।। [२१०]

५. मिरासीचे म्हणू शेत । नाहीं देत पीक उगें ।। [२११]

६. मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहे ।। [२१२]

७. खोल ओले पडे तें पीक उत्तम । उथळांचा श्रम वांयां जाय ।। [२१३]

---

[२०७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ६२, पृ.क्र. १२

[२०८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.२०९४, पृ.क्र.३६१

[२०९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १३३९, पृ.क्र. २८८

[२१०] श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा, शासकीय प्रत, अ.क्र. ३६८०, पृ.क्र. ६०५

[२११] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ८१, पृ.क्र. १५)

[२१२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १८१७, पृ.क्र. १८०)

[२१३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ३४९४, पृ.क्र. ५७८.

८. तरुवर बीजा पोटीं । बीज तरुवरा सेवटी ।। [२१४]

९. बीज तें चि फळ येईल शेवटी । लाभहानितुटी ज्याची तया ।।[२१५]

१०. बीज भाजुनि केली लाही । जन्ममरण आह्मां नाहीं ।। [२१६]

११. ओलें मूळ भेदी खडकाचें अंग । आभ्यासासी सांग कार्यसिद्धि ।। [२१७]

१२. ने करी निगा कुणबी न काढितां तण । कैंचे येती कण हातासी ते ।। [२१८]

१३. सेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायाचें ।। [२१९]

१४. निवडावें तन । सेतीं करावें राखण ।। [२२०]

४.६.८ : लोकगीते व लोककथा :

लोकजीवनात लोकगीते व लोककथा याने समावलेले असते. तत्कालीन सामाजिक परंपरा तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगांत व्यक्त केल्या आहेत.

१. डांका – चौक भरियेला आसनीं । पाचारिली कुळस्वामिनी ।। [२२१]

२. वासुदेव – मनु राजा एक देहपुरी । असे नांद तू त्यासी दोही नारी ।। [२२२]

---

[२१४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ३०५९, पृ.क्र. ७२७)

[२१५] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.२०१०, पृ.क्र.३४८.

[२१६] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.४२६९, पृ.क्र.६९७.

[२१७] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.१४००, पृ.क्र.२४४

[२१८] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.३८१४, पृ.क्र. ६२५.

[२१९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ११४२, पृ.क्र. २५२)

[२२०] श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण – १९९१, अ.क्र.२१३७, पृ.क्र.३६८.

[२२१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४१३, पृ.क्र. ९१

[२२२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४२९, पृ.क्र. ९७

३. जोगी – जग जोगी जग जोगी । जागेजागे बोलती ।। [२२३]

४. सरवदा – ऐका गा ए भाई । सरवदा सांगतो काई ।। [२२४]

५. मुंढा – संबाल यारा उपर तलें दोन्हो मारकी चोट । [२२५]

६. गोंधळ – राजस सुंदर बाळा पाहों आलिया सकळा वो । [२२६]

७. वाघा – मुरळी – अनंत जुगाचा देव्हारा । निजबोधांचा घुमारा ।। [२२७]

८. सौऱ्या – वेसन गेलें निष्काम झालें नर नव्हे नारी ।। [२२८]

९. लळित – वाट पाहे बाहे निढळीं ठेवुनियां हात ।। [२२९]

१०. बहुरूपी – बळे बाह्यत्कारे संपादिले सोंग ।। [२३०]

४.६.९ : शिदोरी काल्याचे अभंग :

१. वाहिला गोपाळें वेणुनाद पडे कानीं ।
धीर नव्हे मनीं चित्त झालें चंचळ ।।२।। [२३१]

२. करिती नारी अक्षयवाणें । जीवभाव देती दानें ।।२।। [२३२]

---

[२२३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४३६, पृ.क्र. १००

[२२४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४३७, पृ.क्र. १००

[२२५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४३८, पृ.क्र. १०१

[२२६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४४५, पृ.क्र. १३०

[२२७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४६६, पृ.क्र. ११२

[२२८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४५५, पृ.क्र. १०८

[२२९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४६९, पृ.क्र. ११२

[२३०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ८६०, पृ.क्र. १९५.

[२३१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १४९, पृ.क्र. ३०

[२३२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २८२७, पृ.क्र. ५८०

३. विश्वव्यापक कमळापती । त्यासी गौळणी कडिये घेती ।।४।। [२३३]

४. तुका म्हणे नटधारी । भोग भोगून ब्रह्मचारी ।।५।। [२३४]

५. चुकलों आम्ही खेळतां खेळ । गेला गोपाळ हातींचा ।।३।। [२३५]

६. कां रे धरिला अबोला । माझा वाटां देईं मला ।। [२३६]
शिदोरीचा केला । झाडा आतां निवडेना ।।२।।

७. भूक लागली अनंता । कां रे नेणसी जाणतां ।।
भागलों वळितां । गाई सैरा ओढाळा ।।३।। [२३७]

८. जें देवांचे दैवत । उभें आहे या रंगांत ।।
गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा ।।३।। [२३८]

९. आम्ही गोवळीं रानटें । नव्हों जनांतील धीटें ।।१।। [२३९]

१०. खेळों आपआपणाशीं । आमचीं तीं आम्हांपाशी ।।३।। [२४०]

४.६.१० : खेळासंदर्भातील अभंग :

लोककाव्यात रुजलेल्या काव्यप्रकारात 'खेळ' हा प्रकार संतसाहित्यातून आला आहे. त्यात हमामा, हुतूतू, विटी–दांडू, टिपरी, घोंगडी, फुगडी या साऱ्यांचा समावेश तुकोबारायांनी

---

[२३३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १७२, पृ.क्र. ३६

[२३४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १७२, पृ.क्र. ३६

[२३५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १३७, पृ.क्र. ५१

[२३६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १२४, पृ.क्र. ४९

[२३७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २२५, पृ.क्र. ४९

[२३८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २१०, पृ.क्र. ४६

[२३९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २२५, पृ.क्र. ४९

[२४०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २२५, पृ.क्र. ४९

केला आहे. भगवंताचे लोकजीवन, त्यातील गौळणी, शिदोरी, काला या साऱ्यातून कृष्ण वर्णन उभे केले आहे. बालक्रीडा, खेळ, गौळणी, काला या शीर्षकाखाली तुकोबारायांच्या गाथेत १४५ च्या आसपास लोकजीवनाचे दाखले देणाऱ्या रचना आढळतात.

तुकोबारायांच्या तत्कालीन जीवनसंदर्भातील काही संदर्भ आपल्याला सहजपणे सापडतात. त्यांपैकी काही ठळक अभंगांत आविष्कृत झालेले उल्लेख पुढीलप्रमाणे घेतले आहेत.

१. गाई गोपाळ यमुनेचे तटीं । येती पाणीया मिळोनि जगजेठी ।।
चेंडु चैगुणा खेळती वाळवंटी । चला चला म्हणती पाहू दृष्टी वो ।।१।। [२४१]

२. झेला रे झेला वरचेवरी झेला। हातीचें गमावी तो पाठीसी खाय टोला ।।१।। [२४२]

३. त्रिगुणांचा चेंडू हातें झुगारी निराळा।
वरिलियां मुखें मन लावी तेथे डोळां ।।२।। [२४३]

४. काम सारुनी सकळ । आले अवघे गोपाळ ।। [२४४]

५. गडी गेले रडी । कान्हो नेदीच तूं चढी ।।१।।[२४५]

६. आम्ही न खेळों न खेळों । आळा भाव तुझा कळों ।।२।। [२४६]

७. गाईन ते लीळा चरित्र पवाडे । राखिले संवगडे सहित गाई ।।१।। [२४७]

---

[२४१] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २७५८, पृ.क्र. ६५१

[२४२] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८८३, पृ.क्र. ६९०

[२४३] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८८३, पृ.क्र. ६९०

[२४४] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८५२, पृ.क्र. ६७८

[२४५] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३,अभंग क्र. २७९६, पृ.क्र. ६६३

[२४६] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २७९६, पृ.क्र. ६६३

[२४७] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २७४७, पृ.क्र. ६४३

८. चोरिलें नवनीत बांधविला गळा । जे तुम्हीं गोपाळा छंद केले ।।२।। [२४८]

९. गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ।।३।। [२४९]

१०. धांवोनियां मागे यशोदे भोजन । हिंडे रानोरान गाईपाठीं ।।२।। [२५०]

११. घ्या रे भोंकरें भाकरी । दहीं भाताची सिदोरी ।।
ताक सांडा दुरी । असेल तें तयापें ।।१।। [२५१]

१२. चला वळूं गाई । बैसो जेऊं एके ठायीं ।।१।। [२५२]

१३. आरुष गोपाळे त्यांची बहु देवा प्रीति ।।३।। [२५३]

१४. तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा।
तोये वांचविलें ऐसें सांगों रे दातारा ।।४।। [२५४]

१५. जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी वेणू पाटीं ।।२।। [२५५]

४.६.१०.१ : विटी – दांडूचे अभंग :

१. सारा विटीदांडू । आणीक कांही खेळ मांडूं ।।१।। [२५६]

---

[२४८] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २७४७, पृ.क्र. ६४३

[२४९] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २७१९, पृ.क्र. ६३८

[२५०] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८२८, पृ.क्र. ६७२

[२५१] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८१४, पृ.क्र. ६३६

[२५२] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८०१, पृ.क्र. ६६४

[२५३] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८१३, पृ.क्र. ६६७

[२५४] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८१३, पृ.क्र. ६६७

[२५५] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८२९, पृ.क्र. ६७२

[२५६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २०१, पृ.क्र. ४३

२. तुका म्हणे आतां । खेळ मोडावा परता ।।८।। [२५७]

३. खेळ खेळतां फोडिल्या डोया । आपण होय निराळा ।।२।। [२५८]

४. मोकळें देवा खेळों द्यावें । सम भावें सांपडावया ।।४।। [२५९]

५. यमुनेतटीं मांडियेला खेळ । मांडियेला खेळ । म्हणे गोपाळ गडियांसी ।।१।। [२६०]

६. वळी गाई धांवे धरा । आमच्या करी येरझार ।।१।। [२६१]

७. कैसा आकळ वो माय चपळ वो ।
त्रिभुवनव्यापक हरि सकळ वो ।।२।। [२६२]

८. तुर्शीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी ।
सहस्त्र मुखावरी हरी । शेष शिणविलें ।।१।। [२६३]

९. चेंडुवासवें घातली उडी । नाथिला काळिया देऊनी बुडी ।।२।। [२६४]

१०. याशीं खेळतां नाश थोरू । तुकया स्वामी सारंगधरू ।।६।। [२६५]

४.६.१०.२ : टिपरीचे अभंग :

१. निष्काम तो झाला कामासी लंपट । गोपिकांची वाट पाहात बैसे ।।४।। [२६६]

---

[२५७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २०१, पृ.क्र. ४३

[२५८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २२९, पृ.क्र. ५०

[२५९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १७०, पृ.क्र. ३५

[२६०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १६९, पृ.क्र. ३५

[२६१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १८५, पृ.क्र. ३८

[२६२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २४९०, पृ.क्र. ५१६

[२६३] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अ.क्र. २८५८, पृ.क्र. ६८२

[२६४] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अ.क्र. २८५८, पृ.क्र. ६८२

[२६५] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अ.क्र. २८५८, पृ.क्र. ६८२

[२६६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १०३३, पृ.क्र. २२९

२. हुंबरती गा तयांकडे कान । कैवल्यनिधान देउनी ठाके ।।१।। [२६७]

३. एके घाईं खेळतां न पडसी डाईं । दुचाळ्यानें ठकसील भाई रे ।
त्रिगुणांचे फेरी थोर कष्टी होसी । या चौघांची तरी धरीं सोई रे ।।१।। [२६८]

४. खेळ खेळोनियां निराळाचि राहीं । सांडीं या विषयाची घाई रे ।
येणेंचि खेळे बसवंत होसी । ऐसें सत्य जाण माझ्या भाई रे ।।२।। [२६९]

५. एक घाईं खेळतां न चुकेचि कोठें । तया संतजन मानवले रे ।।३।। [२७०]

४.६.१०.३ : हमामा / हुतूतू :

१. मशीं पोरा घे रे बार । तुझे बुजीन खालील द्वार ।।१।। [२७१]

२. पोरा हमामा रे हमामा रे ।।२।। [२७२]

३. मशीं हमामा तूं घालीं । पोरा वरी सांभाळी खालीं ।।३।। [२७३]

४. फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे । लाज सांडोनी एकएकी पाहे ।।१।। [२७४]

५. फुगडी गे अवघें मोडी गे । तरीच गोडी गे संसार तोडी गे ।।२।। [२७५]

---

[२६७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १०३३, पृ.क्र. २२८

[२६८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १९०, पृ.क्र. ३९

[२६९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १९०, पृ.क्र. ३९

[२७०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १९०, पृ.क्र. ३९

[२७१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५४, पृ.क्र. ३२

[२७२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५४, पृ.क्र. ३२

[२७३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५४, पृ.क्र. ३२

[२७४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५०, पृ.क्र. ३०

[२७५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५०, पृ.क्र. ३०

६. तुका म्हणें तुजमजमध्यें एक भाव । सम तुकें बार घेऊं पावों उंच ठाव ।।६।। [२७६]

७. सात पांच आणिल्या हरी । वांचूनी काय तगसी पोरी ।। ४।। [२७७]

८. सरला दम पांगले पाय । अझुनी तरी घोळिसी काय ।।५।। [२७८]

९. तुका म्हणे अझुन तरी । सांगितलें तें गधडी करी ।।६।। [२७९]

१०. तुका म्हणे माझें हितचि झालें । फाटकें जाऊन धडकें आलें ।।६।। [२८०]

४.६.११: दळण–कांडण :

सासुरवासी स्त्रीच्या रूपात माहेरची ओवी गाणारी ही भूमिका म्हणजे तत्कालीन गावगाड्यातील दळण–कांडण करणाऱ्या सामान्य स्त्रीच्या दळण–कांडणातून उभे केलेले पांडुरंगाचे भावस्पर्शी दर्शन होय. आपल्या एकेक ओवीतून ती आपल्या पारमार्थिक जीवनाच्या अवस्था वर्णन करते. ग्रामीण समाजाला परिचित असलेल्या आणि लोकप्रिय असलेल्या काव्याचा हा प्रकार आहे. त्याला तुकोबारायांनी सहजपणे अध्यात्मिक उंची गाठून दिली.

१. सिद्ध करुनियां ठेविलें कांडण । मज सांगतीण शुद्ध बुद्धि गें ।।१।। [२८१]

२. आठव हा धरीं मज जागें करी । मागिले पहारीं सेवटींचा गे ।।२।। [२८२]

३. सरलें कांडण पाकसिद्धि करी । मेळवण क्षिरीसाकरचें ।।५।। [२८३]

---

[२७६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५०, पृ.क्र. ३१

[२७७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५१, पृ.क्र. ३१

[२७८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५१, पृ.क्र. ३१

[२७९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५१, पृ.क्र. ३१

[२८०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १०८६, पृ.क्र. २३९

[२८१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५७, पृ.क्र. ३३

[२८२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५७, पृ.क्र. ३३

४. तुका म्हणे मज माहेरीं आवडी । म्हणोनी तांतडी मूळ केलें ।।७।। [२८४]

५. शुद्ध दळणाचें सुख सांगों काईं । मानवत असे सई बाई ।।१।। [२८५]

६. शुद्ध ते वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ।।२।। [२८६]

७. शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ।।३।। [२८७]

८. सावडीं कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ।।१।। [२८८]

९. हिरा शोभला कोंदणीं । जडित माणिकांची खाणी ।।१।। [२८९]

१०. तैसा दिसे नारायण । मुख सुखाचें मांडण ।।२।। [२९०]

११. गाती ओंव्या कामें करिता सकळें । हलविता बाळें देवावरी ।।१।। [२९१]

१२. भरिला उलंडूनी रिता करी घट । मीस पाणियाचें गोविंदाची चट ।
चाले झडझडां उसंतूनी वाट । पाहे पाळतूनी उभा तोचि नीट वो ।।१।। [२९२]

१३. कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी सतता ।।१।। [२९३]

---

[२८३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५७, पृ.क्र. ३३

[२८४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५७, पृ.क्र. ३३

[२८५] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १६०, पृ.क्र. ३४

[२८६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १६०, पृ.क्र. ३४

[२८७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १६०, पृ.क्र. ३४

[२८८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. १५८, पृ.क्र. ३३

[२८९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४७५, पृ.क्र. ११३

[२९०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४७५, पृ.क्र. ११३

[२९१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४५७५, पृ.क्र. ६५४

[२९२] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ३७९, पृ.क्र. ७९

[२९३] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २३५७, पृ.क्र. ४९०

१४. किती त्यांचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ।।२।। [२९४]

४.६.१२ : लोकाचार :

लोकजीवनातील स्त्रीच्या माध्यमातून परमार्थ आणि स्त्रीचे दैनंदिन जीवनाचा समन्वय साधताना तुकाराममहाराज स्त्रियांना उद्देशून म्हणतात, 'अरे बायान्नो हरिविषयक स्नेहरूपी तेल केसाला लावा, पश्चात्तापाच्या फनीने अंतःकरणातील विकार–विचारांना विंचरा, बुद्धीची वेणी चांगली बांधा, डोळ्यांत ज्ञानाचे काजळ घालून पंढरीच्या बाजारात जऊ. पारावर संतरूपी दिवान बसलेले आहेत. त्यांच्याभोवती फेर धरून नाचूया. या संसाराच्या बाजारात अनेक दुकाने आहेत. प्रत्येकाच्या समोर फिरण्यात काय अर्थ आहे? पांडुरंगाच्या ठिकाणी एकचित्त स्थिर होऊ या. त्याला आपले गाऱ्हाणे सांगून आपल्या मूळ स्वरूपाची जाणीव करून घेऊया. अशा प्रकारे तुकाराम महाराजांनी लोकजीवनाच्या माध्यमातून आपला लौकिक कसा राखावा, हे सुचविले आहे.

१. सातें चला काजळ घाला तेल फणी करा ।
दिवाणदारीं बैसले पारीं नाचों फेर धरा ।।१।। [२९५]

२. न देखें न बोलें नाइकें आणीक । एक केलें दोन्ही मिळोनियां ।।२।। [२९६]

३. सांडूनी लौकिक झालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ।।२।। [२९७]

४. नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे झालें तुका हरिरत ।।३।। [२९८]

---

[२९४] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २३५८, पृ.क्र. ४९०

[२९५] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३९६४, पृ.क्र. ८८६

[२९६] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२७, पृ.क्र. ७२१

[२९७] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२२, पृ.क्र. ७२१

[२९८] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२२, पृ.क्र. ७२१

५. घररिघी झालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रह्म ।।२।। [२९९]

६. बळियाचा अंगसंग झाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ।।३।। [३००]

७. व्यभिचार माझा पडिला ठाऊका । न सरती लोकांमाजी झालें ।।२।। [३०१]

८. न धरावा लोभ कांही माझेविशीं । झालें देवपिशी तुका म्हणे ।।३।। [३०२]

९. विसरलें कुळ आपुला आचार । पति भावे दीर घर सोया ।।१।। [३०३]

१०. सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ।।२।। [३०४]

४.६.१३ : देव–धर्म– शकुन–अपशकुन :

१. तुका म्हणे नांद सुखें धरी आठवण ।
माझे येती कोणी त्यांचा राखे बहु मान ।।८।। [३०५]

२. पंढरपुर निवासे तुझे रंगी नाचत असें वो ।
नवस पुरवीं माझा मनींची जाणोनियां इच्छा वो ।।२।। [३०६]

३. मांडिला देव्हारा तुझा त्रिभुवनामाझारी वो ।
चौक साधियेला नाभिकळस ठेविला वरी वो ।।३।। [३०७]

---

[२९९] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२४, पृ.क्र. ७२१

[३००] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२४, पृ.क्र. ७२१

[३०१] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२५, पृ.क्र. ७२१

[३०२] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२५, पृ.क्र. ७२१

[३०३] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२६, पृ.क्र. ७२१

[३०४] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अ.क्र. ३४२६, पृ.क्र. ७२१

[३०५] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. ३४११, पृ.क्र. ८३०

[३०६] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २९३२, पृ.क्र. ७१०

[३०७] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. ३९३२, पृ.क्र. ७१०

४. तुझें तुज पावलें माझा नवस पुरवीं आतां वो ।
तुका म्हणे राखें आपुलिया शरणागता वो ।।६।। [३०८]

५. जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे चेरे ।
साहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें ।।३।। [३०९]

६. बहुतां पाठीं निरोप हाटीं पाठविला तुज ।
तुका म्हणे आतां सांडुनि लौकिकाची लाज ।।४।। [३१०]

७. वेसन गेलें निष्काम झालें नर नव्हे नाही ।
आपल्या तुटी पारख्या भेटी सौरियांच्या फेरी ।।१।। [३११]

८. सकळांमधीं आगळी बुद्धि तिची करूं सेवा ।
वायां तुवां मुंडसवे भक्ती नाचों भावा ।।५।। [३१२]

९. म्हणे तुका टाक रुका नाचों निर्लज्जा ।
बहु झालें सुख कामें चुकलिया काजा ।।६।। [३१३]

१०. समसपाट वेसनकाट निःसंग झालें सौरी ।
कुडपीयेला देश आतां येऊं नेदीं दुसरी ।।१।। [३१४]

११. तुका म्हणे हा वेष दिला आम्हां जेणें ।
जना प्रतीत सवें असो एकपणैं ।।६।। [३१५]

---

[३०८] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. ३९३२, पृ.क्र. ७१०

[३०९] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्र. २४९८, पृ.क्र.५४१

[३१०] वै. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, देवडीकर पारायण प्रमाणित, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई, दुसरी आवृत्ती – २०१०, अभंग क्र. २४९८, पृ.क्र.५४१

[३११] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८८७, पृ.क्र.६९१

[३१२] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८८७, पृ.क्र.६९१

[३१३] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८८७, पृ.क्र.६९१

[३१४] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८९३, पृ.क्र.६९३

[३१५] ह.भ.प. स.के.नेऊरगांवकर , श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती – २००३, अभंग क्र. २८९३, पृ.क्र.६९३

१२. असो मंत्रहीन क्रिया । नका चर्या विचारूं ।।१।। [३१६]

१३. सेवेमधीं जमा धरा । कृपा करा शेवटीं ।।२।। [३१७]

१४. विटंबिले भट । दिला पाठीवरी पाट ।।१।। [३१८]

१५. खोटें जाणोनी अंतर । न साहेचि विश्वंभर ।।२।। [३१९]

१६. केलें सांगितलें काम । नव्हे धर्म सत्तेचा ।।३।। [३२०]

१७. तुका म्हणे असे शाहाणियां दुरी । बोबडिया दासां हाका मारी ।।४।। [३२१]

१८. माझा देव्हारा साचा । नाहीं आणीक कोणाचा ।
त्रिभुवनीं याचा । ठसा नलगे पुसावें ।।१।। [३२२]

१९. या रे लोटांगणीं । कांहीं करा विनवणी ।
करील झाडणा । भूत काढील संसार ।।२।। [३२३]

२०. घेतलासे पुरा । माया सममता आसरा ।
अवघ्या एक सरा । पळती रंग देखोनीं ।।५।। [३२४]

२१. मेंढा मारावा लोहाळ । पूजा पावली सकळ ।

---

[३१६] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४८२, पृ.क्र. ११४

[३१७] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. ४८२, पृ.क्र. ११४

[३१८] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २८३०, पृ.क्र. ५८०

[३१९] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २८३०, पृ.क्र. ५८०

[३२०] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २१७, पृ.क्र. ४८

[३२१] जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांचा गाथा, श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू, पुणे २०१३, अ.क्र. २४०, पृ.क्र. ५२.

[३२२] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २८०, पृ.क्र. १६८

[३२३] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २८०, पृ.क्र. १६८

[३२४] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २८०, पृ.क्र. १६८

तुम्हीं केले बळ । मग मी ठायीं न पडें ।।३।। [३२५]

२२. भवनदीचा न कळे पार ।
काळिया माजी थोर विखार ।।३।। [३२६]

२३. चौक भरियेला आसनीं । पाचरिली कुळस्वामिनी । [३२७]
वैकुंठवासिनी । ये धांवोनी झडकरी ।। ११।

२४. मन मारोनि मेंढा मुठीं । आशा मनसा तृष्णा सुटी ।
भक्तिभाव नैवेद्य ताटीं । भरोनी केला हाकारा ।।४।। [३२८]

२५. गुंडाळा देव्हारा मान नेती मानकरी ।
तुका म्हणे बरीं आजी कोडीं उगविली ।।४।। [३२९]

सारांश : संत तुकाराममहाराजांची वाणी ही 'लोक' वाणी आहे. तसेच लौकिकदृष्ट्या अभंगाचे श्रेष्ठत्व अवर्णनीय आहे. त्यांची अभंग वाणी तत्कालीन लोकजीवनाची लोकभाषा व सद्यःस्थिती यांच्याशी जवळिकीचे नाते प्रस्थापित करते. विद्वानापासून सामान्यांपर्यंत तिचे आकलन होते. त्यातील उत्कट भावविश्व अवतरण क्षमता, म्हणी, वाक्प्रचार उपदेश करणारे तसेच बोधात्मक प्रबोधन घडवून आणणारे आहे.

* * *

[३२५] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २७९, पृ.क्र. १६७

[३२६] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २३०, पृ.क्र. १३८

[३२७] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २७७, पृ.क्र. १६६

[३२८] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २७७, पृ.क्र. १६६

[३२९] नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री संत तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वरकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, प्रथमावृत्ती १९१८, अ.क्र. २७८, पृ.क्र. १६७

४.७ : अभंगांचे घटक व लोकजीवनावरील भाष्य – संदर्भ

४.७.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रबंधात अभ्यासासाठी तुकाराममहाराजांच्या अभंगांचे लोकजीवनाच्या अनुषंगाने ढोबळ पद्धतीने वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात साधारणपणे १५० ते २०० अभंग क्रमवार एकत्रित करून त्यातील काही ठरावीक अभंगांचे विवेचन मांडण्याचा प्रयास केला आहे. त्यात लोकाचाराचे संत श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगांची गाथा, श्रीक्षेत्र देहू यातून साधारणपणे १५ ते २० अभंग आढळले. जोगमहाराज सांप्रदायिक, सार्थ श्री तुकाराम गाथा, ह.भ.प. देवडीकर पारायण पद्धतीप्रमाणे या गाथेतून काही अभंग निवडले आहेत.

तुकाराममहाराज हे जनसामान्यांतले कवी असल्यामुळे त्यांच्या अनुभवांची शिदोरी योग्य होती. आजही आपल्या प्रत्ययास येते व भविष्यातही प्रेरक ठरेल. गोरक्षणाचे महत्त्व तसेच स्पर्धात्मक युगाचे खेळाचे महत्त्व त्यांनी अभंगांच्या माध्यमातून मांडून ठेवले आहे. अनेक अभंग आजही प्रेरणादायी ठरतात. समाजातील अंधश्रद्धेवर तर प्रखर टीका संत तुकाराममहाराज आपल्या अभंगांमध्ये करतात. देव–धर्म, शकुन–शपशकुन, कुळाचार यांच्या आधाराखाली समाजातील रूढी–परंपरागत आंधळेपणा घालवून नारायणाची (विठ्ठलभक्ती) करण्यास प्रोत्साहन देतात.

तुकाराममहाराजांनी आपल्या गाथेमध्ये कृष्णभक्ती, नारायणभक्ती, विठ्ठलभक्ती यांचे वर्णन केलेच आहे. त्याचप्रमाणे संत तुकाराम धर्मनिरपेक्षतेचीही शिकवण आपल्या अभंगातून देताना हिंदी भाषेचाही आधार घेतात. तसेच कृष्ण वर्णन, गौळणींचे वर्ण, शिदोरी, पारंपरिक खेळ, शिदोरी काव्याच्या अंतर्गत आपल्या भक्तीची आर्त करुणा भासलेलीही आढळते.

४.७.२ लेखकांचे लोकजीवनाविषयीचे मत :

तुकारामांचे अभंग हे स्वानुभवाची प्रचिती आहेत. त्यामुळे त्यांच्या अभंगात लोकभाषेचा मौखिक परंपरेतून चालत आलेल्या रीतीरिवाजांचा लोकगीतांचा व इतर रूढी–परंपरांचा वापर केला गेला आहे. प्रस्तुत प्रबंधासाठी लोकाभिमुख तुकाराम शोधण्याचा प्रयास केला गेला आहे. अशाच पद्धतीने अनेक अभ्यासकांनी आपापला दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे १) श. गो. तुळपुळे, २) वा. ल. कुलकर्णी, ३) भालचंद्र नेमाडे, ४) डॉ. सदानंद मोरे, ५) डॉ. दिलीप चित्रे, ६) आ. ह. साळुंखे, ७) मुकुंद दारा, ८) डॉ. कृष्णा इंगोले, ९) डॉ. शंकर चतुरकर व १०) डॉ. रामचंद्र देखणे इ. अभ्यासकांनी तुकाराम गाथेचे अभ्यासक म्हणून त्यांच्या चरित्राचा व अभंग निर्मितीचा, तसेच अभंगातील आशयगर्भतेचा सखोल आशय मांडला आहे. यावरूनच असे लक्षात येते की, तुकारामांचे काव्य हे चिकित्सकात्मक अभ्यासाच्या दृष्टीने आवाहन ठरू शकते.

तुकाराममहाराज आपल्या अभंगनिर्मितीचे श्रेय नामदेवराय व पांडुरंगास देतात. त्याबद्दल तुकाराममहाराज म्हणतात. 'नामदेव केले स्वप्नामाझि जागे' तसेच 'मज विश्वंभर बोलवितो' समाजाच्या उद्धारासाठीच आपण अभंगाची निर्मिती केली आहे. असा त्यांचा सार्थ आत्मविश्वास आहे. तुकोबांच्या काव्यात प्रचंड भावनात्मकता, अनुभव संघटन याचे सचित्र दर्शन गाथेत होते. तुकाराममहाराज अभंगात समाजसुधारकाची आणि लोकजीवनातील एका समाजमनाची जाणीव करून देतात. व आपल्या प्रतिभाशक्तीचे दर्शन घडवितात. तुकोबांच्या अभंगात त्यांची विविध रूपे पाहावयास मिळतात. प्रापंचिक जीवनापासून ते निर्वाणापर्यंत अनेक टप्पे ओलांडताना दिसतात. प्रापंचिक दु:खातून बाहेर पडून आध्यात्माकडे वळलेले तुकाराम कर्मकांडावर प्रखर टीका करणारे तुकाराम; असे विविध पैलू अभ्यासावयास मिळतात. संत तुकाराममहाराजांची अभंगवाणी ही लोकवाणी आहे, तुकोबारायांच्या काव्यात उत्स्फूर्तता, भावनोत्कटता, अनुभवघनता इत्यादी श्रेष्ठ वैशिष्ट्ये आढळतात. ग्रामव्यवस्था व त्याभोवती फिरत असलेले लोकजीवनही अभंगाद्वारे प्रतीत होताना दिसते. त्याबद्दल मांडलेली अभ्यासकांची मते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

लोक म्हणजे समाजातील मानवी समूह असा एक ढोबळ अर्थ आपण लावतो. यात शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही संस्कृतिचा अंतर्भाव असतो. लोक, या शब्दाचा अर्थ विशद करताना तसेच लोकजीवनातील मानसिकता वर्णन करताना लोकांचे जीवन कशाप्रकारे प्रतिबिंबित होते. हे सांगताना [३३०] डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे आपले मत स्पष्ट करताना म्हणतात, 'लोकसाहित्यातील लोक म्हणजे एकत्रितपणे जास्तीत जास्त सुखकर जीवन जगण्यासाठी एकत्र आलेला माणसांचा समुदाय. हा समुदाय समान मनस्क असतो. या समान मनस्क, समुदायाचे संस्कृत संचित व परंपरा एकच असतात. त्यांच्या धारणांसह ह्या लोकांचे वर्तमान जगणे सुरू असते.' येथे लोकजीवनातील लोकसमान मनस्क असतात, हे लक्षात येते. अशा लोकांच्या परंपरा समान असतात. लोकांच्या सर्व जीवनाचे प्रतिबिंब हे लोकजीवनातून व्यक्त होत असते.

लोकजीवनाचा अविभाज्य घटक म्हणजे ग्रामव्यवस्था होय. तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगांद्वारे लोकजीवनात ही ग्रामव्यवस्था मांडली आहे. व त्यावर भाष्य करताना [३३१] अत्रे त्रि. ना. आपल्या गावगाडा या साहित्यात म्हणतात, 'अभंगातील ग्रामव्यवस्था ही बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार यांची बनलेली होती. जाती–जमातींत वाटलेली होती. त्यामध्ये उच्च जाती, व्यावसायिक जाती, फिरत्या जाती, गावाबाहेर राहणाऱ्या अस्पृश्य जाती यांचा समावेश होता. या परस्परावलंबी असल्या, तरी प्रत्येकाचा व्यवसाय सुरक्षित आणि आरक्षित होता. सुरक्षित या अर्थाने की बहुतेक एक जात दुसऱ्यांचा व्यवसाय स्वीकारत नसे. त्यामुळे स्पर्धाही नव्हती. वंशपरंपरेने चालत आलेला व्यवसाय करून आपल्या कुटुंबांचा उदरनिर्वाह प्रत्येक जात करीत होती. लोकजीवनावर धर्मभावनेचा जबरदस्त पगडा होता. धर्म, मोक्ष, नरक, पुनर्जन्म या कल्पना पूर्णपणे मनामनांत भिनलेल्या आहेत. विशिष्ट जातीत जन्म घेणे हे पूर्वजन्मीचे संचित समजले जात होते. त्यामुळे जातिव्यवस्था स्थिर होती.'

---

[३३०] डॉ. सहस्त्रबुद्धे अनील, **लोकबंध,** दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे. प्रथम आवृती, पृ.क्र. ५०.

[३३१] अत्रे. त्रिं. ना., **गावगाडा,** वरदा बूक्स, पुणे, तिसरी आवृत्ती पुनर्मुद्रण – १ जाने. १९९५ पृ. क्र. ५.

[३३२]श्री. नानामहाराज साखरे आपल्या श्री संत गाथा ग्रंथातील प्रस्तावनेत अभंग व लोकजीवनाविषयी लिहितात. संतांचे अभंग लोकाभिमुख आहेत. अभंगांचा प्रभाव लोकजीवनावर फार मोठा आहे. संतांनी अभंगांची रचना केली. ती अलीकडच्या कवींप्रमाणे स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी नाही. अभंग असो किंवा ओवी त्या काव्याचा हेतू, भक्ती व ईश्वरसान्निध्य हाच असतो. अभंग व ओव्यांचा आशय हा अध्यात्मिकच असतो. पण याच वेळी ही काव्ये भक्तिभावनेचा प्रचार करणारीही असतात. अभंगांचा हेतू संतसज्जन जाहीर करतात. तत्कालीन लोकजीवनातील वैशिष्ट्ये अभंगांत गुंफलेली आढळतात. अभंग आणि ओवी यांची भाषा, लोकांच्या बोलण्यातली आणि परिचयाची असते. भाषेत अपरिचित अलंकार मुद्दाम गुंफण्याचा अट्टहास नसतो. अभंग हे समाजमनेच व्यक्त करतात. म्हणूनच हा काव्यप्रकार महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय झालेला आढळतो.

अभंग व ओवी यांच्या लोकप्रियतेचे रहस्य त्यात अभिव्यक्त होणारे जीवनानुभव रोजच्या परिभाषेतील आहेत. अभंगाची भाषा लोकमानसाची असते. त्यात येणारे अनुभव दैनंदिन जीवनातीलच असतात. अभंगातील विचार छोटा असला, तरी अतिशय रमणीय असतो. अभंगातूनच या संतांनी भक्तीचा मळा पिकवला. अभंग व ओवी यांची लोकप्रियता शतके लोटली, तरी अजूनही टिकून आहेत. तुकोबांच्या अभंगातून जनमानसाचा आरसा प्रतिबिंबित होतो. त्यांनी आपल्या अभंगाद्वारे समाजजागृती घडवून आणली व धर्मनिरपेक्षतेची शिकवण दिली. यावर प्रकाश टाकताना [३३३] डॉ. शंकर चतुरकर, 'वाङ्मय आचार्य', 'धन्य तुकोबा समर्थ, सदेह वैकुंठगमन' या प्रबंधात म्हणतात, 'समाज हा राष्ट्राचा पाया आहे. त्याचप्रमाणे कुटुंबाची पाठशाळा आहे. कुटुंबात राहणारा प्रत्येक माणूस हा राष्ट्राचा नागरिक तथा समाजाचा घटक आहे, या दृष्टीने समाजाच्या कल्याणाकरिता प्रत्येक माणूस चारित्र्यसंपन्न असावा. माणसाला माणूस घडविण्याची महाराष्ट्रीय संतांची सामाजिक क्रांती तथा कामगिरी फार महत्त्वाची आहे.'

---

[३३२]साखरे नाना महाराज, **श्री संत गाथा,** मुद्रक प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती – जाने. १९९०. पृ. क्र. ३, ४.

[३३३] डॉ. चतुरकर शंकर, **सदेह वैकुंठगमन,** श्रीनिवास मुद्रणालय, पुणे, ३० जून, १९९३, पृ. क्र. २०८.

माणसाला माणूस बनविताना त्यांच्याजवळ व्यक्ती, जात, वर्ण हा भेद मुळीच नव्हता. आत्मोद्धाराचा समान अधिकार त्यांनी समाजातील शुद्रापासून तो ब्राह्मणापर्यंत सर्वांनाच सांगितला. तुकोबाराय म्हणतात,

'तोचि देवभक्त । भेदाभेद नाही ज्यांत ।।'

हे त्यांनी प्रत्यक्ष अमलात आणून दाखविले. 'समता, बंधुता आणि एकता' या तत्त्वाचा पुरस्कार करून श्री ज्ञानोबांपासून ते तुकोबापर्यंत सकल संतांनी अध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी भक्तिभाव या धर्मपातळीवर कसलाही भेदभाव मानला नाही आणि

'वाढवाया सुख भक्ती भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचे ।।'

हेच धर्मकार्य आम्ही अनेक जन्मांपासून करीत आलो आहोत. मानवी जीवन आणि समाज व त्यात अंतर्भूत असलेले जीवनमूल्य यांचा मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी असलेला समावेश व त्याचा सामाजिक लोकजीवनावर होणारा परिणाम मांडताना [३३४] जयंत देशपांडे हे आपल्या 'अभंग तुकोबाचे' या पुस्तकात म्हणतात, 'संत वाङ्मय मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रवृत्त झालेले आहे. प्रपंच आणि परमार्थाचा मनोज्ञ समन्वय घालून देणारे ते अद्‌भूत शास्त्र आहे. मानवी विचारांच्या विविध स्तरांवरून जीवनामध्ये निर्माण झालेल्या आणि होणाऱ्या विविध समस्यांची चपखल आणि समाधानपूर्वक उकल करून मानवी जीवनाला परिपूर्णता प्राप्त करून देणारा तो एक सुखसंवाद आहे.'

मानवी जीवन व्यक्ती आणि समाज या दोन पातळ्यांवरून विचारात घेतले जाते. सद्य परिस्थितीत या दोन्ही पातळ्यांवरून मानवी जीवनाची प्रकृती क्षीण होते आहे. संतवाङ्मयाच्या अमृत संजीवनीशिवाय या दोन्ही पातळ्यांवर जीवन परिपूर्ण होऊ शकणार नाही. कारण संतवाङ्मयाला जशी अध्यात्मिक मूल्ये आहेत. तशीच सामाजिक मूल्येही आहेत. किंबहुना अध्यात्मिक मूल्ये समाजाभिमुख झाली, की सामाजिक मूल्ये म्हणून सिद्ध होतात आणि

[३३४] जयत देशपांडे, अभंग तुकोबाचे, साकार प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००६, पृ.क्र. (प्रस्तावना)

सामाजिक मूल्ये व्यक्तिकेंद्रीत झाली, की अध्यात्मिक मूल्ये वाढू लागतात. अध्यात्मिक आणि सामाजिक या दोन्ही पातळ्यांवरून एकाच वेळी जीवनाला दिशा मिळत असते.

या दृष्टीने श्री तुकाराममहाराजांचे अभंग चिंतनीय आहेत. कठोर साधनेने संपन्न झालेले स्वतःचे पारमार्थिक विश्व, तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थिती, समाजाकडून प्राप्त झालेली अवहेलना आणि मान, विविध प्रसंगांतून प्रकट झालेल्या समाजस्वभावाचे सूक्ष्म अवलोकन, खोटेपणाची अतिशय चीड, सत्याचा विशेषाग्रह आणि जगाच्या उद्धाराची तीव्र तळमळ यामुळे हे अभंग स्पष्टपणाने भीडभाड न ठेवता अभिव्यक्त झालेले; पण अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करणारे आहेत. यांचा आश्रय करून कोणीही तरून जावे आणि जगाला तारून नेण्याचे सामर्थ्य प्राप्त करून घ्यावे, असे चिंतन संतवाङ्मयाची वेगळी भूमिका दाखविणारे आणि संतांच्या सहज प्रतिभेच्या भव्य आविष्काराचे दर्शन घडविणारे असते.

[३३५]संतसाहित्य आणि लोकसाहित्य याचा सखोल अभ्यास मांडताना डॉ. रा. चिं. ढेरे आपल्या 'संतलोक आणि अभिजन' या प्रस्तुत साहित्यात म्हणतात, ''संतांना लोकोद्धाराची अत्यंत तळमळ असल्यामुळे त्यांनी लोकजीवनाच्या सर्व स्तरांचे बारकाईने निरीक्षण केले होते. संतांची दृष्टी प्राधान्याने पारमार्थिक असली, तरी लोकांची अतिभौतिक दुःखेही त्यांनी सहानुभूतीने न्याहाळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच आपले अनुभव आणि आपले विचार हे समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचावेत असा संतांचा आग्रह होता. या आग्रहापोटी त्यांनी लोकमानसावर प्रभाव पाडणाऱ्या लोकप्रचलित आणि लोकप्रिय अशा गाथ्यांचा निरीक्षणपूर्वक अंगीकार केला आणि त्या माध्यमांतून आपला संदेश प्रवाहित करण्याचा उपक्रम सतत चालू ठेवला आहे.

[३३६]'शेतकऱ्याचा आसूड'मध्ये महात्मा फुले लिहितात, 'नंतर थोडा काळ लोटल्यावर तुकाराम या नावाचे साधू शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाले.' तुकारामाच्या व्यक्तित्वातील साधू आणि शेतकरी या दोन्ही स्वभावधर्माची घट्ट वीण यातून प्रकट होते. तुकाराम सर्वप्रथम श्रमाची प्रतिष्ठा

---

[३३५] रा. चिं. ढेरे, संत लोक आणि अभिजन, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २ मार्च १९९८, पृ.क्र. १९.

[३३६] फुले म., शेतकऱ्यांचा असूड, संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रास्ताविक.

जोपासणारे सृर्जनशील शेतकरी असल्यामुळेच त्यांच्या अभंगांत कृतिशीलतेचे अजोड सामर्थ्य निर्माण होते. आपल्या या सामर्थ्याचा उपयोग तुकोबांनी शेतकऱ्यांना आणि समाजातील सर्वच हीन–दीन घटकांना दांभिक मनोवृत्तीच्या आणि शोषक धर्माच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी केला. कष्टकरी शेतकरी, त्याची साधीसुधी स्वप्न त्या स्वप्नांचीही परिपूर्ती होऊ नये, अशी आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती, शेतीच्या अनुषंगाने प्रकट होणारे शेतकऱ्यांचे आर्थिक सांस्कृतिक व सामाजिक जीवन या सर्वांची प्रत्ययकारी चित्रे तुकोबांनी आपल्या अभंगगाथेतून सामर्थ्याने व जिव्हाळ्याने रेखाटली आहेत.

[३३७] संत तुकोबारायांच्या लोकसंवादातील सामाजिक आशय स्पष्ट करताना डॉ. रामकृष्ण दासमहाराज लहवितकर आपल्या 'संत तुकोबारायांचा लोकसंवाद' या प्रस्तावनेत म्हणतात,

'वेदनीतीचे लोककेंद्री निरुपण हे तुकोबारायांच्या अभंग गाथेतले एक मुख्य आशयसूत्र आहे. वेद, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे यांच्यापासून खूप दूर असलेल्या बहुजन समाजाला ह्या तत्त्वज्ञानातला सांस्कृतिक आशय सहज समजेल अशा लोकभाषेतून रूपांतरित करण्याची गरज होती. ही सामाजिक गरज ओळखून तुकोबारायांनी हे तात्त्विक संचित समाजाभिमुख बनविले आहे, 'वंदे गवळ्याधरी बांधिला' अशा रूपकात्मक व लोकांना समजेल अशा भाषेत भारतीय संस्कृतीला रूपकात्मक व उपदेशात्मक आपण त्यांनी लोकभाषेतून जनसामान्यांपर्यंत पोहोचविला. त्यामुळे वेदांविषयीची भीती, दडपण व दुरावा दूर झाला. 'वेदां'चा तो अर्थ आम्हांसीच ठावा. येरांना वाहावा भार गाथा' अशा परखड शब्दांतून त्यांनी वेदवाणीवर हक्क सांगणाऱ्यांच्या सत्ताकेंद्रातून वैदिक ज्ञानाची मुक्ती केली आणि त्या ज्ञानाचा ध्रुव जनसामान्याकडे वळविला. अध्यात्मिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या तुकोबारायांच्या या कर्तृत्वामुळे महाराष्ट्रात 'अध्यात्मिक लोकशाही' ची नांगरणी होऊ शकली.

गोंधळ : परंपरा स्वरूप आणि आविष्कार या आपल्या साहित्यात डॉ. रामचंद्र देखणे तुकोबारायांच्या अभंगातील लोककलेचे दर्शन घडविताना म्हणतात, 'महाराष्ट्रीय लोकसंस्कृतीमध्ये

[३३७] डॉ. लहवितकर रामकृष्णदास, **संत तुकोबारायांचा लोकसंवाद,** ब्रेन्टॉनिक प्रकाशनगृह, पुणे, द्वितीयावृत्ती एप्रिल २०१०, पृ.क्र. १८.

गोंधळ परंपरेचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. कुळधर्म कुळाचाराचा भाग म्हणून महाराष्ट्राच्या घराघरांमध्ये गोंधळाची परंपरा आहे. समृद्ध लोककलांचा वारसा या महाराष्ट्राला लाभला आहे. महाराष्ट्राच्या लोकभूमिका, लोकगीते आणि लोकसाहित्य यातून समर्थपणे उभी राहते ती महाराष्ट्राची लोकसंस्कृती. मौखिक परंपरेतून सादरीकरणाच्या वैशिष्ट्यांसह या लोककला जनमानसात समर्थपणे उभ्या राहिल्या आहेत. अशाच एका मौखिक परंपरेला नृत्य, नाट्य, संवाद, निरुपण, लोकगीते, लोकभूमिका याची जोड मिळाली आणि त्यातून एक मराठमोळा लोकरंग उभा राहिला तो गोंधळाच्या रूपात. मनोरंजनाइतकेच प्रबोधनाचे मूल्य असणाऱ्या गोंधळ या लोककलेचे आणि परंपरेचे मोठेपण ओळखून मराठी संतांनीही गोंधळाला भारूडात स्थान देऊन गोंधळाची रुपके मांडली आहेत. हे गोंधळाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल म्हणून गोंधळ या लोककला प्रकाराचे शरीर जरी मनोरंजनाचे असेल तरी आत्मा हा प्रबोधनाचा आहे.' [३३८]

रा. द. रानडे तुकोबांच्या अभंगातील लोककाव्य विशद करताना म्हणतात, '' तुकारामांच्या पारमार्थिक व लौकिक जीवनासाठी दिलेल्या संज्ञांना अनुक्रमे निश्चयाचे बळ, अंतःकरणातील व्याकूळता, सर्वात्मभावी साक्षात्कार अशा संज्ञा वापरता येतील. निश्चय, व्याकूळता अथवा आर्तता आणि सर्वात्मभाव या अशा तीन अवस्था आहेत. उत्तरोत्तर तुकाराम स्वतःला विकसित करीत जातात. शेवटी अधिकारी सर्वात्मभावी व्यक्तिमत्त्व त्यांना प्राप्त होते. [३३९]

डॉ. भालचंद्र नेमाडे अभंगातील शेतीविषयी संदर्भ स्पष्ट करताना म्हणतात, ''महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांमध्ये तुकाराममहाराज हे अत्यंत लोकप्रिय आहे. या सर्वांनाच तुकारामांच्या अभंगातील काही म्हणी वा काही ओळी तरी तोंडपाठ असतातच. अनेकांना बरेच अभंग पाठ असतात. काही लोकांना तर जवळ–जवळ सगळाच तुकारामच कंठस्थ असतो. मराठी लोकांचा महाराष्ट्रातील सर्व संतकवींमध्ये तुकारामांवरच सर्वांत जास्त लळा आहे. साहित्याच्या भारतीय व

[३३८] डॉ. देखणे रामचंद्र, **गोंधळ परंपरा, स्वरूप आणि अविष्कार,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, तृतियावृत्ती २०१२, प्रस्तावना.
[३३९] रानडे रा. द., **मराठी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग,** गजेंद्र गडकर, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९३, पृ.क्र. १.

परदेशी अभ्यासकांनी तुकारामांचा मराठी भाविक लोकांवर विलक्षण प्रभाव असल्याचे नमूद केलेले आहे. [३४०]

लोक व लोकजीवनाविषयीचा संदर्भ मांडताना ना. गो. कालेलकर म्हणतात, 'लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग. ही संस्कृती स्वाभाविकपणे जगते आणि निसर्गाला अधिक जवळची आहे. बाह्यसंस्कारांपासून अलिप्त राहिल्यामुळे तिच्यात पुरातत्त्वाचे निर्भेळ अवशेष अधिक प्रमाणात मिळू शकतात. ती आद्य संस्कृती नसली, तरी तिची जुन्यात जुनी उपलब्ध होऊ शकणारी अवस्था. ही अवस्था काही माणसांच्या जीवनाविषयक सवयींतून, रूढींतून परंपरागत नृत्यगीतादी कलाकृतींतून प्रकट होऊ शकते. या माणसांनी बनलेला समाज म्हणजेच 'लोक.' 'लोक'मधून वेगळ्या संस्कृतीचे दर्शन होत असते. [३४१]

४.७.३: गृहीतके

प्रस्तावना :

१. तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवन कसे आहे ?

तुकोबांच्या अभंगातील लोकजीवनावर तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीचा प्रभाव पडलेला दिसतो. तत्कालीन समाज अनेक कर्मकांडामध्ये अडकलेला दिसतो. देवदेवतांचे विविध अवतार अमानवी लीला, शकुन–अपशकुन, अंधश्रद्धा, भ्रामक कल्पना, अद्‌भूत रम्यता याचे पडसाद लोकजीवनावर उमटलेले दिसतात.

---

[३४०] नेमाडे भालचंद्र, **संत तुकाराम,** साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती – १९९४, पृ. क्र. १४.

[३४१] कालेलकर ना. गो., **भाषा आणि संस्कृती,** मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्रथमावृत्ती १९६५, पृ. क्र. ९४.

स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था असूनही जातिव्यवस्थेचा पगडा लोकजीवनावर दिसतो. तुकाराममहाराजांच्या काळात सण, उत्सव, यात्रा, जत्रा, पाप–पुण्य, नाती–गोती, कृषिसंस्कृतीशी संबंधित घटक, कला–क्रीडा, खेळ, भाव–भावना प्रकटीकरण जन्मापासून हे मृत्यूपर्यंतचे संस्कार, मोक्षप्राप्तीची लालसा या साऱ्या घटकांतून लोकजीवन प्रकटले आहे. ते संत तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगवाणीतून मांडले आहे.

२. संत तुकाराममहाराजांच्या अभंगांतील लोकजीवन तत्कालीन समाजाचे प्रतीक आहे का?

तुकारामांच्या अभंग गाथेतील मूल्यांना स्वकर्माचा गंध आहे. तत्कालीन सामाजिक व आर्थिक आणि नैसर्गिक आदी गोष्टींचे प्रहार स्वतः तुकारामांनी अनुभवले आहेत. त्यामुळे त्यांच्या अभंगास स्वानुभवाचा अर्क उतरला असल्यामुळे तत्कालीन संस्कृतीशी एकरूप झालेले दिसतात. अभंगातील लोकजीवन हे तत्कालीन समाजाचे प्रतीक आहे. व ते आपल्याला अनेक माध्यमांतून प्रतीत होते. तत्कालीन समाजव्यवस्थेची, समाजघडणीची, रूढी–परंपरांची लोकभ्रम, लोकव्यवसायाच्या भक्ती साधनेचा आविष्कार विविध प्रतिमा आणि रूपकांतून मांडलेला दिसतो.

३. संत तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवन संशोधनाला कसे प्रेरक आहे ?

संत तुकाराममहाराजांनी आपल्या अभंग गाथेत मानवी अवस्थांचे केलेले उत्कट चित्रण, तत्कालीन ग्रामव्यवस्था, गावगाडा या आधारावर अवलंबून असलेले समाजातील नैतिक अधिष्ठान, मानवी मनाचे प्रतिबिंब व सामाजिक जडण–घडण या साऱ्या गोष्टी अभ्यासकाला प्रेरणा देतात, स्फूर्ती देतात. हे त्यांच्या अभंगांचे वैशिष्ट्य आहे. तुकाराममहाराजांचे अभंग हे अथांग जीवन दर्शन देणारे साहित्य आणि कलाव्यवहार यावर प्रभाव टाकणारे आहेत. अभंगांतील मौलिक विचारांची चिंतनशीलता ही समाजमनाला जागृत करणारी आहे.

४. अभंगातील लोकजीवन प्रबोधनाचे माध्यम कसे आहे ?

तुकारामांची अभंग गाथा निर्मितीचा कालखंड तत्कालीन सामाजिक परिस्थिती, तत्कालीन समस्या या भिन्न जरी असल्या, तरी संत तुकारामांनी अभंगांच्या माध्यमांतून केलेले भाष्य अनेक युगांना प्रेरक ठरणारे आहे. संत तुकारामांचे अभंग हे विविध शाश्वत जीवनमूल्यांचा स्वीकार करणारे असल्याने ते तत्कालीन न वाटता आजच्या एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या समाजाला दिशा देणारे व सद्यःस्थितीला अनुरूप असणारे आहेत. संत तुकारामांनी अभंगांतून मांडलेले आपले मत सामाजिक परिस्थिती व लोकजीवनावर प्रभाव टाकणारे असल्याने आजच्या काळालाही खऱ्या अर्थाने लागू पडताना दिसतात. संत तुकोबारायांची अभंगवाणी ही आत्मप्रत्ययकारी व आत्मसाक्षात्कारी असल्यामुळे समाजातील सर्व स्तरांवर प्रबोधन करण्याचे कार्य करते. सामाजिक दंभावरील प्रहार असो वा तुकारामांचा पर्यावरणाचा विचार असो किंवा धर्मनिरपेक्षतेची संकल्पना असो. आजही समाजाचे प्रबोधन करण्याची क्षमता अभंगांद्वारे मिळते. त्यामुळे तुकोबांची अभंगरचना ही सर्वार्थाने सर्वकालीन प्रबोधनकारक ठरते. तुकोबारायांची अभंगवाणी ही मौल्यवान आणि भविष्य काळाशीही संवाद साधणारी आहे.

सारांश : ''संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास'' या प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली या स्त्रोतात कीर्तनकारांशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे संपर्क साधण्याचे महत्त्वाचे साधन होते त्या अंतर्गत कीर्तनकार आणि अभ्यासकांशी संवाद साधला. त्यांना दिलेली प्रश्नावली भरून घेतली. अ) संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगात लोकजीवन आहे का? ते कसे? ब) तुकोबारायांच्या अभंगांचा समाज जीवनावर परिणाम झाला आहे का? कसा? क) तुकोबारायांचे विचार, लोकजीवन समाजउद्धारक विचार? ड) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवनात आलेले समाज घटक कोणते ? अशा प्रश्नावलीद्वारे कीर्तनकारांच्या मुलाखती घेतल्या. लोकजीवन कसे उमटले आहे. हे कीर्तनकारांकडून जाणून घेतले. गावगाडा, जाती, पोटजाती, वर्णभेद, कुंटुंब व्यवस्था, स्त्री जीवन, लोकव्यवसाय, उद्योग, कृषी, पर्यावरण, कुळाचार, शकुन, अपशकुन, धर्मनिरपेक्षता, देवधर्म, आर्तभक्ती, निसर्ग, लोकीक

आणि उपदेशपर रचना आहेत. त्याचबरोर लोकजीवनातील खेळ, लोकसंस्कृती जपणाऱ्या भूमिकांचाही आढावा घेतला आहे. त्यात घोंगडी, खेळ, टिपरी, जोहार, हमामा, विटी दांडू असे खेळांविषयीही रचना दिल्या आहेत. कीर्तनकारांच्या मुलाखतीमधूनही तुकोबारायांच्या अभंगरंचनातून लोकजीवन कसे आले आहे, हे समजते. कीर्तनकारांनी दिलेले दाखले आणि विवेचन यावरून अभंग रचनांमध्ये लोकजीवन आहे, हे सिद्ध होते.

* * *

प्रकरण पाचवे :

उपसंहार – संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारसी

५.१ : प्रास्ताविक

५.२ : निष्कर्ष (उपप्रकरणानुसार)

५.३ : पुढील संशोधनाची दिशा

५.४ : निष्कर्ष

प्रकरण पाचवे

उपसंहार : संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारसी

५.१ प्रास्ताविक :

'संदर्भ आणि चिंतन – एक अभ्यास', हा विषय विद्यावाचस्पती पदवी संशोधनासाठी निवडला आहे. हाती आलेले अभंगांर्तगत निष्कर्ष, काही वैचारिक व अध्यात्मिक विवेचन, नवे मुद्दे या प्रकरणात एकत्रित मांडलेले आहेत.

तेराव्या शतकापासून तर सतराव्या शतकापर्यंतचा कालखंड म्हणजे वारकरी भागवतधर्मीय संतांचा, अध्यात्मिक, अनुभव संपन्न प्रगत कर्तृत्त्वाचा कालखंड होता. संत ज्ञानेश्वर–नामदेव–एकनाथ–तुकाराम–रामदास अशा अनेक अद्वितीय संताची परंपरा याच कालखंडात महाराष्ट्राच्या इतिहासात कोरली गेली. सर्वधर्मसमभाव समाजात खऱ्या अर्थाने रूढ करून प्रपंच व परमार्थाची सांगड घालणारे ते महाराष्ट्राचे सुवर्णपर्व होय. संत तुकाराममहाराजांचे अतुलनीय असे कार्य याच कालखंडातील आहे. विषयाच्या अनुषंगाने गाथेचा सर्व अर्थाने परामर्श करण्याचा अल्पसा प्रयत्न सदर संशोधनात करण्यात आला आहे. वारकरी संप्रदायामध्ये असणारे संतकवी वाङमयी आणि सामाजिक कर्तृत्त्वाने श्रेष्ठ ठरलेले आहेत.

'संतकृपा झाली । इमारत फळा आली ।

या अभंगातील उक्तीप्रमाणे वारकरी संप्रदायाचे व भागवत धर्माच्या मंदिराच्या कळसाचे स्थान जगद्गुरू संतश्रेष्ठ संत तुकाराममहाराजांना प्राप्त झालेले आहे. वारकरी संप्रदायात

'ज्ञानाचा एका '–'नामाचा तुका'

हे घोषवाक्य प्रसिद्ध आहेत. संत एकनाथ महाराज यांच्यानंतर सतराव्या शतकाच्या पहिल्या पर्वात तुकोबारायांनी समाजात धार्मिक, अध्यात्मिक सामाजिक क्रांती केली. गीता धर्म उलगडून दाखवला, निष्काम कर्मापासून निष्काम भक्तीच्या मार्गावर समाजमानस घेऊन जाण्याचा

आटोकाट प्रयत्न केला. एकूणच संतांची चळवळ ही महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासाला नवीन मार्गक्रमण करणारी ठरली. तशीच ती लोकजीवनाला आदर्शवादाची शिकवण देणारी ठरली आहे.

संशोधनाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा लोकजीवनावर असलेला प्रभाव मांडला आहे. मानवतावादी व आदर्शवादी ह्या धाग्यांनी गुंफलेली वीण लोकजीवनातील अभंग रचनेमुळे कशी संपन्न, दृढ झाली आहे, हे निर्दशनास आणावयाचे आहे. संत तुकारामांच्या अनुभवसंपन्न भावविश्वात सामान्य जनसमुदयास जो प्रेरक बोध त्यांच्या गाथेतील अभंगाद्वारे मांडला आहे, त्याचाही प्रस्तुत संशोधनात आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी साहित्य संशोधन पद्धती, लोकसाहित्य संशोधनपद्धती, भाषा संशोधनपद्धती व समाजशास्त्रीय दृष्टीकोन याचा आधार घेण्यात आला आहे. संशोधनाची भूमिका स्पष्ट करून, प्रस्तावना, विषय त्यांची आवश्यकता समस्यांची मांडणी करून थोडक्यात महाराष्ट्रातील संत परंपरेचाही आढावा घेण्यात आला आहे.

संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगांची निर्मिती ही 'प्रपंचातून परमार्थाकडे' अशी असल्यामुळे त्यांच्या चरित्राचा परामर्श करणे गरजेचे आहे. तेव्हा त्यांच्या जीवनपटाचा आढावा प्रकरण पहिल्यात सविस्तर करण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणात महाराष्ट्रातील संत परंपरेचा आढावा घेत श्रीक्षेत्र देहू संत तुकाराममहाराजांचे जन्म गाव. तुकाराममहाराजांचे चरित्र, जन्म व बालपण, तुकारामांचे प्रापंचिक जीवनाचे वर्णन, एकांतवास, गुरू उपदेश, तुकारामांचे कवित्त्व, परमार्थ साधना, तुकारामांचा छळ, अनगडशहा, बहिणाबाई यांची भेट, निर्वाण वैकुंठगमन यांचा संशोधनाच्या विषयाला गृहित धरून परामर्श करण्यात आला. तुकारामांची गाथा निर्मिती हीच प्रपंचातील विरक्तीतून–परमार्थाकडे अशी आहे. त्यामुळे गाथेतील एक न एक अभंग आयुष्याचा सार सांगून अध्यात्मिक जीवनाची उंची

वाढविण्यासाठी प्रेरक ठरतो. त्यामुळे ठराविक एका पठडीत त्यांचे मोजमाप करता येत नाही. विविध पैलूने प्रत्येक अभंग नटलेला आहे.

प्रकरण पहिले यात संशोधन पद्धतीच्या मांडणीचा सविस्तर विचार केला आहे. संशोधन विषयाचे प्रास्ताविक संशोधन विषय नियमांच्या आधारावर मांडण्यात आले आहे. नियमावलीच्या आधारे संशोधनाची आवश्यकता व समस्या, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाचे उद्दिष्टे व गृहितके विशद केले आहेत.

प्रकरण दुसरेमध्ये संशोधन समस्या तसेच संशोधन विषयाच्या संदर्भातील पुस्तके, संदर्भ ग्रंथ, समिक्षकांची मते निश्चित केली. संशोधन समस्येच्या स्वरुपानुसार पुस्तके, विश्वकोष, ग्रंथ, लेखकांचे साहित्य याचाही आढावा घेऊन वाचन प्रक्रियेतून संशोधनास पूरक माहिती संकलीत केली. व पूर्वाभ्यास नोंदवून संत तुकाराममहाराज व संत तुकारामांची गाथा तसेच इतर सम कालीन संतांविषयी झालेल्या अभ्यासाच्या नोंदी केल्या. 'जयकर ग्रंथालय', 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय', 'रवींद्रनाथ ठाकूर सार्वजनिक ग्रंथालय', निगडी व इतर ग्रंथालयाचा आधार घेत संत तुकारामांच्या अभंग गाथेचा अभ्यास पूर्ण करून विषय निवडीपासून ते त्यातील प्रदीर्घ संशोधनाचा विचार केला. संतश्रेष्ठ तुकाराममहाराज यांच्या वाङ्मय समालोचन – गोडबोले राधा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, संत तुकाराम भक्ती आणि मुक्ती अभंगातील शैली विशेष – डॉ. रमेश धोंगडे, तुकारामांचे प्रपंच विज्ञान आणि समाज चिंतन – डॉ. प्र. चि. शेजवलकर, वारकरी संप्रदाय आणि संत तुकाराम – प्रा. एम. पी. (पाटील) मुंबई, तुकारामांची प्रतिमासृष्टी व त्यांच्या काव्यात्मक शक्तीचे मूल्यमापन – नागपूर विद्यापीठ आदिंसारख्या साहित्याचा आढावा घेऊन, चिंतन करून अभ्यासाची तयारी केली..

प्रकरण तिसरे यात संशोधनाच्या नवीन नियमांनुसार व आदर्श प्रणालीनुसार संशोधन नमुनानिश्चिती केली. भूतकाळ व वर्तमानकाळ या दोहांचे आकलन करीत संशोधनपद्धतीचा उपयोग केला. संशोधनातील सामान्य तत्त्वांचा शोध घेतल्यास त्याद्वारे भविष्यातल्या घटनांविषयी

अंदाज बांधणे सहज शक्य होते. संशोधन करताना वस्तुनिष्ठ पद्धतीने काम करणे गरजेचे असते. प्रस्तुत संशोधनासाठी अभंगातील लोकजीवन मांडत असताना संत तुकाराममहाराजांचे अभंग लोकजीवनाशी किती एकरूप झाले आहेत. हे पटवून देण्यासाठी श्री संत तुकाराममहाराजांच्या गाथेंचे चिंतन, तुकाराममहाराजांचे चरित्र, त्यांचा कालखंड गाथेच्या माध्यमातून अभंगातून आलेला, उमटलेला लोकजीवनाचा शोध घेतला. प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करताना एकाच पद्धतीचा वापर न करता एकापेक्षा अनेक तथ्यांचे संकलन या पद्धतीचा वापर केला आहे. त्यात गाथेतील अभंग, प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण याचा समावेश होतो. त्यामध्ये निरीक्षण साहित्यवाचन मनन चिंतन, संशोधनातील जाणत्या व्यक्तींशी विचारविनिमय यांसारख्या गोष्टीतूनही तथ्यांचे संकलन केले. त्यात प्रश्नावली, सर्वेक्षण, सामाजिक सर्वेक्षण, आशय विश्लेषण आदि गोष्टींचा समावेश केला.

संशोधनाच्या सांगितल्या गेल्या नवीन नियमांचा आधार घेत संशोधनाचा महत्त्वाचा विषय प्रकरण चार मध्ये 'प्रतिपाध्य विषय' या आधारावर विस्तृत पद्धतीने मांडला आहे. संशोधनाचा मूळ आशय व गाभा नवीन नियमांनुसार प्रतिपाध्य विषय या प्रकरणात सविस्तर मांडला.

प्रकरण पाचवे हे 'संत तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन : एक अभ्यास' या प्रस्तुत संशोधनाचा थोडक्यात सारांश घेण्यात आला आहे. पुढील संशोधनाची दिशा, उपप्रकरणानुसार निष्कर्ष, मुलाखती, व छायाचित्र याचा समावेश यात करण्यात आला आहे.

उपप्रकरणानुसार निष्कर्ष – अभंगाची निर्मिती आणि वाटचाल यांचा विचार करण्यासाठी संत ज्ञानेश्वर महाराज ते एकनाथ महाराज हा कालखंड व अभंगाचे स्वरूप आणि भूमिका मांडताना गृहस्थाश्रमाबरोबरच लौकिक अध्यात्मिक जीवनालाही किती महत्त्व आहे. तसेच अध्यात्मिक अनुभूती लोकजीवनात कशा पद्धतीने प्रकट झाली आहे व त्याची पार्श्वभूमी स्पष्ट केली आहे. त्यासाठी समकालीन संतांचाही विचार केला आहे.

चौथ्या प्रकरणात तुकाराममहाराजांच्या गाथेचा 'आत्मा' हे अभंग आहेत. तेराव्या शतकातील उत्कर्षाला पोहोचलेली संत परंपरा, प्रास्ताविकेत जाणून घेऊन तुकारामांच्या अभंगाची संख्या प्रस्थापित अभ्यासासाठी वापरलेल्या गाथेचा विचार, त्यातील अभंग यांचा आढावा, तसेच प्रस्तूत प्रबंधासाठी विशेष तत्त्वावर जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच्या अभंगाचा गाथा श्री संत तुकाराममहाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू व या शासकीय आणि प्रमाणित गाथेचे सहाय्य घेण्यात आले. त्यामुळे त्यातील विस्तृत विषयावर अभंग संख्यांचा विचार केला आहे. तसेच अभंगांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या–त्या वर्गीकरणात समाविष्ट झालेल्या लोकजीवनाचा संदर्भसहित आढावा घेण्यात आला आहे. गाथा ही स्वानुभवानिष्ठ आहे. त्यामुळे हा निकष डोळ्यासमोर ठेवण्यात आला. स्वानुभवपर अभंग, आत्मपर अभंग, करुणापर अभंग, उपदेशपर अभंग, निर्वाणपर अभंग, विरहीणीपर अभंग, अद्वैतपर अभंग, बालक्रीडापर अभंग, रूपकात्मक अभंग, विठ्ठल भक्तीपर अभंग यांचा लोकजीवनाच्या दृष्टीकोनातून आढावा घेण्यात आला.

चौथ्या प्रकरणात संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन या विषयाची पूर्वपीठिका अभ्यासताना प्रपंच व अध्यात्माची सांगड घालणाऱ्या संत तुकोबांचे लोकजीवनातील कार्य अतुलनीय आहे. लोकजीवनातील कार्याची सामाजिक, धार्मिक, राजकीय, अध्यात्मिक व तात्त्विक या आचारावर मांडणी केली आहे. लोकजीवनाची ओढ व प्रेरणा, पारमार्थिक जागृती, संत तुकारामांचे अध्यात्मिक सार, लौकिक जीवनाचा सार, अध्यात्मिक समतेची प्रेरणा, सामाजिक लोकजीवनातील विषमता, नैतिकतेचा पुरस्कार, लोकजीवनाचा आत्मिक विकास सामाजिक अंधश्रद्धा, लोकजीवन संत ज्ञानेश्वर, एकनाथ ते बहिणाबाई, ऐतिहासिक आढावा, तुकोबांची राष्ट्रजागृती, तुकारामांच्या अभंगांतील, सांस्कृतिक जीवन, तुकारामांचे तत्त्वचिंतन व संकल्पना तुकोबांचे धार्मिक व प्रापंचिक तत्त्वज्ञान, तुकोबांचे व्यावहारिक ज्ञान व सामाजिक बांधिलकी अभंगाच्या साह्याने समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१. लोकविश्वास व लोकसमजुत :– विविध समजुती, शकुन–अपशकुन इ. संदर्भातील समज.

२. लोकसंस्कार :– जन्म, मृत्यू, उपनयन, विवाह, इ. संस्कार मानवी जीवनात १६ संस्कार मानले जातात.

३. लोकजीवन सण–उत्सव :– व्रत, अनुष्ठान ऋतु व परंपरेनुसार नाती–गोती

४. पाप पुण्य – नाती–गोती याच्याशी संबंधित विविध कृत्ये

५. लोकव्यवसाय :– शेती, पशुपालन, १२ बलुतेदारी, कृषी संस्कृतीशी संबंधित सारखे सजीव–निर्जीव घटक.

६. लोकजीवनातील सामान्य घटक :– वस्त्रालंकार, वेशभूषा, आचार, विचार

७. लोकभाषा :– म्हणी, सुभाषिते, उखाणे इ. देवधर्म, पुजा, अर्चा

८. कला–क्रीडा :– लोकगीत, लोक कथा, लोककला, नृत्यकला, चित्रकला, गायन, वादन इ. विविध खेळ.

९. विविध लोक जीवनातील मनोरंजन :– गोंधळी, वासुदेव, वाघ्या, मुरूळी इ.

तुकाराममहाराज समकालीन कुटुंब व्यवस्था व त्यात समाविष्ट असलेल्या नाती–गोती याचा आधार लोकजीवन स्पष्ट करण्यासाठी घेतला आहे. लौकिक जीवनातील अनुभवांचाही परामर्श तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगामधून व्यक्त केला आहे. मित्र–मैत्रिणी, गुरु–शिष्य इ. नाती लोकजीवनातील दाखले देऊन नाती स्पष्ट केली आहेत. गाथेतील लोकव्यवसाय व उद्योग, बारा बलुतेदारी ही एकमेकांस कशी पूरक होती, हे स्पष्ट केले आहे. तसेच जाती व्यवस्थेने दिलेली कर्महीही त्याद्वारे स्पष्ट करतात; तसेच कलावंत फिरस्ते यांचे चित्र लोकजीवनात रेखाटतात.

स्त्रीजीवन जात्यावरचे दळण, कांडण स्त्रींची घरातील असलेले नाती त्यांचा ती करीत असलेला सांभाळ यांचा ही समावेश प्रस्तूत प्रकरणात केला आहे. तसेच लोकभ्रम, लोकसमजुती काय आहेत, हे सांगून लोकश्रद्धाही मांडण्याचा प्रयत्न प्रकरणात केला आहे.

तुकाराममहाराजांच्या ग्रामीण व्यवस्थेशी असलेली भाव अवस्था, जाणून घेताना, विठ्ठला ते पाठीराख्या समाजात तसेच तुकोबांच्या काव्यात लोकजीवन कशा पद्धतीने प्रकट झाले आहे. तात्त्विक दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयास आहे. तसेच ह्या सर्व अभ्यासामुळे एक सहज दृष्टी त्याच्या अभंगातील भावशैली वैशिष्ट्ये अवतरणक्षमता म्हणी व वाक्प्रचार, कृषिसेवा यांचा विचार केला आहे. कारण लोकजीवनात आचार–विचार, राहणीमान, उद्योग व्यवसाय, दैनंदिन व्यवहार, रुढी परंपरा व लोकमानस या साऱ्यांवर दृष्टी टाकणे आवश्यक वाटले.

५.२ : निष्कर्ष (प्रकरणानुसार) :

वरील संशोधनाच्या माध्यमातून हाती आलेले निष्कर्ष व निरीक्षणे खालीलप्रमाणे नोंदविण्यात आलेली आहेत.

१. संत तुकाराममहाराजांच्या अभंगांतून व्यक्त झालेले लोकजीवन हे तत्त्कालीन समाजमनाचे चित्रण आहे. त्यातील संदर्भावरून त्यावेळचे समाजजीवन ऊभे राहते.

२. चारशे वर्षांपूर्वी तुकाराममहाराजांची दूरदृष्टी ही शतकानुशतके जीवनदृष्टीचे उज्ज्वल भविष्य साकारणारी आहे. समाजातील जातीभेद अजूनही गेला नाही. कर्मकांड आणि कर्मयोग यांच्यातील भेद स्पष्ट करून तुकोबांनी तत्त्कालीन काळात कर्मश्रेष्ठत्त्वाची शाश्वत मूल्ये देऊन कर्मप्रबोधन घडवले आहे. यातून जातीव्यवस्था निर्मूलनाचा व त्यांच्या सामाजिक समतेचा दृष्टीकोन स्पष्ट होतो.

३. १७व्या शतकातील संतकवी, जगद्गुरू तुकाराममहाराजांचे वाङ्मय आणि साहित्य २१व्या शतकाच्या युगातही तितकेच महत्त्वपूर्ण व अबाधित आहे. याचे मुख्य कारण

म्हणजे आजही उपयुक्त असलेली त्यांच्या अभंगांमधील समर्पकता व अभंगामधून प्रकट होणारे तुकारामांचे आधुनिक विचार. आज २१व्या शतकातही समाजात असलेली अशांतता, नैराश्य व सुख–समाधानासाठीच्या संघर्षामध्ये तुकारामांचे शब्द व त्यांची शिकवण अत्यंत समर्पक, अचूक व आशादायी आहे.

४. अन्न, वस्त्र व निवारा या गरजांपलीकडे आत्म शांतीसाठी, विश्वशांतीसाठी सर्वच संतांनी उपदेश केला आहे व अध्यात्माची वाट दाखविली आहे, तुकाराममहाराज याांनीदेखील या भक्तिमार्गाचा व नामस्मरणाचा संदेश देतात; परंतु त्यासोबतच अत्यंत आधुनिक व पुरोगामी विचारही त्यांच्या अभंगांमधून प्रतिबिंबित होतात ज्या अभंगांमधून वर्तमान व भविष्यातही तुकारामांच्या विचारांची समर्पकता व उपयुक्तता अबाधित राहील व त्यांचा अभ्यास हा आजच्या युगातही मोलाचा व दिशादायी ठरेल.

५. संत तुकारामांच्या गाथेतून मानवधर्माचा, समतेचा, वैश्विक प्रेमाच्या, शांततेचा व क्षमाशीलतेचा उपदेश आपल्याला मिळतो. अभ्यासकांच्या मते 'जे का रंजले, गांजले' या तुकारामांच्या अभंगातील शिकवणीचा प्रसार करण्यासाठी महात्मा गांधींनी त्याचे भाषांतर करून लिहिले आहे. की, Know him to be tru man, who takes to his bosom those who are in distress. Know that god resides in the heart of such a one.' जात–पात विषमता न मानता प्रेमाचा संदेश तुकारामांच्या अनेक अभंगांमधून मिळतोच; परंतु बहिणाबाईंसारखी ब्राह्मण शिष्या व अनगडशहा बाबांसारखे मुस्लिम शिष्य यांसारख्या काही उदाहणांद्वारे ते केवळ अभंगांतून नव्हे; तर त्यांच्या चरित्रातूनही धर्मनिरपेक्षता व समतेचा आदर्श ठेवतात.

'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।
कुणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पुजनाचे ।।'

ही तुकाराममहाराजांची शिकवण मानवधर्म अधोरेखित करते व आजच्या काळातही तिची समर्पकता चालू घडामोडींवरही चपखल बसते व समाजाला शांततेची व प्रेमाची वाट दाखवते.

६. व्यवहारिकदृष्ट्यादेखील तुकारामांचे विचार आजही मोलाचे ठरतात. तुकाराममहाराजंचे व्यवहार कौशल्य व त्यांच्या अभंगातून आलेला उल्लेख यातून अर्थशास्त्राचे अनेक मूलभूत सिद्धांत आपल्यास आढळून येतील. चारशे वर्षापूर्वी तुकाराममहाराजांनी आर्थिक मूल्ये, शेतीची अर्थव्यवस्था समाजातील एकमेकांना पूरक असलेले व्यवसाय व त्यांची आर्थिक तत्त्वे याबद्दल अनेक अभंगांतून लिहिले आहे.

७. तुकाराममहाराजांचा पर्यावरणविचार, भौगोलिक अभ्यास, सिंचनाची शेतीची, प्रदूषणविरहीत पर्यावरणाची काळजीबद्दलचा उल्लेख अनेक अभंगांमधून दिसून येतो. माही, सराई, अंत्राळ, सांडोवा, लहरी, मंगळ इ. अनेक शब्द तुकारामांच्या साहित्यात आढळतात, त्यातून त्यांचा पर्यावरणविचार व वैज्ञानिक दृष्टिकोन दिसून येतो.

८. संत तुकारामांच्या अभंगातील लोकजीवनाचा अभ्यास करताना त्यांचे शेकडो पैलू डोळ्यांसमोर येतात जे आजच्या काळास अनेकविध पद्धतीने मार्गदर्शक आहेत व संवेदनाशून्य समाजाला अध्यात्मिक वाटेवरून शांततेकडे नेण्यासाठी अभंग गाथा हा सुंदर मार्ग आहे. शतकांपूर्वी तुकाराममहाराजांनी भ्रष्टाचार, असहिष्णुता, हिंसाचार, अराजकता व अविवेकीपणाबद्दल खंत मांडली आहे; परंतु त्याबरोबरच सहिष्णूतेचा, शांतीचा व विवेकवादाचा सहज सोपा प्रचार केला आहे. भविष्यात व वर्तमानातही समाजाला बंधुभाव व भक्तिभावाचे आचरण करण्याचा मार्ग तुकारामांनी सांगितला आहे.

'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ'

इतक्या सोप्या शब्दांत तुकाराममहाराजांनी विश्व शांतीचा सोपा मंत्र दिला आहे. म्हणूनच काळानुरूप ह्या अभ्यासाची, संशोधनाची व तुकारामांच्या विचारांच्या प्रचाराची गरज आजही मोलाची आहे.

९. तुकोबांच्या अभंगात विज्ञानमय दृष्टी ओतप्रोत आहे. परंपरा, रुढी व चमत्कारांच्या आहारी जाऊन खऱ्या देवत्त्वाला समाज मुकतो. 'देव' या संकल्पनेचे विश्लेषण आणि व्यापकत्त्व तुकोबांनी ४०० वर्षांपूर्वी केले. समाज हा श्रद्धा सोडून अंधश्रद्धेच्या आहारी जातो व अमानवी कृत्य करतो, म्हणून तुकोबाराय 'निसर्ग' हीच देवता, देव मानावा असे सांगतात व त्यांच्या चराचरातील अस्तित्वाची जाणीव करून देतात. त्यांची विवेकवादी शुद्ध जीवनाची दृष्टी ही पर्यावरण, मानवी जीवन, श्रद्धा आणि विज्ञान यांच्याशी जोडलेली आहे.

१०. जनमानसाला तुकोबा काव्य उत्कटतेची जाणीव करून देतात. आयुष्यात ध्येय गाठावयाचे असेल तर त्यासाठी उत्कट ध्येयनिष्ठा तुमच्या ठायी असली पाहिजे. शिवाय सत्य, असत्याची जाण हवी. सत्यज्ञानाचे आग्रही असल्याशिवाय ध्येयपूर्तता होऊ शकत नाही. म्हणूनच तुकाराममहाराज हे अभंगातून सत्य–असत्याचा परिचय करून देतात आणि समाजिक स्तरावर व सामूहिक जीवनात सत्याचा आग्रह धरतात.

११. दारिद्र्याचे मूळ कारण अज्ञान आहे व अज्ञानातून जनसमुदाय अंधश्रद्धेकडे जाऊ शकतो. २१व्या शतकात वाटचाल करणारा आपला देश, संतांच्या व थोर पुरोगामी विचारवंतांच्या उदा. शाहू, फुले, लोकमान्य टिळक संत गाडगेबाबा, आगरकर, लोकहितवादी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, पुरोगामित्त्वाला समजू शकला नाही. संत गाडेगाबाबा कीर्तनाद्वारे तुकोबांचे साक्षरतेचा, अंधश्रद्धा निर्मुलनाचा संदेश दिला. मात्र

समाजाने या पुरोगामित्त्वाचा आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार केलेला आढळत नाही. 'राष्ट्रीयत्त्वाला' महत्त्वाचे स्थान देण्यास 'पाईकाचे अभंग' शिकवितात. तर जागृतीच्या अभंगांतून अंधश्रद्धेवर जोरदार हल्ला करीत डोळस दृष्टी देतात.

१२. कर्मनिष्ठतेला तुकारामांनी प्राधान्य दिले आहे. लोकजीवनातील बाराबलुतेदारी त्यातून व्यक्त होते. कर्म हे आयुष्याचे सार आहे. पण ते लोकोपयोगी समाजोपयोगी असावे. 'शेती–पर्यावरण' याबद्दलचा तुकाराममहाराजांचा अनुभव स्वतः कुणबी–शेतकरी असल्यामुळे दांडगा होता. त्यामुळे कृषीसंस्कृती, संवर्धन त्यांतील बारकाव्यांचे निरीक्षण त्यांच्या अभंगांतून व्यक्त होते.

कृषीसंस्कृतीचा आणि पर्यावरण संतुलनाचा विचार आज समाजमनावर परिणाम करून जातो. शेतीचा मार्ग विस्तारित कसा होईल व त्यासाठीच्या उपाययोजना अभंगात शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणी आढळते. त्यासाठी वृक्षांचे संवर्धन, सिंचनाचे महत्त्व ते अभंगात सांगतात.

१३. ग्रामीण जीवन व त्याला असलेले पूरक व्यवसाय आदींचे विवेचन तुकोबांनी केले आहे. ते सांगता–सांगता ग्रामीण व्यवस्थेवर भर देऊन तत्कालीन जीवन पद्धती. नाती–गोती समाजाची घडण मार्मिक स्पष्ट परखड, मनोरंजनात्मक पद्धतीने मांडणी दिसते.

१४. तुकोबांनी लोकजीवन–लोकसंस्कृती, कृषी संस्कृतीतील प्रतिमांचे साहाय्य घेऊन सामान्य जनतेला उपदेशाचे आकलन असे तत्त्वज्ञान सांगितले.

१५. नवस, मंत्र, जंत्र, शकुन–अपशकुन या विषयीचे लोकभ्रम, लोकरुढी हे तत्कालीन परिस्थितीत आढळतात. त्यावरही प्रहार करीत ते लोकजीवनाला शुद्ध विचारांचे आणि आचारांचे प्रबोधन घडवितात.

१६. स्त्री जीवनाची विस्तृत मांडणी, तिच्या दैनंदिन जीवन कार्यातून परमेश्वराच्या समीप जाण्याचा मार्ग (म्हणजेच कर्मातून ईश्वरप्राप्ती), अध्यात्माची उच्च सांगड घालताना दिसतो. गावगाड्यातील स्त्री जीवनाचे चित्र विविध रुपकांच्या माध्यमांतून मांडून तिच्या कष्टमय व सहनशील वृत्तीची जाणीव करून देतात.

१७. तुकाराममहाराजांचे अभंग व त्यातून व्यक्त झालेले विचार हे भक्ती, ज्ञान, वैराग्य, ब्रह्म, अध्यात्म, देव, सगुण–निर्गुण या अध्यत्मिक तत्त्वाची मांडणी करतात आणि एका अर्थाने पारमार्थिक किंवा निवृत्तीवादी चिंतन घडवितात. ही अभंग प्रयोजनाची एक बाजू झाली; पण तुकोबारायांचे अभंग हे केवळ निवृत्तीवादी नाहीत, ते प्रवृत्तीवादी आहेत. लोकजीवनाचे प्रतिबिंब त्यात उमटत आहे. म्हणून गावगाडा, कृषि, मोटनाडा, पर्यावरण, वृक्षवल्ली, खेळ, सण–उत्सव, गावगाड्यातील लोकभूमिका, स्त्री–जीवन, कुटुंबव्यवस्था, नाती–गोती, ग्रामीण जीवनातील गोंधळ, जनजागरणासारखे लोकाचार यांचे संदर्भ देत ते एकीकडे त्यातून लोकजीवनाचे संदर्भ मांडतात, तर दुसरीकडे ह्या रुपकांच्या माध्यमांतून सामाजिक प्रबोधन घडवितात. या भूमिकेतून तुकोबारायांच्या अभंगातून प्रवृत्तीदर्शन ऊभे राहाते. हे प्रवृत्तीदर्शन सर्वांनाच खूप आपले व जवळचे वाटते. लोकजीवनातील दाखले देऊन आणि त्यांची रुपके वापरून ऊभे केले प्रवृत्तीदर्शन हे लोकजीवनाला खूपच भावते. भावदर्शन, तत्त्वदर्शन आणि समाजदर्शन यातून ऊभे राहिलेले हे प्रवृत्तीदर्शन! लोकजीवनाचे हे प्रवृत्तीदर्शनही सामाजिक प्रबोधनाची शुद्ध दृष्टी देऊन जाते आणि व्यापक व्यवहारनीती यातून ऊभी राहते. हे तुकोबारायांच्या अभंगवाणीचे एक महत्त्वाचे प्रयोजन ठरते.

१८. लोकजीवनातील खेळ, रुढी, परंपरा, जाती–जमाती, उद्योग–व्यवसाय श्रद्धा अंधश्रद्धा, दळणं, कांडण, नाती–गोती लोकभ्रम, लोकसमजुती दाखवून त्यांना नवीन दिशा दाखविणारे व तत्त्वचिंतन मांडणाऱ्या अभंगाचे सहाय्य घेण्यात आले. ते

सर्वांगीण विकसित आहेत. मांडण्याचा अल्पसा प्रयत्न संशोधनाच्या माध्यमातून केला.

५.३ : पुढील संशोधनाची दिशा :

१. तुकोबांचा 'प्रयत्नवादाचा पुरस्कार' विविध औद्योगिक शैक्षणिक, विज्ञान संशोधकांना यशाचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करतो. त्या दृष्टीकोनातून गाव आणि राष्ट्र बलवान करावयाचे असेल तर प्रथम समाज विकसित झाला पाहिजे. समाजाच्या नवरचनेसाठी अशा मुल्याद्दिष्टित विचारप्रणालीची आवश्यकता आहे. तरच सामाजिक भूमिकेतून क्रांती घडू शकेल. वैचारिक क्रांतीची आवश्यकता आहे.

२. विज्ञानाच्या जोरावर नवनवीन तंत्रज्ञानामुळे २१व्या शतकात वाटचाल करणाऱ्या तरुण पिढीने मनातील दैववाद नष्ट करणे काळाची गरज आहे. वसुधैव कुटुंबकम् ह्या विचारांची गरज आहे व त्यास 'गाथा' तारक ठरेल.

३. तुकोबांची अभंगवाणी ही फक्त वैराग्याचा आणि भक्तीचा विचार करणारी नव्हती; तर राष्ट्रीय अस्मिता जोपासणारी होती ह्यावर दृष्टीक्षेप टाकावा. ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता अबाधित राहू शकेल. त्यासाठी 'पाईकाचे' अभंग सहाय्यभूत ठरतील.

४. संत तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवन संदर्भ आणि चिंतन एक अभ्यास. या प्रबंधात रुढी परंपरेच्या चाकोरीतून बाहेर पडणाऱ्या समाजाला सहाय्यभूत ठरेल असे तुकाराममहाराजांनी मांडले.

५.४ : निष्कर्ष :

२१ व्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या सामान्य जनमानसाला तुकाराम महाराजांनी अभंगांच्या माध्यमातून पाचवा वेदच दर्शविला आहे. भाव आणि भक्तीद्वारे सदाचाराची शिकवन

प्रस्तुत प्रबंधाच्या माध्यमातून मांडली आहे. अभंगातील विचारसरणी ही धर्म, जात, पंथ, राष्ट्र यापलिकडे नेणारी आहे. संकुचीत वृत्तीचे खंडण होऊन मानवतेच्या वैश्वीक विचारांचा उलगडा अभंगांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयास आहे. जगाच्या दृष्टिकोणातून भौतिक प्रगतीचे शिखर कितीही जरी गाठले तरी मानवतेचे उदात्तीकरण ही आजच्या काळाची गरज आहे. म्हणून भविष्यात वारकरी संतांच्या बहुजन सुखाय अशा विचारांची गरज आहे. तुकारामांची अभंग गाथा सद्यस्थितीतील मानवास तारक ठरेल. देशाने वैज्ञानिक, औद्योगिक प्रगती करून सर्वप्रकारच्या भौतिक सुखांची सुविधांची उपलब्धता स्वतःसाठी केली असली तरी समाजात आराजकता, अतंकवाद याचे थैमान सुरू आहे. तरी अशा या काळात तुकोबांची अभंग गाथा मानवला प्रेरक ठरून शांतता प्रस्तावित करू शकते. तुकोबांनी मानवी जीवनाच्या विविध वृत्ती–प्रवृत्तीचे दर्शन आपल्या अभंगातून केले आहे. त्यामुळे समाजाला जागृत करण्याचा तसेच समाजातील अंधश्रद्धा–रुढी परंपरा याला छेद देऊन समाज जागरणाची भूमिका मांडण्याचा प्रयत्न ते करतात. त्यामुळे समाज प्रबोधनाचे कार्यही घडते. ते प्रस्तुत प्रबंधात मांडले आहे. सांस्कृतिक जीवनाच्या अग्रभागी राहून समाजाला प्रेरक अशी वैचारीक जीवनदृष्टी संशोधनाच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे. तुकारामांनी मांडलेला प्रभावी विचार आज जगात जाऊन पोहचला आहे. त्यावर प्रचंड विश्वासही ठेवला आहे. त्यामुळे तुकारामांचे विचार हे समाज परिवर्तनशिल असल्यामुळे ते आजही अधिक महत्त्वाचे वाटतात. त्यात वास्तवाची निवड व वैज्ञानिक दृष्टिकोनही दिसतो.

निसर्ग आणि पर्यावरणासंदर्भातील अतिशय मौलिक विचार गाथेच्या अंतर्गत आढळतो. निसर्गातील चैतन्याचा अनुभव त्यांनी अभंगाद्वारे मांडला. शेतमजूर हा घटकसुद्धा महत्त्वाचा मानून शेतमजुराचे जगणे, शेतावरील कामे त्याच्या अनुशंगाने येणारे वर्ग याचेही सविस्तर वर्णन गाथेच्या अभ्यासांतर्गत आढळते. प्रस्तुत संशोधनाच्या अंतर्गत असे लक्षात येते की, लोकजीवनाकडे दृष्टीक्षेप टाकणारे तुकोबारायांचे अभंग मानवी जीवनाला प्रेरक ठरतील व तरुण पिढीला उपकारक ठरतील. अभंग गाथेमधील सिंचनाचे महत्त्व सांगणारे 'पाणी आडवा, पाणी जिरवा' याचे महत्त्व सांगणारे अनेक अभंग आढळतात. त्यावर सखोल विचार केला असता. महाराष्ट्रातील व इतर

भागातील शेतकऱ्यांची आत्महत्या आजही थांबू शकते. 'सिंचन' हा कृषी संदर्भातील अतिशय महत्त्वाचा भाग साडेचारशे वर्षापूर्वी तुकोबांच्या अभंगगाथेत आढळतो. त्याचा शेतकऱ्यांना उपयोग होऊन आपले शिवार ओले व हिरवे करण्यास निश्चित मदत होईल त्याचे अगदी जवळच्या काळातील उदाहरण द्यायचे झाले तर 'किरण राव, अमीर खान' आणि सहकारी गावोगावी जाऊन करीत असलेले शेततळे याच्या माध्यमातून होणारा क्रांतीकारक बदल आपल्याला अभंग गाथेत आढळतो.

तुकोबारायांची अभंग गाथा तरुणपिढीला शेतकऱ्यांना नैराश्यातून बाहेर काढून कष्ट करण्यास मेहनत करण्यास प्रवृत्त करू शकते. कारण अभंग गाथेत निवृत्तीदर्शनापासून ते प्रवृत्तीदर्शनही आढळते जीवन व्यवहारात मानव आपापले कर्म निष्टेने केल्यास फळ प्राप्ती होते हे निश्चितच सापडते.

तुकारामांच्या काव्यातील सामाजिक स्थिती पाहिली तर बहुतेक दुरावस्था आणि मानसिक गुलामगिरी यात सामान्य जनता आगतिक झाली होती. महाराष्ट्रातील शेतकरी समाज जीवनाचा प्रमुख घटक आहे. तो दुष्काळाच्या खायीत लोटला होता आणि निसर्गाशी झगडता–झगडता खचला होता. तुकोबारायांनी या समाजातील घटकांना प्रतिकुलतेतूनही जीवन जगण्याची वाट दाखविली. स्वकष्टाने प्रतिकुलतेलाच अनुकूल बनविले. प्रतिकूल परिस्थितीतून हातपाय गळून चालणार नाही तर त्यावर मात करून जीवनाचे शिल्पकार बनले पाहिजे, असे तुकोबाराय सांगताना म्हणतात–

मनुष्य देह ऐसा । साधाल ते साधेल सिद्ध ।।

हे सांगून ते समाजात आत्मनिर्भरता करीत आहे. तुकोबारायांच्या विचारसरणीतुन ही आत्मनिर्भरता घडली तर समाज प्रतिकुलतेवर मात करेल व आत्महत्येपासून परावृत्त होईल यात शंका नाही.

आजचा समाज आत्मकेंद्री बनला आहे. तो मी आणि माझे असा मर्यादित बनला आहे. अशा वर्गाला समग्र समाजाचे लोकजीवन कळण्यासाठी प्रस्तुत संशोधनाचा उपयोग होईल.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।'

तुकोबारायांच्या अशा अनेक अभंगातून निसर्ग व पर्यावरणाविषयाची ही जागृती मानवाच्या हितासाठी उपयुक्त ठरते, हे स्पष्ट आढळते. त्याचे संवर्धन करून आत्मचिंतन केले असता आपणाला अनेक निसर्ग चक्राविषयीच्या समस्यांना सामोरे जाण्याची ताकद देते.

एकत्र कुटुंब व्यवस्था सांभाळताना नातीगोती, लोकव्यवहार, सण उत्सव यांच्या माध्यमाद्वारे समाजाचे मानसिक संगोपनाची सुधारना होऊन नैराश्याकडे वाटचाल करणाऱ्या वर्गाला प्रेरक अभंग गाथेत आढळतात. त्यामुळे सामाजिक संवर्धन घडून येईल, हे निश्चित समाजाच्या आनंदासाठी लोकजीवनात खेळ, सण, उत्सव आहेत. लोककला, लोकउत्सव, लोक कलावंतांशी संवाद आहे. आजचा तरुण वर्ग या सामुहिक आनंदापासून मुकला आहे. त्यामुळे या सामाजिक मूल्य देणाऱ्या लोक संस्कृतिपासूनही तो दूर जात आहे. तुकोबांच्या अभंगातील लोकजीवनाचा आढावा प्रस्तुत प्रबंधात मांडला आहे. त्यामुळे लोकसंस्कृतिचे संवर्धन होण्यास मदत होऊन हरवलेला 'लोकसंवाद' पुन्हा निर्माण होऊ शकतो.

खेळ व उत्सव या माध्यमातून लोकजीवन डोकावते. त्यामुळे समाजाची शारीरिक व मानसिक जडण–घडण योग्य पद्धतीने घडण्यास मदत होईल. आपला देश हा कृषीप्रधान देश असल्यामुळे कृषीसंदर्भातील संदर्भाचा उपयोग केला असता निसर्गाशी व पर्यावरणाशी जवळचे नाते निर्माण होऊन देश खऱ्या अर्थाने सुजलाम्–सुफलाम् होण्यास मदत होईल व शेतकरी आत्महत्या थांबवून कुटुंब संवर्धनास मदत होईल हे निश्चित.

'एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।।'

या तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांनाही 'अभंग गाथेचा' उपयोग होईल. 'पाईकांच्या' अभंगांच्या अभ्यासांतर्गत देशहीत व राष्ट्र जागृती कार्यास मदत मिळेल.

भूमी मातेला आपण बीज रुपात एक दान दिले तर ती आपल्याला फळ रुपात हजारो दाने देते. समर्पण हा धरणी मातेचा स्थायी स्वभाव आहे. तो सर्वाठायी यावा. ह्या संदर्भाचे ही अनेक अभंग गाथेत आढळतात.

''कणभर ला मणभर देतो'' हा निसर्गाचा नियम आहे. तेव्हा निसर्गाचे संवर्धन झाले तर महाराष्ट्रातील जनता अन्न, वस्त्र, निवारा ह्या प्राथमिक गरजांपासून दुरापास्थ होणार नाही हे निश्चितच असे संशोधनामार्फत मांडावेसे वाटते.

तुकोबाच्या अभंगात भक्ती, ज्ञान, वैराग्य, अध्यात्म, यांसारखे निवृत्तीवादी विषय आले आहेत. तसेच समाज, जातीय विषमता पर्यावरण, लोकाचार, कृषी लोकसंस्कार, गावगाडा, यांसारखे अनेक विषय तुकोबांनी मांडले आहेत. कधी दृष्टांत तर कधी सिद्धांत तर कधी रूपक म्हणून त्यांनी अध्यात्मिक चिंतनाबरोबर लोकजीवनाचेही वास्तववादी चित्रण उभे केले आहे. आणि लोकजीवनातील घटकांमधून सामाजिक प्रबोधन घडविले आहे. हे प्रवृत्तीवादी चिंतन आजच्या समाजाला आणि विशेषत्त्वाने तरुण वर्गाला खूप मोलाचे ठरेल.

ज्ञानजागृतीबरोबरच त्यांनी अभंगातून केलेली कर्मजागृती आणि त्यासाठी वापरलेली रुपके समाजाला जगण्यासाठी प्रभावी ठरतील.

संत तुकारामांच्या अभंग गाथेतील लोकजीवनाचा अभ्यास करताना अनेक अनाकलनीय प्रश्नांचे आकलन सहजरीत्या या संशोधनामार्फत निश्चितच सापडते.

थोडक्यात संशोधनाच्या नियमांचा विचार करून समन्वय साधण्याचा अल्पसा प्रयत्न केला गेला आहे. हा प्रयत्न भविष्यात तत्कालीन लोकजीवनाचे चित्र ऊभे करण्यास सहाय्यभूत ठरेल अशी आशा बाळगते.

* * *

सदर संशोधनामध्ये अनेक साधनांचा वापर करण्यात आला. तात्त्विक आणि सैद्धांतिक आधार मिळाला. असा आधार ठरलेले संदर्भग्रंथ, नियतकालिके, संशोधन प्रबंध, संकेतस्थळे यांचा संदर्भ सूचीत दिलेला आहे. संदर्भसूची लिहिण्यासाठी अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशनने (एपीए) स्टाईल मॅन्युअलचा आधार घेतला आहे.

संदर्भसूची :

गाथा –

१. खंदारकर शंकर महाराज, **श्री तुकाराममहाराज गाथा भाष्य, खंड १व २,** वै. शं. म.खं.विश्वस्त संस्थेचे प्रकाशन, उद्‌गीर, आवृत्ती तिसरी – १९९४.

२. खंदारकर शंकर महाराज, **श्री तुकाराममहाराज गाथा भाष्य, खंड १व २,** वै. शं. म.खं.विश्वस्त संस्थेचे प्रकाशन, औरंगाबाद – २०१५.

३. वै.जोग महाराज सांप्रदायिक, **सार्थ श्री तुकाराम महाराज गाथा देवडीकर पारायण,**धार्मिक प्रकाशन संस्था, पुणे २०१०.

४. नेऊरगावकर स. के.,**श्रीतुकाराम महाराजांची सार्थ गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,** पुणे, प्रथमावृत्ती १९७९.

५. राजपूत नथुसिंग डोंगरसिंग, **श्री सं.तु.म.सार्थ गाथा,** वारकरी शिक्षण संस्था प्रकाशन, पुणे १९१८.

६. लहवितकर रामकृष्णदास, **श्री ज.तु.म.यांची देहूकर सांप्रदायिक ओळीची सार्थ गाथा,** खंड –१, नाशिक – २०१७.

७. लाड पुरुषोत्तम मंगेश, (संपा.) **श्री तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा,** फोटोझिंको कॉपी पुणे, शासकीय प्रतीची पुनर्मुद्रित आवृत्ती १९९१.

८. संत तुकाराम संस्थान पुणे, **जग्दगुरू संत श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा गाथा,** श्रीश्रेत्र देहू, पुणे २०१३.

ग्रंथ –

१. अत्रे प्र. के.,**संत आणि साहित्य,** परचुरे प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती, १९६१.

२. अत्रे त्रिं. ना.,**गावगाडा,** वरदा बुक्स, पुणे, तृतियावृत्ती, १९९५.

३. इनामदार हे. वि.(संपादक),**संत नामदेव,** केसरी प्रकाशन, पुणे – १९७०

४. इनामदार हे. वी. (संपादक), **अनुभव तुकोबांचा,** स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४.

५. इंगोले कृष्णा, **तुका म्हणे,** साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००१.

६. इर्लेकर सुहासिनी, **ज्ञानियांचा राजा,** स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१२.

७. कदमस. भा. – **संत चोखामेळा चरित्र आणि अभंग,** शब्दालय प्रकाशन, मुंबई

८. कालेलकर ना. गो., **भाषा आणि संस्कृती,** मौज प्रकाशन, मुंबई, प्रथामावृत्ती – १९६५

९. कुलकर्णी गो. म.,**संत साहित्य : काही निरीक्षणे,** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४.

१०. कुलकर्णी वा. ल., **मराठी कविता जुनी आणि नवी,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८०.

११. कुंटे नरेंद्र, **नाथ भागवतातील भक्ती वर्णन,** सोलापूर, प्रथमावृत्ती, १९९८.

१२. केळुसकर कृष्णरावअर्जुन, **संत तुकाराम,** साकेत प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१५.

१३. कोत्तापल्ले नागनाथ, **तुकारामांचे आत्मवृत्त,** सायन पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१५.

१४. खंदारकर शंकर महाराज, **हरिपाठ भाष्य (अभंगत्रयी),** वै. शंकरमहाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन, उद्‌गीर,दुसरी आवृत्ती, २०००.

१५. खंदारकर शंकरमहाराज,शंकरमहाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन,**श्री तुकाराममहाराज गाथा भाष्य, खंड १**,औरंगाबाद ङ्ख २०१५.

१६. खंदारकर शंकरमहाराज –शंकरमहाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन,**श्री तुकाराममहाराज गाथा भाष्य, खंड २,** तिसरी आवृत्ती, १९९४.

१७. गवळी अनिल, **सर्वात्मभावी तुकाराम,** हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००२.

१८. गोखले शुभदा, **अभंग मंत्र गीता,** कल्याणी प्रकाशन, सांगली, २००८.

१९. गोसावी र. रा., **श्री तुकाराम महाराज चरित्र,** सारथी प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००४.

२०. गोसावी र. रा.,**पाच भक्तीसंप्रदाय,** मोघे, पुणे, प्रथमावृत्ती, १९७४.

२१. गोसावी र. रा., **पाच भक्तीसंप्रदाय,** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९८

२२. गोसावी र. रा., **तुकाराम चरित्र,** सारथी प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती – २००४.

२३. गोसावी र. रा.,**सकल संत गाथा (खंडपहिला),** सारथी प्रकाशन, पुणे – २०००

२४. चतुरकर शंकर– **धन्य तुकोबा समर्थ सदेह वैकुंठगमन,** श्री निवास मुद्रणालय, पुणे–३० जून १९९३

२५. चित्रे दि. पु., **पुन्हा तुकाराम,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९९५

२६. जगताप दत्तात्रय, **स्वयंभू तुकोबा राय,** संयम पब्लिकेशन, पुणे.

२७. जाधव नागनाथ, **वारकरी स्वाधाय,** वैष्णवी प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, १९९८.

२८. जाधव रा. ग., **आनंदाचा डोह,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९८६.

२९. जोशी प्र. न., **तुकारामांचे निवडक अभंग,** स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९५.

३०. जोशी प्र. न., **मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास,** प्राचिन खंड, नितीन प्रकाशन, पुणे, १९७२.

३१. जोशी यशवंत, **तुका म्हणे नाम...,** सिनिअर सिटिझन्स कल्चर बूक डेपो, ठाणे, प्रथमावृत्ती, १९३४.

३२. जोशी स. कृ.,**तुका झालासे कळस,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६०.

३३. ढेरे रा. चिं.,**संत साहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७८.

३४. ढेरे रा. चिं. (संपादक), **सकल संत गाथा,** गाथा पंचक.

३५. ढेरे रा. चिं.,**संत,लोक आणि अभिजन,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २०१३.

३६. तहाराबादकर महिपती,**श्री तुकाराम चरित्र,** धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई–२००४,

३७. डॉ. तुळपुळे शं.गो.,**पाच संतकवी,** व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६२.

३८. डॉ. तुळपुळे श. गो.,**पाच संतकवी,** व्हिनस प्रकाशन पुणे, तृतियावृत्ती, १९८४.

३९. दातार मुकुंद, **तुका म्हणे,** स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९.

४०. दास वृंदावन, **संत तुकाराम,** लक्षवेधी प्रकाशन, बेळगाव.

४१. दांडेकर गो. नी.,**तुका आकाशा एवढा,** मॅजिस्टीक, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८१.

४२. दांडेकर सोनोपंत, **अभंग संकीर्तन,** प्रसाद प्रकाशन, पुणे, सप्तमावृत्ती, २०१५.

४३. डॉ. देखणे रामचंद्र, **भारूडे आणि लोकशिक्षण,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६५.

४४. डॉ. देखणे रामचंद्र, **संत साहित्यातील पर्यावरण–विचार,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.

४५. डॉ. देखणे रामचंद्र, **गोंधळ : परंपरा, स्वरूप आणि आविष्कार,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे तृतियावृत्ती, २०१२.

४६. डॉ. देखणे रामचंद्र, **शारदीचिये चंद्रकळे,** उत्कर्ष प्रकाशन, पुणे, २०१७.

४७. डॉ. देखणे रामचंद्र, **वारी : स्वरूप आणि परंपरा,** पद्मगंधा प्रकाशन, तृतियावृत्ती, २०१२.०

४८. डॉ. देखणे रामचंद्र, **आषाढी,** उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१२.

४९. डॉ. देखणे रामचंद्र, **तुका झालासे कळस,** संस्कृती प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, २००९.

५०. डॉ. देखणे रामचंद्र, **तुका झालासे कळस,** संस्कृती प्रकाशन, पुणे, द्वितियावृत्ती,२०१६.

५१. देगलूरकर धुंडामहाराज, **कीर्तनामृतवचने भाग १ ते ५,** स्टेप इन सर्व्हिसेस, पुणे, द्वितीयावृत्ती.

५२. देशपांडे जयंत, **अभंग तुकोबाचे,** साकार प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००६.

५३. देशपांडे वामन, **निवडक तुकाराम,** उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९९७.

५४. धुरंधर बा. कृ.,**संत तुकाराम महाराज यांचे चरित्र,** बाबुलजी कृष्णानाथ धुरंधर आणि धुरंधर बंधू, मुंबई, १९२८.

५५. डॉ. धोंगडे दिलीप,**संत तुकारामांच्या अभंगाचा शैलीवैज्ञानिक अभ्यास,** शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

५६. नगरकर माधव, **दिव्यत्वाचा संस्पर्श,** स्वरूपयोग प्रतिष्ठान, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९.

५७. नसिराबादकर ल. रा.,**प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,** फडके प्रकाशन कोल्हापूर, १९९७

५८. नसिराबादकर ल. रा., **प्राचिन मराठी वाङ्मयाचा इतिहास,** फडके प्रकाशन, कोल्हापूर, दहावी अवृत्ती, २०१६.

५९. नेऊरगांवकर स. के.(संपादक), **श्री तुकाराममहाराजांची सार्थगाथा,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९.

६०. नेमाडे भालचंद्र**, तुकाराम,** साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९४.

६१. नेमाडे भालचंद्र, **तुकाराम गाथा (निवडक अभंग),** साथिया अकादमी, न्यू दिल्ली, २००४.

६२. नेमाडे भालचंद्र, **टिका स्वयंवर,** साकेत प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २००१.

६३. पठाण यु. म., **मध्यमयुगीन महाराष्ट्र : सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन,** मुंबई, प्रथमावृत्ती, २००२.

६४. पाठक यशवंत**, तुकारामांचे अभंग,** साहित्य सेवा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९५.

६५. पांगारकर ल. रा., **श्री संत तुकाराम गाथा,** पहिली आवृत्ती, पुणे, १९७१.

६६. पांगारकर ल. रा., **संत तुकाराम चरित्र,** वरदा प्रकाशन, पुणे, पहिली अवृत्ती, पुणे. सप्टें. १९२०.

६७. पाटील तानाजीराव, **समाज जीवनातील तुकाराम,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००८.

६८. पाटील मालती,**तुकारामांची प्रतिमानसृष्टी व त्यांच्या काव्यात्मशक्तीचे मूल्यमापन,** नागपूर विद्यापीठ,प्रथमावृत्ती १९७४

६९. पिंपळवाडकर जीवन, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,** अभय प्रकाशन, नांदेड, पहिली आवृत्ती, १९९६.

७०. पेंडसे श. दा., **साक्षात्कारी संत तुकाराम,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९८२.

७१. फडकुले निर्मलकुमार, **संत तुकारामांचा जीवन विचार,**सुविधा प्रकाशन, सोलापूर, २००२.

७२. बंगाळ विनायक, **बुडता हे जन,** लोकायत प्रकाशन, सातारा, द्वितीयावृत्ती, २००६.

७३. बुटे शांताराम, **तुकोबांची अभंगवाणी,** सुनंदा प्रकाशन, अकोला, प्रथमावृत्ती, २०१३.

७४. डॉ. बोबडे प्रकाश, **भारतीय समाज रचना पारंपारिक व अधुनिक,** श्री मंगेश प्रकाशन,, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९४

७५. **भजनी,भारूड गाथा,** सारथी प्रकाशन, पुणे, २०१५.

७६. मंगळवेढेकर राजा, **लोकात्मा तुकाराम,** ज्योत्सना प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९८८.

७७. मोडक शैलजा, **जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ,** शिवस्पर्श प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९.

७८. मोरे सदानंद, **तुकाराम दर्शन,** गाज प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती, १९९६.

७९. मोरे सदानंद, **तुकाराम दर्शन,** गाज प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती, १९९६.

८०. मोहिते शिवाजीराव, **वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य,** कर्मवीर प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००८.

८१. राजवाडे वि. का., **करंजखोप विजापूरकर यांच्या ग्रंथ मालेतील संकीर्ण लेखसंग्रह,** वरदा प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९१.

८२. रानडे रा.द., **श्री तुकारामांचे चरित्र (पूर्वार्ध),** गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, प्रथमावृत्ती, १९५८.

८३. रानडे रा.द., **मराठी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग भाग – २,** भारतीय विद्याभवन, मुंबई, १९९३.

८४. लहवितकर रामकृष्णदास,**संत तुकाराम चरित्र,** ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, पुणे, द्वितीय आवृत्ती – २०१०.

८५. लहवितकर रामकृष्णदास, **संत तुकोबारायांचा लोकसंवाद,** ब्रेनटॉनिक प्रकाशन, नाशिक, द्वितीयावृत्ती, २०१०.

८६. लाड पुरुषोत्तम, **श्री तुकारामांचे चरित्र,** गर्व्हन्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९५८.

८७. वाघ विठ्ठल, **वऱ्हाडी म्हणी व लोकधर्म,** लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९७.

८८. सरदार गं.बा.,**तुकाराम दर्शन (अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची),** मॉडर्न बूक डेपो, पुणे, द्वितीयावृत्ती, १९६८.

८९. सरदार गं.बा., **संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती,** लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९९८.

९०. सरश्री, संतांमध्ये संत तुकाराम महाराज, अभंग रहस्य आणि जीवन चरित्र, सकाळ पेपर्स, पुणे, प्रथमावृत्ती, २०१७.

९१. डॉ. सहस्त्रबुद्धे अनील,**लोकबंध,** दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे. प्रथम आवृती – १९९५.

९२. साखरे किसनमहाराज,**तुकोबारायांचे अद्वैत तत्त्वज्ञान,** साखरे प्रकाशन, आळंदी, प्रथमावृत्ती, १९८१.

९३. साखरे नानामहाराज – **श्री संत गाथा संग्रह,** पहिली अवृत्ती – वरदा प्रकाशन, पुणे, १ जाने. १९९०

९४. साखरे नानामहाराज, **श्री तुकाराम गाथा,** वरदा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९८३.

९५. साखरे नानामहाराज, **श्री संत गाथा,** वरदा बुक्स, पुणे, पुनर्मुद्रण, २००४.

९६. सानप किशोर, तायडे मनोज, **तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व,** लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९९५.

९७. साळुंखे आ. ह., **विद्रोही तुकाराम समीक्षेची समीक्षा,** सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९

९८. साळुंखे आ.ह., **विद्रोही तुकाराम,** सदाशिव बागाईतकर स्मृतीमाला, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९९.

९९. सुंठनकर बा. र., **महाराष्ट्र संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य,** लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००८.

१००. हर्ष रा. ग., **तुकाराम,** आनंद प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९३३.

शब्दकोश –

१. अग्निहोत्री द. ह., **अभिनव मराठी, मराठी शब्दकोश भाग ४ था,** व्हीनस प्रकाशन, पुणे, १९८३.

२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश (खंड ४), भारतीय संस्कृती कोश, पुणे, प्रथमावृत्ती, २००३.

३. तर्कतीर्थ लक्ष्मणशात्री : **मराठी विश्वकोश (खंड ३)**, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६.

नियतकालिके –

१. **आमची श्री संतवाणी,** धुळे, जाने. १९९५.

२. **नवभारत अंक,** पुणे, १९९४.

३. **प्रसाद,** पुणे, १९९५, ९७, ९८.

४. **समाजप्रबोधन पत्रिका,** पुणे, सप्टेंबर–ऑक्टोबर, १९८१.

५. **साप्ताहिक सकाळ,** पुणे, १९९३ ते ९४.

६. **श्री वाणी (ज्ञानेश्वरी विशेषांक)** संपादक, सदानंद मोरे, का. स. वाणी, मराठी, प्रगत अध्ययन संस्था, धुळे, १९९६.

इतर –

वारकरी संप्रदाय – विकीपिडीया

माहिती जाल (इंटरनेट) –

www.tukaram.com Dr. sadanand More

www.bookganga.com

www.maayboli.com

परिशिष्ट 'अ'

गाथेंची मुख्यपृष्ठ, अभंग, मंदिराची छायाचित्रे








वै. जोगमहाराज सांप्रदायिक
सार्थ श्रीतुकाराम गाथा
(अभंगक्रम: वै. ह.भ.प. देवडीकर पारायण पद्धतीप्रमाणे)
धार्मिक प्रकाशन संस्था


श्रीतुकाराम महाराजांची
सार्थ
गाथा
संपादक
ह.भ.प. स.के. नेऊरगांवकर
प्राचार्य दांडेकर धार्मिक व सांस्कृतिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे


श्रीसकलसंतगाथा
संपादक : प्रा.डॉ.र.रा.गोसावी



श्री संत तुकाराममहाराजांचे हस्तलिखित, श्रीक्षेत्र देहू

श्री संत तकाराम महाराज अभंग-गाथा ।। १७ ।।

९१. संसाराच्या तापें तापलों मी देवा। करितां या सेवा कुटुंबाची ।।१।। म्हणऊनि तुझे आठविले पाय। यें वो माझे माय पांडुरंगे ।।धृ.।। बहुतां जन्मींचा झालों भारवाही। सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ।।३।। वेढियलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं। कणव न करी कोणी माझी ।।४।। बहु पांगविलों बहु नागविलों। बहु दीस झालों कासाविस ।।५।। तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं। ब्रीद तुझें जगीं दीनानाथ ।।६।।

१४६७. वेदविहित तुम्ही आइका हो कर्मे। बोलतों तीं वर्मे संतांपुढें ।।१।। चारी वर्ण झाले एकाचिये अंगीं। पापपुण्य भागीं विभागिले ।।धृ.।। प्रथम पाउलीं पावविला पंथ। आदि मध्य अंत भेद नाहीं ।।३।। आंबे बोरी वड बाभुळा चंदन। गुणागुणीं भिन्न अग्नि एक।।४।। तुका म्हणे मन उन्मन जो होय। तोंवरी हें सोय विधि पाळीं ।।५।।

१२४. हरिहरां भेद। नाहीं करूं नये वाद ।।१।। एक एकाचे हृदयीं। गोडी साखरेच्या ठायीं ।।धृ.।। भेदकासी नाड। एक वेलांटीच आड ।।३।। उजवे वाम भाग। तुका म्हणे एकचि अंग ।।४।।

२१. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ॥१॥ आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा ॥२॥ कोणाही जीवाचा न घडावा मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचे ॥३॥ तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुखदुःख जीव भोग पावे ॥४॥

२२. आम्ही तरी आस। जालो टाकोनी उदास ॥१॥ आतां कोण भय धरी। पुढें मरणाचे हरी ॥२॥ भलते ठायी पडो। देह तुरंगी हा चढो ॥३॥ तुमचे तुम्हांपाशी। आम्ही आहो जैसी तैसी ॥४॥ गेलें मानामान। सुखदुःखाचे खंडन ॥५॥ तुका म्हणे चित्ति। नाही वागवीत खंती ॥६॥

२३. निंदी कोणी मारी। वंदी कोणी पूजा करी ॥१॥ मज हेही नाहीं तेही नाहीं। वेगळा दोहींपासुनी ॥२॥ देहभोग भोगें घडे। जेंजें जोडे तें तें बरें ॥३॥ अवघें पावे नारायणीं। जनार्दनीं तुकयाचें ॥४॥

२४. जन विजन झालें आम्हां। विठ्ठलनामा प्रमाण ॥१॥ पाहें तिकडे मायबाप। विठ्ठल आहे रखुमाई ॥२॥ वन पट्टण एकभाव। अवघा ठाव सरता जाला ॥३॥ ठाव नाहीं सुखदुःखा। नाचे तुका कौतुकें ॥४॥

२५. हिरा ठेवितां ऐरणी। वांचे मारितां जो घणीं ॥१॥ तोचि मोल यावे खरा। करणीचा होय चुरा ॥२॥ मोहरा तोचि अंगें। सूत न जळे ज्याचे संगे ॥३॥ तुका म्हणे तोचि संत। सोसी जगाचे अघात ॥४॥

१९५. असुरी स्वभाव निर्दय अंतर। मानसीं निष्ठुर अतिवादी ॥१॥ याति कुळ येथे असे अप्रमाण। गुणाचे कारण असे अंगी ॥२॥ काळे कुट पितळ सोने शुद्ध रंग। अंगाचेच अंग साक्षी देते ॥३॥ तुका म्हणे बरी जातीसवे भेटी। नवनीत पोटी साठविले ॥४॥

२०२. ऐसे ऐसियानें भेटती ते साधु। ज्यांच्या दर्शनें तुटे भवबंधू। जे कां सच्चिदानंदी नित्यानंदु। जे कां मोक्षसिद्धी तीर्थ वंदू रे ॥१॥ भाव सर्व कारण मूळ वंदु। सदा समबुद्धि नास्तिक्य भेदु। भूतकृपा मोडी द्वेषकंदु। शत्रू मित्र पुत्र समकरी बंधु रे ॥२॥ मन बुद्धि काया वाचा शुद्ध करी। रूप सर्वत्र देखोनि नमस्कारी। लघुत्व सर्व भावे अंगीकारी। सांडी मांडी मीतूं पण ऐसी थोरी रे ॥३॥ अर्थकामा चाड नाही चित्ता। मानामान मोह माया मिथ्या। वर्ते समाधानी जाणोनी नेणता। साधु भेट देती तया अवचिता रे ॥४॥ मनी दृढ धरी बिश्वास। नाही सांडीमांडीचा सायास। साधुदर्शन नित्यकाळ त्यास। तुका म्हणे जो विटला जाणिवेस रे ॥५॥

९९५. आळविती बाळे। माते तें सुख आगळें ।१। द्यावे आवडी भातुकें। पाहे निवे कवतुकें ।२। लेववूनि अळंकार। दृष्टी करावी सादर।३। आपुलीये पदी। बैसवूनि कोडें वंदी ।४। नेदीं लागों दिठी। उचलोनि लावी कंठी ।५। तुका म्हणे लाभा। वारी घ्या वो पद्मनाभा ॥६॥

६२१. मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदू ऐसे ।।१।। मेले जित असो निजोनियां जागे। जो जो जें जें मागें तें तें देऊं ।।२।। भले तरि देऊं गांडीची लंगोटी। नाठाळाचे काठी देऊं माथा ।।३।। मायबापाहूनि बहु मायावंत। करूं घातपात शत्रूहूनि ।।४।। अमृत तें काय गोड आम्हांपुढे। विष ते बापुडे कडू किती ।।५।। तुका म्हणे आम्ही अवघेंचि गोड। ज्याचे पुरे कोड त्याचेपरि ।।६।।

१६२२. या रे हरिदासानो जिंको कळिकाळा। आमुचिया बळापुढे किती बापुडे ।।१।। रंग सुरंग घमंडी नाना छंदे। हास्य विनोदे नामाची ।।२।। येणें तेणें प्रकारे बहुतां सुख जोडे। पूजन ते घडे नारायणा अंतरी ।।३।। वाकुडीया माना बोल बोलवे आरुष। येईल तो त्यास छंद पढीये गोविंदा ।।४।। आपुल्या आनंदे एकापुढे एक नटा। नाही थोर मोठा लहान ये प्रसंगी ।।५।। तुका म्हणे येथे प्रेम भंग नये कोणी। देव भक्त दोन्ही निवडिता पातक ।।६।।

१६२३. देव जाणता देव जाणता। आपुलिया सत्ता एकाएकी ।।१।। देव चतुर देव चतुर। जाणोनि अंतर वर्ततसे ।।२।। देव निराळा देव निराळा। अलिप्त विटाळा तुका म्हणे ।।३।।

१६२४. माझ्या मुखे मज बोलवितो हरि। सकळांच्या अंतरी नारायणा ।।१।। न करावा द्वेष भूतांचा मत्सर। हां तव विचार जाणो आम्ही ।।२।। तुका म्हणे दोष नाही या विचारे। हिताची उत्तरें शिकवितां ।।३।।

१६२५. मांस खातां हाऊस करी। जोडोनि वैरी ठेवियेला ।।१।। कोण त्याची करील कीव। जीवें जीव नेंणती ।।२।। पुढीलासाठी पाजळी सुरी। आपुली चोरी अंगुळी ।।३।। तुका म्हणे पुढे कुटती हाडे। आपुल्या नाडे रडतील ।।४।।

१६२६. तुज जाणें तान्हे नाही पांडुरंगा। कां जी मज सांगा उपेक्षिले ।।१।। तुज ठावे होते पातकी मी खरा। आधीच कां थारा दिला पायी ।।२।। अंक तो पाडिला मी हरीचा दास। भेद पंगतीस करूं नये ।।३।। तुका म्हणे आम्ही जिंतीले ते खरे। आतां उणें पुरें तुम्हांलागी ।।४।।

दळण

२५८. शुद्ध दळणाचें सुख सांगों काईं। मानवत असे सईबाई ॥ १ ॥
शुद्ध तें वळण लवकरी पावे। डोलवितां निवे अष्टांग तें ॥ २ ॥
शुद्ध हें जेवितां तन निवे मन। अल्प त्या इंधन बुडा लागे ॥ ३ ॥
शुद्ध त्याचा पाक शुद्धचित्त चांगला। अविट तयाला नाश नाहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे शुद्ध आवडे सकळां। भ्रतार वेगळा न करी जीवें ॥ ५ ॥

अडसण

२५७. शुद्धीचें सारोनी भरियेली पाळी। भरडोनी वोंगळी नाश केला ॥ १ ॥
आडसोनी शुद्ध करीं वो साजणी। सिद्ध कां पापिणी नासियेलें ॥ २ ॥
सुपीं तोंचि पाहें धड उगटिलें। नव्हता नासिलें जग झोडी ॥ ३ ॥
सुपीं तोंचि आहे तुज तें आधीन। दळिल्या जेवण जैसें तैसें ॥ ४ ॥
सुपीं तोचि संग घेईं धडफुडी। एकसा गधडी नास केला ॥ ५ ॥

पाळणा

२६१. जननिया बाळका रे घातलें पाळणा ।
पंचतत्त्वीं जडियेल्या वारतिया चहूं कोणा ।
अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा ।
वैखरी धरूनी हातीं भाव दावी खेळणा ॥ १ ॥
निजीं रें निजीं आतां । म्हणोनि परिये दे माता ।
खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां ॥ २ ॥
खेळतां बाहेरी रे मुला लोकांच्या सवें ।
बागुल काळतोंडा नाहीं नेतों तें ठावें ।
खेळतां दुश्चिता रे देखोनी तें न्यावें ।
म्हणोनि सांगे तुज शीघ्र वचन पाळावें ॥ ३ ॥
संचित मागें शुद्ध तुज होतें सांगाती ।
तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं ।
आणीक नेलीं मागें काय जाणों तीं किती ।
आलासी येथवरी थोर पुण्यें बहूतीं ॥ ४ ॥
खेळतां शुक देवा खो रे लागला पाठीं ।
लपाला वरुषें बारा तिये मातेचे पोटीं ।
रिघतां बाहेरी रे पळे घेऊनि कासोटी ।

श्री संत तुकाराम महाराज अभंग-गाथा ।। २० ।।

१०८. जेणें घडे नारायणींअंतराय । होत बापमाय वर्जावींतीं ।।१।।
येर प्रियापुत्रधना कोण लेखा । करिती तीं दु:खा पात्र शत्रू ।।धृ.।।
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ।।३।।
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणिक उपाय दु:खमूळ ।।४।।

१०८७. सर्प भुलोन गुंतला नादा। गारुडियें फांदा घातलासे। हिंडवूनि पोट भरी दारोदारीं। कोंडूनि पेटारी असे रया।।१।। तैसी परी मज झाली पांडुरंगा। गुंतलों तो मी गा सोडवी आतां। माझें मज कांहीं न चलेसें झालें। कृपा हें तुज न करितां।।धृ.।। आविसें मीन लावियला गळीं। भक्ष तो गिळी म्हणूनियां। काढूनि बाहेरी प्राण घेऊं पाहे। तेथें बाप माये कवण रया।।३।। पक्षी पिलयां पातलें आशा। देखोनियां फांसा गुंते बळें। मरण सायासें नेणें धांवोनि वोरसे। जीवित्वा नास झालीं बाळें।।४।। गोडपणें मासी लिगाडीं गुंतली। सांपडे फडफडी अधिकाधिक। तुका म्हणे प्राण घेतला आशा। पंढरीनिवासा धांव घाली ।।५।।

३९०३. मायेविण बाळ क्षणभरी न राहे। न देखतां होय कासावीस।।१।। आणिक उदंड बुजाविती तरी। छंद त्या अंतरीं माउलीचा।।धृ.।। नावडती तया बोल आणिकांचे। देखोनियां नाचे माय दृष्टी।।३।। तुका म्हणे माझी विठ्ठल माउली। आणिकांचे बोलीं चाड नाहीं।।४।।

१२२८. नलगे मायेसी बाळे निरवावें। आपल्या स्वभावें ओढे त्यासी।।१।। मज कां लागला करणें विचार। ज्याचा जार भार त्याचे माथां।।धृ.।। गोड धड त्यासी ठेवी न मागतां। समाधान खातां नेदी मना।।३।। खेळतां गुंतलें उमगूनि आणी। बैसोनिया स्तनीं लावी बळें।।४।। त्याच्या दुःखें पडे आपण खापरीं। लाही तळी वरी होय जैसी।।५।। तुका म्हणे देह विसरे आपुला। आघात तो त्याला लागों नेदी।।६।।

३९६. गाई गोपाळ यमुनेचे तटीं। येती पाणिया मिळोनि जगजेठी। चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं। चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो।।१।। ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी। चित्त विव्हळतें देखावया हरी। मिस पाणियाचें करितील घरीं। बारा सोळा मिळोनि परस्परीं वो।।धृ.।।

जोगी : अभंग १

४३६. जग जोगी जग जोगी। जागेजागे बोलती।।१।। जागता जगदेव। राखा कांहीं भाव।।धृ.।। अवघा क्षेत्रपाळ। पूजावा सकळ।।३।। पूजापत्र कांहीं। फल पुष्प तोय।।४।। बहुतां दिसां फेरा। आला या नगरा।।५।। नका घेऊं भार। धर्म तोचि सार।।६।। तुका मागे दान। द्यावें जी अनन्य।।७।।

कांडण

२५९. सावडीं कांडण ओवी नारायण। निवडे आपण भूस सार ॥ १ ॥
मुसळ आधारीं आवरूनी धरीं। सांवरोनी थोरी घाव घालीं ॥ २ ॥
वाजती कांकणें अनुहात गजरें। छंद माहियेरे गाऊं गीतीं ॥ ३ ॥
कांडितां कांडण नव्हे भाग शीण। तुजमजपण निवडे तो ॥ ४ ॥
तुका म्हणे रूप उमटे आरिसा। पाक त्यासरिसा सिद्ध झाला ॥ ५ ॥

७८३. धन्य देहू गांव पुण्य भूमि ठाव। तेथें नांदे देव पांडुरंग ।।१।। धन्य क्षेत्रवासी लोक दइवाचे। उच्चारिती वाचे नामघोष ।।धृ.।। कर कटी उभा विश्वाचा जनिता। वामांगी ते माता रखुमादेवी ।।२।। गरुड पारीं उभा जोडुनिया कर। अश्वत्थ समोर उत्तरामुख ।।३।। दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर। शोभे गंगातीर इंद्रायणी ।।४।। लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन। तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ।।५।। विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी। हनुमंत शेजारीं सहित दोघे ।।६।। तेथें दास तुका करितो कीर्तन। हृदयीं चरण विठोबाचें ।।७।।

८१७. मढें झांकूनियां करिती पेरणी। कुणबियाची वाणी लवलाहें।।१।। तयापरी करीं स्वहित आपुलें। जयासी फावलें नरदेह।।धृ.।। ओटीच्या परीस मुठीचें तें वाढें। यापरी कैवाडें स्वहिताचें।।३।। नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं। जाणते हें गुंती उगविती।।४।। तुका म्हणे पाहें आपली सूचना। करी तो शाहाणा मृत्युलोकीं।।५।।

३९३४. सब संबाल म्यानें लौंडे खडा केऊं गुंग। मदिरथी माता हुवा भुलि पाडी भंग।।१।। आपसकुं संबाल आपसकुं संबाल मुंढे खुब राख ताल। मुथिवोहि बोला नहीं तो करूंगा हाल।।२।। आवलका तो पीछें नहीं मुदल बिसर जाय। फिरते नहीं लाज रंडी गद्धी गोते खाय।।३।। जिन्हों खातिर इतना होता सो नही दुजें बेकाम। उचा जोरो लियातुंबा तुंबा बुरा काम।।४।। निकल जावे चिकल जोरा मुंढे दिलदारी। जवानीकी छोड दे बात फिर एक तारी।।५।। कहे तुका पिसल रुका मेरेको तो दान देख। पक्कड धका गांडगुढघी मार चलाऊं आलेख।।६।।

३९३५. नजर करे सो हि जिंके बाबा दुरथी तमासा देख। लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख।।१।। काहे भुला एक देखत। आंखो मारतडांगो बाजार।।२।। दमरी चमरी जो नर भुला। सोत आघो हिलत खाय।।३।। नहि बुलावत किसे बाबा आप हि मत जाय। कहे तुका उस असाके संग फिरफिर गोते खायें।।४।।

३९३६. अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज। गाऊ बछरे तिस चलावे यारी बाघो न सात।।१।। ख्याल मेरा साहेबका बाबा हुवा करतार। व्हांटें आघे चढे पीठ आपे हुवा असिवार।।२।। जिकीर करो अल्लाकी बाबा सबल्या अंदर भेस। कहे तुका जो नर बुझे सोहि भया दरवेस।।३।।

* * *

परिशिष्ट 'ब'

संशोधनाच्या संदर्भातील कीर्तनकार, अभ्यासकांच्या मुलाखती

१. डॉ. रामकृष्णदास लहवितकर (पूर्वप्रमुख – संत तुकाराममहाराज अध्यासन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)

२. संजय महाराज पाचपोर (रामायणाचार्य, अकोला)

३. डॉ. सदानंद मोरे (पूर्वाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घुमान, पंजाब)

४. विश्वास मोरे (वरिष्ठ पत्रकार, दै. लोकमत)

५. बापूसाहेब मोरे (पूर्वाध्यक्ष, देहू संस्थान, श्रीक्षेत्र देहूगाव)

प्रस्तावना : महाराष्ट्रातील कीर्तनकारांच्या कीर्तन, प्रवचनांचा, निरूपणाचा आत्मा म्हणजेच सकल मराठी संतांचे अभंग. त्यात सर्वार्थाने लोकप्रिय आणि लोकभिमुख बनलेले आणि कीर्तनकारांना विवेचनासाठी जवळचे वाटणारे संतश्रेष्ठ तुकोबारायांचे अभंग होत. प्रस्तुत संशोधनामध्ये संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवन अभ्यासताना तुकोबारायांचे अभंग हे समाजउद्धारक कसे होते? त्यांच्या अभंगात लोकजीवन कसे प्रकट झाले आहे.

हे सिद्ध करण्यासाठी महाराष्ट्रातील कीर्तनकार आणि प्रवचनकारांच्या प्रकट मुलाखती घेतल्या. कीर्तनकारांना प्रश्नावली देऊन त्यांची प्रकट मुलाखत घेतली आहे. अशी आहे प्रश्नावली.

अ) संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगात लोकजीवन आहे का? ते कसे?

ब) तुकोबारायांच्या अभंगांचा समाज जीवनावर परिणाम झाला आहे का? कसा?

क) तुकोबारायांचे विचार, लोकजीवन समाजउद्धारक विचार?

ड) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवनात आलेले समाज घटक कोणते ?

अशी प्रश्नावली देऊन कीर्तनकारांच्या मुलाखती घेतल्या. त्यांची मते जाणून घेतली. लोकजीवन कसे उमटले आहे. हे कीर्तनकारांकडून जाणून घेतले.

संतांचे अवतार लोककल्याणाकरिताच होत असतात जगाच्या कल्यणाच्या संतांच्या विभूती.

संतांनी निर्माण केलेले अभंग वाङ्मय हा एक उत्तम प्रतीचा 'लोकसंवाद' आहे.

१. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगात उमटलेले लोकजीवन श्री. तुककोबारायांच्या अभंग रचनेत लोकजीवनाचे प्रतिबिंब स्वच्छ उमटलेले दिसते. याची अनेक उदाहरणे त्यांच्या अभंगात दिसून येतात. त्यापैकी काही पुढील प्रमाणे...

बुडता हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणोनिया ।।
न मिळती एकाएक । जिथे नगरीचे लोक । भले राहो नये ।
लोक तैसा ओक धरिता धरवेना ।
कोपला पाटील गावींचे हे लोक । आता मनभीक कोण घाली ।।
विषय ओढी भुलले जीव । आता यांची कोण करील कीव ।
पापाचिया मुळे । झाले सत्याचे वाटोळे ।।
अविचाऱ्या हाती सत्ता देवुनी नागविती ।।

अशी शेकडोप्रमाणे अभंग गाथेत सापडतील. ती मूळातच पाहाणे योग्य होईल.

२) श्री तुकोबारायांच्या अभंगांचा समाजजीवनावर झालेला परिणाम

चार शतकापूर्वी श्री तुकोबारांच्या अगोदर संतवाणी होतीच. मात्र श्री तुकोबारांचे अभंग लोकांना जवळचे वाटतात. कारण ते बोलीभाषेत आहेत. या अभंग संहितेचा समाजजीवनावर प्रचंड परिणाम झाला. विशेष म्हणजे स्वयं. छत्रपति शिवाजीराजे श्री तुकोबारांच्या कीर्तनास येत असत. तयांचे स्वराज्य सुराज्य झाले यास कारण श्री तुकोबारायांचा उपदेश होय जर राजावर परिणाम झाला तर प्रजेवर होणे हे क्रमप्राप्तच होय. उदा. दया तिचे नाव भूतांचे पालन ।आणिक निर्दलन कंटकाचे ।। हे उदाहरण राजांच्या जीवनचरित्रात तंतोतं दिसते. या तीन शतकात श्री महाराजांचे अभंग समाजमनावर पकड धरून आहेत. आजच्या विद्रोही जीवनप्रणालीत महाराष्ट्रात जी सामाजिक शांतता आहे, तो या उपदेशाचाच परिणाम आहे. संतवाङंमयाने महाराष्ट्राचे समाज जीवन घडविले आहे. संत बोधाने समाज सुविचारी, सदाचारी झालेला दिसून येईल.

३) समाजउद्धारक श्री तुकोबारांयाचा विचार –

मानवी जीवन हे जन्ममरणाची परंपरा खंडीत करण्यासाठीच लाभले आहे. या नरदेहाच्या आधारे माणसाने आपला उद्धार करून घ्यावा असा श्री तुकाराम महाराज विचार सांगतात. त्याकरितांचि काही प्रमाणे खालील प्रमाणे –

देव दिला देह भजना गोमटा । तो या झाला फाटा बाधिकेचा ।।
आयुष्याचा साधने । सच्चिदानंद पदवी घेणे ।।
आता उघडी डोळे । जरी अद्यापि न कळे ।।
लागोनिया पाया विनवितो तुम्हाला ।।
सकळासी येथे आहे अधिकार । कलियुगी उद्धार हरिच्या नामे ।।
आता तरी पुढे हाचि उपदेश । नका करू नाश आयुष्याचा ।।
सकळांच्या पाया माझे दंडवत ।।
नको नको मना । गुंतु मायाजाळी ।।
आईक रे जना । तुझ्या स्वहिताच्या खुणा ।
सांगतो तुम्हांशी भजा रे विठ्ठला ।।
उठा जागे व्हा रे आता ।
देह जाईल जाईल । यासी काळोबा खाईल ।।
क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधू

अशा प्रकारची अनेक प्रमाणे देता येतील. सकल समाजाचा उद्धार व्हावा त्याचे कल्याण व्हावे. हा नरदेह वाया जाऊ नये, याकरिता तुकोबारायांनी अट्टहास केला.

४) लोकजीवनातील घटक

श्री तुकोबारायांनी आपल्या सभोवतालचे समाजजीवन पाहिले. अधिकाराप्रमाणे त्यांनी उपदेश केला. हा विषय खूप मोठा आहे. संक्षेपाने सांगायचे झाले तर...

कृषक समाज – निवडाणे तण । शेती करावे राखण ।।
सामान्य स्त्री – निवडावे खडे । तरीच दळण ओजघडे ।।

निंदकजन – निंदकाचे घर । असावे शेजारी ।।

व्यापारी – मुद्दलामध्ये होय तोटा । तो खोटा उद्दीम ।।

नास्तिक – कां रे नाठविसी कृपाळू देवासी । पोसितो जनासी एकलाचि ।।

खळ – तुका म्हणे खळ । करू ठायीचे निर्मळ ।।

दुर्जन – दुर्जनाचा मान । सुखे करावा खंडण ।।

विद्यार्थी – असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।

श्री तुकारामाहाराजांचे वाङ्म प्रसादिक तर आहेच. त्यात सामाजिक कल्याणाचे, लोकजीवनाला दिशा देणारे चिंतन सापडते. अवघ्या विश्वाचे कल्याण व्हावे असे महाराजांना वाटते.

वरील चार मुद्यांचा हा संक्षेपाने घेतलेला आढावा आहे. अल्पमतीप्रमाणे केलेले चिंतन होय.

प्रश्नावली

अ) संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगात लोकजीवन आहे का? ते कसे?

ब) तुकोबारायांच्या अभंगांचा समाज जीवनावर परिणाम झाला आहे का? कसा?

क) तुकोबारायांचे विचार, लोकजीवन समाजउद्धारक विचार?

ड) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवनात आलेले समाज घटक कोणते ?

१. डॉ. रामकृष्णदास लहवितकर,पिंपळे गुरव, पुणे. अभ्यासक(पूर्व प्रमुख – संत तुकाराममहाराज अध्यासन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)
२. संजय महाराज पाचपोर, कीर्तनकार (रामायणाचार्य, अकोला)
३. डॉ. सदानंद मोरे, पुणे, अभ्यासक (पूर्वाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घुमान, पंजाब)
४. विश्वास मोरे, पुणे, अभ्यासक (वरिष्ठ पत्रकार, दै. लोकमत)
५. बापूसाहेब मोरे (पूर्वाध्यक्ष, देहू संस्थान, श्रीक्षेत्र देहूगाव)

अ.क्र.	लेखक	वय	पत्ता	व्यवसाय	मत
१.	डॉ. रामकृष्णदास लहवितकर	६५	पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे.	संशोधक	वेदान्तांचे लोककेंद्री निरुपण हे तुकोबारायांच्या अभंगातील आसयसुत्र आहे. तुकाराम–महाराजांच्या अभंगामध्ये लोकजीवनाचे परिपूर्ण प्रतिबिंब उमटलेले दिसते.

डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर (पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम महाराज अध्यासनाचे प्रमुख) संत तुकाराम महाराज साहित्याचे अभ्यासक, प्रसिद्ध कीर्तनकार, प्रवचनकार म्हणून सर्वपरिचित असणारे व्यक्तीमत्व म्हणजेच, डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर होय. त्यांनी पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम महाराज अध्यासनाचे प्रमुख म्हणून काम पाहिले आहे.

अ) होय, संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगात लोकजीवनच आले आहे. अर्थात लोकजीवनाचे प्रतिबिंब त्यात उमटले आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. नित्याचे जीवन जगताना आचरणशुद्धी, मनशुद्धी, प्रेम, जिव्हाळा, भक्ती ही मुल्ये कशी जगावित, याचा वस्तुपाठ देणारे अभंग संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी रचले. त्यासाठी त्यांनी लोकभाषेचा, लोक तत्त्वाच आणि रचनातत्वाचा वापर करून आपली लोकसंवादी भाषा घडविली. लोकसंकिर्तन हाच त्याच्या एकुण विचारांचा कणा आहे.

ब) वेदान्तीचे लोककेंद्री निरूपण हे तुकोबारायांच्या अभंगातील आशयसूत्र आहे. वेद–उपनिषदे, ब्रम्हसूत्रे यांच्यापासून खूप दूर असलेल्या बहुजन समाजाना ह्या तत्वाज्ञानातला आशय सहज समजेल अशा लोकभाषेतून रूपांतरित करण्याची गरज होती. ही सामाजिक गरज ओळखून तुकोबारायांनी हे तात्वीक संचित समाजाभिमुख बनविले. त्यामुळे वेदांविषयीची भिती, दडपण, दुरावा दूर झाला. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसिस ठावे, येरांनी वहावा भार माथा' अशा परखड शब्दांतून त्यांनी वेदवाणीवर हक्क सांगणाऱ्या सत्ता केंद्रांतून वैदिक ज्ञानाची मुक्ती केली आणि ज्ञानाचा ध्रुव जनसामान्यांकडे वळविला. अध्यात्मिक

समतेचा पुरस्कार करणाऱ्या तुकोबारायांच्या या अभंगवाणीमुळे महाराष्ट्रात अध्यात्मिक लोकशाही निर्माण झाली.

क) बहुजन समाजाच्या आत्मिक उन्नयनासाठी आणि सामाजिक नैतिक, रूढी परंपरांच्या अध:पतनातून त्यांची मुक्तता करण्यासाठी तुकोबारायांनी परखड शब्दांत संस्कृतीवर टीकाही केली आहे. अंधश्रद्धेवर आणि कर्मठपणावर टीका केली आहे. कर्मकांडावर टीका केली आहे. सामाजिक ग्लानी यातून बाहेर येण्यासाठी आत्मशुद्धीचा मनोवैज्ञानिक विचार तुकोबारायांनी अभंगवाणीतून मांडला आहे. प्राथनेतून आणि भक्तीतून चैतन्य, समाधान, आत्मशुद्धी कशी करता येते, हा विचार अभंगवाणीत दिला आहे.

ड) ''बुडता हे जन न देखवे डोळा, म्हनोणी कळवळा येतो आम्हा'' तुकोबारायांच्या कालखंडात सामान्य माणूस हा भरकटलेला होता. एका बाजूला कर्मकांड, यज्ञ यांचे प्रस्थ माजले होते आणि दुसऱ्या बाजूला रूढी परंपरा या उभ्या होत्या. त्यामुळे समाज पुरता गोंधळलेला होता. समाजात आपापसात दुही माजलेली होती. जो तो आपल्याला सर्वश्रेष्ठ समजत होता. परकीय सत्तेचा जुलूम वेगळाच होता. लोकांची कृती आणि उक्ती यांत तफावत जाणवत होती. या साऱ्या गदारोळात स्वधर्माची जाणीव बुडू लागली होती.धर्माच्या नावावर मांत्रिक, तांत्रिक, नवससायास निष्ठांचे प्रस्थ वाढले होते. यातून तुकोबारायांना लोकांना बाहेर काढायचे होते. धर्माचे पालन आणि पाखंड–खंडण, हे लोकजीवनाचे प्रयोजन ठरविले. तुकोबारायांनी जनमाणसाला व्यक्तीस्तोमापासून व कर्मकांडापासून वाचविले आणि नामसंर्कितनाचा सहज, सोपा, पचेल, रूचेल असा मार्ग दाखविला.

अ.क्र.	लेखक	वय	पत्ता	व्यवसाय	मत
२	संजय महाराज पाचपोर	५६	आळंदी देवाची, ता. खेड. जि. पुणे	कीर्तनकार	संत तुकाराममहाराजांच्या अभंगातील लोकजीवनात समाजातील अनेक घटक आलेले आहेत. तसेच दैनंदिन जीवनातील प्रश्न, संसार, पर्यावरण, जीवनाचे परिपूर्ण

					चित्रीकरण, भाषा संस्कार, रूढी–परंपरा असे विविध घटक अनुभवयास मिळतात.

२) रामायणाचार्य संजयमहाराज पाचपोर (विदर्भ) : महाराष्ट्रातील प्रमुख कीर्तनकार, प्रवचनकार आहे. रामायणाचार्य आणि संत तुकाराम महाराच्या अभंगांचा अभ्यास त्यांनी केला आहे.

१) संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगात समाजातील विविध घटकांचे लोकजीवन आले आहे. प्रत्येक अभंगात समाजउद्धाराचा भाव, लोकजीवनाचे घटक दिसून येतात. प्रापंचिक जीवनात धन प्राप्ती हे साध्य असते, पण ती कशी करावी, याचा सल्ला तुकोबा देतात.

''जोडोनिया धन उत्तम व्यवहारे

उदास विचारे वेच करी''

यासारखे अनेक अभंग लोकजीवनाला स्पर्श करतात.

'कोणाही जीवाचा न घडो मत्सर किंवा संसाराच्या तापे तापलो देवा, जन तरी देखे गुंतले प्रपंचि' या सारखे अभंग लोकजीवनाचे दर्शन घडवितात.

२) समाज जीवनावरही या अभंगांचे परिणाम झाला आहे. त्यामुळे लोकजीवन अधिक समृद्ध होण्यास मदत झाली आहे.

''आम्ही वैकुंठवासी, आलो याचि कारणांशी,

बोलिले जे ऋषी, साचभावे वर्ताया.''

आम्ही वैकुंठातील आहोत, पण ऋषींनी मानवकल्याणासाठी जी शस्त्रे रचिली ती लोकांना समजावून देऊन त्यांचे आचरण त्यांच्याकडून करवून घ्यावे, यासाठी आम्ही येथे आलो आहोत. लोकजीवनासाठी आलो आहोत, असे तुकोबारायांनी अभंगातून सांगितले आहे. तुकोबारायाच्या अभंगातील ओळी सुभाषिते ठरले. आज व्यवहारात प्रचलित आहेत. 'शुद्धबीजा पोटी, फळे रसाळ गोमटी...', 'ठेविले अनंते तैसेची रहावे....', 'चित्ती असो द्यावे, समाधान...', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...', अशी सुभाषित समाजात रूढ झालेली आहेत. त्यातून समाज उद्धाराचा भाव आहे. तुकोबांच्या अंतकरणात समाज उद्धाराची

तळमळ दिसून येते. समाजावर त्याचा अनुकुल परिणाम दिसून येतो.

अ.क्र.	लेखक	वय	पत्ता	व्यवसाय	मत
३	डॉ. सदानंद मोरे	६०	शनिवार पेठ, पुणे.	संशोधक व अभ्यासक	तुकोबांनी वेगवेगळ्या जीवन व्यवहारांचे जे अनुभव घेतले ते त्यांच्या वचनांमधून कधी प्रत्यक्षरित्या तर कधी दृष्टान्तांच्या स्वरुपात प्रगट झाले आहेत. तुकोबांची अभंग गाथाही मानवी जीवनाची, लोकजीवनाची महाभाष्यकार आहे.

३) डॉ. सदानंद मोरे : संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील समाजउद्धाराची खूप तळमळ होती. लोकांचे प्रपंचासाठी राबराब राबणे त्यांना आवडत नव्हते. द्‌ेष, मत्सर, लोभ, यात समाज बुडताना त्यांचे अंतकरण हळवे होत असते. 'बुडता हे जण न देखवे डोळा, येतो कळवळा म्हणोनिया'' किंवा लोकांनी चित्त शुद्ध करून भक्ती व प्रपंच करावा यासाठी तुकोबा त्यांच्या पायावर विनंती करतात. 'सकळांच्या पाया माझे दंडवत, आपुलाले चित्त शुद्ध करा' किंवा 'लागोनिया पाया विनवितो तुम्हाला'' या सारखे अनेक अभंग समाजाचा विकास व्हावा, उद्धार व्हावा, यासाठी तुकोबारायांनी अभंग लिहले.

४) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील लोकजीवनात आलेले समाजातील अनेक घटक आहेत.संसारातून परमार्थ हाही विचार तुकोबांनी दिला आहे. दैनंदिन जीवनातील प्रश्न, संसार, पर्यावरण, जीवनाचे रहाट गाडगे, भाषा, संस्कार, रूढी परंपरा, प्राणी, भूतदया असे विविध घटक आलेले आहेत.

३) संतश्रेष्ठ तुकोबारायांचे वंशज संत साहित्याचे अभ्यासक, पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम महाराज अध्यासनाचे प्रमुख, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी तुकाराम डॉट कॉम या संकेतस्थळासाठी लिहलेल्या लेखात 'मानवी जीवनाचा महाभाष्यकार' या

शीर्षकाखाली लेख लिहला आहे. त्यातून समाजजीवनावर झालेला परिणाम स्पष्ट होतो. समाजातील विविध घटकांत अभंग कसे उतरले आहेत. याचे दर्शन घडते. तुकाराम दर्शन या ग्रंथामधून तुकोबारांयाचे भावदर्शन घडविले आहे.

डॉ. सदानंद मोरे म्हणतात, ''मानवी जीवन ही एक अत्यंत गुंतागुंतीची व बहुजिनसी अशी बाब आहे. इतिहासाच्या प्रारंभिक अवस्थेत ते सरळ साधे असेलही; परंतु ज्ञान आणि विज्ञान यांच्या प्रगती बरोबर ते व्यापक, समृध्द आणि व्यामिश्र होत गेले. या जीवनात नाना प्रकारच्या व्यवहारांचा अंतर्भाव होतो. हे व्यवहार कधी एकमेकांना पूरक ठरतात तर कधी परस्परविरोधी होतात. उदाहरण द्यायचे झाले, तर स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक आणि राजकीय सुधारणा या जीवन व्यवहारांच्या परस्परसंबंधांबद्दल झालेल्या वादाचे देता येईल. आगरकरांना ते पूरक वाटायचे, तर टिळकांना विरोधी वाटायचे. आजच्या काळापुरते बोलायचे झाले, तर धर्म आणि राजकारणाच्या संबंधांच्या मुद्याकडे बोट दाखविता येईल. 'धर्मराजकारण समवेत चालती...,' असे महाराष्ट्राचे वर्णन मराठी कवींनी केलेले आहेच; पण मग सेक्युलॅरिझमच्या मुद्याचे काय, हा प्रश्नही उपस्थित होतोच !

जीवन, व्यवहार आणि त्यांचे परस्परसंबध या विषयाला आधुनिक काळात एक वेगळाच आयाम प्राप्त झालेला आहे. तो म्हणजे विशेषीकरणाचा, स्पेशलायझेशनचा. एकेक क्षेत्राच्याच गरजा इतक्या वाढल्या आहेत, टोकदार झाल्या आहेत, की एका क्षेत्रातील माणसाला दुसऱ्या क्षेत्रात काय चालले आहे, याची दखल घेणेही अवघड होत चालले आहे. अशा काळी परिपूर्ण जीवनाची, अष्टपैलू व्यक्तित्वाची आणि समग्रतेची आपण कल्पनाही करू शकत नाही. तत्त्वज्ञान, राजकारण, कला, क्रीडा या क्षेत्रांत मुक्त संचार करणारा श्रीकृष्ण; चित्रे काढणारा, वैज्ञानिक शोध लावणारा प्रबोधनकालीन लिओनार्दो द व्हिन्सी; रवींद्रनाथ टागोर आता परत होऊ शकतील का, हा अडचणीत टाकणाराच प्रश्न आहे. आजच्या काळात अष्टपैलुत्त्वाची व्याख्या एका क्षेत्रातील विशेष प्राविण्य आणि अन्य क्षेत्रांत साधारण संचार, अशीच करावी लागते. संत तुकाराम महाराज हे मानवी जीवनाचे एक श्रेष्ठ भाष्यकार होते. संत हे जीवनविन्मुख होते, असा भल्याभल्यांचा गैरसमज असतो. या मंडळींचे मानवी जीवनाचे आकलनच संकुचित व एकदेशी असते. त्यामुळे त्यांचा फारसा विचार करण्याचे कारण नाही. तुकोबा जीवनाचे भाष्यकार होते; परंतु त्यांचे

भाष्य हे पुस्तकी पंडिताने केलेले भाष्य नव्हते. किंबहुना, तत्कालीन विशिष्ट समाजरचनेमुळे ते पुस्तकी पंडित होऊ शकलेही नसते. अर्थात ही एक प्रकारची इष्टापत्ती म्हणायला हवी. आयुष्याच्या पूर्वार्धात तुकोबांनी हा सर्व अनुभव घेतला. उत्तरार्धात महाराष्ट्रातील भयानक दुष्काळामुळे ओढवलेल्या आपत्तीला त्यांनी तोंड दिले. या आपत्तीत त्यांना स्वत:चे आप्त, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचा नाश होताना पाहावा लागला. मानवजीवनातील अनिश्चिततेचा प्रत्यय आला. थोडक्यात सांगायचे, म्हणजे त्यांचे अनुभवविश्व हे विस्तीर्ण आणि समृध्द होते. पुढेही ते आणखी विस्तारत गेले. त्यांनी ईश्वरानुभूती मिळवली. कवित्व करताना निर्मितीप्रक्रिया अनुभवली. एका बाजूला या कवित्वाची वाढती लोकप्रियता, तर दुसऱ्या बाजूला त्याला प्रखर विरोध त्यांनी अनुभवला. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रामधील सर्वांत लोकप्रिय; परंतु वादग्रस्त व्यक्ति म्हणजे तुकोबा होती. मावळ परिसरात परकीय सत्तेला ग्रहण लागले असून, शिवाजीचा उदय होत आहे, हेही त्यांना पाहायला मिळाले.

या सर्व अनुभवप्रक्रियेला तुकोबा जाणीवपूर्वक सामोरे जात होते. त्यावर विचारचिंतन करीत होते.

''विचारावाचोन। न पावेजे समाधान।''

स्वत:चे समाधान होईपर्यंत, खात्री पटेपर्यंत विचार करीत होते.

'विचारिले आधी आपुल्या मनासी,

तुका म्हणे करू मनासी संवाद''

अशी त्यांची आत्मसंवादाची प्रक्रिया सातत्याने सुरू होती.

सत्य–असत्यासी मन केले ग्वाही । मानियेले नाही बहुमता' अशी त्यांची प्रामाण्यपध्दती होती. वेद, स्मृती, सदाचार आणि आत्मदृष्टी ही चार धर्मप्रमाणे परंपरेने सांगितली आहेत. त्यातील आत्मदृष्टी प्रमाण जवळ जवळ लुप्तप्राय झाले होते. तुकोबांनी त्याचाच अवलंब केला. एकीकडे स्वानुभव आणि दुसरीकडे चिंतन, अशा दुहेरी सामग्रीमुळे तुकोबा जीवनाचे भाष्यकार होऊ शकले.

तुकोबांनी वेगवेगळ्या जीवन व्यवहारांचे जे अनुभव घेतले ते त्यांच्या वचनांमधून कधी प्रत्यक्ष, तर कधी दृष्टान्तांच्या स्वरूपात प्रगट झाले आहेत. एखाद्या संकटाला सामोरे जाताना मराठी माणूस 'आलिया

भोगासी असावे सादर', 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' , 'आले देवाजीच्या मना' असे उद्गार सहजगत्या काढतो, तो यामुळेच. ही मनाची एक चौकटच म्हणायला हवी. तुकोबांनी घडवलेली. केवळ भाषिक अभिव्यक्ती नव्हे, तर ती जणू वैचारिक वर्गवारीच होऊन बसली आहे. रोजच्या सर्वसाधारण विविध जीवन व्यवहारांत तुकोबांचे सूत्ररूपाने मार्गदर्शन कसे होत असते, ते पाहा. वेगवेगळ्या व्यवहारांची ब्रीदवाक्ये, घोषवाक्ये, नीतितत्त्वे तुकोबा पुरवतात.उदाहरणादाखल पाहा. 'एकमेकां साह्य करू। अवघे धरू सुपंथ' हे सहकार क्षेत्रातले, 'बल बुध्दी वेचुनिया शक्ती । उदक चालवावे युक्ती' हे जलनियोजनाचे, 'शुध्द बीजापोटी। फळे रसाळ गोमटी' हे बी – बियाणे निवडण्याबद्दल, 'असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे' प्रयत्नाची महती पटवून देते.

''क्षणभंगुर हा येथील पसारा, नाशिवंत देह जाणारे सकळ । आयुष्य खातो काळ सावधान, चालले सोबती काय मानिली निश्चिती, अशी वचने अटळ भवितव्यतेची आठवण करून देऊन सतत सावध ठेवतात. 'दया तिचे नाव भूतांचे पाळण । आणिक निर्दलण कंटकांचे', 'जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।। तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा' 'तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात', 'भक्ती ते नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मी भोग ब्रह्म तनु' या सुत्ररूप व्याख्या मनात कायमच्या ठसून राहतात, 'नाही निर्मळ जीवन । काय करील साबण', 'गाढवही गेले ब्रह्मचर्य गेले', 'तुका म्हणे ऐशा नरा । मोजूनी माराव्या पैजारो', 'तेथे पैजाराचे काम अधमासी तो अधमे' अशा स्पष्टोक्ती प्रतिपक्षावर तुटून पडताना उपयोगी पडतात, मोले घातले रडाया । नाही आसू नाही माया, 'तुका म्हणे तेथे पाहिजे जातीचे । येरा गबाळाचे काम नोहे ', 'धनवंता लागी । सर्वमान्यता आहे जगी', 'पोट लागले पाठीशी । हिंडविते देशोदेशी 'या प्रकारची वचने जीवनामधील कठोर वास्तविकतेची जाणीव करून देतात. नरदेह दुर्लभ जाणा , आयुष्याचिया साधने । सच्चिदानंद पदवी घेणे यामुळे आपणाला मनुष्यजन्माची किंमत कळते. मानवतेवर सजीव आणि निर्जीव सृष्टीशीही त्यांनी आत्मिक संबंध प्रस्थापित केलेला होता. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' किंवा 'झाडेझुडे जीव सोयरे पाषाणे' हे त्यांचे उद्धार आजच्या कोणत्याही पर्यावरणवादी संघटनांची ध्येयवाक्ये ठरावीत, असे आहेत.

सत्यसमाज सामाजिक क्षेत्रात विशेषत: जातिभेदाच्या क्षेत्रात जहाल होता. याउलट चिपळूणकर, टिळक यांची परंपरा सांगणारे विचारवंत व कार्यकर्ते राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतीत जहाल असले तरी, सामाजिक संदर्भात मात्र नेमस्तांपेक्षाही नेमस्त होते. या गटाकडून रामदासांची वेगळी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला; पण तरीसुध्दा टिळकांसारखे खोलवर विचार करू शकणारे स्थिरबुध्दीचे विचारवंत तुकोबांचे महत्त्व जाणून होते. तुकोबा मानवी जीवनाचे महाभाष्यकार आहेत. यातून समाजजीवनावर असलेला परिणाम लक्षात येईल.

अ.क्र.	लेखक	वय	पत्ता	व्यवसाय	मत
४	विश्वास मोरे	४३	जगद्गुरू बंगला, बी–२/५, रजनीगंधा सोसायटी, चिंचवड, पुणे ३३.	संत साहित्याचे अभ्यासक	तुकोबारायांच्या अभंगात लोकजीवन ओतप्रोत भरले आहे. तसेच संत तुकाराम महाराजांच्या अभंगानी महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन समृद्ध केले आहे.

श्री. विश्वास मोरे (वरिष्ठ पत्रकार, दै. लोकमत)महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव असणाऱ्या आषाढी वारी सोहळ्याचे पंधरा वर्ष वार्तांकन केले आहे. लोकमत वृत्तपत्र समूहात ते मुख्य उपसंपादक म्हणून कार्यरत आहेत. संत साहित्याचे अभ्यासक, वारी एक जीवन दर्शन, पाऊले तुकोबांची या पुस्तकांचे लेखन, तुकोबांच्या अभंगातून लोकजीवन कसे उद्धृत झाले आहे. यावर भाष्य केले.

१) संत तुकाराम महाराजांची गाथा अक्षरवाङ्मयाला लाभलेले वैभव आहे. तुकोबारायांच्या अंभंगात लोकजीवन ओतप्रोत भरले आहे. मुनष्य जीवनाचा सार त्यात आला आहे. त्याचबरोबर भूतदयाही दिसून येते. चारशे वर्षांपूर्वीच्या समाजाचे दर्शन त्यात आले आहे. तत्कालीन समाजव्यवस्था, चालिरिती, रूढी आणि परंपरा यावर अंत्यत परखडपणे टीका, भाष्य केले. सुखी आनंदी जीवनासाठी संसार जसा आवश्यक आहे. तसेच आत्मीक सुखासाठी भक्ती आवश्यक आहे. संसारातून परमार्थ हा त्यांनी

महाराष्ट्राला दिला आहे. व्यवहार कसा करावा, हे तुकोबांनी सांगितले आहे. उत्तम व्यवहार करून धन जोडा, उदास विचारांना थारा देऊ नका. अर्थात 'जोडूनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी'' यासारखे अनेक अभंग लोकजीवनाला स्पर्श करतात. भूतदयेविषयी ते म्हणतात, '''कोणाही जीवाचा न घडो मत्सर...', पर्यावरणाविषयी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे...', अशा विविध अभंगातून लोकजीवनाचे दर्शन घडते.

२) तुकोबारायांच्या अभंगांचा समाज जीवनावर परिणाम झाला आहे का? तो कसा असा प्रश्न आहे. आज आपण वारीचे चित्र पाहतो. पंढरीची वारी करण्यासाठी लाखो लोक निमंत्रणाविनाच येतात. सोहळ्यात सहभागी होतात आणि जीवनातील अनुपम असे सुख अनुभवतात. तुकोबारायांच्या अभंगांचा खोलवरपरिणाम महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील लोकांवर झाला आहे. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे म्हणायचे, 'ज्याच्या घरी नाही, तुकोबांची गाथा त्याला घालाव्या लाथा...' यावरून गाथेचे आणि तुकोबारायांच्या अभंगांचे महत्व लक्षात येईल. समाज जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. तुकोबारायांची प्रेरणा घेऊन, आशिर्वाद घेऊन छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची उभारणी केली. तुकोबांच्या गाथेतील अनेक अभंग आज लोकजीवनातील सुविचार बनले आहेत. 'शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी...', 'कुळी कन्या, पूत्र होती जे सात्विक तयाचा हरीक वाटे देवा...', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे...', 'ठेविले अनंते तैसेची रहावे....', 'चित्ती असो द्यावे, समाधान...', असे अनेक अभंग लोकजीवनाचा एक भाग बनले आहेत. विविध राष्ट्रीय नेते, समाजसुधारकही घडविले आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 'गीता रहस्य' या ग्रंथाची सुरूवात 'संतांची उच्छिष्ठे बोलितो उत्तरे...' या अभंगाने केली आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, आचार्य अत्रे यांच्यावरही प्रभाव दिसून येतो. एवढेच नव्हे तर कवी कुसुमाग्रज, वि. दा. करंदीकर यांनी तुकोबा आणि विल्ययम शेक्सपिअर यांच्या भेटीची कविता लिहली आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी 'अखंड' या नावाखाली जे अभंग लिहिले, ते तुकोबांचे अभंग समोर ठेवूनच; पण तुकोबांचा फुले यांच्यावरील प्रभाव केवळ छंदशास्त्रीय वा भाषिक नव्हता. येरवडा कारागृहात असताना महात्मा गांधीजींनीही तुकोबांची गाथा मागवून घेऊन त्यातील चौदा अभंगांचे निरूपण केले आहे. 'पापाची वासना नको दावू डोळा, त्यापरी आंधळा बराच मी....' 'त्यातूनच गांधीजींची 'आंधळा, मुका आणि बहिरा ही तीन माकडे जन्माला आली. विशेष म्हणजे देशाचे सर्वोच्य

स्थान असणाऱ्या राष्ट्रपती आणि पंतप्रधानांवरही तुकोबारायांचा प्रभाव राहिलेला आहे. माजी राष्ट्रपती अे.पी.जे. अब्दुल कलाम, प्रतिभाताई पाटील, पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यासारख्या व्यक्तीमत्त्वाचे चिंतन स्थळ तुकोबाराय राहिले आहेत. त्याचबरोबर ज्ञानपीठ विजेते वि. वा शिरवाडकर, डॉ. भालचंद्र नेमाडे, तुकाराम साहित्याचे अभ्यासक आणि कवी दिलीप चित्रे, कोल्हटकर, डॉ. सदानंद मोरे, डॉ. दिलीप धोंडगे अशा विविध अभ्यासकांनीही तुकोबारायांच्या अभंगांचे विवेचन केले आहे. ज्ञानपीठाला अभंगाची भूरळ होती. समाजातील विविध घटकांवर, समाजावर, जातीजमातीवर तुकोबारायांच्या अभंगांचा परिणाम दिसून येतो.

क) विश्वव्यापक विचार देणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या भागवत धर्माच्या मंदिराचे कळस बनणाऱ्या तुकोबारायांच्या अभंगांनी महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन समृद्ध केले आहे. तुकोबाराय हे जग्दगुरू म्हणून संतश्रेष्ठ पदापर्यंत पोहोचले असले तरी त्यांच्यातील माणुस हा संवेदनशील होता. कवी, समाजउद्धारक, भक्तीत्तत्व रूजविणारा संत, कळवाळू, मायाळू, कणखर, परखड होते. बुवाबाजी आणि कर्मकाडांचा त्यांना राग होता. 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णूदास, कठीण वज्रास भेदू ऐसे...', 'ऐसी कळवळ्याची जाती, करी लाभाविन प्रिती...', 'बुडता हे जण न देखवे डोळा, येतो कळवळा म्हणोनिया'' या आणि अशा अनेक अभंगातून तुकोबारायांचा समाजजीवनाविषयीचा दृष्टीकोन लक्षात येतो. 'भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळांच्या माथी हाणो, काठी' यातून प्रिती आणि कणखरता लक्षात येईल. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसिस ठावा, येरांनी वहावा भार माथा' यातून वेदवाणीवर अधिकारपण त्यांनी सांगितला आहे. अभंगवाणातून व्यक्त झालेले तुकोबारायांचे विचार, लोकजीवन समाजउद्धारक विचार हे भक्ती दृढ करणारे होते तसेच ते समाजाला दिशा देणारे आणि अनिष्ट गोष्टींवर प्रथांवर प्रहार करणारे होते.

मराठीजनांच्या भावविश्वाचे अतूट, अविभाज्य अंग असलेले कविश्रेष्ठ तुकोबाराय साहित्य, कविता, चित्रपटांच्या माध्यमातून आजपर्यंत आपण अनुभवले आहेत. कविकुलगुरू तुकोबारायांच्या जीवनाचे अनेकविध पैलू आहेत. त्यापैकी एक वेगळा पदर आनंदओवरी या एकपात्री नाटकातून उलगडून दाखविण्याचा प्रयत्न रंगमंचावर होत आहे. प्रसिध्द साहित्यिक दि. बा. मोकाशी यांच्या आनंदओवरी कांदबरीवर आधारित प्रसिध्द दिग्दर्शक अतुल पेठे यांनी रंगावृत्ती केलेले हे एकपात्री नाटक नुकतेच

रंगभूमीवर आणले होते. मराठमोळ्या भाविक भक्तांच्या हृदयात स्थान प्राप्त करणारे तुकोबाराय संसारातून परमार्थ साधत महाराष्ट्रातील भागवत धर्माच्या मंदिराचे कळस बनले. कविश्रेष्ठ तुकोबारायांचा जीवनपट साकारण्याचा प्रयत्न आनंदओवरी या नाटकातून केला गेला आहे. आनंदओवरी मध्ये तुकोबांचा माणूस म्हणून शोध तर आहेच पण सर्जनशील भावाने घेतलेला भावाचा भावपूर्ण शोध आहे. आकाशाएवढा तुकोबारायाच्या जीवनाचं दर्शन घडवण्याचा प्रयत्न या एकपात्री नाटकातून खुबीने केला गेला आहे. विविध नाटक असतील किंवा चित्रपटातूनही तुकोबारायांचा जीवनभाव पुढे आला आहे.

ड) पावणे चारशे वर्षांपूर्वी असणाऱ्या समाजाचे चित्रण संत तुकाराम महाराजांच्या अभंगात आहे. तत्कालीन लोकजीवनाचे ते दर्शन आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. तत्कालीन ग्रामणी संस्कृतीतील गावगाडा, अठरापगड जाती–जमाती, पोटजाती, त्यावेळी वर्णभेद आणि कुंटुंब व्यवस्था, कृषी, उद्योग, पर्यावरण, शकुन, अपशकुन, धर्मनिरपेक्षता, देवधर्म, आर्तभक्ती, निसर्ग, लोकीक आणि उपदेशपर रचना आहेत. त्याचबरोर लोकजीवनातील खेळ, लोकसंस्कृती जपणाऱ्या भूमिकांचाही आढावा घेतला आहे. त्यात घोंगडी, खेळ, टिपरी, जोहार, हमामा, विटी दांडू असे खेळांविषयीही रचना दिल्या आहेत. ग्रामीण संस्कृतीचे दर्शनच अभंगांत घडले आहे. 'भेदाभेद भ्रम अमंगळ..' यातून एकात्मतेचा संदेश ते देतात. 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर...' यातून वाढीस चाललेली जातीयता कमी करण्याचा प्रयत्न करतात. हे सांगण्याबरोबर 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे...' अशी भूतदया त्यांच्या ठायी दिसते.

अ.क्र.	लेखक	वय	पत्ता	व्यवसाय	मत
५	बापूसाहेब मोरे	६३	श्रीक्षेत्र देहूगाव, ता. हवेली, जि. पुणे	कीर्तनकार, प्रवचनकार	संत तुकाराममहारांजाची अभंग गाथा लोकजीवनाचा अविभाज्य घटक आहे. प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या माणवी जीवनास प्रेरक अशी ही गाथा शतकानुशतके मानवी जीवनावर अधिराज्य गाजवेल.

बापूसाहेब मोरे (पूर्वाध्यक्ष, देहू संस्था, श्रीक्षेत्र देहूगाव) :

यांच्या मुलाखतीत वारे लोकजीवनाविषयी ही प्रमाणे देतात.तुकोबारायांच्या अभंगाचा समाजजीवनावर झालेला परिणाम

आपुले आपण जाणावे स्वहित । जेणे राहे चित्त समाधान ।।

एक एका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ।।

अवघे धन्य होऊ आता ।स्मरविता स्मरण ।।

काया वाचा मने झाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधेचि ना।।

विश्वास तो करी स्वामीवरी सत्ता । सकळ भोगीता होय त्याचे ।।

समाजउद्धारक तुकोबारायांचा विचार

अवतार तुम्हा घ्यावया कारण । उद्धराया जन जड जीवा ।।

मागे बहुता जन्मी । हेचि करित आलो आम्ही ।

भवतापश्रमी । दुःखे पिडिले निववु त्या ।।

झाडू संतांचे मारग । आडरानी भरले जग ।।

उचिष्ठाचा भाग । शेष उरला तो सेवू ।।

तुका म्हणे तुम्ही चला याची वाटे । भरवशाचे भेटे पांडुरंग ।।

नवसे कन्या पुत्र होती । तरी का करणे लागे पती ।।

जेई वाढोनी केस । मुते आणिती अंगास । ते नव्हती संतजन

तेथे नाही आत्मखुण ।।

सारांश : श्री संत तुकाराममहाराजांच्या अभंग गाथेतील लोकजीवनाच्या अभ्यासातर्गंत साहाय्यक डॉ. रामकृष्णदास लहवितकर (पूर्वप्रमुख संत तुकाराममहाराज अध्यासन,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) तसेच संजय महाराज पाचपोर रामायणाचार्य, अकोला, डॉ. सदानंद मोरे, (पुर्वाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घुमान, पंजाब) व विश्वास मोरे, (वरिष्ठ पत्रकार, दै. लोकमत) तसेच बापूसाहेब मोरे (पूर्वाध्यक्ष, देहू संस्थान, श्रीक्षेत्र देहूगाव) आदींचे सहकार्य लाभले. अशा प्रकारे तुकाराममहाराजांची अभंग गाथा ही दैनंदिन जीवनाची, लोकजीवनाची व अध्यात्मिक जीवनाची अविभाज्य घटक ठरते.

* * *

परिशिष्ट 'क'
गाथेंची मुख्यपृष्ठ, अभंग, मंदिराची छायाचित्रे

विश्वंभर बाबांना आंबीयाच्या वनात सापडलेली श्री विठ्ठल रुक्मिणीची स्वयंभू मूर्ती'



श्री संत तुकाराममहाराजांची श्रीक्षेत्र देहू येथील मूर्ती

महाद्वार, श्री क्षेत्र देहू

श्री संत तुकाराममहाराजांचे जन्मस्थळ
इनामदारांचा वाडा, श्रीक्षेत्र देहू

श्री संत तुकाराममहाराजांचे
गाथा मंदीर, श्रीक्षेत्र देहू



श्री तुकाराम
महाराजांचे
सुंदर शिल्प
आणि
गोपाळपूरा
येथिल
नांदूरकी वृक्ष

वाचा बोलो वेदनीति । करूं संतीं केलें तें ॥



श्री तुकाराम
महाराजांची
जन्मस्थानाची जागा
व श्री तुकाराम
महाराजांची आणि
पत्नी जिजाबाईची
मोहक मूर्ती

धर्म रक्षणासाठीं । करणे आटी आम्हासीं ॥



इंद्रायणी नदीचा नयनरम्य दृश्य आणि वह्या बुडविल्या तो माशांचा डोह



श्री तुकाराम महाराजांची चांदीची पालखी

भेटी लागे जीवा लागलीसे आस

श्रीक्षेत्र देहू प्रवेशद्वार

श्रीक्षेत्र देहू इंद्रायणी नदी

अभंग निर्मिती झालेल्या श्रीक्षेत्र भंडारा डोंगरावरील श्री संत तुकाराममहाराजांची मूर्ती

प्रथम आरती स्थान, अनगडशहा मेघडंबरी, मंदीर.

श्रीक्षेत्र भंडारा डोंगर, इंदोरी, सुदवडी

अभंग निर्मितीस्थान, श्रीक्षेत्र भंडारा डोंगर (कपाट) गुहा

श्री तुकाराममहाराजांचे निर्वाणस्थान